व्यवहार कसा करावा

अर्थात

व्यवहारशास्त्रावरील निवडक निबंध

ॐ तत्सत् ।

व्यवहार कसा करावा ?

अर्थात्

व्यवहारशास्त्रावरील निवडक निबंध.

हा ग्रंथ

दत्तात्रय विष्णु पारखे, एम्. ए.

हेड मास्तर, मिरज हायस्कूल,

यांनीं रचिला.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि' ॥

गीता अ. २—४७.

शके १८४७ इ. स. १९२५.

किंमत १-८-०

Printed by S. T. Ajgaonkar, B. A., at Manoranjan Press,
3, Sandhurst Road, Girgaon, Bombay 4.
Published by Dattatraya Vishnu Parkhe, M. A., at Miraj (S. M. C.)

प्रास्ताविक दोन शब्द

"लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः। उभयत्र सुखोदर्कः"
(शां. २५८-४)

भावार्थः—'लोकव्यवहार चालून उभय लोकीं कल्याण व्हावें म्हणून धर्माधर्माचे नियम केले आहेत.'

१ 'न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥'
(गी. ३-५.)

'गीतेंतील या प्रसिद्ध वचनांत श्री भगवंतानीं सांगितलेलें आहे कीं कोणी झाला तरी (कांहींना कांहीं) कर्म केल्यावांचून क्षणभर देखील केव्हांहि रहात नाहीं. प्रकृतीचे गुण परतंत्र झालेल्या प्रत्येक इसमास (नेहमीं कांहींना कांहीं तरी) कर्म करण्यास लावीत असतात.' भगवंतानीं सांगितल्याप्रमाणें मनुष्य प्राणी जन्मास आल्यापासून तो इहलोकची यात्रा संपवीपर्यंत त्याच्यामागें अगणित कर्मे लागून चुकलेलीं असतात. अर्थातच हीं कर्मे-व्यावहारिक असल्यानें तीं अनंत असणार. त्यांचे वर्गीकरण करून पुनः त्यांचें सर्वांगसुंदर विवेचन करणें म्हणजे पिपिलिकेनें सागर ओलांडण्याचेंच धाडस करण्याचें मनांत आणण्यासारखें होय. तरी पण, मनुष्याचें कर्म काय किंवा व्यवहार काय, तें एक शास्त्र आहे, त्या शास्त्रास ठरावीक म्हणून कांहीं नियम आहेत व त्या नियमांबरहुकूम मनुष्यप्राण्यानें व्यवहारकर्म करावें असाच ईश्वराचा स्पष्ट आदेश आहे. आणि-ही गोष्ट निसर्गाच्या नियमबद्ध चाललेल्या व्यापारांवरून स्पष्टतर दिसून येत आहे. तेव्हां असे नियम तरी व्यवहाराबाबत काय आहेत, त्या नियमांबरहुकूम मनुष्यप्राण्यानें आपली चालचलणूक कशी ठेवावी याविषयींची स्थूल कल्पना देण्याचा प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश आहे.

२ वस्तुतः व्यवहारशास्त्र हें गीतेंतील कर्मयोग शास्त्राचें लहान भावंडच होय. गीतेंतील 'कर्मयोगा'ची शिकवण प्रसिद्ध आहे:—

"तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥"
गी. ३-१९.

या वचनांतील ‘ असक्तः ’ ‘ असक्तो ’ हे शब्द विविक्षित असल्यामुळें कर्मयोगशास्त्राची मदार काय ती या विशिष्ट शब्दांवरच आहे. व्यवहार-शास्त्रांतील ‘ कर्मयोग्या’ची मदार ‘ सक्तः’ या शब्दावर असलेली जरी दिसून आली तरी त्याचें कर्म ‘ परार्थ ’ साधून देण्याकरितां कारणीभूत होत असतें. हाच काय–तो दोन शास्त्रांतील मुख्य फरक आहे.

३ हल्लींच्या शिक्षणक्रमांत व्यवहारशास्त्रासंबंधीं एखादा ग्रंथ उपलब्ध नसल्यानें तरुणांस सामाजिक बंधनें कोणतीं, त्यांची पालणूक कशी काय करावयाची व व्यवहार–संसार यांची जोपासना करतांनाच गीतेंतील ‘लोकसंग्रहा’बाबत महासिद्धान्ताचा धडा गिरवून संसाराची परमार्थाशीं सांगड घालून देणारा एखादा ग्रंथ–मग तो छोटेखानी कां होईना–प्रसिद्ध झाला असतां मराठी वाङ्मयांतील एक मोठी उणीव दूर होईल या हेतूनें या पुस्तकांतील कांहीं निबंध महाराष्ट्रांतील प्रसिद्ध ‘ मासिक मनोरंजनां’त प्रथम प्रसिद्ध केले. संपादकांच्या आग्रहाच्या विनंतीवरून ‘ प्रफुल्लतेच्या खास अंकांत’ व ‘ राजारामीयन ’ या त्रैमासिकांत आणखी दोन निबंध प्रसिद्ध केले. अशा रीतीनें प्रसिद्ध झालेले सर्व निबंध महाराष्ट्रांतील वाचकवर्गास पसंत पडल्याचें दिसून आलें–एवढेंच नव्हें तर कित्येक विद्वान मित्रांनीं प्रसिद्ध झालेले सर्व निबंध एकत्र करून विषयास अवश्य वाटणाऱ्या आणखी निबंधांची जोड देऊन एक पुस्तक मग तें लहान झालें तरी चालेल–प्रसिद्ध करण्याबद्दल प्रेम-भावानें आग्रहपूर्व विनंति मला केली. आधींच मनांत प्रतीत झालेली जाणीव व विद्वान मित्रांचें प्रोत्साहन या दोन गोष्टीच हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास कारणीभूत झाल्या आहेत.

४. हें पुस्तक तयार करतांना ज्या पुस्तकांचा मला उपयोग झालेला आहे; त्यांचा उल्लेख योग्य ठिकाणीं केलेला आहेच. तरीपण गीतारहस्य, दासबोध, डॉ. भांडारकर व न्या. रानडे या विद्वद्वर्यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें व ‘ कार्लाईल ’चें सार्टर रिसार्टस (Sartor Resartus) या पुस्तकांचा मला विशेष उपयोग झालेला आहे, हें या ठिकाणीं नमूद करून ठेवणें माझें कर्तव्य आहे.

५ या ग्रंथाविषयीं विशेष आस्था दाखवून प्रो. न. ग. दामले व डॉ. पी. एल्. वैद्य या माझ्या विद्वान मित्रांनीं उपयुक्त सूचना केल्या; त्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.

६ गुरुवर्य प्रि. गो. चि. भाटे यांनीं माझ्या पुस्तकासंबंधीं उपयुक्त सूचना केल्या एवढेंच नव्हे तर माझ्या विनंतीस मान देऊन त्यांनीं सुंदर प्रस्तावना लिहून मला उपकृत केलें आहे. गुरुवर्यांचे त्याबद्दल मी मनःपूर्वक आभार मानीत आहे.

७ श्रीमंत राजेश्री सर गंगाधरराव गणेश ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन के. सी. आय. ई., मिरज संस्थानाधिपति यांना या पुस्तकाच्या हस्तलिखित प्रतीतील कांहीं प्रकरणें वाचून दाखविलीं. श्रीमंतांनीं कांहीं उपयुक्त सुचना केल्या; त्यांचा उपयोग मला फार झालेलाच आहे. या पुस्तकास श्रीमंतांकडून प्रोत्साहनाची जोड मिळाल्यामुळें व त्यांनीं उदार अंतःकरणानें सक्रीय सहानुभूति दाखविल्यामुळें हें पुस्तक प्रसिद्ध करणें शक्य झालें. श्रीमंतांनीं प्रोत्साहन देऊन सक्रीय सहानुभूति दाखविल्याबद्दल त्यांचे आभार मी कोणत्या शब्दांत मानावें हेंच मला कळत नाहीं. तरी पण लौकिक रिवाज पतकरल्याशिवाय गत्यंतरच नसल्यामुळें सदर रिवाजास अनुसरून मी नम्रभावानें आभार मानण्याची श्रीमंतांची परवानगी घेत आहें.

८ हिंगणेंबुद्रुक येथील महिलाश्रमांतील प्रोफेसर वा. म. जोशी एम्. ए, फर्ग्युसन कॉलेज पुणें येथील माझे मित्र प्रो. न. ग. दामले एम्. ए. व डेक्कन कॉलेज पुणें येथील प्रो. श्री. नि. चापेकर एम्. ए., एल्एल्. बी. व प्रो. द. वा. पोतदार बी. ए., न्यू पूना कॉलेज पुणें, या सद्गृहस्थांनीं विनंति केल्याप्रमाणें अभिप्राय दिलेले आहेत. ते या पुस्तकास जोडलेले आहेत. या सर्व विद्वान् मित्रांचा मी फार ऋणी आहें.

९ मनोरंजन प्रेसचे मॅनेजर श्री. शां. ता. आजगांवकर, बी. ए. यांनीं या पुस्तकाबद्दल विशेष कळकळ दाखवून छपाईचें वगैरे काम सुबक करून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

१० शेवटीं, संकल्प केल्याप्रमाणें श्रीपरमेश्वराच्या कृपेनेंच हें माझें वाङ्मयात्मक पहिलेंच पुस्तक प्रसिद्ध होत आहे; तें जनतारूपी जनार्दनास नम्रभावें वंदन करून महाराष्ट्रजनतेच्या सेवेस प्रेमभावानें सादर करीत आहे.

मिरज,
२१।१।२६.

दत्तात्रय विष्णु पारखे.

अभिप्राय

(१) प्रो. वा. म. जोशी एम्. ए., 'अनाथ बालिकाश्रम' हिंगणें, पुणें:—

'व्यवहार कसा करावा?' हें रा. दत्तात्रय विष्णु पारखे एम्. ए., यांनीं लिहिलेलें पुस्तक मी वाचून पाहिलें. शाळेंतील विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून देण्यास तें फार चांगलें आहे. भाषा सुबोध व आकर्षक आहे आणि विचार-सरणी सरळ, सयुक्तिक व प्रत्यय उत्पन्न करणारी आहे. हें पुस्तक वाचलें असतां मुलांच्या मनावर चांगले संस्कार होतील व व्यवहारांतील मार्ग ग्रंथ वाचनानें जेवढा सुकर होणें शक्य आहे तेवढा होईल. शाळांतील व इतर वाचनालयांत हें पुस्तक अवश्य ठेवावें व कुटुंबी गृहस्थांनीं मुलामुलींनां वाचण्यास तें अगत्य द्यावें, असें माझें मत आहे. १९।१।१२५.

(२) प्रो. न. ग. दामले एम्. ए; फर्ग्युसन कॉलेज, पुणें:—

रा. द. वि. पारखेकृत 'व्यवहार कसा करावा?' अर्थात् 'व्यवहार-शास्त्रावरील निवडक निबंध' या पुस्तकाचा बराचसा भाग मी वाचून पाहिला. निबंधाची भाषा सरळ व सुबोध आहे. विविध विषयांवर लेखकानें आपले विचार नामांकित ग्रंथकारांच्या वचनांचा आधार घेऊन चांगल्या तऱ्हेनें मांडले आहेत. विषयांची निवड चांगली असून ठिकठिकाणीं सुंदर वेचे व समर्पक दाखले दिले आहेत. विचार बहुधा सर्वसंमत असेच असून सद्भाव-नांना पोषक असे आहेत. हायस्कुलांतील वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना हें पुस्तक बोधप्रद व उपयुक्त वाटल्यावांचून रहाणार नाहीं. रा. पारखे यांच्या परिश्रमाचें शाळाखातें, शिक्षक व विद्यार्थी यांजकडून योग्य चीज होईल अशी आशा आहे. २०।११।१९२५.

(३) प्रो. श्री. नि. चापेकर एम्. ए. एल्एल्. बी. डेक्कन कॉलेज पुणें:—

सद्यःस्थितींत अत्यंत अवश्य अशा या विषयावर रा. रा. पारखे यांनीं नवीन धर्तीचें बऱ्याच अंशीं स्वतंत्र व आटपशीर असें पुस्तक लिहिल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. पुस्तक फार परिश्रमपूर्वक लिहिल्याचें दिसत असून विषयांच्या मुख्य अंगाची मांडणीहि क्रमशः सुसंगत व व्यवस्थित प्रकारची झाली आहे. विवेचनाच्या ओघानुसार येणाऱ्या मुद्यांच्या पुष्टीकर-

णार्थ जीं अनेक संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषेंतील अभियुक्त ग्रंथकारांचीं अवतरणें दिलीं आहेत तींहि फार मार्मिक व स्फूर्तिदायक असून, साधारण वाचकांच्या बहुश्रुतपणांत चांगलीच उपयुक्त भर घालण्यासारखीं आहेत. भाषाहि अशासारख्या विषयाच्या प्रतिपादनास जशी हवी तशी सुबोध, प्रायः व्याकरणशुद्ध असून प्रसंगविशेषीं अलंकारिक व उत्कट कळकळीची झाल्यामुळें, उठावदार व परिणामकारक वाटते. पहिल्या प्रकरणांत रा. रा. पारखे यांनीं पुस्तकांतील निरनिराळया प्रकरणांत प्रतिपादन केलेल्या विषयांचा थोडक्यांत मुद्देसूद गोषवारा दिला आहे तो चांगला असून पुस्तकाची एकंदर मांडणी ध्यानांत येण्यास व पुस्तक वाचनाविषयीं वाचकाच्या मनांत जिज्ञासा जागृत करण्यास तो फार उपयोगी आहे. थोडक्यांत व्यापक व मार्मिक विवेचनाच्या दृष्टीनें शेवटचीं दोन-१४ वें व १५ वें ' आपलें जीवित रमणीय करण्यास काय हवें ?' ' व्यावहारिक मोक्ष मिळविण्याचा उपाय '-हीं प्रकरणें विचारी वाचकांस विशेष बोधप्रद वाटतील असें मला वाटतें.

हायस्कुलें वगैरे दुय्यम शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत, ' शीलविकासात्मक पुस्तकांचें विशेष महत्व असतें. तशा दृष्टीनें, आनुषंगिक वाचनासाठीं किंवा इतर रीतीनें हें पुस्तक तरुण व होतकरू विद्यार्थ्यांच्या हातीं दिल्यास त्यापासून त्यांना फार फायदा होईल असें माझें मत आहे.

असें नवीन धर्तीचें उपयुक्त, आटपशीर व वाचनीय पुस्तक लिहिल्याबद्दल मी रा. रा. पारखे यांचें पुनः अभिनदन करितों व अशीच उपयुक्त वाङ्मयसेवा ते यापुढेंहि अधिकाधिक करीत रहातील अशी मनःपूर्वक इच्छा प्रदर्शित करितों.

ता. १४।१२।२५.

प्रो. द. वा. पोतदार बी. ए. न्यू पूना कॉलेज, पुणें:—

रा. रा. द. वि. पारखे एम्. ए. मिरज, यांनीं लिहिलेलें ' व्यवहार-शास्त्रावरील निवडक निबंध ' हें पुस्तक मी वाचून पाहिलें. सांप्रतच्या शिक्षणां-तून व्यवहार व नीति यांजविषयीं फारच थोडा बोध विद्यार्थ्यांस मिळतो. आणि त्यामुळें शीलसंवर्धनाचें महत्कार्य, जें सुशिक्षणाचें खरें ध्येय होय, तें अगदींच अल्प प्रमाणानें घडत आहे. हा दोष दूर करण्याचे कांहीं प्रयत्न मराठी भाषेंत व्यवहार व नीतिविषयक सुबोध ग्रंथ लिहून कित्येकांनीं केलेले

प्रसिद्ध आहेत. रा. पारखे यांनीं त्या दिशेनें आणखी एक प्रयत्न केला आहे आणि व्यवहार कसा करावा हें तरुण विद्यार्थ्यांस समजावून सांगितलें आहे. रा. पारखे यांचे विचार प्रौढ, उदार व सच्छीलपोषक आहेत. आणि त्यांत जागजागीं थोरांचे अनेक स्थलींचे भिन्न भिन्न उद्गार व वचनें भरपूर दिलीं असल्यानें त्यांचाहि लाभ विद्यार्थ्यांस सहजांत होतो.

व्यवहारनीतींतली कटु तत्त्वें परिणामीं अमृतमय असतात. तथापि तीं कटु तत्त्वें जर गोड भाषेंत मांडता आलीं, तर खळखळ न करितां मुलें जशी गोड औषध पितात, तसें वाचकहि भाषेच्या मोहनीला वश होऊन विचारांच्या तडाक्यांत सांपडतो आणि मग सारी खळबळ निमाल्यावर सद्विचारांचा सांका तळांत थोडा तरी सांचल्याशिवाय रहात नाहीं. रा. पारखे यांची भाषा प्रौढ आहे. त्यांचीं भाषांतरें सरस वठलीं आहेत, परंतु विषयच जात्या रुक्ष पडल्यामुळें भाषेला तेंच रूप येऊं देणें अपरिहार्य झालें आहे. पुनरावृत्तीचा सुयोग येईल त्या वेळीं रा. पारखे आपलें सर्व कौशल्य खर्चून मनोरम भाषेची जोड ग्रंथास करून देतील अशी आशा आहे. तसेंच उतारे जरा कमी केले तर बरें होईल; उताऱ्यांच्या दाट झाडींतून तत्त्वांचा हात धरून आपली वाट चालणें वाचकांस अवघड जातें. आमच्या महाराष्ट्र भाषेंत तुकोबांची गाथा किंवा पंतांची कविता वाचणाऱ्यास नूतन नीतिग्रंथांची तेवढी अवश्यकताच नाहीं असें मला वाटतें. हे प्राचीन ग्रंथ अभ्यासपुस्तकांचें बरेंच कार्य करतील आणि रा. पारखे यांची प्रस्तुतची 'व्यवहारपंचदशी'–कारण निबंध १५ च आहेत–जोडीनें वाचण्याला फार उपयोगी पडेल. असेच ग्रंथ रा. पारखे यांनीं लिहावे आणि श्री. बाळासाहेबांच्या कृपासावलींत त्यांची योग्य जोपासना व्हावी असें इच्छून पुरें करतों.

पौष शु. २।४७.

प्रस्तावना

मैलच्या मैल वहात जाणाऱ्या नदीच्या थडीनें आपण चालत गेलों तर ती नदी बहुरूपा आहे असें आपल्या दृष्टीस पडतें. कोठें रुंद तर कोठें अरुंद; कोठें खोल तर कोठें उथळ; कोठें तलावासारखी शांत तर कोठें समुद्रासारखी खवळलेली; अशा नानारूपानें नदी आपल्याला चकीत करते; केव्हां तर नदी एकदम विलक्षण वळण घेऊन उलट दिशेनें वाहत जाते; तेव्हां जी आपण सारखी पहात आलों तीच काय ही नदी अशी आपल्याला शंका येते. इतकें नदीचें स्थित्यंतर होऊन जातें. जी गोष्ट नदीच्या प्रवाहाला लागू आहे तीच गोष्ट कोणत्याहि देशांतील किंवा कोणत्याही लोकांच्या वाङ्मयप्रवाहासहि लागू आहे. उदाहरणार्थ, इंग्रजी वाङ्मय घ्या; चॉसरपासून आजतागाईत इंग्रजी वाङ्मयाचा प्रवाह सारखा चालू आहे. पण त्यांत वेळोंवेळीं किती विलक्षण फरक झालेले आहेत व निरनिराळ्या काळच्या वाङ्मयाच्या स्वरूपांत केवढें अंतर पडलेलें आहे ! हीच गोष्ट मराठी वाङ्मयालाही लागू आहे. मराठी वाङ्मयाचा प्रवाह ज्ञानेश्वरापासून–नव्हे त्यांच्यापूर्वीच्या मानभावी मताच्या मराठी ग्रंथांपासून–आजतागाईत चालू आहे. पण या प्रवाहाची किती विविधरूपें दृष्टीस पडतात ! व विशेषतः इंग्रजी विद्येचा इकडे प्रसार झाल्यापासून मराठी वाङ्मयामध्यें केवढें स्थित्यंतर होऊन गेलें आहे !

मराठींतील जुनें वाङ्मय प्रायः पद्यमय, पारमार्थिक, निवृत्तिपर, मोक्षमार्ग-दर्शक व भक्तिभावोत्तेजक आहे. संसार हा असार आहे; प्रपंचपसारा क्षणभंगुर आहे; मानवी जीवित् कष्टमय आहे; तेव्हां असल्या असार, क्षणभंगुर व कष्टमय जीविताकडे दुर्लक्ष करून मनुष्यानें आपलें सर्व लय परमार्थाकडे लावून संसारपाशांतून होईल तितकी लवकर आपली सुटका करून घ्यावी. हेंच जुन्या वाङ्मयाच्या उपदेशाचें सार आहे. पण, इंग्रजी विद्या, इंग्रजी वाङ्मय व पाश्चात्य सुधारणेची सुखसोयींची साधनें इकडे आल्यापासून मराठी वाङ्मय पूर्वीच्या अगदीं उलट दिशेनें चाललेलें दिसत आहे. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा महामंत्र ह्मणजे

'तथ्य पूर्ण संसार खरा हा मन लावूनियां जगा कसे.'
सारांश, पाश्चात्य सुधारणेच्या संस्कारानें आपल्याइकडील पूर्वीच्या मानवी जीवितविषयक कल्पना पार बदलून टाकल्यामुळें वाङ्मयाचें स्वरूपहि पार बदलून गेलें आहे ह्मणून जुन्या वाङ्मयाच्या अभिमान्यांना हल्लींच्या ऐहिक विषयांविषयींच्या कविता व विशेषतः हल्लींच्या संसारांतल्या सामान्य प्रसंगाविषयींच्या व क्षुल्लक वस्तूविषयक कविता अगदीं नादान व नापसंत वाटतात. पण वर उल्लेख केल्याप्रमाणें मानवी जीविताबद्दल कल्पनाक्रांति झाल्यामुळें काव्यविषयांत व काव्यस्वरूपांत ही क्रांति होणें अपरिहार्य होतें. अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वाङ्मयाकडे दृष्टि फेकिल्यास ही क्रांति प्रतीत होते. कादंबऱ्या, नाटकें, स्फुट काव्यें, चरित्रें, इतिहास व निबंध वगैरे वाङ्मय मराठींत झपाट्यानें वाढत आहे. अर्थात् या सर्व वाङ्मयाचा जनमनावर परिणाम पारमार्थिक ध्येयाकडे दुर्लक्ष करविण्यांत व ऐहिक ध्येयाकडे लय लावण्यांत होत आहे यांत शंका नाहीं.

पण, हें ऐहिक ध्येय कोणते हा प्रश्न पुढें येतो. पाश्चात्य वाङ्मयानें 'मन लावुनिया जगा कसे' हें तत्व शिकविलें खरें व हें तत्व आमच्या जनमनाला लवकर पटलें हेंहि खरें. पण जगांत जास्त जगून काय साधावयाचें ? पाश्चात्य वाङ्ममयाचा याबद्दल ठाम सिद्धान्त आहे कीं जगांत जें जास्त जगावयाचें तें व्यक्ति किंवा कुटुंब यांच्या हिताकरितां नव्हे तर राष्ट्राच्या किंबहुना मानवजातीच्या हिताकरितां जगावयाचें. आमच्यांतील जुन्या पारमार्थिक मोक्षाच्या ध्येयाबाबत जनमतांत निरुत्साहता उत्पन्न होऊन ऐहिक ध्येयाबद्दल आवड वाढली खरी. पण त्याबरोबरच जनहितलालसा उत्कट तऱ्हेनें वाढली नाहीं व ह्मणून आमच्यांतील अलीकडचे लोक स्वार्थलंपट व आपस्वार्थी होत चालले आहेत कीं काय अशी शंका केव्हां केव्हां मनांत येते. असें खरोखरींच घडून आल्यास 'तेल गेलें तूप गेलें, धुपाटणें हातीं आलें' अशी आमची स्थिति व्हावयाची; तेव्हां, वेळींच सावध राहून तरुणांचे मनांत ऐहिक ध्येयाच्या आवडीबरोबरच जनहिताची आवडहि उत्पन्न करण्याचा वाङ्मयभक्तांनीं प्रयत्न केला पाहिजे; असो.

अशा प्रकारचा प्रयत्न माझे विद्यार्थी मित्र मिरज हायस्कूलचे हल्लींचे हेडमास्तर रा. पारखे यांनीं आपल्या 'व्यवहार कसा करावा ?' या नांवाच्या

निबंधसंग्रहांत केला आहे. यापैकीं कांहीं निबंध त्यांनीं पूर्वी मासिक मनोरंजनांत प्रसिद्ध केले होते. त्यांतच नवीन निबंधांची भर घालून त्यांनीं आपलें पुस्तक तयार केलें व मित्रधर्मानुरूप व शेजारधर्मानुरूप मी त्यांची विनंति मान्य केली. व आजची छोटीशी प्रस्तावना लिहून मी वचनमुक्त होत आहे.

रा. पारखे यांच्या पुस्तकाचा उद्देश ' व्यावहारिक मोक्ष ' मिळविण्याच्या उपायचिंतनाचा आहे. जुन्या कल्पनेप्रमाणें 'व्यावहारिक मोक्ष' हा शब्दसमुच्चय विरोधात्मक आहे. व्यवहार व मोक्ष या मुळीं परस्परविरोधी गोष्टी आहेत; तेव्हां त्यांचा संयोग अशक्य आहे. पण पाश्चात्य सुधारणेच्या संसर्गानें ' व्यावहारिक मोक्ष ' ही कल्पना आतां फारशी विरोधी भासत नाहीं. आपलें या जगांतलें व या आयुष्यांतलें ध्येय काय व तें मिळविण्यास काय केलें पाहिजे हें सांगणें बदललेल्या कल्पनाप्रमाणें सयुक्तिकच वाटतें. रा. पारखे यानीं इंग्रजी, संस्कृत व मराठी अशा तीन्हीं वाङ्मयांचा परिश्रमपूर्वक अभ्यास करून त्यांतील सुंदर उपदेश करणाऱ्या उताऱ्यांनीं आपला ग्रंथ अलंकृत केला आहे. त्यांनीं जागोजागीं दिलेले उतारे खरोखरींच सुविचारपरिप्लुत असून त्यांच्या वाचनानें व मननानें तरुण मुलांच्या मनावर चांगला परिणाम होईल यांत शंका नाहीं. आपलें ऐहिक ध्येय म्हणजे केवळ कुटुंबभरण किंवा सुखवृद्धि नव्हे तर या स्वार्थी ध्येयाबरोबरच प्रत्येकानें समाजहिताचें ध्येयहि आपल्यापुढें ठेवून स्वार्थ व परार्थ असे दुहेरी ध्येय गांठावें असा कळकळीचा उपदेश रा. पारखे यांनीं आपल्या पुस्तकांत केला आहे. हें दुहेरी ध्येय गांठण्यास मनुष्याची उत्तम दानत पाहिजे हेंहि रा. पारखे यांनीं आपल्या ग्रंथांत ध्वनित केलें आहे.

तेव्हां दानत किंवा दानतीचा माणूस म्हणजे काय, इकडे थोडें लक्ष देणें प्राप्त आहे. अत्यंत लहरी माणसास दानतीचा माणूस ह्मणतां येणार नाहीं. कारण लहरी माणूस मनांतल्या क्षणिक लहरीवर तरंगत जातो. त्याच्या वर्तनांत किंवा वागणुकींत निश्चितता मुळींच नसते. तो आज एक गोष्ट करील तर उद्यां दुसरीच गोष्ट करील. अशा लहरी माणसासच चंचलचित्त माणूस ह्मणतात. तसेंच दुर्बळ मनाचा माणूसहि दानतीचा माणूस ह्मणतां येणार नाहीं. ' म्हातारा आणि त्याचा बैल ' या इसाबनीतींतील गोष्टीप्रमाणें वागणारा किंवा संस्कृतांतील तीन धूर्तांच्या गोष्टींतील ब्राह्मणाप्रमाणें वागणारा माणूस

परप्रत्ययनेयबुद्धि असतो; व अशा माणसाला दानतीचा माणूस म्हणतां येणार नाहीं. तसेंच विलक्षण दुराग्रही किंवा प्रतिनिविष्टमूर्खांप्रमाणें वागणाऱ्या माणसालाहि दानतीचा माणूस म्हणतां येणार नाहीं. दानतीमध्यें खऱ्या कर्तव्याची स्पष्ट व योग्य जाणीव हा विचार प्रधान अंश व त्या कर्तव्याबरहुकूम वागण्याचा दृढनिश्चय हा इच्छाशक्तिप्रधान दुसरा अंश असतो. म्हणजे आपलें कर्तव्यकर्म कोणतें हें मनुष्याला बरोबर कळण्याची शक्ति पाहिजे व तदनुरूप वर्तन करण्याची निश्चयी इच्छाशक्ति पाहिजे. कर्तव्याबद्दल भलत्या भलत्या कल्पना असून नुसती निश्चयी इच्छाशक्ति असेल तर तो मनुष्य धर्मवेडा (Fanatic) बनेल. बरें, कर्तव्याबद्दल योग्य कल्पना असून चंचलवृत्ति किंवा दुर्बल इच्छा शक्ति असेल तर तो मनुष्य दांभिक व कर्तव्यशून्य बनेल; म्हणून दानतीच्या माणसांमध्यें कर्तव्याची योग्य जाणीव व दृढनिश्चयी इच्छाशक्ति असे दोन्ही गुण पाहिजेत. अशा दानतीच्या माणसांच्या हांतूनच ऐहिक ध्येय साध्य होईल यांत शंका नाहीं. असो.

रा. पारखे यांच्या पुस्तकांतील निरनिराळ्या प्रकरणांत तरुण मंडळीला आपल्या कर्तव्याची योग्य जाणीव व्हावी व त्यांच्या मनामध्यें दृढनिश्चयी इच्छाशक्ति बाणावी अशाच प्रकारचें उपदेशपर विवेचन आलेलें आहे. यामुळें रा. पारखे यांचें पुस्तक मुलांमुलींच्या हातीं देण्यास फार योग्य आहे. त्या पुस्तकाच्या वाचनानें मनावर चांगलें संस्कार उमटतील यांत मला शंका वाटत नाहीं. रा. पारखे यांनीं बरेच श्रम घेऊन वाचनीय असें हें पुस्तक मराठी वाचकांस सादर केलें आहे. त्याचा संग्रह करून रा. पारखे यांच्या श्रमाचें चीज करणें मराठी वाचकवर्गाकडे व मराठी वाङ्मयाच्या वाढीस मदत करणाऱ्या संस्थांकडे आहे.

विलिंग्डन कॉलेज
ता. २०।१।२६ } गोविंद चिमणाजी भाटे.



श्रीमंत सर गंगाधरराव गणेश ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन,

के. सी. आय्. ई.,

मिरज–संस्थानाधिपति.

श्रीगणेशाय नमः

अर्पणपत्रिका

श्रीमंत राजश्री सर गंगाधरराव गणेश
ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन, के. सी. आय्. इ.

मिरजसंस्थानाधिपति

यांचे सेवेसी.

श्रीमंतांच्या अंगीं वास करीत असलेल्या अमूल्य अशा अनेक गुणांविषयीं माझ्या मनामध्यें वसत असलेला प्रेमादरभाव व्यक्त करण्याचें दृश्य चिन्ह म्हणून हें ग्रंथरूपी सुमन श्रीमंतांच्या सेवेस अर्पण केलें असे.

आपला नम्र,

ग्रंथकर्ता.

व्यवहार कसा करावा ?

अर्थात्

व्यवहारशास्त्रावरील निवडक निबंध.

या पुस्तकांतील विषयांची प्रकरणशः

अनुक्रमणिका.

श्रीगणेशायनमः

ॐतत्सत्.

व्यवहार कसा करावा ?

अर्थात्

व्यवहारशास्त्रावरील निवडक निबंध.

प्रकरण पहिलें.

विषयप्रवेश.

सर्वेषां यः सुहृन्नित्यं सर्वेषां च हिते रतः ।
कर्मणा मनसा वाचा स धर्मं वेद जाजले ॥

(महाभारत शांति २६१-९)

अर्थः—" कर्मांनीं, मनानें व वाचेनें सर्वांच्या हितांत गढलेला व सर्वांचा जो नित्य स्नेही त्यालाच हे जाजले, धर्म कळला (म्हणावयाचा.")

प्रस्तुत विषय हल्लींच्या काळीं तर फार अगत्याचाच होऊन बसलेला आहे. मानवी संबंध, मग ते कौटुंबिक असोत अगर सामाजिक असोत, त्यांची जोपासना करण्यास व्यवहाराचे मूलभूत सिद्धान्त काय, त्या सिद्धान्तांस अनुसरून आपलें वर्तन कसें ठेवावें—या व अशा प्रश्नांकडे कौटुंबिक व सामाजिक दृष्टीनें मनुष्यानें आपलें लक्ष पुरविणें जरूरीचें होऊन गेलेलें आहे. या प्रश्नांच्या सोडवणुकीवरच त्याचें श्रेयस् म्हणा, प्रेयस् म्हणा, अवलंबून असतें. आपआपल्या समाजांतील कित्येक कुटुंबांची व संस्थांची स्थिति ध्यानांत घेतां त्यांची स्थिति समाधानकारक आहे, असें म्हणण्यास फारशी जागा नाहीं. ही स्थिति असमाधानकारक कां ? या प्रश्नाची मीमांसा करतां बहुसंख्याक लोक

वागणुकीच्या विविक्षित नियमांकडे लक्ष पुरवीत नाहींत, त्यामुळें त्यांच्या हांतून आपापल्या हितसंबंधाची पाळणूक होत नाहीं असेंच आपल्यास दिसून येत असतें. तेव्हां हे वागणुकीचे नियम काय ? अर्थात् आपापले हितसंबंध रक्षण करण्याचे मार्ग कोणते ? थोडक्यांत हें व्यवहारशास्त्र आहे तरी काय ? याविषयींची चर्चा पुढील प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

आतां, पुढील प्रकरणांची संगति दाखविण्यापूर्वीच 'व्यवहार'–या शब्दाचा पुढील प्रकरणांत जागोजागीं जो अर्थ अभिप्रेत आहे तो या ठिकाणीं सांगून टाकणें सोईचें होणार आहे.

'व्यवहार' या शब्दाचे अर्थ मोल्स्वर्थ खालीलप्रमाणें देतोः—

(1) Operation of action generally, work, exercise.
(2) Procedure, practice, course of action or being.
(3) Trade, Traffic.
(4) The Practice of the Courts of law.
(5) A law suit.

व्ही. जी. आपटे यांच्या कोशांत या शब्दाचे अर्थ खालीलप्रमाणें आहेत.

व्यवहारः—(१) परस्परांमधील देवघेव, (२) व्यापार.
(३) धंदा, (४) **वर्तन**, (५) लोकरीति, (६) न्याय,
(७) शिष्टाचार, **वर्तनव्यवस्था.**

व्यवहारशास्त्रांत 'व्यवहार' या शब्दाचे अर्थ मोल्स्वर्थनें सांगितल्याप्रमाणें Course of action or being अगर आपटे यांच्या कोशांत दिल्याप्रमाणें वर्तन, वर्तनव्यवस्था हेच अर्थ अभिप्रेत असून त्यांचा उपयोग पुढील प्रकरणांत ठिकठिकाणीं केलेला आहे असें दिसून येईल.

दुसरा शब्द ह्मणजे **नीति**; या शब्दाचा अर्थ मोल्स्वर्थनें दिलेला ह्मणजे Rules for Conduct हाच अभिप्रेत असून त्याचा उपयोग पुढील प्रकरणांत केलेला आहे.

तिसरा शब्द–**योग**. टिळकांनीं गीतारहस्यांत सांगितल्याप्रमाणें या शब्दाचे अर्थ पुढीलप्रमाणें आहेत. योग हा शब्द 'युज्' ह्मणजे जोडणें, या धातूपासून झाला असून त्याचा धात्वर्थ 'जोड, **जुळणी, मिळवणी, संगति–एकत्रावस्थिति**' असा आहे. व व्यवहारशास्त्रांत यांपैकीं 'जुळणी, मिळवणी, संगति, एकत्रावस्थिति हे अर्थ अभिप्रेत असून 'व्यवहारयोग' ह्मणजे

चर्तना–वागणुकी–मधील जुळणी, संगति, एकसूत्रीपणा हाच अर्थ व्यवहार-शास्त्रावरच्या पुढील प्रकरणांत अभिप्रेत आहे. याप्रमाणें मुख्य मुख्य शब्दांची परिभाषा येथें नमूद करून पुढील प्रकरणांची संगति कशी लावावयाची याचा थोडक्यांत या ठिकाणीं विचार करणें चांगलें.

गेल्या पांच पन्नास वर्षांमध्यें आपल्या विचारसरणीमध्यें व रहाणीमध्यें जे इष्ट अनिष्ट फेरबदल झालेले आहेत, त्यांमध्येंच आपल्या कौटुंबिक रहाणीचा फेरबदल फार महत्त्वाचा समजला पाहिजे. आज समाजांतील पुष्कळ कुटुंबांकडे दृष्टि फेंकिल्यास आपणांस दिसून येतें कीं, पुत्र मातेस विचारीनासा झालेला आहे; तर पिता मुलास भीक घालेनासा झालेला आहे; मग बहीण भाऊ व इतर आप्तगोत्र यांचे संबंध दूरच राहोत. या शोचनीय स्थितीचा निष्कर्ष काढतां आपणांस कळून चुकेल कीं, 'आदर' या पवित्र भावनेस मनुष्यप्राणी पारखा होत चाललेला आहे. ही भावनाच नामशेष होत चालली म्हणजे 'देवाण घेवाण' या वृत्तीस जोराचें चालन मिळत जातें व कुटुंबांतील निस्सीम प्रेमभाव लयास जात असतो. एकदा प्रेमाच्या संबंधास ओहटी लागल्यावर जो तो आपापल्यापुरता पाहतो, विचार करतो व आपली राहणी ठेवतो. यामुळेंच कुटुंबांतील घटक अलग अलग होत जाऊन कुटुंबच्या कुटुंब विस्खलित होऊन जात असल्यास नवल नाहीं '**मातृदेवो भव**' या प्रकरणांत 'मातृविषयक' उल्लेख असला तरी सर्व कौटुंबिक स्थितीचें आधुनिक काळांतील चित्र रेखाटण्याचाच उद्देश आहे ही गोष्ट दृष्टिआड करतां कामा नये. (प्रकरण २)

अशा तऱ्हेनें आधुनिक कौटुंबिक स्थितीचें वर्णन करून त्यांमधील गुणदोषांची चर्चा करून, ती स्थिति सुधारून टाकण्याचे मार्ग कोणते ही दिशा दाखविल्यावर मनुष्यानें समाजांत आपली वागणूक कशी ठेवावयाची हें पहाणें जरूर आहे.

सामाजिक वागणुकीमध्यें यश कमवावयास मनुष्याला '**बोलण्याची कला**' अवगत असणें जरूर आहे. व्यासपीठावर उभे राहून एखादा विषय घेऊन त्यावर "बोलणें"–ह्या कलेचें प्रस्तुत ठिकाणीं विवेचन कर्तव्य नसून आपले हितसंबंध राखतांना मनुष्य समाजांत दुसऱ्याशीं भाषण–संभाषण करतो त्या बोलण्याच्या कलेचा प्रस्तुत विचार करणें जरूर आहे. आतां कित्येकांस 'बोलणें'ही कलाच वाटत नसते. विचार करतां ही कला आहे व कलेचीं अंगेंहित्या

आहेत. आपल्या बोलण्याचा इष्ट परिणाम होण्यास आपली चटकदार भाषा असावी लागते. कल्पनाशक्तीची जोड असून पुन्हां, प्रसंगावधान व समयसूचकता हे दोन गुण अंकित असावयास लागतात व हींच काय तीं बोलण्याच्या कलेचीं अंगें–सामुग्री. (प्र० ३.)

परंतु, बोलण्याच्या कलेबरोबर आपण आणखी एका गोष्टीकडे लक्ष पुरविणें जरूर आहे. ती गोष्ट म्हणजे आपलें बोलणें सत्यास जागृत असावें लागतें, तरच आपल्या व्यवहारास किंमत येते. परंतु वस्तुस्थिति अशी कीं, असत्याचा मोह आपणांस आवरेनासा झालेला दिसून येत आहे. मार्कट्वेन ह्या विनोदी लेखकानें सांगितलेल्या कोणत्या ना कोणत्या तरी असत्यास कवटाळीत असलेलें आपलें बोलणें आहे कीं काय, याचा विचार मनुष्यानें करणें चांगलें. सत्य व नीति यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. सत्यच जर धर धरीत नसेल तर नीतितत्त्वाचा धर राहावा कसा ? शिक्षणाचाहि परिणाम नीतितत्त्वावर व्हावा तसा होत नाहीं. त्याला उपाय एकच. नीतितत्त्वाची मनुष्यास चाड वाटून त्यानें सत्यब्रह्माची आराधना करीत असलें पाहिजे. ह्मणजेच त्याच्यावर स्वार्थवृत्तीचा पगडा बसत नाहीं. (प्र० ४)

बोलण्याच्या कलेस सत्यतत्त्वाची जोड असून सुद्धां आपल्या वागणुकींत हळुवारपणा असावा लागतो. हल्लींच्या काळीं तर मनुष्यप्राण्याची मनोवृत्ति इतकी नाजूक होऊन बसलेली दिसून येते कीं, आपला शब्द काय किंवा कृति काय,याकडे ज्याचें त्याचें लक्ष लागून राहिलेलें असतें.त्यांच्यामध्यें विसंगतपणा म्हणा किंवा कठोरपणा ह्मणा, दिसून आला कीं, आपल्या शब्दाचा व कृतीच्या विपर्यास होत जातो व मानवी सुखाचा आनंद कधीं कधीं मावळून जात असतो. ह्मणून मनाचा सुरेलपणा राखून जग हें प्रचंड काव्य आहे,हें अनुभवास येण्यास मनुष्याची वागणुक हळुवारपणाची असावी लागते. प्रसंगीं साधुवृत्तीची शांति धारण करावी लागते. म्हणजेच अनिष्ट असे प्रेमसंबध तोडणारे प्रसंग लयास जाऊन सक्रिय सहानुभूतीच्या जोरावर मनुष्यास लोकांचा विश्वास संपादन करून घेतां येत असतो. (प्र० ५ व ६.)

आतां, बोलण्याच्या कलेंत तरबेज होऊन आपला व्यवहार सत्यमय ठेवून विचार, उच्चार, आचार या त्रयीमध्यें नेहमीं मेळ राखून लोकांच्या विश्वासास पात्र होऊन बसणें, म्हणजेच व्यवहारतः वागणुकीच्या कलेची सामुग्री आपल्या

जवळ सिद्ध करून ठेवण्यासारखें होय. इतकी सामुग्री तयार असल्यावर वागणुकीची कला हस्तगत होण्यास फार प्रयास पडत नाहींत. हल्लींच्या काळींतर जगांतील दूरदूरच्या देशांशीं आपला संबंध अधिक अधिक प्रमाणांत निगडित होत चालल्यानें आपल्या समाजांतील लोकांचें या कलेकडे लक्ष जाणें जरूर आहे. प्रसंगीं आपला एक शब्द, किंवा आपली एक कृति आपलाच नव्हे तर, आपल्या समाजाचा नाश करून टाकण्यास कारणीभूत होऊन बसते. तेव्हां, या कलेस जरूर असणाऱ्या मुख्य मुख्य गुणांचा वास आपल्या अंगीं जरूर असणें इष्ट आहे. हे गुण म्हटले म्हणजे विनोदपूर्ण, सत्यमय पण सहानुभूतिपूर्ण शब्दांचा कुशल उपयोग, आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीचें आकलन व प्रसंगावधानयुक्त आचरण. (प्र० ७)

व्यावहारिक वागणुकीच्या कलेची उत्तम जोड मिळविल्यावर मनुष्यानें आपल्या अंगचा दुबळेपणा काढून टाकिला पाहिजे. दुबळेपणाच्या मुळाशीं भ्याडपणा असतो. या भ्याड वृत्तीमुळेंच मनुष्याच्या मानसिक वृत्तींचा विकास व्हावा तसा होत नसतो. ही दुर्बल वृत्ति घालविण्यास इच्छाशक्तीचा उपयोग होत असतो व हिच्याच जोरावर जगांतील टक्याटोणप्यांचें मनुष्यास कांहीं वाटत नसतें. पुन्हां, इच्छाशक्तीचा सदुपयोग करितां यावा यासाठीं मनुष्यानें आत्मनिरीक्षण करून आपल्या स्वभावांतील गुणावगुणांचें परीक्षण करणें जरूर असतें. हें परीक्षण झालें तरच त्यास आपल्या अंगीं विशिष्ट गुण काय याची जाणीव होऊन त्या गुणांच्या जोरावरच त्यास विशिष्ट प्रकारची कामगिरी करून आपलें स्वत्व राखतां येतें. (प्र० ९).

येथवर वर्णन केलेल्या व्यावहारिक गुणांतच सद्बुद्धीच्या गुणाची भर पडलेली चांगली. स्वार्थमूलक वृत्तीमुळें सद्बुद्धीचें खोबरें होऊन जात असतें व तिच्या जागीं मत्सर या दुर्गुणाचें अधिष्ठान होऊन बसतें. याकरितां उपकृत करण्याची बुद्धि ठेवून तदनुसार आपल्या हातून कृति होत गेल्यास व्यवहारतः चित्तशुद्धीचें फळ आपणांस प्राप्त होत असतें. (प्र० १०).

चित्तशुद्धीनेंच मनुष्याचें शील बनत असतें. हें शील भ्रष्ट होऊं नये म्हणून महाभारतांतील 'जें आपलें कर्म लोकांच्या हिताचें होत नाहीं, किंवा ज्याबद्दल आपली आपल्यासच लाज वाटते, तें कधींहि करूं नये.' हें वचन मनुष्यानें

आपल्या दृष्टीसमोर सदैव धरलें पाहिजे. व या नियमास अनुसरून ज्याची वागणुक होत असते, तोच ' व्यावहारिक योगी ' ह्मणावयाचा (प्र० ११).

मनुष्याची व्यवहारतः चित्तशुद्धि झाल्यावर त्याच्या हांतून 'कर्तव्य,' कर्तव्य या दृष्टीनेंच बजाविलें जात असतें. जगांत 'कर्तव्या'चें क्षेत्र अफाट असून शक्ति-बुद्धि-परिस्थित्यनुसार मनुष्यानें आपलें कर्तव्य मोहाच्या प्रसंगास बळी न पडतां बजावित राहिलें पाहिजे (प्र० १२).

आतां, कर्तव्य' या बुद्धीनेंच कर्माचरण करीत राहिलें असतां पर्यायानें समाजविषयक कर्मच आपल्या हांतून घडत जात असतें ही गोष्ट कळून येईल. शिवाय 'अधिकस्य अधिकं फलम्' या न्यायानें प्रत्येकानें 'आपल्या समाजा-करितां ह्मणून स्वबुद्धिनुसार व परिस्थित्यनुसार कांहीं अवश्य कर्म करीत राहिलें पाहिजे. ह्मणजेच समाजाच्या ज्या कांहीं उणीवा असतात त्या भरून निघण्याची कांहीं आशा असते. (प्र० १३).

समाजाकरितां ह्मणून मनुष्य जें कांहीं कर्तव्य करीत असतो, तें करण्यांतच त्यास सात्विक आनंदाचा लाभ होत असतो. त्या आनंदांतच जणूं भर पडावी म्हणून व योग्यांच्या आनंदाचा अनुभव मिळावा ह्मणून, मनुष्यानें एकान्त-वासांतील रम्य स्थलाचा आश्रय करून-मग तो प्रतिदिवशीं थोडा वेळ कां होईना-निसर्गाच्या चारुतेचें आकंठपान करीत रहावें व तत्त्वज्ञानांतील सिद्धा-न्तांची चिन्तनिका करावी; ह्मणजेच त्यास पृथ्वीवर 'नंदनवना'चा अनुभव मिळणार. (प्र० १४).

येथवर केलेल्या विवरणावरून कळून आलें असेलच कीं, व्यवहार हें नियमबद्ध शास्त्र आहे. परस्परांच्या हितसंबंधांची पाळणूक चांगल्या तऱ्हेनें करतां येण्यास या शास्त्राची कशी जरूरी आहे हें आतां नव्यानें सांगावयास नको. शेवटीं, व्यवहारशास्त्रांत पारंगत होऊन जो सर्वांस हवाहवासा होऊन बसतो, स्वकुटुंबाकरितांच नव्हे तर, आपल्या समाजाकरितां कर्तव्य बजा-वण्यांत जो आपलें आयुष्य वेंचितो, त्यालाच व्यावहारिक मोक्ष मिळाल्यास नवल तें काय ? (प्र० १५).

प्रकरण दुसरें.

मातृदेवो भव.

(१) "मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव।"

(२) उपाध्यायान्दशाचार्यः आचार्याणां शतं पिता।
सहस्रं तु पितृन्माता गौरवेणातिरिच्यते॥

(मनु २—१४५)

अर्थः—"दहा उपाध्यायांपेक्षां आचार्य, शंभर आचार्यांपेक्षां पिता, आणि हजार पित्यांपेक्षां माता गौरवानें अधिक आहे." (मनुस्मृति २—१४५.)

वरील वचनें ध्यानांत घेतलीं असतां वेदकालीं काय किंवा स्मृतिकालीं काय, मातेचा महिमा सर्व काळीं गाइलेला आढळून येतो. याचें कारण अगदीं उघड आहे कीं, जगांत निष्कपट प्रेम जर कोणाचें पाहून घ्यावयाचें झालें तर तें मातेचेंच. तेंच खरें शुद्ध प्रेम. बालक मोठें विद्वान् होऊन पुढें आपणांस उपयोगी पडो वा न पडो, त्याच्यापासून सुख होवो, अगर न होवो...... अशा तऱ्हेचें व्यावहारिक विचार बालकाच्याबाबत तरी तिच्या मनास शिवत नसतात. कर्तव्य म्हणून, छेः ही तरी कर्तव्याची जाणीव तिला कोठें असतें? बालकाचा गोंडस चेहरा पहातांच प्रेमाचा उमाळा अनिवार येऊन स्तनांवाटे दुग्धस्राव करणारी माता कर्तव्य म्हणून प्रेम करीत असेल हें संभवनीय तरी कसें? बालकाचें चिमुकलें मुख पाहतांच तिला प्रेमाचें भरतें येतें-मग तशी तिची इच्छा असो अगर नसो-त्याला ती तरी काय करणार?

मातेचें प्रेम किती अकृत्रिम असतें याविषयींची तुकोबांची एक उक्ति मार्मिक आहे; ते म्हणतात.:—

मातेचिये चित्तीं। अवघी बालकाची व्याप्ती।
देह विसरे आपुला। जवळीं घेतां शीण गेला।"

असो; अशा निष्कपट प्रेमाला देवघेवीचा-व्यावहारिक व्यापार माहीत नसतो. म्हणून हें प्रेम स्वर्गीय. 'देवाणघेवाणीचा व्यापार' प्रेमाच्या कामांत सुरू झाला म्हणजे प्रेमाची समाप्तीच झाली असें समजावें. पृथ्वीवर स्वर्गीय प्रेम जर कोठें पाहून घ्यावयाचें झालें, तर बालकांविषयींचें मातेचेंच प्रेम पाहून घ्यावें. बालक कुरुप असो वा सुरूप असो, किंबहुना एखादा अवयव अगर इंद्रिय त्याला उणें असो, तिच्या प्रेमांत कधीं कमीपणा येत नसतो. किंबहुना,

अशा व्यंग बालकावरच तिचें अलोट प्रेम दिसून येतें. आणि यावरून असा नियम दिसून येतो कीं, व्यंग मुलाच्या बाबतींत जगाचा तुसडेपणा कितीहि तीव्रतेनें दृष्टोत्पत्तीस येत असू द्या, मातेच्या प्रेमास ह्मणून तें कधीं पारखें होत असलेलें दिसून येत नाहीं. याविषयीं एक सुंदर कथा वनपर्वान्तर्गत आरण्यकपर्वांत आहे. ती अशीः—

"एकदां स्वर्गांमध्यें असलेली धेनूची माता सुरभि रडूं लागली. तेव्हां इंद्राला दया येऊन त्यानें तिला विचारिलें.

इंद्र म्हणालाः—हे कल्याणि, तूं अशी रडतेस कां? देव, मनुष्यें आणि नाग हे खुशाल आहेत ना? तूं कांहीं लहानसहान कारणानें रडावयाची नाहींस ह्मणून विचारितों.

सुरभि म्हणालीः—इंद्रा,तुजवर कांहीं संकट ओढवल्याचें मजला दिसून आलेलें नाहीं. मला जो शोक झालेला आहे, तो माझ्या पुत्रासंबंधींचा; ह्मणूनच मी रडतें आहे. हे देवाधिपते, हा पहा, माझा पुत्र नांगराला जुंपल्यामुळें त्यास पीडा होऊन तो पडूं लागला आहे; आतां आपण यांतून सुटूं अशी त्यास उमेद वाटत आहे. तथापि हा हलकट शेतकरी या माझ्या बलहीन पुत्राला पुन्हां नांगराला जोडून चाबकानें मारीत आहे. हे देवेन्द्रा, हें पाहून मला करुणा आली व माझें अंतःकरण उद्विग्न होऊन गेलें. इंद्रा, नांगराला दोन बैल जोडलेले आहेत; त्यांतील एक चांगला शक्तिमान् असून जूं अधिक वहातो आहे; पण, दुसऱ्याच्या अंगीं सामर्थ्य नसून तो कृश आहे. त्यामुळें त्याच्या सर्वांगावर शिरा उमटलेल्या आहेत, त्याला हा भार ओढल्यानें कष्ट होत आहेत, ह्मणून त्याविषयीं मला फार दुःख होत आहे. इंद्रा, त्याला वरचेवर चाबकानें मारिलें किंवा, शस्त्रानें टोचिलें तरीही त्याच्यानें तो भार ओढवत नाहीं त्यामुळें त्याच्याविषयीं मी शोकाकुल झालें आहे; व म्हणूनच अत्यंत कष्टी होऊन नेत्रांतून अश्रू ढाळीत कळवळ्यानें रडत आहे.

इंद्र म्हणालाः—हे कल्याणि, तुझ्या हजारों पुत्रांना लोक अशी पीडा देतात. मग या एकाच पुत्राला मारलें, म्हणून तुझ्या अंतःकरणांत कां दया उत्पन्न होत आहे?

सुरभि म्हणालीः—मला जरी हजारों पुत्र आहेत तरी त्या सर्वांशीं माझें सारखेंच वर्तन आहे. **तथापि, इंद्रा, स्वभावतः च दीन असून पुनः पीडित झालेल्या मुलावर माझी अधिक कृपा आहे."**

तसेंच एखाद्या मातेची व तिच्या बालकाची कांहीं काल ताटातूट व्हावी व पुन्हां तिच्या दृष्टीस बालक पडावें, मग तिच्या आनंदाचा पारावार कोठवर वर्णावा[1] ?

असो; त्याचप्रमाणें, मूर्तिमंत स्वार्थत्याग जगांत कोठें पहावयाचा असेल तर तो मातेच्याच ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतो. आपल्या मुलाचें शिक्षण व्हावें, त्यानें जगांत नांव काढावें, व त्याचें सर्वदा चांगलें होत असावें या उदात्त हेतूनें तनमनधन-सर्वस्व अर्पण करणारी जर कोण असेल-निघेल तर ती माताच. गरीबी स्थितीतील मातांचा स्वार्थत्याग तर पुसूंच नका. मुलांच्या शिक्षणासाठीं आपल्या प्रकृतीची पर्वा न करणाऱ्या, लोकांच्या घरीं काबाड-कष्ट करून पैसा कमावून पुत्राच्या शिक्षणाकरितां द्रव्य वेंचणाऱ्या व प्रसंग पडला असतां चीजवस्त विकून मदत करणाऱ्या-सेवक बनणाऱ्या माता आपल्या समाजांत हव्या तेवढ्या आहेत. या बाबतींतील 'वाशिंग्टन आयार्व्हिंग' नांवाच्या सुप्रसिद्ध आंग्ल लेखकाचे सुंदर विचार मननीय असून हृदयस्पर्शी आहेत; तो ह्मणतो[2]:—

---

१ साउदे कवि म्हणतो.

1 "The mother when she meets on high,
The Babe she lost in infancy,
Hath she not then, for pains and fears,
The day of woe, the watchful night,
For all her sorrow, all her tears,
An over-payment of delight ?"

2 "Oh ! there is an enduring tenderness in the love of a mother to her son that transcends all other affections of the heart. It is neither to be chilled by selfishness, nor daunted by danger, nor weakened by worthlessness, nor stifled by ingratitude. She will sacrifice every comfort to his convenience. She will surrender every pleasure to his enjoyment. She will glory in his fame and exult in his prosperity ; and if misfortune overtake him he will be the dearer to her from misfortune and if disgrace settle upon his name, she will still love and cherish him inspite of his disgrace; and if all the world beside cast him off she will be all the world to him.'

"मानवी प्रेमाच्या सर्व प्रकारांत पुत्रविषयक मातेच्या निःस्वार्थ बुद्धीच्या प्रेमाची थोरवी काय वर्णावी? स्वार्थप्रियतेच्या दोषानें तिचें प्रेम कलुषित होत नसून तें गारठत नसतें. संकटाच्या माऱ्यानें तें खचतहि पण नसतें. मुलांच्या क्षुद्र दोषांमुळें तिच्या प्रेमांत कमतरता येत नसून त्याच्या अकृतज्ञतापूर्ण वागणुकीनें तें गुदमरून नाशहि पण पावत नसतें. त्याची सोय व्हावी म्हणून ती आपल्या सोयीची पर्वा करीत नाहीं. त्याच्या ऐषआरामाप्रीत्यर्थ आपल्या आरामविषयक गोष्टींची ती फिकीर करीत नसून त्या त्या गोष्टी त्यास ती मोठ्या खुषीनें बहाल करीत रहाते. त्याच्यावर संकटानें झडप घातली म्हणा किंवा त्याच्या यशास डाग लागून म्हणा, सर्व जगानें त्यास तुच्छतादर्शक बुद्धीनें झिडकारलें म्हणून म्हणा, तो तिला अधिकच प्यारा होऊन रहातो. येवढेंच नव्हे तर त्यास जगांत जो 'राम' वाटत नाहींसा होतो, तो त्याला तिच्या प्रेमळ सहवासांत प्राप्त होत असतो."

असो; बालकावर मातेचें प्रेम किती अलोट असतें व त्याचें कल्याण व्हावें, एतदर्थ अहर्निश स्वार्थत्याग करण्याची तिची तयारी कशी असते–याबद्दलची कल्पना वरील उताऱ्यावरून वाचकांस येणारी आहे.

आतां, अशा तऱ्हेचें निर्व्याज प्रेम व मूर्तिमंत स्वार्थत्याग ज्या घरांत अहोरात्र वावरत–नांदत असेल, तें घर प्रत्येकास प्रिय वाटत असल्यास नवल तें काय? मातेच्या पवित्र निःश्वासानें सर्व वातावरण पवित्र होऊन जात असतें. तिचे ते प्रेमळ शब्द, लडिवाळपणानें तिनें ती घातलेली समजूत, या गोष्टीच इंग्रजीमधील "घराच्या व्यतिरिक्त अन्य ठिकाण 'स्वर्गीय प्रेमाचें' स्थान होऊं शकत नाहीं," ही म्हण[1] सार्थ करून दाखवीत असतात. खऱ्या मनोभावानें, प्रेमानें व निर्हेतुक बुद्धीनें सर्व जीविताचा व्यय करून आपल्या पुत्राचें लालनपालन करण्याचें व्रत अंगीकारणाऱ्या मातेची थोरवी काय वर्णावी!

एके ठिकाणीं मातेचा मार्मिक दृष्टान्त आहे, तो असाः—

"माता यथा निजं पुत्तं आयुसा एक पुत्त अनुरक्खे
एवं सब्बेसु भूतेसु मानसं भावये अपरिमाणं ॥

अर्थः—("माता जशी आपल्या सर्व जीविताचा व्यय करून एकुलत्या एक पुत्राचें रक्षण करिते, त्याप्रमाणें सर्व भूतांविषयीं आपलें मन अमर्याद स्नेहानें परिपूर्ण करावें.)"

1 "There is no place like Home."

दुसरें असें कीं, मातेच्या सहवासांत जो एक अत्यंत मधुर ह्मणूनच स्वर्गीय अशा सुखाचा अनुभव येत असतो तो अन्यत्र मिळत नसतो. तसेंच, आपल्या मनांतील खोड्यानाड्या विचारांचा–व्यावहारिक लबाड घडामोडीच्या विचारांचा डोलारा मातेच्या पवित्र सान्निध्यांत पार कोसळून जात असतो. ही गोष्ट ज्यानें त्यानें आपल्या मनाशींच पडताळून पहावी. तिच्या प्रेमळ सहवासांत पुत्राचे विचार तात्काळ कां होईना, सत्यमय, प्रेममय व दृढनिश्चयी असेच होत असतात. तिच्याजवळ टाकलेला शब्द खराखुरा करून दाखविणारे केव्हांहि सुपुत्रच होत. कोणत्याहि अंगीकृत कार्यांत यश मिळण्यास मातेचा आशीर्वाद त्यांना स्फूर्तिदायक होत असल्यामुळें जरूर तर दुप्पट उत्साहाची जोड मिळून त्यांनां यशप्राप्ति होत असते.

मोठ्या बिकट परिस्थितींत मराठी राज्याची स्थापना करणारे श्री शिवाजी महाराज घ्या; त्यांनां प्रोत्साहनरूपी ह्मणा, किंवा शिक्षणरूपी ह्मणा, साहाय्य करणारीं माणसें कोण असतील, तर तीं माता जिजाई व शिक्षक दादोजी कोंडदेव हींच होत. त्याचप्रमाणें नेपोलिअनचा इतिहास पहा किंवा अलेंझांडरचें चरित्र उघडा; सर्व युरोपखंड दणाणून टाकणाऱ्या किंबहुना सबंध जगास 'देमाय धरणी ठाय' करून सोडणाऱ्या विभूतींना मातांचीच प्रेमरूपी वासवी शक्ति चालन देत होती हीच गोष्ट दिसून येणार आहे. ग्रीसच्या इतिहासांतील प्रसिद्ध सेनापति एपॅमिनोन्डास यानें जेव्हां ल्यूक्ट्राची लढाई जिंकली, तेव्हां त्यानें संस्मरणीय उद्गार काढले कीं, 'माझ्या मातापित्यास या जयानें आनंद होणार आहे, ह्मणूनच या जयाचा मला इतका हर्ष होत आहे.' त्याचप्रमाणें अलेक्झांडरचें आपल्या मातेवर किती प्रेम होतें, याविषयीं एक आख्यायिका प्लुटार्कनें अलेक्झांडरच्या चरित्रांत दिलेली आहे. 'ऑलिम्पियास' हें अलेक्झांडरच्या मातेचें नांव. ऍंटिपेटर हा अलेक्झांडरचा स्नेही. या ऍन्टिपेटरनें 'ऑलिम्पियास' विरुद्ध अलेक्झांडरास एक खरमरीत पत्र लिहिलें. तें पत्र वाचून अलेक्झांडरनें उद्गार काढले कीं[1],

---

1 "Lo, said he, Antipater knoweth not that one tear of the mother's eye will wipe out ten thousand such letters."

"ॲन्टिपेटरला हें माहीत नाहीं कीं, माझ्या मातेच्या डोळ्यांतील अश्रूचा एकच थेंब अशा हजारों पत्रांनीं केलेला मनावरील परिणाम घालवून टाकील."[1]

तेव्हां, जगांतील थोरथोर विभूतींचीं चरित्रें उज्वल होण्यास त्यांच्या माता कशा कारणीभूत झाल्या, ही गोष्ट येथवर केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होणार आहे. पण, थोर पुरुषांच्या चरित्रांतील काय, किंवा इतिहासांतील काय, अशा गोष्टींकडे आपलें लक्ष जावें तितकें जात नाहीं, ही दुःखाची गोष्ट होय. गम तीची गोष्ट ही कीं, जगाच्या इतिहासांतील थोर थोर विभूतींचीं चरित्रें आपण वाचतों, त्यांनां उच्च पदवी कशी मिळाली, याजविषयीं आपण चिकित्सापूर्ण दृष्टीनें त्यांचें कौतुक करितों, पण ज्यांच्या निःसीम स्वार्थत्यागावर–प्रेमरूपी भरभक्कम पायावर त्यांच्या अढळ कीर्तीचीं मंदिरें उभारलीं जात असतात, त्या मातांचे आपण कधीं नांव काढतों काय? प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल याच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास माता ही 'पूज्य विभूति'[2] आहे. आपल्या समाजांत नमुनेदार मातांचीं उदाहरणें हवींतेवढीं आहेत. दुःखाची गोष्ट ही कीं, अशा मातांचा इतिहास आपण आतांपर्यंत लिहिलेला नाहीं, किंवा त्यांच्या चरित्रांचीं स्तुतिस्तोत्रें आजवर गावीं तशीं आपण गाइलेलींहि पण नाहींत. ह्मणून, आतां तरी अशा मातांचीं चरित्रें संगतवार लिहिलीं गेल्यावर

1 C. W. C. Oman, M A.F.S.A. says "Alexander had been brought up under influences that would have fired even a less enthusiastic soul than his. His mother Olympias a princess of Epirus was a fiery ambitious woman with a dash of superstition in her mind. She taught Alexander that he was through the Epirot Kings descended from Achilles, the hero of the tale of Troy, and bade him rival the great deeds of his ancestor. His first tutor is said to have won his heart by always calling him by the name of the Prince in the Iliad, and styling Philip Peleus and himself Phoenix—the traditionary preceptor of Achilles. There is no doubt that Alexander had the tale of Achilles on his brain: more than once in his life we shall mark the effect of this ancestor—worship on his behaviour." 2 Heroine.

थोरथोर विभूतींच्या चरित्रांचे धागे उकलत जाऊन, त्यांच्या चरित्रांतील कित्येक गोष्टींवर चक्क प्रकाश पडावयाचा तो पडून स्त्री-शिक्षणास एक प्रकारची मदत व्हावयाची ती होऊन पुनः मराठी वाङ्मयांत उत्तम भर पडेल, असा भरंवसा आहे.

आतां, आज आपल्या समाजांतील स्त्री-शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करतां आपणांस कबूल करावें लागेल कीं, स्त्री-शिक्षणाचें पाऊल आजमितीस झपाट्यानें पुढें पडत आहे; स्त्री-शिक्षणास वाहून घेऊन आज कित्येक महानुभावांचें भगीरथ प्रयत्न चालले असल्यानें स्त्री-शिक्षणाचा भविष्य काळ उज्ज्वल आहे असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. स्त्री-शिक्षण नको, असें ह्मणणाऱ्यांचा वर्ग आतां नष्टप्राय झालेला आहे; व योग्य शिक्षणाशिवाय स्त्रीवर्गाच्या हातून भावी पिढीची (Future State) जबाबदारी पूर्णपणें पार पडणें शक्य नाहीं हें तत्त्व आज तरी सुशिक्षित पिढींत पटूं लागलेलें आहे भावी पिढीच्या स्वभावास शिस्तीचें,उद्योगाचें वळण लावण्याचें व उत्तम नागरिकांच्या अंगीं अवश्य असणाऱ्या गुणांच्या बीजारोपणाचें मुख्य काम मातेकडेच असतें.जी.हर्बर्ट ह्मणतोः—

"शंभर शिक्षकांचें काम चांगली माता एकटीच करूं शकत असल्यानें तिची किंमत शंभर शिक्षकाएवढी असते." हर्बर्टचें हें विधान कोणास मान्य होणार नाहीं? लहान लहान बालकांच्या भावनात्मक विचारांचें निरीक्षण योग्य प्रकारें करण्यास माताच अधिक समर्थ असते. व कधीं रागानें तर कधीं लोभानें दुसऱ्यावेळीं लडिवाळपणानें आंजारून गोंजारून चांगल्या गुणांचें बीजारोपण करण्यास मातेस पित्यापेक्षां अधिक संधि [2]मिळते.

---

1 "One good mother is worth a hundred schoolmasters."

2 "Just as a mother, with sweet, pious face,
Yearns towards her little children from her seat,
Gives one a kiss, another an embrace,
Takes this upon her knees, that in her feet;
And while from actions, looks, complaints pretences,
She learns their feelings and their various will,
To this a look, to that a word, dispenses,
And, whether a stern or smiling, loves them still;
(Filicaja, Translated by Leigh Hunt.")

तेव्हां, अशा योग्य संध्या घेऊनच सुमाता आपल्या पुत्रांचा भावी आयुष्य-क्रम ठरवीत असतात.

आंग्ल चित्रकार वेस्ट ह्मणतो:—"उत्तम चित्रकार होण्यास माझ्या मातेचें (प्रेमाचें) चुंबन कारणीभूत झालें."[1] या वाक्यांतील रहस्य हेंच कीं, मातांनीं मनावर घेतल्यास त्यांस आपल्या पुत्रांचे आयुष्यक्रम उदात्त करून सोडतां येतात. तेव्हां आपल्या समाजांतील माता आपल्या जबाबदाऱ्या पूर्णपणें ओळखून त्या चांगल्या तऱ्हेनें पार पाडून नमुनेदार भावी पिढी निर्माण करतील अशी आज पूर्ण उमेद वाटत आहे.

आतां, जगांत अशीही उदाहरणें थोडीं थोडकीं सांपडत नाहींत कीं, सर्व जन्मभर मातेशीं निष्ठुरतेनें वागणाऱ्या, तिच्या शब्दांस कवडीमोल किंमत ठरविणाऱ्या व तिच्याकडे ढुंकून सुद्धां न पहाणाऱ्या अशा पुत्रांना सुद्धां ती स्वर्गवासी झाल्यावर प्रेमाचें भरतें येतें. समर्थ दासबोधांत ह्मणतात:—

ते समयीं माता आठवली, ह्मणे धन्य धन्य ते माऊली,
मज कारणें बहुत कष्टली, परी मी नेणेंचि मूर्ख.
आजि जरी ते असती, तरी मला कदा न विसंबती,
ते पोर-आगी वेगळीच. पुत्र वैभवहिन भिकारी,
माता तैसाचि अंगिकारी, दगदगला देखोन अंतरीं,
त्याच्या दुःखें दुखावें प्रपंच विचारें पाहतां
हें सकल जोडे न जोडे माता, हें शरीर जयें करितां,
निर्माण जाहलें. ह्मणोनि धन्य धन्य प्रपंची जन
जे माय बापांचें भजन करिती, न करिती मन
निष्ठुर जिवलगासीं. संगति स्त्रिया बालकांची,
आहे साठी जन्माची, परी माय बापें कैचीं मिळतील पुढें ?

तेव्हां, आईबापांचा सहवास सुदैवानें आपल्यास लाभला आहे तोपर्यंत त्यांच्याशीं निष्ठुरतेनें वर्तन ठेवावयाचें, व तीं निवर्तल्यावर **"परी माय बापें कैचीं मिळतील पुढें"** ? ह्मणून रडावयाचें, यांत काय शहाणपणा ? खरें खुरें प्रेम करणारें मनुष्य जगांतून नाहींसें झाल्यावर अशा लोकांना किती जरी दुःख झालें तरी त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. माता जोंपर्यंत जिवंत

1 "A kiss from my mother made me a painter."

आहे तोंपर्यंतच तिच्या मुलांनीं मधुर भाषणानें व गोड कृतींनीं तिच्या उपकाराची फेड केली,तर तिच्या जीवास खरें समाधान होणार; त्यांनीं आपल्या श्रमांचा पांग फेडला असेंच तिला वाटणार. जिच्या स्वार्थत्यागाच्या जोरावर आपण लहानाचे मोठे होतो-विद्वान् होतो,किंबहुना ऐहिक ऐश्वर्य लाभतें-त्या मातेकडे आपण दुर्लक्ष करून कसें चालेल ? ती जसें आपलें कर्तव्य चोख बजाविते, तसेंच तिच्यासंबंधींचें कर्तव्य चांगल्या तऱ्हेनें बजावून आपण तिच्या ऋणाची फेड केली पाहिजे. जगन्मान्य विभूती श्री शिवाजी, अलेक्झांडर, नेपोलीअन यांची आपल्या मातांच्या ठायीं भक्ति कशी निःसीम होती व त्यांनीं मातेच्या आज्ञेमध्यें वागून मातृऋणाची फेड कशी केली याविषयींची कल्पना मग ती अंधुकपणें होईना-त्यांच्या चरित्रांवरून होणार आहे. पण इतिहासांतील अशा गोष्टींकडे आपलें लक्ष आधीं जात नाहीं, व तें गेल्यास तसें इष्ट आचरण करण्याची बुद्धि आपल्यास होत नाहीं व तशी केव्हांतरी बुद्धीही झाल्यास त्याप्रमाणें कृति आपल्या आचरणांत उतरत नाहीं !!

या वस्तुस्थितीची मीमांसा करतां आपल्यास असें दिसून येईल कीं, कृत गोष्टींचा-उपकाराचा विसर मनुष्यास ताबडतोब पडत असतो. कृतज्ञता हा गुण आहे व या गुणाची जाणीव-समाजाच्या दुर्दैवानेंच म्हणावयाचें-बहुतेकांस होत नाहीं, अशीच खरी स्थिति आहे. समजा, तुम्हीं दुसऱ्यावर अनंत उपकार केलेले आहेत; व त्यानें तुमच्या उपकारांची फेड केली नाहीं म्हणा, किंवा तुमच्या विषयींचा जरूर तो आदर त्यानें कृतीनें-आचरणानें दाखविला नाहीं म्हणा, तर तुम्हाला त्याची वर्तणुक कितीशी खपत असते ? तुम्हीं त्याला त्याबद्दल बोल लावतांच कीं नाहीं ? प्रसंगोपात तुम्ही त्याच्या नांवानें खडे फोडण्यासहि कमी करत नाहीं. व्यवहारांत 'द्यावें तसें [1]घ्यावे' या तत्त्वाचा अंमल चालतो. म्हणून आपण व्यवहारांत 'द्यावें तसें घ्यावें' या नियमाचा अंमल स्वतःवर कां चालवूं नये ? त्या नियमाचा अंमल स्वतःवर चालवून तदनुसार आचरण उतरल्यास आपला संसार सुखाचा होईल हीच खूणगांठ मनुष्यानें आपल्या मनाशीं बांधून ठेवलेली चांगली. बायबलमधील[2] लोकांनीं तुमच्याशीं

---

1 Give and take

2 "Whatsoever ye would that men should do to you, do ye even so to them" St. Mathu VII 12."

जसें वागावें असें तुम्हांस वाटतें, तसें प्रथम तुह्मीच त्यांच्याशीं वागत चला, हें वाक्य घ्या; अगर बुद्धाचा आत्मौपम्य दृष्टीचा उपदेश पहाः—

> " यथा अहं तथा एते यथा एते तथा अहं।
> अत्तानं उपमं कत्त्वा न हनेय्य न घातये ॥ "
>
> (सुत्तनिपात, नालकसुत्त २७)

अर्थः—" जसा मी तसे हे, जसे हे तसा मी (याप्रमाणें) आपली उपमा समजून (कोणासहि) मारूं नये, व मारवूं नये." हीं दोन्हीं महावाक्यें " दे व घे " याच तत्त्वाचा उपदेश करीत असल्याचें दिसून येणार आहे.

तेव्हां, मातेनें केलेल्या श्रमांचें चीजहि करावयाचें नाहीं, उलट, तिचें समाधान रहाणार नाहीं अशी वर्तणूक ठेवीत जावयाचें,-अशा तऱ्हेची वागणूक कोणत्याहि दृष्टीनें श्रेयस्कर नव्हेच नव्हे; मुक्तेश्वराचें या बाबतींतील वचन लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहेः—

> श्रेष्ठ वृद्धाचा अपमान । तेंचि अवलक्ष्मीचें स्थान ।
> विघ्नें येती तेथें ठांकून । जेथें दुर्वचन वडिलांतें ॥

दुसऱ्या ठिकाणीं त्याची अशीच एक उक्ति आहे:—

> त्रास देणें सकळां जीवां । हा कोण पुरुषार्थ पार्थिवा ?
> दयावंत तोचि देवा मान्य होय सर्वस्त्रें ॥

लोकांनां त्रास देत रहाणें हा कांहीं पुरुषार्थ नव्हे; त्यांतून वडिलांचा अप-मान करून त्यांचें मन दुखवीत रहाणें ही गोष्ट श्रेयस्कर नव्हेच नव्हे, असाच आपल्या संतकवींचा अभिप्राय दिसतो.

तेव्हां, प्रत्येक मनुष्याची आपल्या मातेशीं वागणूक प्रेमळपणाची असावी, व तिच्या ऋणाची फेड ज्यायोगें होईल, त्या गोष्टी करण्याचें त्यानें व्रत चाल-वावें. सर्व जन्मभर ज्या माउलीनें आपलें तनमनधन-सर्वस्व अर्पण करून आपली यशोरूपी इमारत बांधण्यास व त्यावर कळस चढविण्यास निःसीमपणें खटपट केली, तिचा जन्म आपल्या आदरपूर्ण व प्रेमळ वागणुकीनें सुखांत

जावा व तिच्या ऋणाची फेड करावी, अशीच सुपुत्राची इच्छा किंबहुना ध्येय असणार हें उघड आहे.[1]

प्रकरण तिसरें.

बोलण्याची कला.

सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयादेश धर्मः सनातनः ॥

मनुस्मृतिः ४–१३८.

अर्थः—(खरें बोलावें, गोड बोलावें, खरें असलें तरी कडू बोलूं नये, गोड असलें तरी खोटें बोलूं नये, हा सनातन म्हणजे नित्य धर्म होय.)

---

१ सुपुत्रांचें मातृविषयक ध्येय किती उदात्त असतें–तिच्या वृद्धावस्थेंत तर तो तिच्याशीं विनम्र कसा होत असतो व कृतज्ञतापूर्ण बुद्धीनें तो तिच्या आकांक्षा पूर्ण करण्याची कशी आटोकाट खटपट करीत असतो...वगैरे उदात्त विचार कर्क व्हाईट कवीनें फार बहारीनें खालील ओळींत ग्रथित केल्याचें दिसून येईल:—

" And canst thou, mother, for a moment think
That we, thy children, when old age shall shed
Its blanching honours on thy weary head,
Could from our best of duties ever shrink?
Sooner the sun from his high sphere should sink
Than we, ungrateful, leave thee in that day,
To pine in solitude thy life away,
Or shun thee, tottering on the graves' cold brink,
Banish the thought! Whenever our steps may roam,
O'er smiling plains, or wastes without a tree,
Still will fond memory point our hearts to thee,
And paint the pleasures of thy peaceful home;
While duty bids us all thy grief assuage,
And smoothe the pillow of thy sinking age.
Kirke White."

'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी आपल्या भाषेंत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ डोक्यास विशेष तसदी देण्याच्या भानगडींत न पडतां सहज कळण्याजोगा आहे. ज्याप्रमाणें एकाचें रूप दुसऱ्याच्या रूपास 'मिळतें' असें सांपडणें शक्य नाहीं, त्याप्रमाणेंच एकाचा स्वभाव दुसऱ्याच्या स्वभावाशीं 'जुळता' हि पण मिळणें अशक्य. आतां स्वभावास्वभावामध्यें विसंवादित्व दिसून येतें, एवढेंच नव्हे तर तें बोलण्या बोलण्याच्या तऱ्हांमध्येंहि आढळून येतें ही गोष्ट मानवी स्वभावाच्या सूक्ष्म निरीक्षणानें प्रत्ययास येण्यासारखी आहे. उदाहरणार्थ, एकाच्या बोलण्यांत मनमोकळेपणाचा गुण दिसून येतो, तर दुसऱ्याच्या बोलण्यांत "आंतली गांठ" दिसून येत असते. तिसऱ्याच्या बोलण्यांत नेहमीं रागाची छटा असते, तर चवथ्याचें बोलणें लडिवाळपणाचें असतें. कांहींच्या बोलण्यांत विनोद ओतप्रोत असतो, तर दुसऱ्यांच्या बोलण्यांत येथून तेथून 'खोंची' शिवाय कांहीं असत नाहीं. कित्येकांचें बोलणें म्हणजे 'एरंडाचें गुऱ्हाळ.' तें इतकें कंटाळवाणें होत असतें कीं, "एकदा ही ब्याद टळेल तर देव पावेल" असें म्हणण्याची श्रोत्यांवर पाळी येते. दुसरीं कांहीं माणसें थोडेंच बोलतात, पण त्यांचें बोलणें अर्थपूर्ण असतें. याच्या उलट, पुष्कळांच्या बोलण्यांत मुद्दा थोडा तर कोंडाच फार, असा प्रकार अनुभवास येतो. अशा एक कां दोन–अनेक बोलण्याच्या तऱ्हा आढळून येतात. पण हें प्रत्ययास येण्यास मनुष्यस्वभावाच्या निरीक्षणाची जोड मात्र अवश्य असली पाहिजे हें वर सांगितलेंच आहे.

हा विषय साधा, म्हणून कमी योग्यतेचा, असा आक्षेप या लेखावर काढणारे पुष्कळ सांपडतील; व या विषयाची वासलात कांहीं विचार न करतां, ते मनसोक्त लावतील हेंहि पण आम्ही जाणून आहों. पण, त्यांनीं आपलें डोकें थंड ठेवून शांतपणें या विषयाचा जर विचार केला तर त्यांनांसुद्धा असें कळून चुकेल कीं, 'बोलणें' ही एक कला आहे. आतां ती सर्वांस उपजत येतेच अशांतला कांहीं भाग नाहीं. तरी पण ही कष्टसाध्य आहे, एवढीच गोष्ट आम्ही या ठिकाणीं सांगून ठेवितों. आमच्या मतें या विषयाचें महत्त्व लोकांस कमी वाटून त्याची फार हेळसांड चालली आहे. ही स्थिति चांगली नव्हे. ही विचारार्ह बाब आहे. प्रत्येकानें या विषयाकडे वळून योग्य तें विचारपरिशीलन करून ही कला अधिगत करून घ्यावी अशी आमची सर्वांस प्रेमाची सूचना आहे. पारमार्थिक हिताचा प्रश्न जरी बाजूस ठेवला, तरीहि

व्यावहारिक हित (ही कला अधिगत झाली असतां) साधतें असें विधान आह्मी या ठिकाणीं करून ठेवितों. तेव्हां चांगलें बोलणें म्हणजे काय, व त्यापासून सुपरिणाम काय काय घडून येतात, याबद्दलची चर्चा या ठिकाणीं करण्याचें योजिलें आहे.

मानवी व्यवहाराचें वरवर निरीक्षण केलें तरी आपणांस दिसून येणार आहे कीं, मनुष्यस्वभावच निष्काम कर्म करण्यास पराङ्मुख असलेला दिसून येतो. कांहीं तरी आमिषाची लालूच असल्याशिवाय अगर दाखविल्याशिवाय सर्वसाधारणतः लोकांची कर्मांकडे प्रवृत्ति होत नसते. पूर्वींच्या श्रुती काय अथवा स्मृती काय, अमूक कर्म केलें असतां तमूक मिळतें असेंच सांगतात. उदाहरणार्थ, ‘ स्वर्गकामो यजेत ’ (स्वर्गाची इच्छा करणाऱ्यानें यज्ञ करावा) ही श्रुति घ्या; किंवा अशाच तऱ्हेच्या इतर श्रुती घ्या. त्या सर्व आमच्या या विधानास पुष्टीच देत असलेल्या दिसून येणार आहेत. तेव्हां आह्मी सुद्धां हीच पद्धत अनुसरून या कलेच्या अध्ययनापासून व त्यांत पारंगत झाल्यापासून ऐहिकच कां होईनात, पण फायदे काय काय होण्याजोगे आहेत हें प्रथम पाहूं.

चांगलें बोलणें साधल्यानें आपल्या ओळखीच्याच मनुष्यावर काय, पण एखाद्या तिऱ्हाईत इसमावरहि आपली छाप पडूं शकते. व्यवहारास लागणाऱ्या जरूर त्या इतर गुणांचा अंगीं वास असेल, व ही कला अवगत नसेल तर, ते गुण प्रसंगीं असून नसून सारखेच असें ह्मणण्याची पाळी येत असते. सुसंगतवार व चटकदार भाषापद्धति योजिल्यानें दुसऱ्याचें मन साहजिकपणें आपल्याकडे आकर्षण करून घेतलें जात असतें. आपल्याबद्दलचा इतरांचा अनुकूल ग्रह या कलेच्या जोरावर करून घेतां येतो; व मैत्री चिरस्थायी होण्यास या गुणाची थोडी फार आवश्यकता लागतेच. दुसऱ्याच्या कठोर मनाची धार या कलेवर चालत नाहीं. समाजाच्या उच्च तऱ्हेच्या वातावरणांत या कलेच्याच सहाय्यानें प्रवेश करतां येतो. पक्षकार काय, गिऱ्हाईक काय, किंवा रोगी काय, हे सर्व या कलेच्या लोहचुंबकानें आपणाकडे आकर्षून घेतले जातात. महाभारताच्या वनपर्वांत यक्षानें युधिष्ठिरास प्रश्न विचारिला आहे कीं, "प्रिय भाषण करणाऱ्याला काय प्राप्त होतें?" युधिष्ठिरानें उत्तर दिलें कीं, "प्रिय भाषण करणारा सर्वांनांच प्रिय होतो." या वाक्यांतील ‘प्रिय भाषण’ या शब्दाचा अभिप्रेत अर्थ–‘बोलण्याची कला ज्यास साध्य झाली आहे अशा

इसमाचें भाषण'[1] असाच घेतला पाहिजे. कारण सदा निव्वळ गोडगोड बोलून लोकप्रियता कशी टिकेल–कां टिकावी हा प्रश्नच आहे. व्यवहारांतील आपला नित्याचा अनुभव आपणांस हेंच सांगतो कीं, आपलें ज्ञान तुटपुंजें असलें तरी फड मारून नेण्यास ही कला मदत करिते. सारांश, या कलेंत पारंगत झालेलीं माणसें समाजास प्रिय होऊन बसतात. समाजाकडून लोकप्रियता मिळविल्यावर व ती टिकल्यावर व्यवहारदृष्ट्या मनुष्यास आणखी इष्ट ती कोणती गोष्ट असणार ?

आतां, एका आक्षेपाचें निरसन करूं. कित्येकांच्या मतें बोलण्याची कलाच जर नाहीं तर ती शिकून साध्य होणार कशी ? ती कां एखादें शास्त्र आहे, कीं, ज्याचें पाठांतर केलें असतां ती अवगत होईल ? अशा माणसांच्या बोलण्याचा–विधानांचा निष्कर्ष एवढाच निघतो कीं, उत्तम बोलणें ही ईश्वरी देणगीच होय. ज्याप्रमाणें वाटेल त्यास कवि होतां येत नाहीं, त्याप्रमाणें वाटेल त्याला चांगलें बोलणेंहि साधणें अशक्य. अशा आक्षेपकांस असा प्रश्न करतां येईल कीं, वैद्य होण्यास, वकीली करण्यास, व्यापारी बनण्यास दैवी शक्तीचीच जोड अवश्य लागते काय ? ईश्वरदत्त बुद्धीची जोड असलीच तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें होईल हा प्रश्न निराळा. पण अशा बुद्धीची जोड नसताना सुद्धां त्या त्या धंद्यांत प्रवीणता संपादन करतां येत नाहीं काय ? मग याच कलेंत श्रम केले असतां ती साध्य होणार नाहीं, असें गृहीत धरून कां चालावें ?

इंग्रजी भाषेंत अशी एक म्हण आहे कीं, "मनुष्याचा स्वभाव त्याच्या बोलण्याच्या व लिहिण्याच्या सरणीवरून अजमावतां येतो." म्हणून ही म्हण ध्यानांत घेतां आपल्या भाषणाचें महत्त्व व्यवहारदृष्ट्या किती असतें, याची कल्पना सहज होईल. पण खेदाची गोष्ट अशी कीं, कित्येक माणसें आपल्या संभाषणाविषयीं बेफिकीर असतात. वस्तुतः प्रत्येक शब्द किंमतीचा असतो. एक प्रसिद्ध अरबी पंडित म्हणतो कीं,[2] "प्रत्येक वाक्य म्हटलें म्हणजे सोन्याच्या रसाचा एक थेंब होय." या कलेंत तरबेज झालेला मनुष्य आपल्या प्रत्येक शब्दास किंमत देत असल्याचें दिसून येईल. एक अमेरिकन तत्त्वेत्ता म्हणतो कीं:[3]—"शब्दांनींच

1 " The style is the man."

2 " Every sentence is like a drop of gold."

3 " Words often make the thought, and the master of words will say things greater than are in him. Who-

विचार बोलून दाखवितां येत असतो. शब्दपंडित मोठ्या कुशलतेनें आपला विचार अधिक उठावदारपणानें बोलून दाखवित असतो. शब्दांचें वाक्य बनविणारा इसम आपलें अंगचें शहाणपण व्यक्त करतो, येवढेंच नव्हे तर, ज्या समाजाचें शब्दचित्र तो रेखाटतो त्या समाजाचें शहाणपण तो व्यक्त करीत असतो."

यावरून शब्दपंडित आपल्या मनांतील उद्भूत झालेले विचार मोठ्या कुशलतेनें-शहाणपणानें कसा मांडित असतो याची कल्पना येईल.

आतां अशा शब्दपंडितास त्याच्या कलेकरितां लागणारी सामुग्री कोणती म्हणाल, तर त्याचें तोंड तेवढें धड असावें लागतें. त्याची जिव्हा त्याच्या कह्यांत असून तिचा योग्य तोच उपयोग तो करीत असतो. त्यास पक्कें माहित असतें कीं, तिला सैरावैरा सोडल्यास 'ही बया कांहीं खोडी केल्याशिवाय रहावयाची नाहीं.'[1] असो. बाकीच्या कलांची तशी स्थिति नाहीं. गायनवादन कला घ्या; किंवा चित्रकला घ्या; त्या त्या कलेचें प्रदर्शन करण्यास विविक्षित प्रकारच्या साहित्याची पैदास जरूर करावी लागते. पण आपला शब्दपंडित "Master of words" राजाच्या दरबारांत जावो, खासगी बैठकींत बसो, अगर अगदीं अपरिचित मंडळींत चुकून माकून सांपडो, त्या त्या परिस्थितींत त्या त्या लोकांवर निवळ वाणीच्या जोरावर तो आपली छाप पाडूं शकतो. बेकन ह्मणतो[2] 'लेखनकला मनुष्यास त्या त्या विषयाचें ज्ञान बरोबर देते.' तर आपणांस असेंहि म्हणतां येईल कीं[3], 'चांगल्या तऱ्हेच्या संभाषणानें मनुष्यास प्रसंगीं काय बोलावें हें सुचून तो वेळींच परिणामकारक असें बोलून जातो.' ज्याप्रमाणें पोहण्याची कला केवळ पोहण्याच्या कलेवरील पुस्तकें वाचून साध्य होणें शक्य नाहीं; मल्लविद्या आखड्यांत

---

ever makes a sentence of words utters in his own wisdom, but the wisdom of the race whose life is in the words ?"

1 " He who allows his tongue to run riot, instead of controlling it makes for mischief."

2 " Writing maketh a man exact."

3 " Good conversation makes a man a ready thinker, a ready speaker."

प्रत्यक्ष उतरल्याशिवाय प्राप्त होत नाहीं, किंवा लिहिण्याची कला मांडी मोडून खर्डे लिहिल्याशिवाय अंकित होत नाहीं, तद्वतच बोलण्याची कला बोलण्याचा सराव ठेवल्याशिवाय अधिगत व्हावयाची नाहीं. तेव्हां चांगलें बोलतां येण्यास चांगलें बोलण्याचाच सराव ठेविला पाहिजे. अमेरिकन तत्त्ववेत्ता इमर्सन म्हणतो[1]:— "जोरदार मानसिक वृत्तीच्या मनुष्याबरोबर तुम्ही बराच वेळ संभाषण करा; म्हणजे त्याच्या विचारसरणीचा तुमच्यावर पगडा बसतो, येवढेंच नव्हे तर निरनिराळ्या वस्तूंकडे त्याची पहाण्याची जी ठरावीक रीत असते त्याच सरणीची संवय तुह्माला तात्काल लागते.व पुनः तुमचा त्याच्याशीं बोलण्याचा प्रसंग आला तर विवक्षित गोष्टींविषयीं त्याचे ठाम विचार काय आहेत, ते तुम्हांस आधींच आजमावतां येतात."

आतां प्रस्तुत कला साध्य होण्यास आपल्या अंगीं कोणते कोणते गुण अवश्य असावे लागतात ते पाहूं. डॉ. जॉनसनच्या मतें बोलण्याच्या कलेस पुढील गोष्टींची अवश्यकता असतेः—

१ ज्या विषयासंबंधीं आपणांस बोलावयाचें त्या विषयाचें ज्ञान हवें.

२ सदर विषयाच्या प्रतिपादनार्थ शब्दांची सामुग्री तयार हवी. शब्दांची कमतरता पडतां कामा नये.

३ कल्पनाशक्तीची जोड हवी. कल्पनाशक्तीच्या योगानें शब्दांची योजना कुशलतेनें करतां येऊन सुसंगतवार अशी विषयाची मांडणी मांडतां येते. अर्थात् बोलण्यांत चटकदारपणा येऊन मार्मिकताही येत असते.

४ प्रसंगावधान पाहिजे. वेळ कोणती, कोणाशीं आपण बोलत आहों, याचा सारासार विचार हवा.

५ दृढनिश्चय असा हवा कीं, कोणत्याही परिस्थितींत हार म्हणून खावयाची नाहीं; व हार खाल्ली असतां माघारही पण घ्यावयाची नाहीं. या शेवटल्या गोष्टीवर जॉनसननें फार जोर दिलेला आहे, दृढनिश्चय नसेल तर या कलेंत प्राविण्य कसें मिळणार ?

---

1 "*Talk much with any man of vigorous mind and we acquire fast the habit of working at things in the same light, and on each occurrence, we anticipate his thought.*"

जॉनसननें ही कला साध्य होण्यास वर दिलेल्या पांचच गोष्टींचा उल्लेख केला; पण आमच्या मतें एवढ्याच गोष्टीवर आपला निर्वाह होईल असें वाटत नाहीं. पुढील गोष्टी ध्यानांत ठेवणें जरूरीचें आहे असें दिसून येईल.

(अ) पहिली गोष्ट अशी कीं, सर्व कलांचें थोडें थोडें (अर्थात् व्यवहारापुरतें कां होईना) ज्ञान पाहिजे. हें ज्ञान संपादण्यास आपलें वाचन जबर पाहिजे. चिकित्सापूर्ण वाचनानें मानसिक शक्तींचा विकास होत जाऊन नवीन नवीन कल्पनांची भर पडत जाते, व शब्दांचा भरणाही वाढत जातो. विचार व कल्पना उदात्त असून त्यांची मांडणी योग्य शब्दांत कुशलतेनें झाली असतां आपल्या संभाषणाचा इष्ट परिणाम कां बरें होणार नाहीं !

(आ.) अपणांस प्रस्तुत कलेंत प्राविण्य मिळावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें विद्वान् व बहुश्रुत लोकांच्या सहवासांत वावरण्याची शक्य तितकी संधि पकडली पाहिजे. विश्वविद्यालयांतील उच्चतर–तम शिक्षण मिळालें असून जर तुह्मी एकलकोंडे रहाल तर वाक्कलेंत तुमची प्रगति होणार नाहीं. कोण कसा बोलतो, कोणाच्या कल्पनेच्या भराऱ्या किती उंच असतात, शब्दांच्या कोट्या कोण कसा करतो, दुसऱ्याजवळ केव्हां कसा विषय काढावा याबद्दलचा पोंच कोण कसा कसा दाखवितो ...अशा गोष्टी चांगल्या सुशिक्षित व बहुश्रुत समाजांत वावरल्याशिवाय इतरत्र पहावयास सांपडत नसतात.

(इ) खासगी तऱ्हेनें बोलतांना काय, किंवा सार्वजनिक रीत्या बोलतांना काय, आपले विचार व्यवस्थित तऱ्हेनें मांडण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. लोक आपणास हंसतील, आपली मागें थट्टा करतील ह्मणून आपल्या विचारांची प्रसिद्धी न करणें ही गोष्ट या कलेच्या दृष्टीनें केव्हांहि फायदेशीर होणार नाहीं.

(ई) पहिल्या पहिल्यानें प्रसंगावधान रहावें तसें रहात नाहीं. यामुळें आयत्या वेळीं आपले विचार अपुरे पडतात, शब्द कोते ठरतात, व विचारांची मांडणी व्यवस्थित तऱ्हेनें न झाल्यामुळें प्रथम प्रथम गाळण उडतेहि. पण, 'प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति' या न्यायानें यत्न हा चालू ठेवलाच पाहिजे.

(उ) आपल्या बोलण्यांत कांहीं उद्देश–निश्चय हवा.

श्रीसमर्थ ह्मणतातः—

' निश्चयेविण जें बोलणें। तें अवघेंचि कंटाळवाणें ।
बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरर्थक दासबोध.

(ऊ) उत्तम तऱ्हेनें बोलतां येण्यास दुसरा काय बोलतो हें सावधान चित्तानें ऐकून घेण्याची संवय हवी. त्याचें सर्व भाषण शांतपणें ऐकून घेऊन मग विचार करून उत्तर दिलें असतां तोडीला तोड होते. डॉ. जॉनसनची बोलण्याची पद्धत अशीच असें कीं, प्रतिपक्षाचें बोलणें तो सावधान चित्तानें ऐकून घेत असे; त्याच्या बोलण्यांत लंगडेपणा कोठें आहे हें तो लक्ष्यांत ठेवीत असे; व मागाहून त्याच्या त्या शब्दावर म्हणा, अगर कल्पनेवर ह्मणा, जोर देऊन आपल्या वाक्प्रहाराचा भडिमार करून तो प्रतिपक्षास 'दे माय धरणी ठाय' करून सोडीत असे. आपलें नेहमीं असें घडतें कीं, संभाषणाच्या भरांत आपण दुसऱ्याचें बोलणें पूर्णपणें ऐकून घेत नाहीं. दुसरा चार शब्द बोलतो न बोलतो तोंच, आपण मध्यें तोंड घालून आपण आपलें चऱ्हाट सुरु करतों, व अशा आगंतुकीच्या घातुक संवयीनें आपली बाजू आपण लंगडी करून सोडीत असतो. वास्तविक पहातां, दुसऱ्यास त्याची बाजू योग्य तऱ्हेनें मांडण्यास पूर्ण अवसर मिळाला पाहिजे. किंबहुना, तो त्यास मिळणें हा त्याचा हक्क आहे. परंतु दुसऱ्याच्या या हक्काकडे आपलें लक्ष जात नाहीं, ही दुःखाची गोष्ट होय. या कलेचा अभ्यास करण्यास अधीरा स्वभाव केव्हांहि कुचकामी ठरतो ही गोष्ट आपण मनांत वागविली पाहिजे.[१]

---

१ सुप्रसिद्ध आंग्ल लेखक स्विफ्ट याचे या बाबतींतील विचार मननीय आहेत. या उताऱ्यावरून स्पष्ट कळून येणार आहे कीं, बोलण्यांत अधीरता हा दोष असून या दोषामुळें संभाषणाचा हेतु साध्य होत नसतो. संभाषणाचा मुख्य हेतु म्हटला ह्मणजे दुसऱ्याची करमणूक ह्मणा अगर त्याला त्यासंबंधींचें ज्ञान करून देणें ह्मणा, हाच असतो; पण हा हेतु पुष्कळ वेळां साध्य होत नाहीं. याबद्दल इंग्रजी उतारा महत्त्वाचा असल्यामुळें तो जशाचा तसा खालीं देतों.

"There are two faults in conversation, which appear very different, yet arise from the same root, and are equally blameable; I mean an impatience to interrupt others; and the uneasiness of being interrupted ourselves. The two chief ends of conversation are to entertain and improve those we are among, or to receive those benefits ourselves; which whoever will consider, can not easily run into either of those two errors;because, when any man speaks in company, it is to be supposed

वरील बहुतेक गुण प्रसिद्ध ग्रंथकार डॉ. जॉनसन याच्या अंगीं वास करीत होते, ही गोष्ट बॉस्वेलनें जॉनसनचें जें चरित्र लिहिलें आहे, त्यावरून स्पष्ट दिसून येणार आहे. बोलण्याच्या कलेंत तो एक पंडितच होऊन गेला. बोलण्याची कला म्हणजे काय, व त्यांत प्रभुत्व कसें व किती मिळवितां येतें, याचें उत्तम उदाहरण डॉ. जॉनसन होय. त्याच्याबरोबर संभाषण करण्यास, वाद करण्यास जेव्हां एखादा विद्वान् येई, तेव्हां विजयश्री जॉनसनच्या गळ्यांत आपली माळ घालावयाची. जॉनसनचीच बाजू नेहमीं भली भक्कम असे, अशी कल्पना बांधणें चुकीचें होईल. पण तो कोणतीही बाजू घेवो, तिचें कुशलतेनें समर्थन करून प्रतिपक्षास चीत करून टाकण्याच्या बाबतींत त्याचा अगदीं हातखंडा होता. बर्क, फॉक्स हेहि प्रसिद्ध वाक्पटु होऊन गेले. बर्कच्या झणा किंवा फॉक्सच्या झणा, धोधो अशा अस्खलित वाक्प्रवाहानें पार्लमेंट कैक प्रसंगीं खडबडून जावो, प्रतिपक्षाची कितीहि तिरपीट उडो, किंवा त्यांच्या त्या भाषणाचा ध्वनि दूर दूर ठिकाणच्या इंग्रज लोकांच्या कर्णरंध्रांत कितीहि दुमदुमून राहो, पण त्यांनां जेव्हां डॉ. जॉनसनच्यापुढें येऊन भाषण करण्याची पाळी येई, तेव्हां त्यांची तिरपीट व फजिती उडे ही गोष्ट खरी. पुष्कळ वेळां त्याच्यापुढें त्यांना मुग्धतेचें पांघरूण घ्यावें लागे; व अनेक प्रसंगीं डॉ. जॉन-

---

he does it for his hearer's sake, and not his own; so that common discretion will teach us not to force their attention if they are not willing to lend it; nor on the other side, to interrupt him, who is in possession, because that is in the grossest manner to give the preference to our own good sense.

There are some people, whose good manners will not suffer them to interrupt you, but, what is almost bad, will discover abundance of impatience, and lie upon the watch until you have done; because, they have started something in their own thoughts, which they long to be delivered of. Meantime, they are so far from regarding what passes, that their imaginations are wholly turned upon what they have in reserve, for fear it should slip out of their memory."

सनच्या वाक्प्रवाहाचे घुटके ते चोरटेपणानें कसे घेत असत. याचें सुंदर चित्र जॉनसनच्या चरित्रांत बॉस्वेलनें फार उत्तम प्रकारें रेखाटलें आहे. जॉनसनच्या उलट बोलण्याची प्राज्ञा तरी कोणाची होती ? कार्लाईलच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास जॉनसन हा बोलण्याच्या कलेंत एक विभूति (Hero) होऊन गेला.

बॉस्वेलनें जॉनसनच्या चरित्रांत पुढील आख्यायिका दिलेली आहे. त्यावरून जॉनसन हा बोलण्याच्या कलेंत कसा तरबेज होता हें कळून येणार आहे.

एकदां, ऑक्सफर्ड विश्वविद्यालयामधून सहा विद्यार्थ्यांना जॉन वेस्लीचे ते अनुयायी म्हणून (Methodists) व ते सारखे जाहीर रीत्या धर्मावर प्रवचनें देत, प्रार्थना करीत म्हणून हांकून लाविले. तेव्हां जॉनसनचें म्हणणें पडलें कीं, 'त्यांना हांकून लाविलें ही न्याय्य व रास्तच गोष्ट झाली. विश्वविद्यालयांत ज्यांना शिकावयाचें नाहीं व ज्यांचा बहाणा दुसऱ्यांस शिकविण्याचा त्यांना विश्वविद्यालयच काय करावयाचें ? विश्वविद्यालयांत धर्माचीं तत्वें शिकावयाचीं नाहींत तर तीं कोठें शिकावयाचीं ? बरें पुनः त्यांची परीक्षा घेण्यांत आली, पण ते सर्व धड्डोबाच ठरले. बॉसवेल म्हणतोः– त्यांना हांकून लाविलें ही शिक्षा जास्ती कडक नाहीं कां झाली ? मला असें समजलें आहे कीं, तीं चांगलीं माणसें होतीं म्हणून. जॉनसन म्हणतोः—तीं असतील चांगलीं; परंतु ऑक्सफर्डच्या विश्वविद्यालयांत ठेवून घेण्याइतकी त्यांची पात्रता नव्हती, एवढीच काय ती गोष्ट. अहो, **गाय हें जनावर रानांत फार चांगलें असतें, परंतु ती बागेत आली असतां आपण तिला हांकून लावितोंच कीं नाहीं** ? यावर बॉसवेलचें तोंड बंद पडलें.[१]

१ इंग्रजींतील मूळ उतारा पुडीलप्रमाणें आहे.

"I talked of the recent expulsion of six students from the university of Oxford, who were methodists, and would not desist from publickly praying and exhorting. Johnson :—"Sir, that expulsion was extremely just and proper. What have they to do at an university, who are not willing to be taught, but will presume to teach ? Where is religion to be learnt, but at an university ? Sir, they were examined, and found to be mighty ignorant fellows." Boswell :—"But was

आपल्या इतिहासप्रसिद्ध विभूतीसुद्धां वाक्कलेंत तरबेज होत्या, ही गोष्ट पुढील आख्यायिकांवरून कळून येणार आहे.

१ शिवाजी व अफझलखान यांची भेट झाली व महाराजांनीं वाघनखांनीं खानाचीं आंतडीं बाहेर काढलीं, तेव्हां दोघांचें संभाषण झालें. "खान ह्मणतात. 'शिवजी, दगा केला. शिपाईगिरीची शर्त केलीस,...'**अब हमारी तरवार देख**' म्हणून महाराजावर वार खानांनीं चालविला... महाराजांनीं सफई करून '**तुम् पठाण, अब हमारी भवानी शिवजीको देखो**' असें बोलून तरवारीचा वार त्याचे खांद्यावर केला."

(२) निजाम उन्मुल्क व श्रीमंत बाजीरावसाहेब यांची भेट; या प्रसंगीचें उभयतांचें बोलणें फार मनोवेधक आहे. "नबाब बाजीरावांस म्हणतात. " आतां कसें ! आतां तुम्हीं आमचे हातांत सांपडला ! तुमचे शिंदे होळकर ते कोठें आहेत ? आतां तुह्मांस येथें आम्हीं एखादा दगा केला तर कसें होईल ?" श्रीमंत बोलतात, " मी जेथें आहे तेथें माझ्याजवळ सारे आहेत." यावर नबाब म्हणतात, " कोठें आहेत ?" मग, होळकर व शिंदे यांच्या भेटी नबाबाशीं करविल्या. त्यासमयीं निजाम-उन्मुलक याची खातरजमा झाली. नंतर नबाब बाजीराव यांस ह्मणतात, "आह्मी तुम्हांस या वेळीं दगा करणार नाहीं, कारण यासमयीं आह्मांस तुमची गरज. तुह्मांपाशीं काम बहुत आहे. याउपर आमचे विश्वासावर आमचे भेटीस कोणीं येऊं नये. आम्ही दगा करावयास चुकावयाचें नाहीं." असें ह्मणून नबाब बोलतात, " **एक बाजी सब पाजी** " हें श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंत नबाबांस बोलले, " **एक निजाम सब हजाम** "

वरील उदाहरणें देण्याचा आशय एवढाच, कीं, वाक्पंडित प्रसंगावधान राखून प्रतिपक्षास मार्मिक उत्तरें देऊन निरूत्तर कसें करून सोडतात, ही गोष्ट वाचकांच्या लक्ष्यांत यावी.

---

it not hard Sir, to expel them, for I am told they were good beings." Johnson :—' I believe, they might be good good beings but they were not fit to be in the university of Oxford. A cow is a very good animal in the field; but, we turn her out of a garden,"

प्राचीन काळीं, ग्रीस वगैरे देशांत विचारविनिमयाचीं साधनें उदाहरणार्थ, दैनिकें, मासिकें निरनिराळ्या माला वगैरे नव्हतीं. तेव्हां विचारविनिमयाचें मुख्य साधन संभाषण हेंच होतें. म्हणूनच बोलण्याच्या कलेस त्या काळीं फार महत्त्व आलें होतें. लोकमतावर आपल्या मतांचा पगडा बसण्यास मुख्य मुख्य वक्ते पेरिक्लीज, आल्सीबियाडीज, डेमॉस्थनीस त्याचप्रमाणें प्रसिद्ध तत्त्ववेत्ते सॉक्रेटीस, प्लेटो प्रभृतींनीं या कलेची आराधना करून राजकारण व तत्त्वज्ञान हस्तगत करून घेतलें होतें.

सारांश, ही कला साध्य होण्यास समयसूचकता, रंगेल वृत्ति,सहनशीलता, उदारमत व सदिच्छा इत्यादि अवश्यपणें लागणाऱ्या गुणांचा वास आपल्या अंगीं जरूर असावा लागतो. आपण हें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, आपण बुद्धिमान असलों, विद्वान असलों, श्रीमान् असलों तरी बोलण्याच्या कलेंत जर विशारद झालों, तरच लोकांवर आपली छाप पडणार व जगांतील व्यवहार सुरळीतपणें चालविण्याची धमक आपल्या अंगीं येणार.

प्रकरण चवथें.

"असत्याचें व्यावहारिक स्वरूप."

'सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म'

मुक्तेश्वर.

जगांतील सर्व देशांत व सर्व धर्मांत आबाल, वृद्ध, स्त्रीपुरुषांनां अनादि काळापासून सर्वतोपरि मान्य व प्रमाणभूत झालेलीं जीं कांहीं तत्त्वें आहेत, त्यांत 'सत्य' हें तत्त्व अग्रेसरत्वाचा मान पटकावून बसलें आहे. उपनिषदांतील 'सत्यं वद, धर्मं चर,' हा गुरुचा शिष्यास उपदेश, किंवा 'सत्येषु यतितव्यं वः सत्यंहि परमं बलं' या वाक्यानें भीष्मानीं शांति व अनुशासन पर्वांत केलेला धर्मास उपदेश, या दोन्ही उपदेशांत या जगांत प्रत्येकाचा (संसार) (सत्यमय) व्हावयास हवा असाच ध्वनि निघतो. शांतिपर्वांत 'नास्ति सत्यात्परो धर्मः'। किंवा मुक्तेश्वराचें 'सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म' हीं दोन्हीं महावाक्यें सत्यपूर्ण वागणूक म्हणजेच 'धर्माची पाळणूक' हीच गोष्ट कंठरवानें प्रतिपादन करीत आहेत. सारांश, हीं सर्व वचनें सत्याचा अगाध महिमा गात असलेलीं दिसून येतात.

मनु सत्य बोलण्यासंबंधानें म्हणतोः—

वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिः सृताः।
तांस्तु यः स्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः॥
(मनु. ४. २५६)

'मनुष्यप्राणी आपले सर्व व्यवहार वाणीच्याच जोरावर करीत असतो; तीच वाणी जर सत्यमय नसेल-सत्य सोडून ती जर संचरूं लागेल-तर वाणीशीं प्रतारणा होऊन सर्व मुदलाचीच एकदम चोरी करणारा तो होतो.' अशी स्थिति असल्यावर अर्थातच मानवी व्यवहाराचा धरबंद सुटून मानवी संसाराची इमारत अनीतिच्या वालुकामय पायावर उभारली जाते व अशी इमारत किती काळ टिकूं शकते, याचें प्रत्यंतर-कटु अनुभव-मनुष्य प्राणी अनादिकाळापासून घेत आलेला आहे. अशा कटु अनुभवाचे घुटके तो घेत असतो तरी, असत्यावरील त्याचा मोह कमी होत नाहीं. उलट, सत्यावरची त्याची निष्ठा कालांतरानें कमी होत जाऊन तो सत्य ब्रह्माच्या सेवेस पराङ्मुख होऊन बसतो.

हा असत्य बोलण्याचा मोह स्वभाववैचित्र्यानुसार बहुतेकांस थोडा थोडका तरी होत असतोच. ज्यास तो होत नाहीं, त्याची साधूच्या कोटींत गणना केली पाहिजे. शोचनीय स्थिति अशी कीं, मनुष्याच्या वाणींत 'कापडी अंक' कांहीं ना कांहीं असतोच. या विधानाचें प्रत्यंतर ज्यानें त्यानें आपल्या मनाशींच पडताळून पाहिलेलें चांगलें. खेदाची गोष्ट ही कीं, असत्यावरील मोह त्याच्या इतका पचनीं पडत जातो कीं, कालांतरानें 'आपण असत्यपूर्ण भाषण करीत असतों' ही कल्पनासुद्धां त्यास शिवत नाहीं. अशा माणसाच्या बाबतींत[1] "संवयीनें कोणतीहि गोष्ट आपला स्वभावच बनून जाते" ही इंग्रजी भाषेंतील म्हण सार्थ ठरूं पहाते. तेव्हां, पहिली गोष्ट अशी कीं, असत्य भाषणाचा मोह लहानपणापासूनच आवरला-त्याचा शक्य तितक्या जोरानें प्रतिकार केला तरच,-त्याचा आपल्यावरील पगडा कमी होणार. असत्य भाषणाचा प्रतिकार करण्याची जागृति सतत मनांत वागवावयास हवी. व अशा पूर्ण जागृतीच्या जोरावर असत्याचा मोह आंवरून सत्याचीच कांस धरून संसाराचें तारू

1 "Habit is the second nature."

हांकारणें म्हणजेच इहलोकींच्याच काय, पण, पारलौकिक यात्रेचेंहि ध्येय उत्तम तऱ्हेनें गांठल्याचें श्रेय मिळणार आहे.

असत्य बोलण्याच्या मोहाची प्रवृत्ति कां होते, या प्रश्नाचें विस्तृत विवेचन मिसेस ओपी या नांवाच्या एका इंग्रजी विदुषीनें केलें असून खोटें बोलण्याच्या तऱ्हांचें तिनें पुढीलप्रमाणें वर्गीकरण केलें आहे.

(अ) पोकळ डौल मिरविण्याची संवय लागल्यानें खरें व खोटें एका जात्यांतच भरडून टाकिलें जातें.

(आ) खुशामत करण्याची संवय लागली असतां खोटें बोलण्याची प्रवृत्ति होते.

(इ) आपणांस सवड मिळावी, आपली सोय व्हावी, या हेतूनें असत्य बोलण्याचा मोह पडतो.

(ई) ज्यामध्यें आपले हितसंबंध निगडित झालेले आहेत अशा बाबींसंबंधानें मनुष्य खोटें भाषण करण्यास प्रवृत्त होतो.

(उ) भीतीमुळें खोटें बोलणें प्राप्त होतें.

(ऊ) एखाद्याशीं शत्रुत्व अगर द्वेषसंबंध असला म्हणजे चुरशीनें खोटें बोलण्याची प्रवृत्ति होते.

(ए) दुष्ट बुद्धीचा मनुष्य असत्य भाषण हटकून करतो.

(ऐ) गमतीखातर मनुष्य अनृत भाषण करीत असतो.

आतां ,हें वर्गीकरण पूर्ण आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. मनुष्यस्वभावाच्या दृढतर अभ्यासानें आणखीहि भर वरील यादींत पडूं शकेल. मार्कट्वेन या विनोदी लेखकानें तर असा आढावा काढलेला आहे कीं, खोटें बोलण्याच्या एकंदर (अर्थात् त्याच्या दृष्टीनें) ८६९ तऱ्हा आहेत.

आतां असत्य भाषणाचे दुसरे कांहीं प्रकार आहेत, त्यांचा या ठिकाणींच विचार करूं.

(१) कित्येक लोकांचा क्रम असा असतो कीं, कांहीं विवक्षित हेतु नसतांना देखील खोटें बोलत सुटावयाचें. एखादा उद्दिष्ट कार्यभाग साधून घ्यावयाचा असेल तर गोष्ट निराळी. खोटें बोलण्यास कांहीं तरी सबब म्हणून तरी पुढें ढकलतां येईल. पण, तशी वस्तुस्थिति नसतांनासुद्धां खोटें बोलावयाचें.

पुढें पुढें तर असें होतें कीं, खोटें बोलल्याशिवाय चैनच पडत नाहीं. प्रसिद्ध ग्रंथकार बेकन ह्मणतो[1]:—

(खोटें बोलावयाचें म्हणून बोलावयाचें, ही मनुष्याची प्रवृत्ति कां असावी ? या प्रश्नाचें उत्तर काढण्याचा ग्रीसमधील कांहीं तत्त्ववेत्त्यांनीं यत्न केला. पण त्यांनांसुद्धां ह्या प्रश्नाची पूर्ण चिकित्सा करूनहि समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं. गमतीखातर खोटें बोलावयाचें, ही गोष्ट निराळी. उदाहरणार्थः— काव्यामध्यें रंगून कवी खोटें विधान करतात; बरें, व्यापारामध्यें नफा होतो म्हणून तर व्यापारी खोटें बोलतो; तशी तरी या माणसाची स्थिति असते कां पहावी तर तीहि पण नसते. तेव्हां असत्यामध्यें अशी काय जादू आहे कीं, ज्या जादूनें त्याच्यावर आपली इतकी जबर मोहनी टाकावी ! ! ! वर सांगितल्याप्रमाणें या तत्त्ववेत्त्यांनांहि जादूचा ठाव लागला नाहीं) बरोबर आहे, जादूच ती; तिचा ठाव लागावा कसा ?

(२) असे कित्येक लोक असतात कीं, वस्तुतः त्यांची असत्य बोलण्याची इच्छा असत नाहीं. पण ज्या गोष्टीविषयीं बोलावयाचें तिजबद्दलची सांगोपांग माहिती त्यांनां नसल्यानें ती गोष्ट सांगतांना मध्यें खंड पडूं नये ह्मणून, पदरच्या चार खोट्यानाट्या गोष्टी घुसडून द्यावयाच्या. परंतु अशा रीतीनें असत्य बोलून सुद्धां श्रोत्यांवर ती गोष्ट खरी असल्याबद्दलचा इष्ट परिणाम होत नाहीं तो नाहींच. शिवाय अशा प्रसंगीं नाहक फजिती उडण्याचा संभव मात्र फार असतो.

(३) खुशामत करणाऱ्या लोकांचा असत्य बोलण्याचा हेतु पुष्कळ वेळां स्वार्थमूलक असतो. स्वतःच्या फायद्यासाठीं दुसऱ्यांच्या दुर्गुणांकडे जाणून बुजून डोळे झांक करावयाची; व त्यांच्या मनोवृत्तीहि दुखविण्याच्या भानगडींत पडावयाचें नाहीं, असाच या लोकांचा हेतु असतो. परंतु अशा लोकांनीं बर्कचें पुढील वाक्य ध्यानांत धरणें जरूर आहे. तो ह्मणतो[2] कीं, "खुशामतीनें

---

1 " One of the later schools of the Grecians examineth the matter, and is at a stand to think what should be in it, that men should love lies, where neither they make for pleasure, as with poets, nor for advantage, as with the merchant ; but for the lies' sake."

2 " Flattery corrupts both the receiver and the giver."

खुशामत करणाऱ्याच्या व ती ज्याची केली जाते, त्याच्या अशा दोघांच्याहि नीतिमत्तेचा ऱ्हास होत असतो." अशा लोकांचा क्रमच हा कीं, दुसऱ्याच्या ह्मणण्याची री ओढावयाची, होस हो, ह्मणून टाळी द्यावयाची व स्वतःचा कार्यभाग साधून घ्यावयाचा!

(४) कांहीं लोक सभ्यतेचा आंव आणून दुसऱ्यांस न कळेल, अशा रीतीनें दुसऱ्यांचा आपल्याविषयीं अनुकूल ग्रह करून घेतात व तो तसाच अनुकूल टिकविण्याची खटपट करितात. अशीं माणसें सत्य पण अप्रिय बोलून तुम्हांला नाखुष करण्यापेक्षां सभ्यतेचा आंव घालून, कधीं स्तब्ध राहून तर दुसऱ्यावेळीं दुटप्पी बोलून तुह्मांला पूर्णपणें चकवीत असतात.

भारतांतील सभापर्वांत युधिष्ठिर श्रीकृष्णास ह्मणतो, 'देवा! ही गोष्ट (राजसूय यज्ञ पार पाडण्यास काय केलें पाहिजे?) तुलाच विचारण्याचें कारण असें कीं, कित्येक विनयशील पुरुष दुसऱ्याचे दोष केव्हांहि सांगत नाहींत, कित्येक पुरुष स्वार्थासाठीं प्रिय बोलत असतात, आणि कित्येक तर प्रिय बोलणें हेंच आपलें कर्तव्य समजत असतात. यामुळें एखादें कार्य केवळ लोकमतास अनुसरून केल्यानें तें खरोखरीच हितप्रद होईल असें म्हणतां यावयाचें नाहीं. म्हणून देवा, तूं असले हे त्रिविध हेतू एकीकडे ठेवून व कामक्रोधांनीं अविकृत राहून लोकांमध्यें जें कृत्य अत्यंत उचित असेल तें अगदीं बरोबर रीतीनें सांग, यावरून सत्य बोलणारा इसम किती विरळा असतो हें स्पष्ट कळून येणार आहे. सत्य बोलणें किती कठीण आहे, व सत्य हा नित्य धर्म कसा, ही गोष्ट मनूच्या खालीं दिलेल्या श्लोकावरुन स्पष्ट होणार आहे. मनु म्हणतोः —

सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम्।
प्रियंच नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः॥

मनु. ४-१३८.

अर्थः—(खरें बोलावें, गोड बोलावें, खरें असलें तरी कडू बोलू नये; गोड असलें तरी खोटें बोलूं नये, हा सनातन– नित्य धर्म होय.)

(५) आतां कित्येक मनुष्यांच्या अंगीं नैतिक बलाचा अभाव असल्यानें आपल्या 'सदसद्‌विवेक बुद्धीस' जें पटेल, तेंच बोलून दाखविणें म्हणजे त्यांच्या जिवावर धोंड आल्यासारखें होत असतें. अशीं माणसें आपली बाजू

स्पष्टपणें मांडण्याच्या भानगडींत पडत नाहींत, व स्वतःचा बचावहि करीत नाहींत; व तसाच कांहीं प्रश्न उपस्थित झाल्यास उत्तर देण्याची टाळाटाळच करून वेळ मारून नेत असतात. अशा माणसांचा हिशेब असा असतो कीं, आपण होऊनच ती गोष्ट बोलून कशाला दाखवा ? आपोआपच त्यांचें त्यांना खरें काय आहे हें कळून येईल. अशा समजुतीनें ते मागेंमागें घेत असतात; म्हणून नैतिक बळाची जोड नसली म्हणजे नाहक खोटें बोलण्याचा प्रसंग वारंवार येत असतो.

(६) कित्येकांचें म्हणणें असें पडतें कीं, असत्य बोललें तरच आपल्या बाजूचें समर्थन होऊन तात्कालिक फायदाहि पण होत असतो. तेव्हां असा फायदा सोडून सत्य बोलण्याच्या भानगडींत कोण पडतो ? परंतु व्यवहारांत अशी दृष्टि ठेवणें मनुष्याचें शील नव्हे. जगापुढें सत्याची बाजू मांडून आपलें कर्तव्य बजावीत रहावयाचें–याच वागणुकीला शीलाची वागणूक म्हणतां येईल; व हाच मार्ग केव्हांहि श्रेष्ठतम ठरेल. बेकन म्हणतो:[1]—

“ सरळ व रोखठोक व्यवहार करणें हेंच मनुष्याच्या शीलास योग्य होय. खरें व खोटें यांचें मिश्रण ह्मणजे चांदी अगर सोनें व हिणकस धातु यांचें मिश्रण करण्यासारखें होय. त्या नाण्याचा खणखणीत व्यवहार जरी चालला तरी त्या व्यवहाराची किंमत केव्हांहि हिणकस ठरणार...मनुष्याचा एकदां खोटा व्यवहार आढळून आला कीं लज्जेनें त्याला खालीं मान घालावी लागते.”

पुनः असत्यपूर्ण वागणूक करणें म्हणजे सृष्टिनियमांचें अतिक्रमण करण्यासारखें होय. ‘सत्य’ म्हणजे ‘असणारें,’ म्हणून कधींहि ‘नाहींसें न होणारें,’ अथवा त्रिकालाबाधित रहाणारें,’ म्हणून, असत्यपूर्ण व्यवहारानें क्षणिक फायद्यास बळी पडणें व आपलें शील भ्रष्ट करणें हें कोणत्याहि दृष्टीनें श्रेयस्कर नाहीं.

---

1 “ Clear and round dealing is the honour of man's nature : and that mixture of falsehood is like alloy in coin of gold and silver, which may make the metal work the better, but it embasseth it. . . . . There is no vice that doth so cover a man with shame as to be found false and perfidious.”

सर् मॅथ्यू हेल नांवाचा ग्रंथकार म्हणतोः-खोटें बोलणें, खोटा व्यवहार हा ईश्वराविरुद्ध गुन्हा आहे, एवढेंच नव्हे तर सर्व मानवजातीविरुद्ध तो गुन्हा आहे. व ज्या समाजांत 'सत्य' या मूलभूत तत्त्वास किंमत नाहीं, तो समाज सुसंघटित व चिरस्थायी होणें अशक्य आहे.[1]

आतां खरें वाटेल तेंच बोलणार, व तेंच आचरून दाखविणार, अशा बाण्याचीं माणसें केव्हांहि झालें तरी विरळांच. सत्यपूर्ण व्यवहार हेंच सर्वांचें ध्येय असावें. कारण सत्यमय व्यवहाराचीं माणसें केव्हांहि देशास ललामभूतच होत असतात;व अशा देशाचा दर्जा जगांतील राष्ट्रांमध्यें वाढत असतो. बायबलामध्येंहि म्हटलें आहे कीं,[2] "उच्च नीतीमत्तेच्या वागणुकीनेंच देश श्रेष्ठ पदवीस चढत असतो."

आतां व्यवहारांत नेहमीं जिव्हाचापल्याचा उपयोग करावा लागतो, अशांतला कांहीं भाग नाहीं. कित्येक प्रसंगीं खरें बोलण्याचा प्रसंग आला असतां मूग गिळून बसणें हें सुद्धां असत्याच्या बाजूस उचलून धरल्याप्रमाणें होत

1 "Never speak anything for a truth which you know or believe to be false. Lying is a great sin against God, who gave us a tongue to speak the truth, and not falsehood. It is a great offence against humanity itself; for where there is no regard to truth, there can be no safe society between man and man. And it is an injury to the speaker; for, besides the disgrace which it brings upon him, it occasions so much business of mind, that he can scarcely tell truth, or avoid lyi ng, even when he has no colour of necessity for it; and in time, he comes to such a pass, that as other people cannot believe he speaks truth, so he himself scarcely knows when he tells a falsehood.

As you must be careful not to lie, so you must avoid coming nearer it. You must not equivocate, nor speak anything positively for which you have no authority but to report or conjuncture, or opinion !--Sir; Mathew Hale."

2 "Righteousness alone exalteth a nation."

असतें. कधीं कधीं डोळयाचा एक कटाक्षसुद्धां असत्य बोलण्याचें काम करीत असतो. सारांश, असत्य भाषणाचे असे सूक्ष्म भेद अनेक आहेत.

(अ) आतां असा एक प्रश्न येथें उद्भवण्याचा संभव आहे कीं, सत्य भाषण केलें पाहिजे, व सच्चा व्यवहार असला पाहिजे या गोष्टी खऱ्या. पण व्यवहारांत आपल्यावर म्हणा, दुसऱ्यावर म्हणा, चोरांचा हल्ला येऊन बिकट प्रसंग ठेपला; व अशा वेळीं तुम्हीं खोटें बोलला, तरच सुटकाही होण्याचा संभव-खात्रीही पण आहे. तर अशा प्रसंगीं सत्य बोलावें किंवा बोलूं नये? प्रश्न बरोबर. आपल्या शास्त्रकारांनीं हा प्रश्न सोडवून निर्णय काय काढलेला आहे, येवढेंच या ठिकाणीं पहाणें आहे (कारण, निरनिराळया शास्त्रकारांचीं मतें याविषयीं कशीं काय आहेत, त्याविषयींची साधकबाधक प्रमाणें पाहून चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे म्हणून) शांतिपर्वांत सत्यानृताध्यायीं (शां. १०९,१५ १६,) भीष्म युधिष्ठिरास सांगतात कीं:—

अकूजनेनचेन्मोक्षो नावकूजेत्कथंचन ।
अवश्यं कूजितव्ये वा शंकेरन्वाप्यकूजनात् ।
श्रेयस्तत्रानृतं वक्तुं सत्यादिति विचारितम् ॥

"न बोलतां मोक्ष म्हणजे सुटका होण्यासारखी असेल तर, कांहीं झालें तरी बोलूं नये; आणि बोलणें अवश्यच असेल तर, किंवा न बोलल्यानें (दुसऱ्यास) शंका येण्याचा संभव असेल तर, त्यावेळीं सत्यापेक्षां खोटें बोलणें प्रशस्त, असें विचारांतीं ठरलेलें आहे! ज्यानें सर्वांचेंच नुकसान होतें तें सत्य नव्हे, व अहिंसाहि नव्हे. शांति पर्वांत (३१९.१३:२८७.१९) सनत्कुमाराच्या आधारानें नारद शुकास सांगतातः—

सत्यस्यवचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत् ।
यद्भूतहितमत्यतं एतत्सत्यं मतं मम ॥

(सत्य बोलणें हें प्रशस्त होय; पण, सत्यापेक्षांहि सर्व भूतांचें ज्यांत हित असेल तें बोलावें. कारण, सर्व भूतांचें ज्यांत अत्यंत हित, तेंच माझ्या मतें खरें सत्य होय." बायबलच्या नव्या करारांत ख्रिस्ताचा शिष्य पॉल म्हणतो:—[1]

---

1 "For if the truth of God hath more abounded through my lie unto his glory; why yet am I also judged as a sinner? (Romans 3, 7)."

" मीं खोटें बोलल्यानें प्रभूच्या सत्याचा महिमा जर अधिक वाढतो–म्हणजे ख्रिस्तीधर्माचा अधिक प्रसार होतो, तर त्यामुळें मी पापी कसा ठरणार ?

(आ) आपल्या शास्त्रकारांनीं असा एक नियम घालून दिलेला आहे कीं:—

" **न नर्मयुक्तं वचनं हिनस्ति न स्त्रीषु राजन्न विवाहकाले ।**
प्राणात्यये सर्वधनापहारे पंचानृतान्याहुरपातकानि ॥

अर्थः—थट्टेंत, बायकांजवळ, विवाहकालीं, प्राणावर संकट आलें असतां, आणि मिळकत बचावण्यासाठीं मिळून पांच ठिकाणीं अनृत बोलणें पातक नाहीं."

या बाबत मनूचा निर्णय पाहा:—

कामिनीषु विवाहेषु गवांभक्ष्ये तथेन्धने ।
ब्राह्मणाभ्युपपत्तौ च शपथे नास्ति पातकम् ॥ मनु १.११२

या सर्व निर्णयावरून आपणांस असें म्हणतां येईल कीं, **आपल्या शास्त्रकारांनीं असत्य बोलण्याची मंजुरी अपवादादाखलच अपरिहार्य ह्मणून दिलेली आहे.** यावरून खोटें बोलणें आपल्या शास्त्रकारांस पसंत आहे ह्मणून, सरास खोटा व्यवहार करूं लागल्यास शास्त्रकारांच्या वचनांचा धडधडीत विपर्यास केल्याचें व खोटा व्यवहार जाणून बुजून केल्याचें असें दुप्पट पातक आपल्या माथीं बसणार, हें उघड आहे. अपरिहार्य म्हणून ज्या ज्या ठिकाणीं असत्य भाषण करण्याची मुभा दिलेली आहे, त्या त्या ठिकाणीं हें पापच झालें असें म्हणून त्यांनीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. वास्तविक विचार करतां **आपल्या शास्त्रकारांचा अखेरचा सिद्धान्त** असा आहे कीं,

आत्महेतोः परार्थे वा नर्महास्याश्रयात्तथा ।
ये मृषा न वदन्तीह ते नराः स्वर्गगामिनः ॥

" स्वार्थाकरितां परहितार्थ, किंवा थट्टेनेंहि जे पुरुष या जगीं कधीं देखील खोटें बोलत नाहींत, त्यांसच स्वर्गप्राप्ति होते." यावरून आपल्या शास्त्रकारांस अनृत भाषण करणें ही गोष्ट पसंत नसून त्यांनीं कित्येक ठिकाणीं 'असत्य' भाषण करण्याची मंजुरी जी दिलेली आहे, ती अपरिहार्य ह्मणूनच दिलेली

असल्यानें ठिकठिकाणीं अशा धर्माला त्यांनीं ' आपद्धर्म ' हेंच नांव दिलेलें आहे. त्यांच्या सर्व वचनांतून मनुष्याचा व्यवहार सत्यमय व्हावा, असाच ध्वनि निघतो. व्यवहारांत अशा त्यांच्या वचनाकडे काणाडोळा करणें म्हणजे सूर्य तळपत असतां काळाकुट्ट अंधःकार पडला आहे, असें म्हणण्यासारखें होय; असो.

वरील विवेचनावरून मनुष्याच्या नीतीमत्तेची भलीभक्कम इमारत नेहमीं ' सत्या'वर उभारली जाते, ही गोष्ट कळून चुकणार आहे. असत्य व्यवहाररूपी रोगानें नीतीमत्तेचें शरीर पोखरून जातें; व अखेर नैतिक बलाचा ऱ्हास होत असतो. मनुष्याचें शिक्षण कितीहि झालेलें असो, त्याची बुद्धिमत्ता कितीहि अलोट असो, लोकांस एकदा त्याच्या खोट्या व्यवहाराची बातमी लागली कीं, त्याचें शील कवडीमोल होत असतें. खोट्या व्यवहाराची बतावणी त्यानें किती जरी केली तरी, तो व्यवहार केव्हांतरी सृष्टीनियमानुसार उघडकीस येऊन त्याची फटफजिती व्हावयाची ती होत असतेच. कावळा मोर होऊं पाहतां त्याची जी स्थिति झाली तशीच या खोट्या व्यवहाराच्या माणसाची होत असते. सत्यप्रिय मनुष्यास शीलभ्रष्टता खपत नसते. सत्यापासून मी रेसभर ढळणार नाहीं, सत्याची कास मी सोडणार नाहीं, मग कितीहि अडचणी आल्या तरी बेहत्तर; सत्यपूर्ण वागणूक हेंच आपलें ब्रीद, हाच आपला बाणा व हेंच आपलें ध्येय ही गोष्ट व्यवहारांत तो सदैव मनांत वागवीत असतो.

हल्लीच्या काळीं तर व्यापार व असत्य यांचा संबंध पहातां, तो जिव्हाळ्याचा असल्याचें आपणांस कळून येईल. कित्येकांच्या मतें व्यापार म्हणजे खोटा व्यवहार; जणूं काय, हें समीकरण स्पष्टपणें मांडण्यास त्यांचें मन जरासुद्धां कच खात नाहीं. व्यापार जसा पैशाशिवाय होत नाहीं, तसाच तो खोटें बोलल्याशिवाय चालणेंहि पण शक्य नाहीं; अशी त्यांची समजूत असते. याचें प्रत्यंतर हल्लींच्या ' जाहिरातीच्या युगांत ' वाटेल तसें येणार आहे ! जाहिरात देण्यामध्यें जितकी तुमची बुद्धिमत्ता खर्च करणें तुह्मांस शक्य असेल, तितकी खर्च करा; व पैसे उकळा. कारण, पुष्कळशा जाहिरातींत सांगितलेला अनुभव कोणाच्या प्रत्ययास येत असतो ! तसेंच, पुष्कळ दुकानदारांचीं दिवाळीं तरी कां निघत असतात ? या सर्व गोष्टींची मीमांसा करतां आपणांस त्यांचा खोटा व्यवहार हाच त्यांच्या नाशास कारणीभूत होत असतो, असें एकच उत्तर देतां येतें.

अनीतीमूलक व्यवहाराची मीमांसा करतांना आपणांस अशी गोष्ट दिसून येते कीं, कामक्रोधादि षड्रिपु हे मनुष्याच्या नीतीमत्तेचा ऱ्हास करण्याकरितां टपून बसलेले असतात त्यांच्यावर वर्चस्व मिळविण्याकरितां उपयोगी पडणारी जर कोणती शक्ति असेल तर ती 'सत्यपूर्ण व्यावहारिक वागणूक' हीच होय. ही सत्यपूर्ण वागणुकीची शक्ति ईश्वरानें मनुष्याच्या स्वाधीन केलेली आहे व त्याला अशी आज्ञा करून ठेविली आहे कीं, " बाबारे, या शक्तीचा तूं उपयोग कर, म्हणजे षड्रिपूंचें तुजवर कांहींहि चालणार नाहीं." या शक्तीचा उपयोग करून घेतल्यास जगन्नियंत्याची आज्ञा पाळल्याचें आपल्याला श्रेय मिळतें; नाहींपेक्षां त्याचा नियम उल्लंघिल्याचें पातक लागून प्रायश्चित्त भोगावें लागतें. डॉ. भांडारकरांनीं आपल्या एका धर्मपर व्याख्यानांत सांगितलें आहे कीं, " सत्य एकंदर व्यवहाराचें बीज आहे. सत्यास अनुसरून निस्पृह बुद्धीनें एखादी गोष्ट आपलें कर्तव्य म्हणून करणें हेंच धर्माचें सार आहे "

पौराणिक कालांत 'सत्य' या महातत्त्वास किती महत्त्व दिलें जात असें, ही गोष्ट श्रीरामचंद्राच्या, पांडवांच्या चरित्रावरून स्पष्ट कळून येणार आहे. श्रीरामचंद्राची एक गोष्ट आहे कीं, दशरथाच्या वचनास अनुसरून श्रीरामचंद्र वनवास करीत असतां, जाबालीनें दशरथ निवृत्त झाला, तेव्हां त्यास दिलेल्या वचनाचें बंधन आतां राहिलें नाहीं; आणि भरताचा आग्रह आहे तर, १४ वर्षें वनवास करण्याचें वेड सोडून दे, असें म्हणून त्याचा निश्चय ढळविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां रामाच्या तोंडातून निघालेला 'सत्यमेवेश्वरो लोके सत्ये सर्वं प्रतिष्ठितम्'–सत्य हाच लोकांमध्यें ईश्वर, सत्य हाच सर्वांचा आधार हा उद्गार फार महत्त्वाचा आहे. व हा उद्गार सतत मनांत वागवून आपण जर संसारांत चालूं लागलों तर आपल्या जन्माचें सार्थक झालें असेंच समजणें रास्त होईल.

अशा जगन्मान्य महात्म्यांच्या चरित्रांची मीमांसा केल्यास दिसून येईल कीं, 'विचार उच्चार, आचार' या त्रयीमध्यें त्यांच्या सत्यपूर्ण वागणुकीचा धागा गोंविलेला होता, म्हणूनच ते सर्व जगास वंद्य होऊन बसलेले आहेत.

पुन्हां, सत्यपूर्ण वागणुकीनें मनुष्यास ईश्वरविषयक ज्ञान होत असतें. या विषयीं श्वेताश्वतर उपनिषदांत एक श्रुति आहेः —

**'तिलेषु तैलं दधिनीव सर्पिरापः स्रोतस्वरणीषु चाग्निः ।
एवमात्मनि गृह्यतेऽसौ सत्येनैवं तपसा योऽनुपश्यति ॥**

"'तिलामध्यें तेल जसें सांपडतें, दह्यामध्यें घृत, बारीक झऱ्यामध्यें पाणी, अरणीमध्यें अग्नि त्याप्रमाणें सत्य व तप यांच्यायोगें जो पाहतों, त्याला आपल्याच ठायीं परमेश्वर सांपडतो."

याचप्रमाणें बायबलमध्येंहि• सांगितलें आहे कीं, "तुम्ही एकमेक बांधव आहां, तर असत्याची शीग सोडून सत्यपूर्ण भाषण करीत जा.[1]"

सारांश, स्त्रियांनां जितकी पातिव्रत्याची किंमत वाटत असते, तितकीच मनुष्यांनां सत्याची वाटली पाहिजे; असो. तेव्हां प्रेमपूर्वक विनंति कीं, व्यवहारतः व परमार्थतः सर्व संसार सुखप्रद होण्यास उपनिषदांतील "सत्यं वद, धर्मं चर।" हा मंत्र आपल्या मनःफलकावर कोरून ठेवा, व संसारांत '**राम**' आहे; हें सिद्ध करून दाखवा.

प्रकरण पांचवें.

"व्यवहारतः कलहप्रियता केव्हांहि अनिष्टच."

भद्रं भद्रमिति ब्रूयाद्भद्रमित्येव वा वदेत।
शुष्कवैरं विवादंच न कुर्यात्केनचित्सह॥ मनु ४-१३९.

अर्थ:—अभद्र असलें तरी त्याला भद्र (चांगलें) म्हणावें, चांगलें असल्यास चांगलें म्हणावेंच. काथ्याकूट, तंटे–भांडणें कोणाबरोबरहि करूं नयेत.

लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्यामध्यें "योगः कर्मसु कौशलम्" (गी. २-५०) या पदांतील 'योग' म्हणजे कर्में करण्याची कांहीं विशेष प्रकारची कुशलता, युक्ति, चतुराई अगर शैली अशी या शब्दाची व्याख्या गीतेंतच मुद्दाम स्पष्टपणें केलेली आहे, म्हणून 'योग' या शब्दाची चर्चा करून अखेर 'कर्माचें पाप न लागतां कर्में करण्याची समत्वबुद्धिरूप जी विशेष युक्ति प्रथम सांगितली, तिचेंच नांव 'कौशल' असून या कौशल्यानें म्हणजे युक्तीनें कर्में करणें यासच गीतेंत 'योग' म्हटलें आहे, असें उघड दिसून येतें;" असाच आपला अखेरचा निर्णय दिलेला आहे. या ठिकाणीं या निर्णयाच्या योग्यायोग्यतेचा विचार कर्तव्य नसून व्यवहार–शास्त्रांत योगः कर्मसु कौशलम्'

---

1 "Wherefore, putting away falsehood, speak ye truth each one with his neighbour: for we are members one of another."

याचा काय अर्थ अभिप्रेत आहे, तेंच या ठिकाणीं पहावयाचें आहे. गीतेमध्यें ' योगः कर्मसु कौशलम् ' या पदांतील योग म्हणजे कर्मयोग–निष्काम कर्मयोग–'निष्काम कर्म करण्याचें कौशल्य" असा अर्थ अभिप्रेत असला तरी, लोकव्यवहारांत विविक्षित उद्देशफल–मनांत वागवून सत्य धर्मानें पण गोडी गुलाबीनें कर्म करण्याचें कौशल्य असाच संकुचित अर्थ घेतला पाहिजे. विवक्षित उद्देशाप्रीत्यर्थ मनुष्याचा जगांतील सर्वसाधारण व्यवहार दिसून येतो. किंबहुना विवक्षित ध्येय गांठण्यासाठीं कुशलतेनें कर्म करीत रहाणें हाच व्यवहारशास्त्राचा पाया होय.

परंतु, सत्यपूर्ण वागणुकीनें, कुशलतेनें कर्में करीत राहून उद्दिष्ट ध्येय गांठणें ही गोष्ट निष्काम बुद्धीनें कर्में करण्याची कला साध्य करून घेण्याइतकीच कठीण आहे. याचें कारण उघड आहे कीं, व्यवहारांत निरनिराळ्या प्रकृतीधर्मांच्या पुरुषांशीं, स्त्रियांशीं (कुटुंबांत म्हणा, अगर समाजांत म्हणा) आपला संबंध येत असतो. कित्येकांचा स्वभाव रागीट असला, तर दुसरे दुष्टबुद्धीचे असतात, तिसऱ्या प्रकारचे लोक कुढ्या मनाचे असले तर चौथ्या प्रकारचे दुटप्पी वृत्तीचे...अशा प्रकारच्या मानवी स्वभावाच्या अनेक तऱ्हा आहेत. ही गोष्ट मनुष्यस्वभावाचें वरवर निरीक्षण केलें तर कळून चुकणार आहे.

तेव्हां अशा निरनिराळ्या प्रकृतिधर्मांच्या माणसांशीं 'मिळतें' घेण्यास कलहाचें खटक्याचे प्रसंग प्रयत्नपूर्वक टाळणें कसें इष्ट आहे, व तत्प्रीत्यर्थ आपण कोणत्या गोष्टी मनांत वागवून आचरणांत - कृतींत काय काय उतरविलें पाहिजे, याविषयींचीच चर्चा या ठिकाणीं करण्याचें योजिलें आहे.

तुकोबांनीं सांगितलें आहे कीं, ' मन करारे प्रसन्न सर्वसिद्धीचें कारण.' या वचनांतील 'सर्वसिद्धीचें कारण' हें पद महत्वाचें आहे पारमार्थिक सिद्धि काय किंवा व्यावहारिक–ऐहिक सिद्धि काय, या दोन्ही सिद्धि मिळण्याकरितां मनाची प्रसन्नवृत्ति हीच कशी कारणीभूत असते हीच गोष्ट त्यांनां दाखवावयाची आहे. जगांत आपला व्यवहार सदा सुरळीत चाललाच पाहिजे, अशी छातीला हात लावून हमी देण्याची कोणाची तयारी आहे ? पुष्कळ वेळां, चिंता, कलहाचे प्रसंग मनुष्याची प्रसन्नवृत्ति ढळवितात. अशा वेळीं मुख्य गोष्ट अशी कीं आपल्या मनाची समता–सुस्थिति–प्रसन्नवृत्ति रहाण्याची योग्य खबरदारी

मनुष्यानें घेणें चांगलें. मनाचे सूर बेसूर न करतां मनामध्यें सुरेल गाणें गात राहिल्यानें आपली वृत्ति वाटेल त्या परिस्थितींत प्रसन्न राखण्यास हरकत पडत नाहीं. जगांतील व्यवहाराच्या टक्याटोणप्यांच्या तडाक्यांत सुद्धां मनामध्यें सुरेल गाणें गात राहिल्यानें मनुष्यास आपले व्यापार व्यवस्थित तऱ्हेनें करतां येतात.[१]

याबाबत मनुष्यानें मुख्य गोष्ट अशी ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, काळजी कामापुरती वहावयाची. ती सारखी लावून घेणें म्हणजे मानसिक स्वास्थ्य बिघडविणें होय. याविषयीं ग्लॅडस्टन यांचें उदाहरण जमेंत घेण्यासारखें आहे. हाऊस ऑफ कॉमन्सच्या सभेंतून ग्लॅडस्टन साहेबांची स्वारी जी घरीं यावयाची, ती काळजीचें गाठोडें हाऊस ऑफ कॉमन्सच्या इमारतींत ठेवूनच यावयाची. त्यामुळें त्यांची वृत्ती सदा प्रसन्न रहात असे. किंबहुना, असेंहि म्हणतां येईल कीं, अशी प्रसन्न वृत्ति सतत राखण्याची ट्रक त्यांस साधून गेलेली होती. त्यामुळें जबाबदारीचीं कामें अंगावर घेऊन तीं उरकण्याचें त्यास कांहींच वाटत नसे. आतां जगांत कित्येकांच्या मनाची स्थिति इतकी नाजूक होऊन बसलेली असते कीं, एखादी वाईट गोष्ट कर्मवशात् त्यांच्या हातून घडली तर ती त्यांच्या मनाला सारखी लागून रहाते. अर्थातच फाजील काळजी वाहिल्यानें त्यांचा इतर व्यवहार व्यवस्थित तऱ्हेनें पार पडत नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यामुळें त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम घडत असतो अशा मनोभूमिकेच्या माणसांनीं आपलें चित्त प्रसन्न राखलें नाहीं, किंबहुना चित्त प्रसन्न राखण्याची कला त्यांस साध्य करून घेतां आली नाहीं, तर त्यांच्या जगण्यांत 'राम' तो काय रहाणार? 'दुःखासी कारण जन्म घ्यावा'

---

१ याबाबत आंग्ल कवि केबल ह्मणतोः—

"There are in this loud stunning tide
Of human care and crime,
With whom the melodies abide
Of th'everlasting chime;
Who carry music in their heart.
Through dusky lane and wrangling mart,
Plying their daily task with busier feet,
Because their secret souls a holy strain
repeat."

या तुकारामाच्या मात्रेचे वळसे सारखे घेण्याचें त्यांच्या नशीबीं ठरलेलें. मनाची शक्ति किती अचाट आहे याविषयीं एक आंग्ल कवि ह्मणतोः[1]—

"मनरूपी राज्यामध्यें मनाची शक्ति इतकी अचाट आहे कीं, त्याची (मनाची) सुस्थिति असली ह्मणजे नरकाचा स्वर्ग होतो, व त्याची समता बिघडली असली म्हणजे स्वर्गाचा नर्क होतो!" तेव्हां, निरनिराळ्या प्रकृतिधर्मांच्या माणसांशीं व्यवहाराचे प्रसंग आले असतां आपलें मन प्रसन्न नसेल तर त्यांच्याशीं आपले खटके उडण्याचें ठरलेलें, हें ध्यानांत ठेवावें.

आतां, खटके उडाले असतां मनुष्यस्वभावावर काय काय दुष्परिणाम घडून येतात ते पहाः–सारखे तंटे बखेडे करीत राहिल्यानें मनाची प्रसन्नता ढळते. अर्थातच मनाला उत्साह वाटेनासा होतो; तो कधीं कधीं रागीट, चिरचिरा बनत असतो. मनाचा उदारपणा लोपून त्यास संकुचितपणा आल्यानें दुसऱ्याचे गुण दिसावयाच्या ऐवजीं त्याचे दोषच त्यास ठळकपणें दिसूं लागतात. ह्मणूनच "जगांत अत्यंत कठीण गोष्ट ह्मटली म्हणजे स्वतःचे स्वतःस ओळखावयास शिकणें, व अत्यंत सोपी गोष्ट म्हटली ह्मणजे दुसऱ्याच्या कृतींतील दोष काढणें" असें विधान ग्रीक तत्त्ववेत्ता थेल्स यानें केलें आहे[2]. लोकांचे दोषच निवळ दिसूं लागले म्हणजे त्या माणसाची वृत्ति साशंक झालेली आहे असें समजावें याचा परिणाम असा होतो कीं त्याचा लोककृतींकडे पहाण्याचा दृष्टिकोण बदलून जातो, त्याच्या मनांत दुसऱ्या विषयीचे भलत्या भलत्या ग्रहांचें जाळें माजून जातें. अशी स्वभावाची नाजुक परिस्थिति झाल्यावर लोकांबरोबर खटके उडण्यास वाटेल तितका अवसर सांपडत असतो.

आज आपल्या कुटुंबाच्या अगर समाजाच्या स्थितीचें चित्र काढल्यास त्यांत खालीं निर्दिष्ट केलेले दोषरूपी डाग कमीजास्त प्रमाणांत–ठळक अगर पुसट असे दिसून येतील.

---

1 "The mind is its own place and in itself
Can make a heaven of hell, a hell of heaven."

2 Thales said that the hardest thing was to learn to know oneself; the easiest to find fault with the doings of other people.

(१) स्वार्थवृत्तिः—या दुर्गणाचा फैलाव हल्लींच्या काळींतर इतका अनावर झालेला आहे कीं, जो तो आपापल्या स्वार्थास कवटाळून बसलेला दिसत आहे; एवढेंच नव्हे तर, दुसऱ्याचाहि स्वार्थ असतो, दुसऱ्याची बाजू कांहीं ह्मणून असते ही कल्पनाहि त्यास शिवेनाशी झालेली आहे. अपवादात्मक कांहीं स्थळेंहीं निघावयाचीं. पण ते केव्हांहि अपवादच. त्यामुळें सर्वसाधारण नियमास कांहीं बाध येत नाहीं; तेव्हां दोन स्वार्थ एके ठिकाणीं आले असतां चकमक उडण्यास काय उशीर ?

(२) स्वतःच्या गुणांचा अगर कर्तबगारीचा फाजील अभिमान अगर अहंभाव. या दोषामुळें दुसऱ्याच्या गुणांविषयींचें उदार मत रहात नसून दुसऱ्याशीं फटकून–सडेतोड वृत्तीनें वागण्याची त्याची रहाटीच होऊन बसते. अशा तुसड वागणुकीनें लोक खुष रहात नाहींत, हा अनुभव स्पष्ट आहे.

(३) हल्लीं आपल्या समाजाच्या व्यवहाराचें निरीक्षण केलें असतां आपल्या दृष्टोत्पत्तीस येणार आहे कीं, 'सहिष्णुता' हा गुण पुष्कळास पारखा होऊन बसलेला आहे. त्यामुळें आपला सामाजिक व्यवहार फार नाजुक होऊन गेल्यास नवल नाहीं. त्याचा परिणाम मात्र असा झालेला आहे कीं, ज्यास त्यास स्वतःचे हितसंबंध राखणें कठीण जात आहे.

येथवर ठळक ठळक सामाजिक दुर्गुणांचा विचार झाला.

आतां कलहाचे प्रकार किती याजविषयींचा उहापोह या ठिकाणीं केला असतां सोयीचें होणार आहे.

(अ) कित्येक लोक दुसऱ्यांविषयीं आपणास कळकळ वाटते–त्यांचा उत्कर्ष व्हावा ह्मणून कठोर शब्दप्रयोग करीत असतात. परंतु अशा लोकांच्या स्वभावाची मीमांसा केल्यास स्वार्थप्रेरीत बुद्धीनेंच त्यांच्या तोंडून असले शब्द बाहेर पडत असतात, असेंच आपणांस पुष्कळ वेळां दिसून येणार आहे. एक ग्रंथकार म्हणतोः[1]—

लोकांच्या ताडताड बोलण्याची मीमांसा केल्यास आपणांस दिसून येतें कीं, ताडताड बोलणें हें प्रेमयुक्त भावनांनीं प्रेरीत होत नसून मनाच्या अस्व-

---

1 "There is not a bit of love in the nag. However much the nagger may talk about affection, it is full of unrest and friction and selfishness."

स्थतेमुळें म्हणा, खटक्यामुळें ह्मणा अगर स्वार्थसाधु वृत्तीमुळें म्हणा, प्रेरीत असलेलें दिसून येतें.

(आ) दुसऱ्या प्रकारच्या लोकांच्या भांडणांत अपशब्दांचा भरणा फार असलेला आढळून येतो. अपशब्दांनीं मनाचा दुष्टपणा व्यक्त होतो. दुसऱ्यांशीं मिळतें घेण्यास गोड वागणुक, व मधुर शब्दांची योजना पुष्कळ प्रसंगीं उपयोगी पडत असल्याचें दिसून येतें. बरें; ईश्वरानें जी वाणी दिलेली आहे, तिचा चांगला उपयोग व्हावा अशीच ईश्वरी योजना आहे. परंतु या योजनेकडे मनुष्यप्राणी कधीं कधीं जाणून बुजून काना डोळा करतो, ही खेदाची गोष्ट होय. बायबलमध्यें ह्मटलें आहे कीं,[१] "सत्शील मनुष्याचें तोंड म्हणजे जीवनाचा झरा होय. दुष्ट माणसाचें तोंड अपशब्दांनीं—दांडगाईच्या शब्दांनीं भरलेलें असतें."

(इ) कित्येक तमोवृत्तीचीं माणसें (सांख्यशास्त्रांत ज्याप्रमाणें पुरुष प्रकृतीचा पसारा पहातो, त्याप्रमाणें) दुसऱ्याची भांडणें पाहून स्वतःची तृप्ति करून घेत असतात. अशीं माणसें दुसऱ्यांमध्यें गैरसमजाचा फैलाव करून परस्परांमध्यें कलहाग्नि पेटवितात. भर्तृहरीच्या श्लोकांतील 'ते केन जानीमहे' या कोटीमध्येंच अशा माणसांची गणना करावी लागेल. एकदा ही दुष्ट संवय अशा माणसांना जडली म्हणजे तंटे लावल्याशिवाय त्यांना चैनच पडेनासें होतें!

तमोगुणाचीं लक्षणें सांगतांना श्रीसमर्थ म्हणतातः—

'भांडण लाऊन द्यावें । स्वयें कौतुक पहावें ॥
कुबुद्धि घेतली जीवें तो तमोगुण । (दा. २-६-२२)

(ई) दुसरीं कांहीं माणसें अशीं असतात कीं, दही वाळत घालून भांडावयाची त्यांना संवयच जडलेली असते. अज्ञानी माणसांचाच वर्ग हा. अशा माणसांस थोडीशी कुरापत पुरी पडत असते. व एवढें तेवढें कारण त्यांना त्यांचा तोंडाचा पट्टा सुरू करण्यास पुरेंसें होतें.

(उ) आतां भांडणाचे निरनिराळे प्रकार दाखविणारे शब्द मराठी भाषेंत किती आहेत व त्याचा उपयोग व्यवहारांत आपण कसा करतों हें पहाणें मनोरंजक असून बोधप्रद होईल असा भरंवसा आहे.

---

1 The mouth of a righteous man is a well of life. but violence covereth the mouth of the wicked, (Bibe. Proverbs 10–11).

मराठीमध्यें 'भांडणें ' व 'तंडणें' हे दोन शब्द जे आहेत, त्यांपैकीं–भांडणें तंटा–कलह करणें हा अर्थ सर्वांस संमत व परिचित आहेच पण, तंडणें आपलेंच मत खरें समजून तें लोकांवर लादण्याची दांडगाई करणें–असाच–अर्थ आपण व्यवहारांत घेत असतों. भांडणाचा तिसरा प्रकार जो आहे, तो काथ्या कुटण्याचा. "काथ्या कुटणें" म्हणजे रिकामा वाद करीत बसणें; अर्थातच अशा पोकळ वादापासून निष्पन्न कांहीं होत नसतें; आतां वादविवाद, चर्चा यांचा स्थूलमानानें अर्थ जवळ जवळ एकच होत असला तरी प्रत्येक शब्दाचा सूक्ष्म अर्थ निराळाच असल्याचें दिसून येईल. 'वाद' याचा अर्थ व्यवहारांत भांडण, चर्चा असाच सर्वसाधारणपणें आपण घेत असतों. 'वादविवाद' यामध्यें पूर्वपक्ष उत्तरपक्ष मांडून साधक बाधक प्रमाणें काढून जो वाद होत असतो तो. 'चर्चा' या शब्दांत–कोणत्याहि विषयाचे मुद्दे काढून त्यांचा उहापोह करणें व अखेर निर्णय काय निघत असेल तो पहाणें–हा अर्थ अभिप्रेत असतो. प्रस्तुत विषयास लागूं पडणाऱ्या शब्दांचे अर्थ किती याची यादच रा. व्ही. जी. आपटे व मोल्सवर्थ यांच्या कोशांवरून घेतलेली याखालीं देत आहे. हेतु एवढाच कीं, ते ते अर्थ वाचकांनीं पडताळून पहावेत, व व्यवहारांत आपण त्यांचा कसा उपयोग करतों इकडे त्यांचें लक्ष जावें; असो.

शब्दाचें नांव,	आपटे.	मोल्सवर्थ.
भांडणें	तंटा करणें.	Quarrel, contend with.
तंडेली	आडदांडपणा, दांडगाई	Rudeness, violent behaviour,
वाद	चर्चा, भांडण, मत, सिद्धान्त.	(1) Disputation, (2) Discourse, conversation, oral conference. (3) Report, Rumour, Popular talk,
विवाद	चर्चा, वाद.	(1) Discussion, debate, disputation (2) controversy. (3) Contest at Law.
चर्चा	वादविवाद, विचार, उहापोह.	Any emulative contest.
वादविवाद	चर्चा, खल, भवति न भवति.	Dispute Discussion, debate, Argumentation,

विचार करितां कळून येईल कीं, वाद, विवाद, चर्चा या त्रयीचा चांगला उपयोग करून घेतला असतां आपल्या बुद्धीस एक प्रकारचें सुवळण लागत जाऊन तिच्यामध्यें कुशाग्रतेचा आवश्यक गुण येत असतो. याबाबत वादविवादमंडळाचा उपयोग चांगल्या तऱ्हेनें होत असतो. विलायतेंत ऑक्सफर्ड व केंब्रिज या प्रसिद्ध ठिकाणीं अशा तऱ्हेच्या वादविवादात्मक संस्था[1] असून त्यांचा उपयोग तिकडील तरुण चांगल्या तऱ्हेनें करून घेत असतात. पार्लमेंटमध्यें जी कामगिरी भाषणद्वारा पुढें करावयाची, तिचा 'ओनामा' घालून देणाऱ्या या संस्थाच होत. अशा संस्थांना छोट्याखानी पार्लमेंटाच्या सभा[2] ह्मणतां येईल. आपल्याकडे अशा संस्था फारशा नाहींत. व ज्या कांहीं आहेत, त्यांमध्यें परस्परांविषयीं आदरबुद्धी कमी होत चालल्यानें व स्वार्थवृत्ती फाजील बोकाळल्यानें मुळांतील वादविषयक मुद्दा बाजूस रहातो, व जो तो आपापल्या परीनें अर्थ खेचूं लागला म्हणजे निर्णय होत नाहीं, व अखेर वेळ खर्च करून 'काथ्याकूट केल्याचें' श्रेय मात्र पदरीं पडत असतें, असाच आपला अनुभव असल्याचें दिसून येईल.

कलहाचे प्रसंग कोणत्या कोणत्या मानवी स्वभावाच्या दुर्गुणानें उद्भवत असतात, व कलहाचे प्रकार किती यासंबंधींचा स्थूलमानानें एथवर विचार झाला. आतां समाजांतील लोकांशीं मिळतें घेण्यास आपल्या अंगीं कोणत्या कोणत्या गुणांचा वास अवश्यपणें असावा लागतो, याचा विचार करूं.

पहिली गोष्ट अशी कीं, मनुष्यानें सदैव ध्यानांत वागविलें पाहिजे कीं, जगांतील अर्धीं मुर्धीं भांडणें गैरसमजामुळें उद्भवलीं असतात. अशा भांडणांची मुळांतील कारणें पुष्कळ प्रसंगीं क्षुल्लकच असतात; पण गैरसमजाच्या राक्षसानें एकदा पछाडलें म्हणजेच त्यांना फार महत्त्व चढून रणेंच्या रणें माजत असतात; असाच जगांतील अनुभव आहे.[2]

तसेंच एखादा शब्द अर्धामुर्धा ऐकून त्याचा विपर्यास करून लोक भांडणें उकरून काढीत असतात. थट्टेनें एखादा शब्द उच्चारला तर तो खऱ्या भावनेनेंच उच्चारला ह्मणून ह्मणावयाचें, किंवा प्रेमानें एखादा कठोर शब्द

1 (Debating Society, 2 Parliament in miniature)

2 "Trifles light as air
Are to the jealous confirmation strong
As proofs of holy writ."

दुसऱ्याचें बरें व्हावें—(अर्थात्च खऱ्या भावानें) म्हणून उच्चारिला तर त्याचा उलट अर्थ करावयाचा-अशा तऱ्हेच्या वागणुकीनें पुष्कळांनीं चांगल्या चांगल्यांचा स्नेह गमावून आपल्या जन्माचें मातेरें केलेलें आहे. तेव्हां, जगांतील असा कटु अनुभव मनापुढें ठेवून माणसानें दुसऱ्यांशीं वागतांना आपल्या मनाचा थोरपणा वाढवून एवढ्या तेवढ्या क्षुल्लक गोष्टीकडे काणाडोळा करण्याची आपल्या मनाची तयारी दाखविली पाहिजे. न्यायमूर्ती म. गो. रानडे आपल्या एका धर्मपर व्याख्यानांत म्हणतात, कीं, "आपले स्वतःचे सदासर्वदा दोष पहाणें, त्याकडे सदासर्वदा लक्ष देणें व इतरांच्या कृतींतील गुणाचा अंश पाहणें, अशी उदारवृत्ति सदासर्वदा संसारांत असली पाहिजे."

"ह्याना मूर" नांवाच्या आंग्ल कवयित्रीचें एक सुदंर काव्य आहे त्यांत ती ह्मणते कीं, लोकांनां श्रीमंत करण्याचें ह्मणा, किंवा शारीरिक सामर्थ्य प्राप्त करून देण्याचें म्हणा आपणांस शक्य नाहीं, तरी लोकांच्या बारीक-सारीक दोषांकडे काणा डोळा करून, त्यांना अपशब्द न बोलून आपल्या सहवासापासून त्यांचें चित्त प्रसन्न व्हावें, अशी आपली वागणूक ठेवण्याचें तरी आपल्या हातांत आहे. हें नाकबूल करून चालावयाचें नाहीं [1]

---

1 "Since trifles make the sum of human things,
And half our misery from our foibles springs;
Since Life's best joys consist in peace and ease,
And few can save or serve, but all may please;
Oh! let th' ungentle spirit learn from hence,
A small unkindness is a great offence.
Large bounties to restore, we wish in vain,
But all may shun the guilt of giving pain.
To bless mankind with tides of flowing wealth,
With power to grace them, or to crown with health,
Our little lot denies, but heaven decrees
To all the gift of minist'ring ease;
The mild forbearance at another's fault
The taunting word Suppress'd as soon as thought;
On these Heaven bade the bliss of life depend,
And crush'd ill fortune when it made a friend."

दुसरी गोष्ट अशी कीं, लोकांविषयींची आपल्या मनांत खरी खुरी सहानुभूति हवी. ज्यांच्या ज्यांच्याशीं ह्मणून आपला सहवास होत असतो, त्यांच्या कृतींतील दोष काढण्याच्या भरीस न पडतां, थोर मनानें त्यांच्या स्वभावांतील गुणांचें आविष्करण करून त्यांच्या चांगल्या कृतींचा खऱ्या भावनेनें गौरव करणें जरूर असतें, या बाबतींत सिनेकाचें वाक्य ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. तो ह्मणतो[1]:—

" मुलें तरुण म्हणून त्यांचे दोष मनांत आणतां कामा नये. स्त्रिया अबला म्हणून त्यांच्या दोषांकडे (शक्य तितका) कानाडोळा करण्याची प्रवृत्ति असावी. राजास तर बोलूनचालून न्याय करावयाचा असतो; तेव्हां खटल्याखोकल्यांत कांहीं चुका त्याच्या हातून व्हावयाच्याच सज्जनांचे हेतू चांगले असल्यामुळें त्यांच्या दोषाकडे दुर्लक्ष करणें जरूर असतें. व वाईट माणसें तर बोलूनचालून फुटक्या नशीबाचीं; त्यांच्या पुढें दुःख वाढून ठेवलेलें असल्यामुळें त्यांची कींव करणें केव्हांहि रास्तच होणार आहे. असो."

आतां, बारीकसारीक कलहाचे प्रसंग गोड शब्दांनीं टाळतां येण्याजोगे असतात. जॉर्ज हर्बर्ट [2]म्हणतो, "चांगल्या (गोड) शब्दांना किंमतहि फारशी पडत नाहीं; पण त्यांचा उपयोग मात्र चांगला होत असतो." याच बाबतींत पुढील उतारा फार बोधप्रद आहे. महाभारतांतील उद्योगपर्वांतर्गत प्रजागरपर्वांत (अ. ३४) विदुर धृतराष्ट्रास सांगतो:—

' हे राजा गोडवाणीनें किती तऱ्हेचे फायदे होतात, तेच द्वाड वाणीनें अनर्थ ओढवतात. बाणांनीं विद्ध झालेलें किंवा कुऱ्हाडीनें तोडलेलें अरण्य पुनः वाढून पूर्ववत् होतें. परंतु निंदायुक्त दुर्भाषणानें पाडलेला व्रण केव्हांहि भरून येत नाहीं. कर्णि, नालिक वगैरे बाण शरीरांतून बाहेर काढतात, परंतु वाग्बाण हा बाहेर काढतां येत नाहीं. तो एकदा काळजांत घुसला कीं, तेथेंच कायम

1 "We should make excuses for children, because they are young; for women, because they are weak; for rulers, because they have to make decisions, and can not avoid some mistakes for good men, because they mean kindly; for bad ones, because they are much to be pitied, and have a miserable future before them."

2 Sweet words cost little and are worth much."

सलत राहतो. वाग्बाणांचा असा कांहीं स्वभावच आहे कीं, ते तोंडातून सहज सुटले तरी, इकडे तिकडे न जातां अचूक दुसऱ्याच्या मर्मांतच जाऊन बसतात; आणि मग तो जखमी मनुष्य रात्रंदिवस तळमळत पडतो. यासाठीं शहाण्यानें हे वाग्बाण केव्हांहि वापरूं नये.'

साधुसंताची व्याख्या देतांना न्या. मू. रानडे आपल्या एका धर्मपर व्याख्यानांत म्हणतातः–" इतरांची चित्तवृत्ति अशुद्ध व क्षुब्ध असली तरी आपल्या शुद्ध भावानें व मधुर वाणीनें अमृतवल्लीसारखी शांतता करितां येते असा अधिकार ज्या पुरुषांस आहे, तेच खरे साधुसंत ह्मणावे."

केव्हांहि, क्रोध हाच भांडणाचें मूळ. जगांतील मोठमोठ्या महात्म्यांचीं–तत्त्वज्ञांचीं जीं कांहीं वचनें आहेत, त्यांत दुसऱ्यास क्रोध आला असतां, आपण अक्रोधी राहिल्यानें त्याचा राग जिंकावा, लोकांनीं आपणांस शापिलें असतां, आपण उलट शापूं नये " अशीं वचनें आहेत. बौद्धाचें पुढील वचन प्रसिद्धच आहे:—

" अक्रोधेन जिने कोधं असाधुं साधुना जिने,
जिने कदरियं दानेन सच्चेन अलीकवादिनम् "

अर्थ:—" कोणास राग आला असतां, आपण अक्रोधी राहून त्याचा राग जिंकावा; कोणी आपलें वाईट केलें असतां त्याचें बरें करून अथवा अपकाराला उपकार करून त्यास जिंकावें; जो कवडीचुंबक असेल त्याला दान करून आणि एखादा असत्य भाषण करणारा असेल त्यास सत्यभाषणानें व सत्य आचरणाविषयीं आपली अढळ निष्ठा दाखवून जिंकावें. " हें वचन घ्या; अथवा ख्रिस्ताचा उपदेश ' एका गालावर मारलें असतां दुसरा गाल पुढें कर,' किंवा 'नाहं' शप्तः प्रतिशपामि 'कंचित्', आकुश्यमानो न वदामि किंचित्' किंवा, "क्षपाम्यहं ताड्यमानश्च नित्यं" हीं सर्व महाभारतांतील महावचनें कामक्रोधादिक वृत्तींचा जोरानें निषेध करून 'आत्मसंयमन' या गुणाच्या जोरावर त्या दाबून टाकून कलहाचें बीज जगांतून नाहींसें करा, असाच कंठरवानें उपदेश करीत नाहींत काय? हें कलहाचें बीज नाहींसें करण्यास आपण प्रयत्न केला पाहिजे, व सर्वकाळ आपण अशी इच्छा वागविली पाहिजे कीं, "सुखिनो वा खमिनो होतु सब्बेसत्ता भवंतु सुखितत्ता"— (सर्व सुखी असोत, त्यांना क्षेम असो, त्यांचा आत्मा सुखी असो.)

आतां, या ठिकाणीं असा एक प्रश्न जर कोणी काढलाच कीं, 'आपण अशी इच्छा कां वागवावी ?' तर आपणांस असें उत्तर देतां येईल कीं, तशी ईश्वरी आज्ञा असते म्हणून.' आतां असे ईश्वरी नियम तरी काय आहेत, व ते वाचावयास सांपडतील कोठें असाहि प्रश्न केल्यास आपणांस असें म्हणतां येईल कीं, सृष्टीचे जे नियम तेच ईश्वराचे नियम—त्याच ईश्वरी आज्ञा. पंच महाभूतांमध्यें म्हणा, सृष्टीच्या व्यापारामध्यें म्हणा; कलहाचें बी रुजून त्यांची खडाजंगी भांडणें जगाच्या प्रळयकाळीं व्हावयाची असतील, तर तीं खुशाल होवोत ? पण, त्यांच्यामध्यें हल्लींच्या काळीं तर कलहाचें बीं सांपडत नसून सृष्टीचे सर्व व्यापार कसे सुरळीत चालले आहेत, या विषयाकडे विचारसंपन्न म्हणविणाऱ्या मनुष्यप्राण्याचें लक्ष्य जावयास नको काय ? सूर्य, चंद्र, तारकापुंज, नद्या, समुद्र व पर्वत आपापले व्यापार शांतपणें पण, शिस्तीनें आजवर करीत आलेले आहेत. निसर्गाच्या अशा व्यापारांचें निरीक्षण करून मनुष्यप्राण्यानें आपापले व्यापार शांतपणें व शिस्तीनें कां करूं नयेत, ही विचारणीय बाब आहे.अशा तऱ्हेचें सृष्टीच्या क्रमानुसार मनुष्याच्या हातून वर्तन कां होत नाहीं, याची मीमांसा करतां असें म्हणावें लागतें कीं, मानव प्राणी क्षुद्र वृत्तीच्या[1] कह्यांत सांपडल्यामुळें व आत्मसंयमन या गुणास तो पारखा होऊन बसल्यामुळें शांतपणानें (कलह न करतां) त्याच्या हातून व्यापार होत नाहींत.

'सारांश परमेश्वराचींच सर्व मनुष्यें हीं लेंकरें होत. अर्थातच परस्परांचें बंधुत्वाचें नातें आहे, आणि परस्पराशीं प्रेमानें वागावें हाच त्यांचा धर्म. आतां खालील श्लोकांत वर्णिलेली स्थिति जर त्यांची झाली तरच या धर्माचें आचरण त्यांच्या हांतून होणार आहे, ही गोष्ट त्यानीं ध्यानांत धरणें जरूर आहे.

विमलमतिर्विमत्सरः प्रशान्तः शुचिचरितोऽखिल सत्त्वमित्रभूतः
प्रियहितवचनोऽस्तमानमायो वसति सदा हृदि यस्य वासुदेवः

अर्थः—ज्याच्या अंतःकरणामध्यें वासुदेव परमात्मा वास करितो, त्याची मति विमल होते, तो मत्सररहित होतो. तो अत्यंत शांत होतो. त्याचें चरित्र पवित्र होतें; तो सर्व प्राण्यांचा मित्र होतो, नेहमीं, त्याचें भाषण हितकारक व प्रेमळ असतें आणि अभिमान व कपट हीं नष्ट होत असतात.

1 Lower self.

प्रकरण सहावें.

" लोकांचा विश्वास संपादन करून घेणें हीच व्यवहार-शास्त्राची पहिली पायरी होय."

" अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥" गीता १७-१५.

अर्थः—(मनाला) उद्वेग न देणारें, सत्य, प्रिय व हितकारक असें जें भाषण तें आणि स्वाध्यायाचा-स्वकर्माचा अभ्यास, यांस वाङ्मय (वाचिक) तप म्हणतात. '

जगांतील व्यवहार सुरळीत चालण्यास अंगीं ज्या कांहीं गुणांचा वास अवश्यपणें असावा लागतो, त्यांपैकींच लोकांचा विश्वास संपादन करण्याच्या कलेचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. व्यवहारांत हरघडीं, निरनिराळ्या स्वभाववृत्तीच्या लोकांशीं प्रसंग पडत असतो. तेव्हां, त्या लोकांच्या स्वभावाचे गुणधर्म पूर्णपणें ओळखून त्यांच्या स्वभावांशीं आपला स्वभाव 'मिळता' करणें म्हणजे ' योगः कर्मसु कौशलम् ' हा गीतेंतील पाठ गिरविण्याइतकेंच कसें कठीण आहे, याविषयींची चर्चा आह्मी गेल्या प्रकरणांत यथामति केलेलीच आहे. या ठिकाणीं येवढेंच सांगावयाचें कीं, हा पाठ गिरवून सुद्धां दुसऱ्यांच्या स्वभावांशीं आपला स्वभाव मिळता करणें, व लोकांचा विश्वास संपादन करून घेणें हें सर्वांनांच साधतें, अशांतला भाग नाहीं. नदीच्या प्रवाहांत दोन मडकीं आपाततः एकमेकांवर जोरानें आपटलीं असतां फुटून जातात; तद्वतच व्यवहाराच्या प्रवाहांत दोन माणसांची गांठ पडली असतां कधीं कधीं स्वभाव-वैचित्र्यानुसार खटके उडालेले आढळून येतात. खटके किंवा खटकेवजा भाषण घडलें नाहीं तर भाग्यच ह्मणावयाचें. तरी पण अशा भेटींचा इष्ट परिणाम घडून येऊन परस्परांचे हितसंबंध-स्नेहसंबंध टिकणें व टिकविणें, ही गोष्ट कठीण जाते, असाच आपला व्यावहारिक अनुभव आपणांस सांगत नाहीं काय ? नदीच्या प्रवाहांतील मडकीं एकमेकांवर कर्मवशात् आपटावयास चुकलीं तरच वहावत असतात, पण समाजांतील स्नेह-संबंध वाचविण्यास गोड-वागणूकच उपयोगी पडते, तिच्यामुळेंच खटके चुकतात, वेळ निभावते, व कार्यभाग साध्य होत असतो. हल्लींच्या युगांत तर मनुष्याचा स्वभाव इतका सूक्ष्मतम नाजूक झालेला दृष्टोत्पत्तीस येतो कीं, एखादा

साधा शब्द पण तो भिन्नस्वरांत उच्चारिला असतां लगेच दुसऱ्याची चर्या पालटते, तब्यत गरम होते. अशी समाजाची स्थिति असल्यावर–झाल्यावर लोकांचा विश्वास आपल्यावर बसणें व तो बसवून घेणें हीं कामें दुर्घटच होत. लोकांचा विश्वास आपल्यावर बसण्यास आपल्या अंगीं कोणते कोणते गुण असावे लागतात–आपली वागणूक कशी असावी लागते–थोडक्यांत ही कला तरी काय आहे–याविषयींची चर्चा केल्यास सामाजिक दृष्ट्या इष्टापत्तीच होणार, या भावनेनें या ठिकाणीं हा विषय घेतला आहे.

आतां प्रथम भेटीचें महत्त्व काय असतें याविषयींची कल्पना पुष्कळांस असत नाहीं. परक्या इसमाचा स्वभाव अर्थात् परका-पारखा असल्यानें त्याच्या स्वभावाचे गुणधर्म कोण कोणते, हें प्रथम कसें कळणार ? या ठिकाणीं सुचविण्याची गोष्ट अशी कीं, प्रथम भेटीच्या वेळीं दुसऱ्याचे गुणधर्म शोधून काढण्याच्या भरीस फार न पडतां आपली दुसऱ्याशीं वागणूक कशी काय आहे, आपले दोष दुसऱ्यांस दिसतात किंवा कसें–वगैरे गोष्टीं-विषयीं जरूर ती दक्षता राखणें अगत्याचें असतें. पुष्कळांविषयीं तर असें विधान करतां येईल कीं, प्रथम भेटीच्या वेळीं परक्यांशीं त्यांची वागणूक निष्काळजीपणाची असून ते आपल्या अंगच्या दोषांचें–अज्ञानाचें निष्कारण प्रदर्शन करीत असतात. त्यांचें बोलणें कधीं कधीं मुद्दा सोडून असतें, तर कधीं बोलणें सुरू केल्यावर तें 'एरंडाच्या गुऱ्हाळाप्रमाणें' कंटाळवाणें होऊन जातें. कांहीं जण बेमुर्वतीनें सडेतोड उत्तरें देऊन आपल्या अंगची घमेंड-खोरपणाची वृत्ती दुसऱ्याच्या निदर्शनास आणून देत असतात. तिसऱ्या प्रकारचे लोक तर घुम्मी–मूक वृत्ती धारण करतात; तर चौथ्या प्रकारचे दुसऱ्याची हेटाळणी–फटफजिती करण्याच्या उद्योगास लागतात ! सारांश, आपल्या समाजांतील लोकांस प्रथम भेटीचें महत्त्व काय असतें, या गोष्टीविषयीं दुर्दैवानें माहिती असावी तितकी नसल्यामुळें आपल्या विषयींचे निष्कारण गैरसमज आपल्याच लोकांत काय किंवा परदेशीय लोकांत काय, फैलावत असतात; व त्यांचा बाधक परिणाम मात्र आपल्या व्यवहारावर होत असल्याचा आपला अनुभव स्पष्ट आहे. तेव्हां या ठिकाणीं मुद्दाम सांगावयाची गोष्ट अशी कीं, या बाबतींत आपला कटु अनुभव असतांही विनाकारण 'बावळट' म्हणून घेण्याची पाळी कधीं कधीं जी पुष्कळांवर येत असते, ती न येऊं देण्याबद्दलची ज्यानें त्यानें खबरदारी घेतलेली चांगली.

पाश्चात्यांच्या समाजांत तर, प्रथमभेटीचें महत्त्व फार असतें. अशा भेटींतच परक्याच्या चर्येकडे, बोलण्याकडे, त्याच्या पोशाखाकडे, वागणुकीकडे लक्ष पुरवून दुसऱ्याविषयींचा अनुकूल म्हणा, प्रतिकूल म्हणा, ग्रह बनविण्याची त्यांची पद्धत असते. व अशा तऱ्हेचा बनलेला ग्रह मग तो अनुकूल असो वा प्रतिकूल असो, तो कायम टिकण्याचा संभव असल्यामुळें विजातीयांच्या समाजांत तर प्रथम भेटीचें महत्त्व फार असतें, ही गोष्ट आपण ध्यानांत वागविणें जरूर आहे. पुनः दुसरी गोष्ट अशी कीं, दुसऱ्या जातींतील लोकांचे आपल्या जातींतील-समाजांतील लोकांविषयीं भलते सलते ग्रह झाले असल्यास ते घालविणें, व अनुकूल असल्यास ते टिकविणें या दोन्ही तऱ्हेच्या कामगिऱ्या आपणांस अशाच भेटीच्या वेळीं उरकून घ्याव्या लागतात, व ही जबाबदारी योग्य तऱ्हेनें पार पाडण्यास आपली वागणूक किती दक्षतापूर्वक असली पाहिजे हें आतां सहज कळून चुकेल असा भरंवसा वाटतो.

आतां, व्यवहारांत नेहमीं आपली विद्वत्ताच काम करूं शकतें, असें म्हणणें योग्य होणार नाहीं. विद्वत्तेची जोड असल्यास उत्तमच. परंतु मुख्य गोष्ट अशी कीं, लोकांचें मन आपल्याकडे वेधून घेतां येईल अशा तऱ्हेची चित्तवेधक आपली वागणुक हवी. आपला शब्द व कृति यांच्यामध्यें मेळ असून त्यांचा दुसऱ्यावर इष्ट परिणाम होईल अशीच त्यांची मांडणी हवी. समयास उचित अशा तऱ्हेचा आपला पोशाख वापरून चालण्याबोलण्याची ढब रुबाबदार असून व प्रसंगावधानयुक्त आपली सचोटीची वागणूक ठेवून दुसऱ्याच्या स्वभावाचें निरीक्षण करणें जरूर असतें. श्री समर्थ म्हणतातः—

'नाना जनाचें हृदये मृदुशब्दें उकलावें' दा. १०-२-१० या एका वाक्यांत 'मृदुशब्दें' या एकाच शब्दानें आपलें भाषण किति मधुर असलें पाहिजे, व तसें तें मधूर असलें तरच दुसऱ्याचें हृदय उकलतें इतका अर्थ अभिप्रेत आहे. व अशा हळुवार तऱ्हेनें दुसऱ्याचें हृदय उकलून आपला व्यवहार चालविल्यास आपणांस त्यांत बरकत येत असते. नुसत्या विद्वत्तेच्या जोरावर 'मी व्यवहार चालवीन,' हें विधान करणें म्हणजे 'व्यवहारज्ञानाच्या नांवानें आंवळ्या येवढें" असें म्हणून घेण्यासारखें होय.

याबाबत समर्थांचें वचन आहे कीं:-

विद्या उदंडचि सिकला। प्रसंग मान चुकतचि गेला।
तरी मग तये विद्येला कोण पुसे॥ दा. १२-२ ३०.

व्यवहारांत आपणांस अनुभव येतो कीं, जेव्हा निरनिराळ्या कंपन्यांचे एजंट आपल्याकडे कांहीं व्यापाराकरितां येतात, तेव्हां त्यांचें इंग्रजी ज्ञान मोडकें तोडकें असलें तरी ते आपल्या चित्ताकर्षक वागणुकीनें दुसऱ्यांवर आपला पगडा बसवून इष्ट कार्यभाग उरकून घेत असतात. त्यांच्या मोहक शब्दांनीं आपल्यावर तावत्काळ कां होईना, एक प्रकारची मोहनी पडत असते खरी. आनंददायक शब्द कोणास नकोसे वाटतात? अशा मोहक शब्दांत एक प्रकारची जादू भरलेली असते. बायबलमध्यें एक वाक्य आहे[1] कीं:—

"आनंददायक शब्द हे जणू मधाचें पोळेंच होत. आपल्या आत्म्यास त्यायोगें आराम वाटून शरीरप्रकृतीवरहि उत्तम परिणाम होत असतो."

आतां कित्येक माणसांना आपल्याविषयींचा लोकांचा ग्रह अनुकूल असाच करून घेण्याची हातोटी साधून गेलेली असते ही गोष्ट खरी. त्यांच्या तोंडून कसाहि शब्द निघो,तो योग्य असावयाचाच; व त्यांची कृतिहि हळुवारपणाची ठरावयाचीच. प्रसंगास योग्य अशी वर्तणूक त्यांच्या हातून लीलेनें होत असते. त्यामुळें दुसऱ्यांवर इष्ट परिणाम हटकून व्हावयाचा, तोच होत असतो; बाकी इतरांस ही कला दृढ परिश्रमानें साध्य करून घ्यावी लागते.

ही कला परिश्रमानें साध्य करून घ्यावयाची झाल्यास पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.

(१) आनंदाची चर्याः—नेहमी आपली मुद्रा उल्हासपूर्ण असावी, दुर्मुखलेला–सडलेला–विरस चेहरा कोणासहि आवडत नसतो. आल्हाददायक वृत्तीचा परिणाम फार आश्चर्यकारक होत असतो; ही गोष्ट मनांत वागविणें इष्ट आहे. बायबल एके ठिकाणीं म्हणतें कीं[2]

---

1 "Pleasant words are as an honey comb
Sweet to the soul and health to the bones.
Proverbs 16–24.

2 "A merry heart doeth good like medicine; but a broken Spirit drieth the bones.
Proverbs 17–22.

उल्हासयुक्त अंतःकरणाचा एखाद्या "रामबाण औषधाप्रमाणें आश्चर्यकारक परिणाम होत असतो. परंतु दुर्मुखलेल्या वृत्तीनें हाडांतील रस निघून जाऊन तीं वाळून सडतात."

शोपेनहॉर एके ठिकाणीं म्हणतो[1]: —

"कित्येक माणसांनां जग हें ओसाड, नीरस व दिखाऊ असें दिसतें, तर दुसऱ्यांना तेंच सुंदर, मजेदार व अर्थपूर्ण दिसतें." या वाक्याची मीमांसा करितां आपणांस दिसून येणार आहे कीं, जगांत दोन वृत्त्यांचीं माणसें सर्व-साधारणपणें आढळून येतात. पहिल्या वृत्तीच्या माणसांना जग हें सारवस्तूंनीं भरलेलें आहे-म्हणून त्यांत 'राम' आहे, अर्थात् संसारांत कांहीं अर्थ आहे, अशी त्यांची भावना असते. इंग्रजीमध्यें अशा वृत्तीला नांव देणें झाल्यास आपण त्या वृत्तीला अशावादी वृत्ति[2] असें ह्मणूं. व संसारांत कांहीं 'राम' नाहीं, जग हें असार वस्तूंनीं भरलेलें आहे ह्मणून जिवितांत–जगण्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा वृत्तीला आपण निराशावादीवृत्ति[3] असें ह्मणूं. आतां पहिल्या प्रकारच्या माणसांची वृत्ति अर्थात् उल्हसित असल्यामुळें जग हें प्रचंड काव्य आहे म्हणूनच तें आनंदाचें स्थान होय; व आपण त्या काव्यरसाचा स्वाद घेणारे मधुकर आहोंत अशी त्यांची भावना असते. निरनिराळ्या प्रकारच्या सुरेख सुमनांचा मधुर आस्वाद घेऊन त्यांतील गोड पराग सेवन करणाऱ्या मधुकराचें जीवित श्रमपूर्ण असलें तरी तें काव्यमयच होय, यांत संशय नाहीं. ईश्वराच्या प्रचंड कृतींचा आस्वाद घेणारे असे आपण रसिक जर झालों नाहीं, आपल्या हृदयाच्या तारांनीं निरनिराळ्या अनुकूल संवेदनांशीं तादात्म्य पावून काव्यपूर्ण म्हणून गोड गीतें जर गाऊन दाखविलीं नाहींत, तर जिण्यांत 'राम' रहाणार नसून मनास 'आराम' वाटणार नाहीं. याकरितां, आपल्या परिस्थितींतील आनंददायक स्थळें हुडकून काढून त्यांवर मन खिळवून काव्यमय स्थिति भोगणें हेंच जीविताचें सार आहे, ही गोष्ट ध्यानांत वागविणें जरूर आहे. तेव्हां, अशा तऱ्हेनें जीविताचें सार ओळखून तदनुसार वर्तन ठेवणारा उल्ह-सित वृत्तीचा मानवप्राणी दुसऱ्यास हवाहवासा वाटल्यास नवल तें काय?

---

1 To one man, the world is barren, dull and superficial; to another rich, interesting and full of meaning.'

2 Optimism 3 'Pessimism.'

सी.बॅक्स्टन म्हणतो:[1]—''आपलें अंत:करण आनंदपूर्ण असलें म्हणजे आनंदाची मेजवानी स्वत:स मिळत राहून पुन:ती आपणांपासून दुसऱ्यांसहि मिळत रहाते.''

दुसऱ्या वृत्तीच्या माणसांना जग हें भयाण व असार वस्तूंनीं भरलेलें असें वाटत असून जिकडे तिकडे त्यांना 'निराशा' भरलेली दिसत असते. त्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत नसून नेहमीं ते दुर्मुखलेले –रडवे असे दिसून येतात. स्वभावतः अशा तऱ्हेच्या रडव्या माणसाचा सहवास कोणास हवासारखा वाटेल? अशा माणसापासून जग दोन पावलें दूरच रहातें, हा आपला अनुभव आहे, असो. सिसरो ह्मणतो[2]—

"ज्ञानी माणसास वास्तविक पाहतां त्रास होत नसतो. याचें कारण, जगताचा विस्तार व अनाद्यंतता या दोन्हीची त्यास कल्पना असते. म्हणून ज्ञानी माणसास मानवाच्या चिमुकल्या आयुष्यक्रमांत मोठी अशी गोष्ट काय घडून येणार? त्याचें मन सदा तत्पर असल्यामुळें त्याच्या बाबतींत अनपेक्षित अशी कोणतीच गोष्ट घडून येत नाहीं.

(२) दुसरा गुण ह्मणजे मनाचा थोरपणा. निरनिराळ्या स्वभाववृत्तींच्या लोकांमध्यें गुणांबरोबर अवगूण असणें अपरिहार्य आहे. येवढा दैदिप्यमान सूर्यनारायण–पण, त्याच्यावरहि दुर्बिणीनें पाहूं लागल्यास डाग आहेत. मग बिचाऱ्या मानव प्राण्याची कथा काय? म्हणून, दुसऱ्याचे दोष ध्यानांत घेण्यापूर्वीं त्याच्या गुणांवर आपली दृष्टि खेळविणें हीच गोष्ट चांगली. वस्तुतः प्रत्येकांत कांहीं ना कांहीं गूण हे असावयाचेच. इंग्रजींत एक म्हण आहे:[3]—

"शोधा;म्हणजे तुमचें तुह्मालाच सांपडेल."म्हणून दुसऱ्यांच्या गुणांची प्रसंगीं चहा करणें यांत मनाच्या थोरपणाचा कांहीं भाग असला तरी, त्यांच्या दोषांकडे

1 'A merry heart is a continual feast to others besides itself.'

2 'What trouble is there in life that can appear great to him who has acquainted himself with the eternity and the extent of the universe? For, what is there in human knowledge or the short span of this life, that can appear great to a wise man? Whose mind is always so upon its guard that nothing can be-fall him which is unexpected.'—Cicero.

3 "Seek and ye shall find"

सहानुभूतिपूर्ण नजरेनें पहाणें यांतच मनाचा खराखुरा थोरपणा दिसून येणारा आहे. श्रीसमर्थ ह्मणतातः—

" दुसऱ्यांच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणीमात्रांस मेळवून घ्यावें । बऱ्या शब्दें ॥"

दा. १२-१०—७

दुसऱ्यांच्या दोषांची हुर्रेवडी करून टाकणारीं माणसें हवीं तेवढीं सांपडतील. पण त्यांच्या दोषांकडे सहानुभूतीपूर्ण नजरेनें पाहून त्यांजवर उपकृति करून ठेवणारा मनुष्यप्राणी सांपडणें कठीण. हीच गोष्ट आपला नित्याचा व्यावहारिक अनुभव सांगत नाहीं काय ? श्री समर्थ म्हणतातः-

वेड्यास वेडें म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरीच घडे दिग्विजये निस्पहासी ॥ (दा. १३-१०-२६)

म्हणून आपलें मन केव्हांहि समुद्रासारखें थोर हवें. उदधीच्या उदरांत हजारों नद्यांचा मैला नेऊन सोडला तरी तो शांतवृत्तीनेंच गडप करून टाकतो. त्याच्या शांत वृत्तींत फरक पडलेला दिसत नाहीं; एवढेंच नव्हे तर, तो इतक्या नद्यांचे मैलारूपी दोष होते कां नव्हते याचा मागमूसहि लागून देत नाहीं. अशीच मनुष्याच्या मनाची थोर स्थिति झाल्यावर मग काय हवें ! उदधीप्रमाणेंच त्यानें दुसऱ्यांच्या अवगुणांविषयीं सहानुभूति दाखविणें व्यवहारतः अगत्याचें आहे. प्रसंगीं आपला धिःकार झाला असतां आपल्या शांत वृत्तींत फरक पडतां कामा नये.

श्रीसमर्थ म्हणतातः—'उदंड धिःकारून बोलती । तरी चलों नेदावी शांति । दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु (दा. १२-१०-१६) बायबलमध्येंहि म्हटलें आहे कीं,[1] जर तुम्ही लोकांना त्यांच्या अपराधाबद्दल क्षमा केली नाहीं तर, तुमचा आकाशांतील बाप तुमच्या अपराधाबद्दल क्षमा करणार नाहीं.

(३) परंतु जगांत अशी कांहीं माणसें असतात कीं, त्यांनां दुसऱ्याचे दोष दिसले असतां जाणूनबुजून मूकवृत्ति धरून ते खुनशी बनत असतात. कांहीं

1 "But if ye forgive not men their tresspasses, neither will your Father forgive your tresspasses" Math. 6-16.

केल्या त्या वेळीं 'ब्र' म्हणून काढावयाचें नाहीं; पण वेळ आली असतां 'उद्गें' काढण्यास कमीहि पण करावयाचें नाहीं.अशी वृत्ति धरणें म्हणजे त्यांनीं आपल्या मनाचा क्षुद्रपणा दाखविणें होय. इसाबनीतींतील त्या उदार सिंहाची वागणूक ध्यानांत ध्या, उंदरानें–मग तें न कळत कां होईना–त्याचें नाक खाजवून त्यास त्रास दिला. तरी त्यानें मनाच्या थोरपणामुळें सहानुभूतिपूर्ण शब्द उच्चारून उंदरास सोडून दिलें, अशीच वागणूक केव्हांहि अनुकरणीय म्हणून वंदनीय ठरणार. दुसऱ्याच्या क्षुल्लक अपराधाबद्दल हरघडीं आपली खुनशी-पणाची वागणूक होत गेल्यास समाजाकडून आपला धिःकार होत असतो एवढेंच या ठिकाणीं सांगण्याचा हेतु.

(४) शेवटीं मुख्य गोष्ट अशी कीं, लोकांविषयींची आपली सक्रिय सहानुभूति असावयास पाहिजे. आपण जो शब्द बोलूं तो खरा करून दाखविला पाहिजे–अशी आपली तयारी हवी. समर्थ ह्मणतात:—

बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ॥
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ दा. २२–१०–२९.

परंतु, जगांतील व्यवहार पाहतां, शाब्दिक सहानुभूति[1] दाखविणारे हिंमत-बहाद्दर हवे तेवढे आहेत ?[2]

म्हणून आपल्या वागणुकींत खरेपणाचा धागा गोंविलेला नसेल, तर त्या वागणुकीची कवडीमोल किंमत होत असते. विचार, उच्चार, आचार, या त्रयींत एकसूत्रीपणा असल्यासच आपल्या शब्दास व कृतीस व्यवहारांत किंमत येऊन लोकांचा विश्वास संपादन करण्याची कला आपल्या अधिगत होणार.

सारांश,हल्लीं आपल्या समाजांत सडेतोडपणानें–फटकून वागण्याच्या तऱ्हेचा प्रघात Fashion पडल्यामुळें व तसें वागण्यांतच पुष्कळ लोक धन्यता मानत असल्यामुळें सर्व समाज विस्कळित होत चाललेला दिसून येत आहे. समा-जाचे घटकावयवच जर निरनिराळे फटकून राहूं लागले, तर समाज एकवटणार

---

1 Lip Sympathy

२ या बाबत एका आंग्ल कवीचें ह्मणणें आहे:—

To say well is good, but to do well is better;
Do well is the spirit, and say well the better;
If do well and say well were fitted in one frame,
All were won, all were done, and got were all the gain.

कसा ? दुसऱ्याचा विश्वास आपल्यावर असला काय, नसला काय, अशी बेपर्वाईची वृत्ति-दृष्टि झाल्यावर समाजांत संघशक्ति रहात नाहीं; व संघशक्तीचा लोप झाला असतां व्यक्तीच्या दृष्टीनेंच नव्हे तर, समाजाच्या दृष्टीनें महत् कार्य घडून येणें पुष्कळ वेळां अशक्यप्राय होऊन बसतें. समाजाची अशी विस्खळीत स्थिति झाल्यावर देशस्थिति कशी होत असेल याची कल्पनाच बांधणें सोयीचें होईल. म्हणून सदासर्वकाळ प्रफुल्लित चेहरा, मनाचा थोरपणा, क्षमावृत्ति व सक्रीय सहानुभूति या चतुःसूत्रीच्या जोरावर लोकांचा विश्वास आपणांस संपादन करून घेतां येतो. शेवटीं,

(१) बोले तैसा चाले। त्याचीं वंदावीं पाउलें

(२) जैसें बोलणें बोलावें। तैसेचि चालणें चालावें।
मग महंतलीला स्वभावें। अंगीं बाणे॥

या समर्थांच्या महा वचनाची आठवण धरून तदनुसार आपलें आचरण ठेवीत राहिल्यानें जगाचा आपल्यावर विश्वास बसणार व व्यवहार-शास्त्राची पहिली पायरी गांठल्याचें श्रेय आपल्या पदरीं पडणार.

प्रकरण सातवें.

"व्यावहारिक शास्त्राचें रहस्य."

"Talent is something, but tact is everything"

भावार्थः—व्यवहारांत बुद्धीमत्तेचा कांहीं उपयोग होतो, परंतु विविक्षित वागणुकीच्या हातोटीचा उपयोग प्रत्येक ठिकाणीं होतोच होतो.

समाजांतील व्यवहारांत चांगल्या तऱ्हेनें वागून लोकांवर छाप ठेवून स्वीकृत कार्यांत यश संपादण्यास मनुष्यास इंग्रजी भाषेतील Tact म्हणजे वागण्याची हातोटी-कला-या गुणाचा फार उपयोग होत असतो. हल्लींच्या काळीं तर मानवी व्यवहार फारच गुंतागुंतीचा-भानगडीचा ह्मणून नाजुक झालेला आहे. हें समाजांतील हितसंबंध राखतां राखतां मनुष्य कसा बेजार होऊन जातो, या गोष्टीकडे वरवर लक्ष पुरविलें तरी कळून येणार आहे. अशा तऱ्हेची मानवी व्यवहाराची स्थिति कां असावी-किंबहुना व्हावी, याची मीमांसा करूं लागल्यास तुसडेपणाची वृत्ति, बेमुर्वतपणा, फाजील घमेंड, अहंमन्यता वगैरे दोष मनुष्यस्वभावांत अधिक प्रमाणांत आढळून येत चालले

आहेत ही गोष्ट प्रत्येकास कबूल करावी लागेल. अशा दुर्गुणाची–दोषांची पैदास जर समाजांत जोरानें होत चालली आहे, तर मानवी व्यवहार अति भानगडीचा झाला असल्यास नवल काय ? अर्थात् अशा गुंतागुंतीच्या व्यवहाराचे धागे ज्यांना आकलन होत नाहींत–उकलत नाहींत, त्यांच्या हितसंबंधांची पाळणूक बरोबर रीतीनें होत नसल्यानें ते कधीं–कधींच कां–पुष्कळ वेळां नष्टच होऊन जात असल्यामुळें त्यांच्या व्यवहाराचें-अर्थात् त्यांच्या जन्माचें मातेरें होऊन जात असतें, व जगाच्या राहाटींत त्यांच्या वांट्यास हरघडी अपयशच ठेविलेलें; अशीच त्यांची कष्टमय स्थिति होऊन बसते.

अशा तऱ्हेची व्यवहाराची दुःखप्रद स्थिति झाली असतां जो तो आपल्या हितसंबंधांकडे पहात बसणार, व युक्त्याप्रयुक्त्या लढवून आपल्याच भातावर वरण ओतीत बसणार हें उघड आहे. तेव्हां अशा परिस्थितींत सचोटीची वागणूक ठेवून आपले हितसंबंध योग्य तऱ्हेनें पाळतां येण्यास उपरिनिर्दिष्ट वागणुकीच्या कलेच्या गुणाची हल्लींच्या काळीं तर प्रत्येकास जरूर आहे. हल्लीच्या व्यापारी युगांत ही कला काय, त्याचें महत्व काय, याविषयींची थोडी चर्चा केल्यास आज ती हवीशी वाटेल, या हेतूनें प्रस्तुत विषय हातीं घेतला आहे.

आतां जगांत अशीं कांहीं माणसें आढळून येत असतात कीं, दुसऱ्याचें मन न दुखवितां ते आपला हेतु स्पष्ट बोलून दाखवितात. बरोबरच आहे कीं, ज्यांच्यांशीं त्यांचे हितसंबंध निगडित झालेले असतात, त्यांचें मन दुखवून कसें चालेल ? दुसऱ्याची मनःप्रवृत्ती काय आहे हें जाणून प्रसंग पाहून शब्द टाकला तरच त्या शब्दास किंमत येणार; नाहीं तर उद्दिष्ट गांठण्याचें दूरच राहून एखादा भलताच शब्द तोंडावाटे चुकून जरी बाहेर पडला तरी आपलें काम व्हावयाचें तें होत नाहीं; पण उलट कधींकधीं जन्मभर मनांत परस्परांविषयीं काळेंबेरें आणण्याचें श्रेय मात्र आपल्या पदरीं पडत असतें. मोठ्या दमानें व उत्साहानें आपण काम करण्यास जावें, तों आपल्याकडून कांहींतरी अवचित गोष्ट घडून माशी शिंकते; अशी स्थिति कित्येकांच्या वांट्यास व्यवहाराच्या प्रवाहांत येत असलेली दिसून येते.

बरें; याच्या उलट दुसरीं अशीं कांहीं माणसें असतात कीं, व्यवहारांत त्यांच्या तोंडावाटें कसाहि शब्द बाहेर पडो, त्याचा विपर्यास हा आपला व्हावयाचाच; येवढेंच नव्हे तर त्यांच्या कृतीचा लोकांत उपहास

ठरलेला. अर्थातच त्यांचें हंसें समाजांत कधीं कधीं झाल्यास नवलहि पण नाहीं. सारांश, सर्व जगाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोण सदैव फिरलेला, अशी कित्येकांची कष्टमय स्थिति आढळून येत असते खरी. आतां जगाचा आपल्याविषयींचा अनुकूल ग्रह कां होऊं नये, आपल्या शब्दास लोकांनीं मान कां तुकवूं नये, आपल्या कृतीचा व शब्दाचा विपर्यास कां होत जावा... वगैरे गोष्टी विचारांत घेण्याजोग्या नाहींत, हें विधान समंजस माणूस करील असें आह्मांस वाटत नाहीं. जगांतील अनुभव काय सांगतो ही गोष्ट मनांत घेतां आपणांस कळून चुकणार आहे कीं, उपरिनिर्दिष्ट प्रश्न फार अगत्याचे आहेत . त्याचा विचार आपल्या मनःप्रवृत्तींची व स्वभावांतील दोषांची मीमांसा करून ज्याचा त्यानें आपल्याशींच करावा; हीच गोष्ट श्रेयस्कर होय; व आपल्या अंगीं हलगर्जीपणानें जे कांहीं दोष राहून आपल्या स्वभावाशीं तादात्म्य पावून जात असतात, त्यांच्याकडे काणाडोळा करणें ह्मणजे आपल्या नाशास आपण स्वतः कारणीभूत होण्यासारखें आहे. तेव्हां आपणांमध्यें असे दोष काय जे असतील ते दूर करण्याची प्रत्येकाची प्रवृत्ति असावी व ही फार अगत्याची गोष्ट आहे असें अंमळ विचारांतीं कळून चुकणार आहे. विनाकारण माणसानीं निवळ हलगर्जीपणाच्या वागणुकीमुळें जें नुकसान होत असतें, तें कां करून घ्यावें, लोकांनीं त्यांच्याकडे करड्या नजरेनें कां पहावें, या गोष्टीचा विचार केल्यास ते विवक्षित प्रसंग ओळखीत नाहींत, व ते ओळखून ठेवले असले तरी, त्यांच्याकडून योग्य ती वागणूक घडून नाहीं, असेंच कष्टानें म्हणावें लागतें!—हाच सिद्धान्त निघतो. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास समाजांत वागणूक कशी असावी? हें व्यावहारिक शास्त्र तरी काय आहे ? एवढी सुद्धां कल्पना आजमितीस त्यांच्या मनांत उदित होत नाहीं असें दिसून येतें; व कित्येकांच्या मनांत ती उदित झालीच तरी त्या शास्त्राकडे त्यांचें लक्ष जात नाहीं, ही गोष्ट खास.

जगांत चांगल्या बुद्धिमत्तेचीं माणसें असतात, पण प्रस्तुत कलेस तीं जर पारखीं असलीं, तर त्यांच्या बुद्धिमत्तेचें चीज होत नाहीं, व त्यांच्या अंगच्या निरनिराळ्या गुणांचें चीज पडावें तसें पडत नाहीं. हिरा खरा, पण त्याला सुद्धां कोंदणाची जरूरी असते. कोंदणांत बरोबर तो बसेल तरच त्याची प्रभा फांकते, व त्याचा खरा भाव किंबहुना जास्ती भाव बाजारांत येत असतो. त्याप्रमाणें नुसत्या बुद्धिमत्तेच्या

जोरावर माणसानें वाटेल तशी मनमुराद वर्तणूक ठेवून व्यवहार-शकट हांकण्यास सुरुवात केल्यास त्याची समाजाकडून वेळोवेळीं संभावना कशी होत असते, हीहि अनुभवसिद्ध गोष्ट आहे; व या गोष्टीचें महत्त्व ध्यानांत न वागवितां व्यवहार चालविणें ह्मणजे सूर्यप्रकाश सोडून अंधारांत चांचपडत चालणें व प्रसंगीं खड्ड्यांत आदळण्यासारखें होय. तेव्हां, बुद्धिमत्तेचा जोर कितीहि असला तरी, त्यांचा उपयोग समाजांतील वागणुकीच्या कलेशीं 'मिळता' "जुळता"केल्यास-व तो तसा झाल्यास इष्टापत्तीच होणार,नाहींपेक्षां, समाजाकडून वेळोवेळीं पूजेचा (?) मान मिळत जाणार, ही गोष्ट स्पष्टच आहे.

"समाजांत वागावें कसें" ही कला, हें ज्ञान अवगत नसेल तर, काय काय अनिष्ट परिणाम घडून येतात ते पहा. मैत्री जमत नाहीं, जमल्यास टिकत नाहीं; व्यापाऱ्यास गिऱ्हाईक मिळत नाहीं, तर वैद्याकडे रोगी फिरकत नाहीं; वर्तमानपत्राचे वर्गणीदार टिकत नाहींत, तर शाळामास्तरास नोकरी मिळत नाहीं. सारांश, या कलेचा अंगीं अभाव असल्यावर माणसाची अशी केविलवाणी स्थिति होऊन बसते.

उलट, या कलेमुळेंच स्नेहसंबंध वाढत जातात, व ते चिरकाल टिकत असतातहि. जिव्हाळ्याचे स्नेहसंबंध वाढले असतां समाजांत आपलें बळ वाढून आपल्या हितसंबंधाचें रक्षण चांगल्या तऱ्हेनें होऊन आपल्या अंगच्या निरनिराळ्या गुणांचा विकास होण्यास योग्य ती संधि मिळत जाते व समाजांत आपली चहा होण्यास उशीरही लागत नसतो. अशा तऱ्हेनें सामाजिक दृष्ट्या आपली स्थिति सुधारत जाते, ही गोष्ट निर्विवाद आहे.

आतां ही कला साध्य होण्यास आपल्या अंगीं काय काय गोष्टी अवश्य लागत असतात, या प्रश्नाचा विचार करूं.

(१) प्रथम एक गोष्ट आपण ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे कीं, आपल्या अंगीं तुसडेपणाच्या दुर्गुणानें वास करतां कामा नये. तुम्हीच जर दूरदूर, फटकून वागूं लागला तर, दुसरेहि तसेच वागत रहाणार. हल्लीं तर तुसडेपणा इतका बोकाळला आहे कीं ज्याला त्याला वाटतें आपणांस 'क्ष' घेऊन काय करावयाचा ? त्याच्याखेरीज काय आपलें चालत नाहीं ? असे बेमुर्वतपणाचे विचार या तुसडवृत्तीमुळेंच मनुष्याच्या मनांत उदय पावत असतात; पण, बिचाऱ्या मनुष्यप्राण्यास त्याबरोबर असा एक विचार सुचत नाहीं (मग, तें

त्याचें दुभार्ग्य म्हणा वाटेल तर,) कीं जगाचें आपल्याशिवाय काय चालणार नाहीं ? जर आपण जगाची पर्वा केली तरच, सूर्य, चंद्र व ग्रहमालिका आपापले व्यापार करीत राहून जगाची रहाटी सुरळीत चालत जाणार, अशी थोडीच गोष्ट आहे ? इतकी तुमची जरूरी न भासल्यानें जगानें तरी तुमची पर्वा कां करावी—कळत नाहीं ? तुमच्या तुसड्या वृत्तीमुळें तुमच्याविषयींचीं जगाची सहानुभूति रहावी कशी? हा एक प्रश्नच आहे. तुम्ही किती जरी श्रम घेऊन चांगल्या गोष्टी केल्या, तरी लोकांची तिकडे दृष्टी जात नाहीं; गेल्यास ते तुमच्या गुणाचें चीज करण्यास प्रवृत्त होत नाहींत असेंच बहुधा आढळून येत असतें. तेव्हां तुसड्या वृत्तीमुळें जर कल्याण होत नाहीं, व अकल्याणच वांट्यास येत असतें हा जर नित्याचा अनुभव, तर तुसड्या वृत्तीचा दुर्गुण काढून टाकण्याची आटोकाट खटपट ज्यानें त्यानें करणें यांतच शहाणपणा आहे.

(२) कित्येकांच्या मतें आपल्या अंगीं गाढी विद्वत्ता असल्यावर ह्मणा, अगर आपला सामाजिक दर्जा मोठा असल्यावर ह्मणा, आपल्या अंगीं तुसडी वृत्ति असली तर काय बिघडणार आहे ? फारसें बिघडणार नाहीं, हा पक्ष जरी आपण घेऊन चाललों तरी, तुसडेपणा हा गुण कसा ठरतो हें कळत नाहीं. व हा गुण जर ठरत नाहीं, तर तुसड्या वृत्तीच्या दुर्गुणाचे देव्हारे माजविण्यांत कांहीं हंशील नाहीं, हीहि गोष्ट तितकीच स्पष्ट आहे. कोणत्याहि कालीं व कोणत्याहि समाजांत ‘तुसडी वृत्ति’ हा गुण म्हणून लेखण्यांत आलेला नाहीं. तर अशा तऱ्हेच्या दुर्गुणाचें जगास प्रदर्शन करून किती एक अहंमन्य काय साधीत असतात, हें आमच्या कल्पनाशक्तीच्या आटोक्याबाहेर असल्याचें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. ईश्वरकृपेनें तुह्मांस सामाजिक दर्जा मोठा लाभलेला आहे ह्मणा, किंवा, तुह्मांस गाढ्या विद्वत्तेची जोड साधलेली आहे ह्मणून ह्मणा—समाजाशीं फटकून वागण्यांत तुह्मी काय साधतां हें कळत नाहीं. हल्लींच्या काळीं तर, मनुष्याच्या अंगीं हा दुर्गुण असल्यावर—मग तो मोठा विद्वान् असो किंवा बडा अधिकारी असो, त्याची समाजाकडून हेटाळणी मात्र होत असते.

(३) समाजांत आपली वागणूक कशी असावी ? हें शास्त्र तरी काय आहे ? यासंबंधीं ज्ञान होण्यास सुद्धां विवक्षित कालाची परिस्थिति काय आहे, याविषयींची कल्पना बरोबर बांधणें ही गोष्ट देखील अगत्याची आहे.

परिस्थिती ओळखून तदनुसार वर्तन करण्यास किंवा जरूर असल्यास एखादी गोष्ट बोलून दाखविण्यास अवश्य लागणारें प्रसंगावधान अंगीं असावें लागतें. हें प्रसंगावधान आपल्या अंगीं नसल्यास कर्तबगारी असूनहि कित्येक माणसें प्रसंगविशेषीं फिक्कीं पडत असतात असाच व्यवहारांतील अनुभव आहे. अर्थात् त्यांना धंद्यांत काय किंवा किरकोळ व्यवहारांत काय बरकत आलेली दिसून येत नाहीं.

(४) त्याचप्रमाणें मनुष्यस्वभावाचें ज्ञान असणें ही गोष्ट सुद्धां प्रस्तुत कला अधिगत होण्यास आवश्यक आहे. या मनुष्यस्वभावांत काय काय चिजा आहेत, कोणते कोणते गुण व दुर्गुण यांची खिचडी किंवा पाक आहे, हें मनुष्य-स्वभावाचा दृढतर अभ्यास केला असतां कळून येणार आहे. अशा तऱ्हेचा दृढतर अभ्यास केला नसल्यानें मनुष्यस्वभाव ही काय चीज आहे, हें कळत नाहीं; व त्यामुळें नित्याच्या कित्येक साध्या व्यवहारांत सुद्धां कांहीं माणसें फशीं पडत असलेलीं दिसून येतात ! आतां याच्या उलट पहा. जगांतील नित्याच्या लोकव्यवहारांत सुद्धां अशीं कांहीं माणसें आढळून येतात कीं, त्यांच्या अंगीं मोडकें तोडकें ज्ञान असूनहि त्यांची चलती असते—त्यांचा बोलबाला होतो, व त्यांचें व्यवहार बहुधा फलदायकच होत असतात. अंमळ विचार केला असतां आपणास असें दिसून येतें कीं, अशा लोकांस मनुष्यस्वभा-वाचें ज्ञान असूनही परिस्थितीचे धागे काय काय आहेत व ते उकलावेत कसे हेंहि माहीत असतें. व प्रसंगावधानाची जोड असल्यामुळें ते वेळ मारून नेत असतात. म्हणूनच त्यांचा व्यवहार बहुधा यशस्वी ठरत असतो.[१]

हल्लींच्या आधिभौतिक-व्यापारी युगांत तर प्रस्तुत कलेकडे काणाडोळा करून चालेल असें वाटत नाहीं. या कलेचा अंगीं आभाव असल्यावर व्यापारधंदा चालणें शक्य नाहीं. लोकांचें मन न दुखवितां आपला कार्यभाग

१ अमेरिकन तत्त्ववेत्ता इमर्सन म्हणतोः—

1 "These favourites of society, and what it calls whole souls, are able men, and of more spirit than writ, who have no uncomfortable egotism, but who exactly fill the hour and the company, contented and contenting, at a marriage or a funeral, a ball or jury, a water party or a shooting match."—

उरकून घ्यावयाचा व आपले हितसंबंध सुरक्षित ठेवावयाचे, हें लहानसहान काम आहे व तें वाटेल त्या इसमास साधणारें आहे, अशी कल्पना बांधणें म्हणजे आपल्या अंगच्या व्यावहारिक ज्ञानाचें (?) जंगी प्रदर्शन करणें होय. एकदां बर्लेनें एलिझाबेथ राणीजवळ असें विधान केलें होतें कीं, आपल्या गोड वागणुकीनें " दुसऱ्यांचीं मनें आकर्षण करा; म्हणजे त्यांच्या मनावर ताबा मिळावयाचा तो मिळून पुनः त्यांच्या मालमत्तेवरहि तो मिळत असतो."[1]

(५) व्यावहारिक वागणुकीमध्यें एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत ठेवणें जरूरीची आहे कीं, आपल्या सत्यपूर्ण वागणुकीनें लोकांचा आपल्या शब्दावर म्हणा, कृतीवर म्हणा, विश्वास बसावयास हवा. आपली वागणूक सत्यमय नसेल तर मनुष्यस्वभावाचें ज्ञान असून परिस्थिति ओळखून व प्रसंगावधानाची जोड असून देखील आपल्या शब्दाचा—कृतीचा विपर्यास होणें अपरिहार्य असतें. साधारणपणें, पुष्कळ लोकांची अशी समजुत झालेली दिसून येते कीं, जो या सामाजिक वागणुकीच्या कलेंत तरबेज होऊं पहातो, तो असत्याची कांस धरतो; किंबहुना, असत्यपूर्ण वागणुकीचा आश्रय धरल्याखेरीज त्याचा व्यवहार सुरळीत चालणें शक्यच नाहीं, असें त्यांचें ठाम मत झालेलें दिसून येतें खरें. सामाजिक वागणुकीची कला=असत्यपूर्ण वागणूक, हें समीकरण धाष्ट्यानें मांडावयास ते कचरत नाहींत, असा अनुभव आहे. तुमच्या वागणुकींत खरेपणा असत नाहीं,—ही गोष्ट जगास एकदां कळली असतां तुमच्या व्यवहाराची इमारत भरभक्कम पायावर उभी रहाणेंच शक्य नाहीं; आणि जरी ती उभारलेली दिसून आली तरी तिचा पाया कच्च्या बांधाऱ्यावरच आहे, व त्या बांधाऱ्याचा धरबंद केव्हांतरी सुटून इमारत जमीनदोस्त होईल, ही खूणगांठ तुह्मीं आपल्या मनाशीं बांधून ठेवलेली चांगली. शब्दांत काय, किंवा कृतींत काय, असत्याचा धागा कां एकदां गोंविलेला जगाच्या दृष्टोत्पत्तीस आला तर तुमच्या शब्दावर ह्मणा, कृतीवर ह्मणा, लोकांचा विश्वास बसावा कसा? त्यांचा विश्वास पार उडून गेल्यामुळें ते तुमच्या व्यवहारास किंमत देण्यास तयार होत नसले तर आश्चर्य नाहीं. मग मनुष्यस्वभावाचें ज्ञान, परिस्थितीची पूर्ण ओळख व प्रसंगावधानाची

1 " Win their hearts and you have all men's hearts and purses."

जोड इतक्या गोष्टींची सामुग्री जवळ तयार असूनहि "सगळें मुसळ केरांत" अशी स्थिति होऊन जात असते. तेव्हां उपरिनिर्दिष्ट सामुग्रीस सत्यपूर्ण वागणुकीची मदत असली ह्मणजे जगाचा तुमच्यावर विश्वास बसतो, सर्व जग तुमचें मित्र होतें, मग सर्व लोकांनीं तुह्मास आपले म्हटल्यावर इष्ट गोष्ट दुसरी कोणती असणार?

आतां, जग पुढें जात आहे किंवा मागें खेंचलें जात आहे, हा प्रश्न जरी वादग्रस्त असला तरी, व्यवहारांतील आपले हितसंबंध फारच भानगडीचे ह्मणून नाजूक होत चालले आहेत; किंबहुना ते तसे झाले असल्याचें मागें सांगितलेलें आहेच. असे भानगडीचे संबंध होण्यास जीं कांहीं कारणें आहेत, त्यापैकीं 'गैरसमज' ह्या कारणाचा मुख्यत्वेंकरून नामनिर्देश केला पाहिजे. पुष्कळ वेळां लोकांमध्यें आपल्याविषयीं गैरसमज निष्कारण पिकविलेले असतात, असा आपला अनुभव आहे. आपल्या ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, ज्या गोष्टी नाहींत, त्या गोष्टी-दोष-आपल्या माथ्यावर लोक मारीत असतात; व याचा परिणाम मात्र असा होतो कीं, आपण एका दिशेनें चालत असतों, तर विरुद्ध दिशेनें आपणांस खेचण्याचे लोकांचे प्रयत्न जोरानें सुरू असतात. अशी स्थिति असल्यावर प्रसंगीं आपल्या अब्रूवर पाळी येऊन कधीं कधीं आपणांस आर्थिक नुकसानहि सोसणें भाग पडतें. बरें, अंमळ उशिरां आपल्याविषयींचे जे कांहीं गैरसमज माजलेले असतात, ते घालविण्याचा आपण कितीजरी प्रयत्न केला-बोलून बोलून ह्मणा किंवा कृतीवरून-कितीजरी निर्वाळा दिला तरी, गैरसमजाचें भूत एकदां तुमच्या मानगुटीवर जें बसलेलें असतें, त्याची मगरमिठी तुमच्यानें सैलावत नाहीं, अर्थात् तुमची त्यापासून सुटकाहि पण होत नाहीं !

आतां, व्यवहारांतील अनुभव आपण ध्यानांत घेतला असतां, आपणांस दिसून येतें कीं, कळत न कळत एखादा उपरोधिक शब्द आपण बोलून जात असतों, व कधीं कधीं, एखादी क्षुल्लक कृति सुद्धां करून जातों. पण, तेवढ्या क्षुल्लक कारणावरून आपल्या विषयींचे गैरसमज लोकांत फैलावत असतात, 'अ'नें 'ब'ला जर कां ह्मटलें, "कां बुवा, हल्लीं तुमचें ठीक चाललेलें दिसतें" व हें साधें वाक्य जर कां त्यानें स्वरभेद करून उच्चारिलें असेल, तर, 'ब'च्या मनांत 'अ' विषयीं काळेंबेरें येतें, गैरसमजास सुरुवात होते व "ब" च्या कल्पनाशक्तीचा स्वैरसंचार सुरू होऊं लागतो.मग, 'अ'नें किती जरी कंठरवानें

'व'ला विनवून सांगितलें कीं, 'अहो, तसें बोलण्याचा माझा कांहीं रोख नव्हता,' तरी ऐकून घेतो कोण? असाच प्रकार समाजांत वेळोंवेळीं झालेला आपण पहात नाहीं काय? कांहींतरी कुसपट काढून एखादा भलता सलता शब्द बोलून आपल्याविषयीं आपणच लोकांत गैरसमज माजवावा, अशी कोणाचीहि मनःप्रवृत्ति असणार नाहीं; पण लक्ष्यांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं, आपणच पुष्कळ वेळां या बाबतींत दोषी ठरत असतों. तेव्हां, आपणच सर्व आपला व्यवहार काळजीपूर्वक केला असतां अशा तऱ्हेच्या गैरसमाजाचें खूळ विनाकारण बोकाळणार नाहीं, व सर्व व्यवहारहि सुरळीत चालेल.[१]

दुसऱ्या एका ग्रंथकाराचें म्हणणें असें आहे कीं,[२]:—

या कलेविषयीं ॲडिसन एके ठिकाणीं म्हणतोः—

1 The true art of being agreeable, is to appear well pleased with all the company, and rather to seem well entertained with them, than to bring entertainment to them. A man thus disposed perhaps, may have not much learning, nor any wit; but if he has common sense and something friendly in his behaviour, it conciliates men's minds more than the brightest parts without this dispositions. It is true, indeed, that, we should not dissemble and flatter in company; but a man may be very agreeable, strictly consistent with truth and sincerity, by a prudent silence where he cannot concur, and a pleasing assent where he can. Now and then you meet with a person so exactly formed to please that he will gain upon every one that hears or beholds him: this disposition is not merely the gift of nature, but frequently the effect of much knowledge of the world, and a command over the passions."

2 "A tactful man will not only make the most of everything he does know, but also of many things he does not know, and will gain more credit by his adroit mode of hiding his ignorance than a pedant by his attempt to exhibit his erudition."

"ज्या इसमास ही कला अवगत आहे, तो ज्ञात असलेल्या व्यवहारांत यश संपादन करतोच; पण ज्या व्यवहाराची त्याला कांहीं माहिती नाहीं, त्या व्यवहारासंबंधीं 'मौनव्रत' धारण करून आपला 'आब' तो कुशलतेनें राखीत असतो. ही कला अधिगत नसलेला इसम मात्र आपलें अज्ञान दाखवून हंसें करून घेत असतो."

किरकोळ व्यवहार काय किंवा राजकारणांतील व्यवहार काय, ही कला अंगीं असल्यावर आपल्या नोकरलोकांवरच नव्हे तर बरोबरीच्या सरदारांवरहि आपली छाप पडून तोडीस तोड देतां येते—ही गोष्ट पुढील इतिहासप्रसिद्ध आख्यायिकांवरून कळून येणार आहे.

(१) शिवाजी "महाराज दिल्लीचा जाब येतांच जाणें पडेल, किल्लेकोटांचा बंदोबस्त झाला पाहिजे, म्हणून निरोप घेऊन निघाले... महाराजांनीं विचार केला जे, 'आपण किल्ल्यांची खबरदारी केली होती तसें किल्लेकरी चालून खबरदार सावध आहेत नाहींत पहावें म्हणून, रात्रीचे किल्यावर गेले आणि हवालदारास हांक मारून 'महाराज आले, गनिमाची झड मागें आहे; दरवाजा उघडून किल्ल्यावर घेणें' असें सांगितल्यावरून तटावर सारे अधिकारी खबरदार लोक घेऊन येऊन उभे राहून 'रात्रीस दरवाजा उघडूं नये, ही कैद महाराजांनीं करून दिली यास्तव उघडीत नाहीं; शत्रू आला असला तरी घेरियाचे लोक खालीं हुशार करून रोखून राखतों; दरवाजानजिक तटालगत असावें; 'शत्रू पुढें न येण्याचा बंदोबस्त करून वरून रोंखून पुढें येऊं देत नाहीं' असा अर्ज केला. तेव्हां सर्फराजी होईल. आज्ञाही आमची व परवानगीही आमची; आम्हीच सांगतों दरवाजा उघडावा.' असें बोलल्यावर '**दरवाजा उघडीत नाहीं. रात्र थोडी आहे. मागील गलबल पडूं देत नाहीं**' असें उत्तर केलें. याजवर 'पारिपत्य केलें जाईल. तुम्ही चाकर इतबारी, हुकुमाप्रमाणें चालावें हें घडत नाहीं हें चांगलें नाहीं,' असें भय घालून पाहिलें. तथापि दरवाजा उघडीतना. प्रातःकाळ झाला, तेव्हां सर्व कारभारी हात बांधून दरवाजाजवळ येऊन कुलपें काढविलीं आणि महाराजांस आंत घेऊन "आम्ही अन्यायी, पारिपत्य करणें असेल तें करावें," असें बोलल्यावर महाराज बहुत संतोषी झाले. त्यांस नांवाजून त्यांनीं वाढविलें. **आज्ञेप्रमाणें चालतां इतबारी आहां, असें बोलले**—(मल्हार रामराव कृत श्री शिवछत्रपति महाराज यांचें चरित्र; पृष्ठ १०८–१०९).

(२) 'पहिल्या बाजीरावसाहेबांनीं माळव्यांतील मुलूख सर केला. त्याचा अंमल बसवीत चालिले ते जाऊन उज्जनीस लागले. तेव्हां उज्जन जयसिंगराजे जयपूरवाले यांजकडे होती. त्यांनीं हें वर्तमान ऐकून जयसिंगराजे फौजेची तयारी करून श्रीमंतांवर चढाई करून आले. उभयतांची लढाई जुंपली. त्या लढाईंत जयसिंग यांनीं पाहिलें तों बाजीराव यांचे मस्तकीं ईश्वराचें चक्र फिरतें. असें पाहून जयसिंगराजे यांणीं विचार केला कीं, "यांचे मस्तकीं ईश्वराचें चक्र रक्षण करतें, तेव्हां आम्हांस लढाईंत आटोपतात असें दिसत नाहीं. त्यापेक्षां यांशीं तह करावा हें चांगलें." बाजीरावसाहेब यांणींहि जयसिंगराजे यांस पाहिलें तेव्हां श्रीमंतास असें वाटलें कीं, 'जयसिंग पुण्यवान् तेजस्वी आहे. हा आम्हांस आटोपतां दिसत नाहीं. तेव्हां याशीं समेट करावा तें उत्तम." असा विचार करीत आहेत तों जयसिंगराजे यांजकडील वकील पेशवे यांजकडे बोलण्यास आले. परस्परें बोलणीं बहुत झाली. त्या बोलण्यांत श्रीमंत यांचा मानस उज्जन घेण्याचा आहे, असें समजून जयसिंगराजे यांणीं सांगून पाठविलें, कीं, **आह्मी उज्जन येरवीं देत नाहीं; तुम्ही दान घेत असाल तर तुह्मांस देतों."** हें ऐकून श्रीमंतांनीं उत्तर सांगून पाठविलें कीं, " **आह्मी ब्राह्मण आहों, दान घेण्यास आह्मांस प्रत्यवाय नाहीं"** (सोहनी विरचित पेशव्यांची बखर. पृष्ठें ३५--३६.)

अशी एक गोष्ट सांगतात कीं, इतिहासप्रसिद्ध राज्यक्रांतीच्या वेळीं फ्रान्स-मध्यें जो कांहीं धुमाकूळ माजून राहिला होता त्या वेळीं, एका प्रसंगीं एक शिपायांची तुकडी फ्रान्समध्यें एका रस्त्यावर उभी होती. एक सेनापति आपल्या लोकांस त्या तुकडीवर गोळ्या झाडण्याकरितां हुकूम देण्याच्या बेतांत होता; इतक्यांत एक अंमलदार पुढें आला व आपण लोकांनां कांहीं सांगणार आहों तर आपणांस परवानगी द्या; अशी विनंति त्यानें सेनापतीस केली व सेनापतीनें ती मान्यहि पण केली. त्याबरोबर त्या अंमलदारानें पुढें होऊन लोकांस उद्देशून एकच वाक्य उच्चारिलें तें असें:—

---

1 "Gentlemen will have the kindness to retire, for I am ordered to shoot down the rabble,"

"सभ्य गृहस्थांनीं कृपा करून एथून तावडतोब निघून जावें, कारण येथें जमलेल्या बाजारबुणग्यांवर गोळ्या झाडण्याचा मला हुकूम झालेला आहे."

या शब्दांचा परिणाम असा झाला कीं, विजेच्या धक्क्यासारखा धक्का त्या तुकडीस बसून एका क्षणांत त्या तुकडीची आपोआप पांगापांग होऊन गेली!

या इतिहासप्रसिद्ध गोष्टींवरून मोठमोठ्या सेनापतींनां काय, राजकारण-धुरंधरांनां काय, राजेलोकांनां काय किंवा चार पैसे रोज मिळवून पोट भरणाऱ्या साध्या इसमास काय, या कलेची किती जरूरी आहे, याविषयीं चांगली कल्पना येणार आहे.

आतां व्यवहारांतील आपला अनुभव आपणांस असें सांगतों कीं, कित्येक वेळां आपलीं कामें विनोदपूर्ण भाषेनें–खेळीमेळीच्या शब्दानें साध्य होत असतात. कोणासहि रोकठोक भाषा मग ती सत्यपूर्ण असली तरी मानवत नाहीं, इतकेंच नव्हे तर कधीं कधीं ती कडू लागते. त्या औषधाचें दुसऱ्यांनीं सेवन करण्यास त्यांत विनोदाचा मधुर पाक प्रसंगविशेषीं घातला तरच त्या औषधास गोड चव येऊन त्याचें सेवन फार खुशीनें होत असतें. औषधाचेंच सेवन योग्य प्रकारें झालें असल्यास त्याचा इष्ट परिणाम व्हावयास वेळहि लागत नाहीं.

म्हणूनच, विनोदपूर्ण, सत्यमय पण सहानुभूतिपूर्ण शब्दांचा कुशल उपयोग सभोंवतालच्या परिस्थितीचें योग्य प्रकारें आकलन व प्रसंगानुसार अवधानयुक्त आचरण हींच काय तीं प्रस्तूत कलेचीं मुख्य अंगें होत. इतक्या गोष्टींची जोड आपणांस जेव्हां लाभेल तेव्हांच ही कला आपणास अवगत झाली असें म्हणतां येईल.

एका ग्रंथकारानें ही कला पूर्णपणें अवगत होण्यास आपल्यास पुढील गूण यावयास पाहिजेत, असें लिहिलें आहे:—

(अ) मनुष्यस्वभाव, मानवी आशा, आकांक्षा, इत्यादि गोष्टींचें पूर्ण ज्ञान होणें अवश्य आहे.

(आ) दुसऱ्याविषयीं आपण कल्पना अगर अनुमान जें कांहीं बांधावयाचें तें आपण दुसऱ्या माणसाच्या जागीं असतों तर आपणांस काय वाटलें असतें–किंबहुना, आपण काय केलें असतें, हा विचार करून मग काय तें बांधावें.

(इ) दुसऱ्याच्या मनास विनाकारण त्रास होणार असेल तर तसे शब्द न उच्चारण्याची पूर्ण ती–योग्य प्रकारें खबरदारी घ्यावी व मनावर ताबा असावा.

(ई) प्रसंग पाहून योग्य ती गोष्ट करण्यास किंवा, जरूर असल्यास योग्य तें बोलून दाखविण्यास व दुसऱ्यांस प्रसंगविशेषीं शक्य त्या सवलती देण्यास मनाची तयारी असणें ही गोष्ट अवश्य होय.

(उ) " व्यक्ती तितक्या प्रकृती, " ही म्हण–हें सत्य ध्यानांत वागवून मतवैचित्र्य हें असणारच, व अशा बहुमतांपैकीं आपलें एक मत अशी मनाची समजूत करून ठेवणें अगत्याचें आहे.

(ऊ) सत्यपूर्ण व उदारतेची वागणूक–मग तुमचा शत्रूशीं जरी प्रसंग आला तरी त्याच्याशीं–करावयाची, हें व्रत चालविणें अवघड असलें तरी जरूरीचें आहे.

(ए) परिस्थित्यनुसार ज्या कांहीं चाली किंवा परंपरागत गोष्टी लोकांनीं आचरावयाच्या असतात, त्यांनां मान्यता दाखविण्याची मनाची खंबीरता, व तदनुसार आपली औदार्यपूर्ण वागणूक असणें इष्ट आहे.

(ऐ) सभ्यपणा, आनंदी मुद्रा व मनाचा खरेपणा या गुणांची जोड आपल्या अंगीं असणें, ही या कलेची पूर्व तयारी होय.

सारांश, प्रस्तुत विषयाच्या केलेल्या विवेचनावरून आपल्या नित्याच्या व्यवहारांत या कलेची किती जरूरी आहे व व्यावहारिक शास्त्रांत या कलेचा अंतर्भाव कसा होतो त्याविषयींची ठळक कल्पना येणार आहे; व ही कल्पना ठळक रीतीनें आली असतां व्यावहारीक शास्त्राचें रहस्य=प्रस्तुत कला, हेंहि समजून चुकणार आहे,

———

प्रकरण आठवें.

"क्लैब्यं मास्म गमः"

क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप॥ गी. २–३.

अर्थः—(हे पार्था, असा नामर्द होऊं नकोस! हें तुला योग्य दिसत नाहीं. मनाचें क्षुद्र दौर्बल्य टाकून देऊन तूं (युद्धास) उभा रहा!)

भारतीय युद्धाच्या आरंभीं, अर्जुनानें जेव्हां परपक्षीय सेनेचें निरीक्षण केलें, तेव्हां, त्या सैन्यांत त्याला नातलग, सखेसोयरे, गुरु, अशी वडीलधारी मंडळी दृष्टीस पडली; व त्या सर्वांचा नाश आपल्या हातानें होणार, व त्यांनां ठार मारण्याचें श्रेय (?) आज आपल्यास मिळणार ही कल्पना–कल्पना–कसली मोहच तो–त्या कल्पनेनें म्हणा, अगर मोहानें म्हणा, त्याच्यावर आपला पगडा बसवून त्याची स्थिति एखाद्या क्लीबाप्रमाणें करून टाकिली! त्याच्या मनांत भीतीनें आपलें ठाणें बसविलें! व याचा परिणाम असा झाला कीं, शूरामध्यें शूर अशा त्या अर्जुनाच्या हातांतून गाण्डीव धनुष्य गळून पडलें. त्याच्या सर्व अंगास कंप सुटला, त्याचीं गात्रें विगलित झालीं, व तो एखाद्या भागुबाई-प्रमाणें किंकर्तव्यतामूढ होऊन बसला!

आपली स्थिति किती केविलवाणी झालेली आहे हें श्रीकृष्णास सांगतांना अर्जुन म्हणतोः—

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते।
गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते।
नच शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः॥

गीता अः १–२९–२०

अर्थः—(माझीं गात्रें शिथील होतात व तोंड कोरडें पडतें; आणि शरीराला कंप सुटून रोमांचहि उभे रहातात; गाण्डीव हातांतून गळून पडतें. व अंगाचाहि सर्वत्र दाह होतो; उभें रहावत नाहीं, आणि माझें मन भ्रमल्या-सारखें झालें आहे!)

आतां अर्जुनाच्या या कंपायमान स्थितीची मीमांसा पौर्वात्य तत्त्वज्ञानी काय किंवा पाश्चात्य तत्त्वज्ञानी काय, ते आपापल्या परीनें वाटेल तशी करोत,

निघतील (अर्थात् त्यांच्या त्यांच्या दृष्टीनें) ते सिद्धान्त काढोत; व्यवहारज्ञानी मात्र अर्जुनाच्या केविलवाण्या स्थितीचें निरीक्षण करून असेंच अनुमान काढणार कीं, या धक्काबुक्कीच्या मामल्यांत अर्जुनाच्या मनानें कच खाल्ली, तो किंकर्तव्यता मूढ बनला! व त्याची 'चक्रं भ्रमति मस्तके' अशी कष्टमय स्थिति होऊन गेली. वास्तविक पहातां, अर्जुनासारख्या खंद्या योध्यानें नेहमीप्रमाणें समरांगणावर धडाडीनें जाऊन मित्र-शत्रु-आप-पर हा भाव विसरून नीतीनें युद्ध करावयाचें. यांतच काय तो त्याचा शूरपणा दिसून येणार होता! पण तो मोहाच्या कैचींत चांगला अडकून गेल्यामुळें त्याचा इलाजच चालेना! पण आपण अर्जुनासच इतका दोष कां द्यावा, हेंच कळत नाहीं. मानवी प्राण्याच्या आयुष्यक्रमांत असेच मोहाचे प्रसंग काय थोडे येतात? व त्या प्रसंगीं कोणत्या ना कोणत्या तरी कारणामुळें होईना; त्याच्या हातून भ्याडवत् आचरण होत असतेंच कीं नाहीं?

आंग्ल कवि मिल्टन ह्मणतोः—' दुबळेपणाची जाणीव होणें हीच गोष्ट मनुष्यप्राण्याची केविलवाणी स्थिति करून सोडीत असते.'[1] मनोदौर्बल्याची जाणीव असल्यावर आपल्या अंगीं ज्या कांहीं गुणांचा वास आहे, त्या गुणांची प्रभा जशी पडावी, तशी ती न पडल्यास आश्चर्य काय? वस्तुतः पहातां आपल्या कृतींवरून आपल्या अंगच्या त्या त्या गुणाची आपणांस काय, किंवा जनास काय, खरी परीक्षा होणें हीच व्यवहारदृष्ट्या श्रेयस्कर गोष्ट होय.[2]

---

1 " To be weak is the true misery."

या बाबत प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल म्हणतोः—

2 " And yet of your strength there is and can be no clear feeling, save by what you have prospered in, by what you have done. Between vague wavering capability and fixed indubitable performances, what a differance ? A certain in-articulate self-consciousness dwells dimly in us ; which only our works can render articulate and decisively discernible. Our works are the mirror where-in the spirit first sees its natural lineaments. Hence, too the folly of that impossible precept, know thyself;till it be translated into this partially possible one, know what thow canst work at—Carlyle's Sartor Resartus—The everlasting No."

मनुष्यास अशा तऱ्हेच्या मानसिक दौर्बल्याची जाणीव कां होत जावी, या गोष्टीचा विचार करतां एक कारण असें दिसून येतें कीं, त्याच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक शक्तींचा पूर्ण विकास झालेला नसतो. किंबहुना, आपणांस सर्वसाधारण विधान करणें झाल्यास असेंहि म्हणतां येईल कीं, तो आपल्यापुढें निरनिराळ्या शक्तींचा विकास करून घेण्याचें ध्येयहि ठेवीत असलेला दिसून येत नाहीं.[१]

असें ध्येय गांठण्यास त्यानें आपल्या श्रमाची व बुद्धींची पराकाष्ठा केली पाहिजे. आपल्या शक्ती सर्व एकवटून जेवढें साध्य करून घेतां येईल तेवढें मनुष्यानें साध्य करून घेतलेंच पाहिजे. व अशीच त्याची व्यवहारांत दृष्टि असावयास पाहिजे.

स्वध्येयविषयक ही दृष्टि मनुष्यानें एकदा मिळविल्यावर मग काय हवें ?"नर करणी करे तो नरका नारायण हो जाय"अशा तऱ्हेची कर्तुमकर्तुं शक्ति मनुष्यास प्राप्त होत असल्यास नवल नाहीं. या बाबत जीन् पॉल रेक्टर म्हणतोः[२]— "जी स्थिति प्राप्त करून घेण्याची तुमची इच्छा असेल ती तुम्हाला प्राप्त करून घेतां येते. चित्‌शक्तीचा पाठिंबा मिळाला असतां तुमच्या इच्छाशक्तीचा जोर इतका जोरावतो कीं जेव्हां जेव्हां खऱ्या भावानें व तीव्र इच्छेनें तुम्हास काय जें प्राप्त करून घ्यावयाचें असेल, तेव्हां तेव्हां तें तुमच्या हातांत येऊन पडतेंच."

(२) मनुष्याच्या व्यवहाराचें निरीक्षण करतां, आपणांस दृष्टोत्पत्तीस येतें कीं, इच्छाशक्तीनें आपल्या कुवृत्ति दाबून टाकण्याची व सुवृत्तींनां योग्य अवसर देण्याची संवय त्याच्या मनास हवी तशी असत नाहीं ! व दुःखाची

---

१ अशा तऱ्हेचें ध्येय मनुष्यानें ठेवण्याबाबत हंम्बोल्टचें वाक्य असें आहे.

1 "The aim of every man shall be to secure the highest and most harmonious development of his powers to a complete whole."

2 "What you wish to be, that you are, for, such is the force of our will joined to the supreme; that whenever we wish to be seriously and with a true intention, that we become."

गोष्ट ही कीं, त्याविषयींचें महत्त्व त्यास कांहीं वाटत नसतें, असाच आपला याबाबत आजचा अनुभव आहे खरा. त्याचा परिणाम अर्थात् तो अनिष्ट असणारच–आपणांस दिसून येतो कीं मानवी प्राणी सुवृत्तींनां थारा देत नसून कुवृत्तींचा मनसोक्त खेळ तो आज चालूं देत आहे! तेव्हां, इच्छाशक्तीचा दाब नाहींसा झाल्यावर षड्रिपूंचें वर्चस्व त्याच्यावर गाजून राहिल्यास आश्चर्य काय?

आतां, या ठिकाणीं असा एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे कीं, आपलें मन ताब्यांत रहाण्यासाठीं शिक्षणाचा कांहीं उपयोग होत असतोच कीं नाहीं? याचें उत्तर देणें झाल्यास बौद्धिक शिक्षणाचा इच्छाशक्तीशीं वाटतो तसा संबंध नाहीं. व आजचा अनुभव याच गोष्टीची साक्ष देत आहे कीं, पुष्कळांच्या बाबतींत बौद्धिक शिक्षणामुळें मनाची शक्ति वाढण्याऐवजीं तें कमकुवत होत असलेलें दिसून येत आहे. मग हा दोष बौद्धिक शिक्षणपद्धतीचा म्हणा वाटेल तर, पण या रोखठोख अनुभवाकडे काणाडोळा मात्र करून चालावयाचें नाहीं.सारांश, मन कह्यांत ठेवून त्याच्याकडून अवश्य ते व्यापार करवून घेण्याकरितां प्रथम आपण कुविचार दाबून टाकून सुविचारांच्या प्रेरणेप्रमाणें वागणूक ठेवण्यास झटलें पाहिजे. ह्मणजेच इच्छा–शक्तीवर आपला ताबा बसत जाणार. ह्मणूनच ज्यानें आपली इच्छा–शक्ती आपल्या ताब्यांत ठेवलेली आहे, तोच काय तो धीराचा–धैर्यशाली म्हणावयाचा!

(३) मनुष्याच्या आयुष्यक्रमांत टक्के–टोणपे खाण्याचे प्रसंग हे यावयाचेच. व अशा प्रसंगीं जर आपल्या मनानें कच खाल्ली–माघार घेतली तर आपली फटफजिती काय होत असते ती पुसूं नका. म्हणूनच गीतेंत दैवी संपत्तीचें वर्णन करतांना श्रीकृष्ण धृतिः किंवा धैर्य या गुणाचा उल्लेख करतात. इच्छाशक्तीनें आपल्या निरनिराळ्या वृत्तींचें नियमन करून त्यांचे व्यापार योग्य तऱ्हेनें चालविण्यास अंगीं जी शक्ति लागते, त्याच शक्तीला–गुणाला 'धृतिः' म्हणावयाचें. व्यवहारांत हा अर्थ आपण नेहमींच घेऊन चालतो, अशांतला प्रकार नाहीं. कांहीं विचार न करितां निःशंकपणें–बेपर्वाईनें एखाद्यानें कांहीं कृत्य केल्यास त्या कृत्यास आपण निर्भयपणाची–धडाडीची वागणूक असें सुद्धां म्हणतो. " Fearless" ह्या शब्दाचे अर्थ कॅंडी 'निर्भय, अभय, अभीरु, आशंक, बेपरवा असे देतो. इंग्रजीमधील 'Courage' हाच

शब्द धृतिः किंवा धैर्य असा अर्थ देतो. कँडी–Courageous या शब्दाचे अर्थ "शूर, हिम्मतदार, हिम्मती, हिम्मतीचा, हिम्मेदार, छातीदार, छातीचा असे देतो. सर्व अर्थ एकमेकांशीं पडताळून पाहतां आपण ग्राह्य मानलेल्या अर्थाचें वैशिष्टय काय व महत्त्व काय, किंबहुना व्यवहारशास्त्रदृष्ट्या हाच अर्थ अभिप्रेत आहे, हें कळून चुकणार आहे.

जगांत प्रस्तुत गुण आपल्या अंगीं नसेल तर आपल्या प्रतिभेचें–विद्वत्तेचें तेज फांकत नाहीं. म्हणूनच प्रसंग आला असतां आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर आपल्या हातून घेववेल तेवढी उडी कर्तव्यक्षेत्रांत टोकलीच पाहिजे, असाच मनुष्याचा बाणा व्यवहारांत हवा. याबाबत सिडने स्मिथ्चे विचार मननीय आहेत. तो म्हणतो:—[1]

"अंगीं धृति या गुणाचा थोडक्या का प्रमाणांत होईना, अभाव असल्यामुळें चांगल्या चांगल्या बुद्धीमत्तेचीं पुष्कळ माणसें जगास पारखी होऊन गेलेलीं आहेत. भीरुतेमुळें आज हजारों माणसें अंधाराच्या काळयाकुट्ट गर्तेत खिचपत पडून गेलेलीं आहेत. जर कां या माणसांनीं भ्याडपणाच्या दुर्गुणाचें पटल दूर सारुन धडाडीनें एकदा पहिला प्रयत्न केला असतां, तरीसुद्धां कीर्तीरुपी मंदिराचीं पुष्कळ दालनें त्यांनां पहातां आलीं असतीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, जगांत कांहीं तरी चांगली कामगिरी करुन दाखवावयाची झाली तर थंडी, वारा...म्हणा–अगर अडचणींनीं उत्पन्न केलेलीं संकटें म्हणा,

1 " A great deal of talent is lost in the world for the want of a little courage. Every day sends to their graves a number of obscure men, who have only remained in obscurity because their timidity has prevented them from making a first effort: and who, if they would have been induced to begin, would in all probability have gone great lengths in the career of fame. The fact is, that to do anything in this world worth doing, we must not stand back, shivering and thinking of the cold and danger, but jump in and scramble through as well as we can.—Sidney Smith.

त्यांची भीति न बाळगतां शक्य त्या धडाडीनें त्यांनीं आखाड्यांत उडी टाकून सुद्गन पार गेलें पाहिजे.

(४) आपल्या हातून एखादी चूक घडली असेल व ती कबूल करण्याचा प्रसंग आला असतां, ती कबूल करण्यामध्येंसुद्धा अशा प्रकारचें मनोधैर्य दृष्टोत्पत्तीस यावयास हवें. लॉर्ड रॉबर्टस्ची एक गोष्ट सांगतात कीं, तो खरेंच बोलत असे. व आपल्या हांतून एखादी चूक घडल्यास तो ती कबूल करण्यास तत्पर असे. पार्लमेंटच्या एका कमेटीपुढें एकदा त्याची साक्ष झाली. साक्ष देतां देतां चुकून एक असत्य विधान त्याच्या तोंडून बाहेर पडलें. मग त्याच्या ध्यानांत ही चूक आली. चूक किरकोळ असल्यामुळें त्याच्या मित्रांनीं 'कमेटीस कळविण्याचें कांहीं कारण नाहीं,' असाच आपला सल्ला दिला, पण रॉबर्टस्नें आपण साक्ष देतांना आपल्या तोंडून एक असत्य विधान बाहेर पडलें, अशा अर्थाचें एक पत्र कमेटीस पाठविलें !

न्या. तेलंगांची अशीच एक गोष्ट सांगतात कीं, सामाजिक सुधारक या नात्यानें त्यांनीं एक गोष्ट करावयास नको होती, ती त्यांच्या हातून घडली. लगेच वर्तमानपत्रांतून त्यांच्यावर टीकेचा भडिमारहि सुरू झाला. त्यांच्या स्नेह्यांनीं त्यांस आपला बचाव करण्याविषयीं सल्ला दिली; पण, त्यांनीं तसें करण्याचें नाकारलें, एवढेंच नव्हे तर आपल्या हातून अशी गोष्ट व्हावयास नको होती, अशीच त्यांनी कबूलीहि पण दिली !

आतां जगांत कित्येक कणिकनीतीचा उपयोग करीत असतात. महाभारता-मधील आदिपर्वांत अ. (१४०) कणिकनीति सांगितलेली आहे. त्यांत असा एक नियम दिलेला आहे कीं, 'जोंपर्यंत भीति दूर आहे, तोंपर्यंत भित्र्यासारखें तिचें निवारण करावें; परंतु, ती येऊन ठेपली असतां, न भितां तिच्याशीं झुंजावें. बेकननें महंमदची अशीच एक गोष्ट सांगितलेली आहे कीं ' मी एका टेकडीस बोलाविलें आहे, व ती आल्यावर तिच्यावर उभा राहून मी तुह्मांस उपदेश करीन.' सर्व लोक जमले, महंमदनें टेकडीस बोलाविलें ! पण ती येणार कशी ? लगेच, न लाजतां–न भीतां महंमदनें पुढील वाक्य उच्चारिलें कीं[1]

1 "If the hill will not come to Mahomet, Mahomet will go to the hill."

"जर टेकडी महंमदकडे येत नाहीं तर, महंमदच टेंकडीकडे जाईल, ह्मणजे झालें !" अशा तऱ्हेचा कणिकनीतीचा व्यवहार समाजांत थोडाबहुत पहाण्यांत येत नाहीं असें कोण ह्मणेल ? असो.

प्रस्तुत विषयाबाबत प्रत्येकानें पुढील गोष्टी ध्यानांत धरून व्यवहार करणें श्रेयस्कर होईल.

(अ) मनुष्याचा विचार किती जरी उदात्त असला तरी निवळ उदात्त विचार करणें हें ध्येय नसून तदनुसार कृति करणें हें त्याचें ध्येय असावें लागतें. तत्त्ववेत्ता कार्लाईल [1]म्हणतो:—

'मनुष्याचें अंतिम ध्येय म्हटलें ह्मणजे त्याची काय ती कृति होय. विचार–हेतु मग तो कितीजरी थोर असला तरी तो त्याचें ध्येय होऊं शकत नाहीं.' व्यवहारांत हॅम्लेटप्रमाणें नुसतें किंकर्तव्यतामूढ होऊन बसणें यांत काय शहाणपण आहे ? विचारानें–अर्थात् तो ठाम असला पाहिजे–ध्येयाची दिशा कळून येईल. पण नुसती दिशा कळणें व ध्येय हस्तगत करून टाकणें ह्मणजे आम्रफलाच्या गोडीची कल्पनेनें कल्पना बांधणें व तेंच प्रत्यक्ष चाखून पहाणें यामध्यें जेवढें अंतर असतें तेवढें अंतर ठेवण्यासारखें होय. ज्या इच्छेपासून फलाची निष्पत्ति होत नाहीं, ती इच्छा व फल–ध्येय यांची सांगड इच्छाशक्तीच्या[2] जोरावर घालीत रहाणें हेंच मानवी जीविताचें सार होय.

(आ) अमेरिकेचा तत्त्ववेत्ता इमर्सन [3]म्हणतो:–'सृष्टिदेवतेनें प्रत्येक इसमास अशा कांहीं शक्त्यांची जोड दिलेली असते कीं, त्यांच्यायोगें त्यास जगांत दुसऱ्यास असाध्य अशी करामत करून दाखवितां येते !' हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास प्रत्येक मानवी प्राण्याचें वैशिष्टय कांहीं ह्मणून असतेंच व तसें तें असलें पाहिजे असा ईश्वरी नियम दिसतो. सृष्ट पदार्थांत हें वैशिष्टय कसें राखिलें गेलें आहे, हें त्या त्या सृष्ट पदार्थांच्या

---

1 "The end of man is an Action, and not a thought, though it were the noblest.'

2 will power

3 "Nature arms each one with such facilities as enable him to do some feat impossible to any other."

गुणांचें निरीक्षण केलें असतां दिसून येणार आहे. व सर्व सृष्टींत हें विशिष्टत्व नांदलें आहे म्हणूनच तिच्यामध्यें नानाविधता व रमणीयता हे गुण दृष्टोत्पत्तीस येत आहेत. भगवान् सहस्ररश्मीचे किरण प्रखर तेज ओतीत असले तर, चंद्राचे आल्हाददायक किरण दुग्धप्राय चांदण्याची वृष्टीच करीत असतात. झुळझुळ वाहणारे ओढे, धों धों फोंफावणाऱ्या नद्या, पर्वतांच्या रांगा, उंच उंच गगनभेदी वृक्ष हे सर्व सृष्टपदार्थ सृष्टीच्या नियमांनुसार आपापलें वैशिष्ट्य राखीत असून निसर्गाला नितांत रमणीय करून टाकीत आहेत. पण बिचारा मानवप्राणी मात्र आपल्या भ्याड वृत्तींनें आपलें विशिष्टत्व घालवून टाकून विशिष्ट प्रकारची कामगिरी न बजावल्यानें समाजरूपी मंदिराच्या घोटीवदारपणांत ह्मणा-बाळसेदारपणांत ह्मणा, कमीपणा आणण्याच्या मार्गास लागलेला दिसून येत आहे. ईश्वरानें ज्या ज्या शक्त्यांची जोड त्यास दिलेली आहे, त्या त्या शक्त्यांच्या जोरावर त्यानें समाजविषयक विवक्षित कामगिरी करून आपलें 'स्वत्व' कां राखूं नये, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

आतां जगाच्या इतिहासांतील थोर थोर विभूतींचीं चरित्रें वाचलीं असतां आपणांस दिसून येईल कीं, त्या त्या विभूतींनीं समाजविषयक ह्मणा देशविषयक ह्मणा, विशिष्ट प्रकारची कामगिरी करून जगाच्या इतिहासांत आपलें 'स्वत्व' मागें राखून ठेवलेलें आहे. श्रीशिवाजीमहाराजांनीं गाय व ब्राह्मण यांचा बचाव करण्याकरितां आपलें सर्वस्व वेंचिलें तर, "प्रत्येक इंग्रजानें आपलें कर्तव्य बजावीत रहावे अशी इंग्लंड देशाची अपेक्षा आहे," हें महावाक्य आपल्या इतिहासांत कोरून ठेवून कर्तव्य कसें करावें याचा धडा आपल्या देशबांधवांकरितां घालून देण्याकरितांच जणूं नेल्सननें आपले प्राण खर्ची घातले! बुद्ध ह्मणा, महंमद पैगंबर ह्मणा, येशूख्रिस्त घ्या किंवा आपल्याकडील श्रीशंकराचार्यांपासून तों ज्ञानेश्वर–तुकारामापर्यंत संतमालिका घ्या, सर्वांनीं धैर्यानें आपल्या इच्छाशक्तीवर ताबा ठेऊन विवक्षित प्रकारची कामगिरी करून आपल्या समाजास नव्हे तर देशास–सर्व जगास उपकृत करून सोडलेलें आहे. थोर लोकांच्या चरित्रांच्या पारायणापासून स्वबुद्धीनुसार धैर्यानें कांहीं

1 Individuality.

2 'England expects every man to do his duty.'

तरी समाजविषयक कामगिरी करण्याचा धडा उचलला व तो गिरविला तरच प्रत्येकानें आपलें 'वैशिष्टय' राखलें असें म्हणतां येईल.

पण दुःखाची गोष्ट ही कीं, पुष्कळांस तशी बुद्धी होत नाहीं; ज्या कित्येकांस कर्मवशांत होते, त्यांच्या अंगीं मनोदौर्बल्य वास करीत असतें. म्हणून तदनुसार कृति त्यांच्या हांतून उतरत नसते. असा आजचा कटु अनुभव आहे.

(इ) मनोदौर्बल्याच्या रोगानें मनुष्यास एकदा पछाडल्यावर त्यास जगण्यांत 'राम' वाटेनासा होतो. कार्लाईलचा सार्टर रिझार्टस् (ठिगळयाशिंपी) म्हणून जो प्रख्यात कादंबरीवजा तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ आहे त्या ग्रंथांतील प्रो. टायफल्सड्राक् ही व्यक्ति घ्या; ही व्यक्ति काल्पनीक जरी असली तरी त्या व्यक्तीचें स्वभावचित्र रेखाटतांना कार्लाईनें एक प्रसंग असा दाखविलेला आहे कीं, एकदा त्यास मानसिक दौर्बल्यानें पछाडिलें, तेव्हां त्यास सर्व जग भयाण दिसूं लागलें. प्रो. टायफलसड्रॅाक अशा प्रकारच्या आपल्या कष्टमय स्थितीची मीमांसा करीतांना त्याच्या मनांत एक दिव्य विचार उदय पावला. त्या वेळीं कार्लाईलनें त्याच्या तोंडून पुढील बहारीची वाक्यें वदविलीं आहेत:—[१]

"मानसिक दौर्बल्याची" मीमांसा करतांना टायफल्स ड्राक् म्हणतो:—

---

1 What art thou afraid of? Wherefore, like a Coward, dost thou for ever pip and whimper, and go cowering and trembling? Despicable biped! What is the sum total of the worst that lies before thee? Death? Well, Death?......Hast thou not a heart; canst thou not suffer whatsoever it be; and as a child of freedom, though out cast, trample Tophet under thy feet, while it consumes thee? Let it come then; I will meet it and defy it!" And as I so thought, there rushed like a stream of fire over my soul; and I shook base fear away from me for ever. I was strong of unknown strength, a spirit almost a god.' Everlasting No; Sartar Resartus.

'तुला कशाचीरे इतकी भीति वाटत आहे ? एखाद्या भागुबाईप्रमाणें रडक्या आवाजांत बेसूर गाणें कां गात बसलेला आहेस ? आणि असा लपत छपत का रे चालतोस ? अरे बापड्या ! कल्पना कर कीं, जास्तींत जास्ती तुझें वाईट काय रे होईल ? तर मरण, परमावधीचे हाल, व मनुष्यप्राणी आणि सैतान यांचेकडून उगवला जाणारा तुझा सूड ! इतक्याच गोष्टी ना ? विचार कर; तुला अंतःकरण म्हणून कांहीं आहे कीं नाहीं ? मग तुला एवढ्या हालअपेष्टा सहन करतां कां येऊं नयेत ? विचार करून पाहिलें असतां स्वातंत्र्यरूपी देवतेचा पुत्रच तूं. जरी जगानें तुला झिडकारून टाकलें तरी हालअपेष्टांचा दरकार न करतां त्यांच्यावर (हाल अपेष्टांवर) थय थय नाचणें हेंच काम तुझें. मरणच ना ? येउदें कीं; त्याची तुला इतकी पर्वा काय म्हणून वाटावी ?' 'हा विचार माझ्या मनांत उत्पन्न झाला मात्र तोंच माझ्या आत्म्यांत तेजाची एक नवीन फुणगी जाऊन मिळाली ! व चमत्कार पहा कीं, माझी जी भीती होती ती कायमची पार पळून गेली ! व मला एक प्रकारचें तेज चढून देवदूत किंवा-प्रति ईश्वर मीच;अशीच माझी भावना होऊन बसली.'

हा उतारा देण्याचा उद्देश एवढाच कीं, टायफल्सड्रॉकप्रमाणेंच मनुष्यास या व्यवहारांत अशा तऱ्हेचे-भीतीचे-मनोदौर्बल्याचे अनेक प्रसंग येत असतात ! व मनुष्यप्राणी कधीं कधीं 'टायफल्स' प्रमाणें त्या कष्टमय स्थितीची मीमांसाहि पण करूं लागतो. पण पुष्कळांच्या बाबतींत तरी म्हणतां येईल कीं त्यांच्या हृदयाकाशांत अशा दिव्य स्फुल्लिंगाचा प्रकाश पडत नसतो ! ज्यांच्या हृदयांत त्याचा दैदिप्यमान प्रकाश पडतो, असे 'तुकोबा' सारखे पुरुष केव्हांहि महात्मेच होत. व अशाच माणसांची दृष्टि त्या दिव्य प्रकाशामुळें ऐहिक विषयांवरून पार उडून ईश्वरविषयक ज्ञानावर खिळून रहात असते. 'ठिगळ्या शिंपी' या ग्रंथांतील कार्लाईलचा महा सिद्धान्त पहाः—[1]

'इंद्रियजन्य सुखाचा त्याग करून ईश्वरावर अढळ निष्ठा ठेव-' हा सिद्धांत त्यांच्या मनांत बाणल्यामुळें त्यांच्या हातून कांहीं समाजविषयक कामगिरी होत असते. व तावून सुलाखून निघालेल्या अशा कर्मयोग्यांना कार्लाईलचा पुढील उपदेश फार बहारीचा वाटत असतोः—[2]

---

1 " Love not pleasure, Love God."

2 " Produce ; Produce ! Were it but the pitifullest infinitesimal fraction of a product,produce it in God's

'निर्माण कर; निर्माण कर! मग तें कार्य किती जरी क्षुल्लक असलें तरी ईश्वराच्या नांवानें करीत रहा. तुझ्या हांतून काय जें होणार तें एवढेंच. मग उशीर कां? आटप. तुझ्या आवांक्यांत जें कांहीं असेल तें (चटकन) पहा; व शक्तिसर्वस्व खर्च करून तें एकदा उरकून टाक! आयुष्य जोंपर्यंत आहे, तोंपर्यंतच तुझ्या हांतून काय तें होणार. कारण, एकदा मृत्यूची रात्र आल्यावर मग कोण काय कामगिरी करून दाखविणार!'

आपल्याकडील सुद्धां गीतेची शिकवण कशी आहे ती पाहाः—

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युद्धयस्व विगतज्वरः ॥

गीता ३–३०

अर्थः—अध्यात्मबुद्धीनें माझ्या ठायीं सर्व कर्मे अर्पण करून (फळाची) आशा व ममत्व सोडून तूं बिनदिक्कत युद्ध कर. या श्लोकांत 'युद्ध कर' म्हणून जें सांगितलें आहे तें विवक्षित प्रसंगाला उद्देशून म्हटलेलें आहे. वास्तविक पाहातां, कर्मयोग म्हणजे काय–व ज्ञानी मनुष्यानें कसें कर्म करीत राहिलें पाहिजे हीच गोष्ट–हीच शिकवण श्रीकृष्णानीं लोकांस या महाश्लोकाच्या द्वारा केल्याचें दिसून येणार. यावरून कार्लाईलच्या 'कर्मयोगा' ची शिकवण गीतेंतील निष्काम–'कर्मयोगा' च्या शिकवणीशीं कशी 'मिळती' आहे, हें स्पष्ट दिसून येणार आहे.

जगाच्या कटु अनुभवानें जें 'मनोदौर्बल्य' येत असतें, तें घालविण्याकरितां 'ईश्वरावर दृढ निष्ठा पाहिजे'हाच रामबाण उपाय आहे, वहें कंठरवानें आपल्या साधुसंतांनीं सांगून ठेवलेलें आहे. याबाबत तुकोबांचा एक अभंग आहेः—

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ।
दासा साह्य नारायण । होय रक्षिता आपण ।
नलगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ।
न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ॥

गोडबोले–गाथा ३५०५

---

name! It is the utmost thou hast in thee: Out with it, then. Up, up, whatsoever thy hand findeth to do, do it with thy whole might. work while it is called to-day; for the Night cometh where-in no man can work."

सारांश, महासाधुसंतांनीं सांगितलेला अशा तऱ्हेचा दिव्य संदेश मनावर आणून घेऊन—ईश्वरावर अढळ निष्ठा ठेवून मनावरील क्षुद्र दौर्बल्याचा पडदा जोरानें सारून टाकण्याचें मनुष्याचें काम आहे; व अशा तऱ्हेचें काम करून जगांत आल्यासारखें व पाठीमागें नांव राहील असें उद्दिष्ट ध्येय साध्य करून दाखवा; व जगण्यांत 'राम' आहे-ही गोष्ट जगाच्या निदर्शनास आणून द्या; येवढी सर्व महाराष्ट्रवासीयांस प्रेमपूर्वक विनंति आहे.'

प्रकरण नववें.

"आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः"

'उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥'

गीता ६–५.

अर्थः—' आपण होऊन आपला उद्धार करावा. आपण (च) आपल्या स्वतःचा नाश करून घेऊं नये. कारण, आपणच आपला बंधू व आपणच आपला शत्रू.)'

समाजांत कांहीं जणांचा, कांहीं जणांचाच कां ? पुष्कळ लोकांचा व्यवहार दुःखपर्यवसायी असाच आढळून येतो! त्यांचा व्यवहार=आंतबट्ट्याचाच व्यापार असें समीकरण मांडून दाखविलें असतां चालेल. त्यांनीं करावयाला जावें एक, व व्हावें भलतेंच! कोणत्याहि व्यवहारांत यश नाहीं तें नाहींच; परंतु जिवास त्रास मात्र ठरलेला! अशी त्यांच्या व्यवहाराची स्थिति झाल्यावर त्यांच्या जीवितांत आनंद तो काय रहाणार ?

अशा लोकांच्या व्यवहाराची मीमांसा करूं लागल्यास आपणांस स्थूल मानानें ज्या गोष्टी दिसून येतात त्या अशाः—

I Courage, brother, do not stumble,
Though the path be dark as night,
There is a star to guide the humble,
Trust in God and do the right.

Dr. Norman Macleod.

(१) पुष्कळ लोकांनीं कितीहि जरी परीक्षा देऊन विद्या कमावून ठेविलेली असली तरी त्यांनीं आपल्या अंगच्या गुणदोषांची छाननी करून स्वतःच्या स्वभावाची परीक्षा करून ठेवणें हें फार अगत्याचें आहे; व अशी स्वभाव-परीक्षा करून जर त्यांनीं अंगच्या निरनिराळ्या शक्तींचा ठाव अजमावून ठेविला नाहीं, तर ते लोक व्यवहारांत 'करंटे'च निघाल्यास आश्चर्य नाहीं. श्री समर्थ ह्मणतातः—

लोक नाना परीक्षा जाणती । अंतर परीक्षा नेणती ।
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥

दा० १२-२-२५.

ही अंतर परीक्षा न केल्यानें त्यांच्या व्यवहाराचें—जन्माचें मातेरें होऊन जातें,—ही गोष्ट मनुष्यानें ध्यानांत सदैव वागविणें चांगली. आपल्या समाजांतील लोकांची स्थिति हल्लीं तर शोचनीय होऊन बसलेली आहे खरी. कोणताहि धंदा ह्मणा, व्यवहार म्हणा,—जो करावयाचा—त्यास अवश्य लागणाऱ्या गुणांची जोड ईश्वरानें आपणांस दिलेली आहे किंवा नाहीं, याचा कांहीं विचार त्यांनीं करावयास नको काय? वकील घ्या, व्यापाऱ्यांकडे पहा, वैद्य घ्या, कितीसे लोक त्या धंद्याची आपणांस आवड आहे ह्मणून, तिकडे आपली बुद्धि चालते ह्मणून त्या त्या धंद्यास—व्यवहारास अवश्य लागणारे गुण आपल्या अंगीं आहेत ह्मणून त्या त्या धंद्यांत ह्मणा, व्यवहारांत ह्मणा, पडत असतात? एकाचा काका तूं अमूक विद्या शीक' ह्मणून सांगतो, तर दुसऱ्याचा मामा 'तूं अमूक व्यवहार कर' ह्मणून बजावीत असतो! आतां त्याचा काका काय—किंवा मामा काय "आपण त्याच्यावर लादत असलेल्या धंद्यास त्याची लायकी किती आहे—त्या व्यवहारास तो कितीसा निभेल'—या महत्त्वाच्या गोष्टींचा विचार त्यांच्याकडून जितका व्हावा तितका होत नसतो, असाच आपला आजचा अनुभव आहे! बरें; दुसऱ्यांनीं तो विचार कांहीं केला नाहीं तर आपण स्वतः स्वतःच्या हिताकरितां ह्मणून तो करावयास नको काय? योग्य तऱ्हेनें या बाबतींत विचार करून जर कित्येकांस आपल्या अंगीं अमूक धंद्याची पात्रता नाहीं ह्मणून, कळून चुकलें, तर त्यांनीं तसें स्पष्ट शब्दांत आपल्या वडीलधाऱ्या माणसांस सांगावयास नड ती काय? मुग्ध बसल्याचा परिणाम मात्र असा दिसून येतो कीं, आपल्या समाजांत कित्येकांचा व्यवहार ह्मणजे आंतबट्ट्याचा व्यापार असें उपरिनिर्दिष्ट समीकरण मांडून दाखवितां येईल.

(२) आतां दुसरें कांहीं असें असतात कीं, इतर लोक अमूक मार्गानें जातात ह्मणून, हेहि त्याच मार्गानें जाऊं लागतात; पण प्रश्न असा कीं, इतर जर खड्यांत पडत असतील, तर तुह्मी सुद्धां खड्ड्यांत पडणार कीं काय ? हा विचार ज्याचा त्यानें तरी करणें जरूर आहे. ज्या त्या कामांत 'परप्रत्ययनेय बुद्धिः' उपयोगी पडत नसते. मनुष्यानें स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय ठेविली पाहिजे तरच त्याचें जगांत निभणार, ही गोष्ट त्यानें सदैव ध्यानांत वागविलेली चांगली. या बाबतींत प्रसिद्ध तत्त्वज्ञानी सिनेका ह्मणतोः[1]—

'आपण शेळ्यामेंढ्यांप्रमाणें दुसऱ्यांच्या मार्गानें जाणें चांगलें नव्हे; सारासार बुद्धीनें आपला आपण काय तो विचार ठरवावा, हीच गोष्ट केव्हांहि श्रेयस्कर ठरणार.'

(३) वरील विवेचनावरून स्वतःची स्वतःनेंच परीक्षा करून आपल्या अंगच्या गुणदोषांचें चित्र काढून व शक्त्या अजमावून ठेवणें किती अगत्याचें आहे, हें कळून चुकणार आहे. स्वतःच्या दोषांकडे शक्य तितका काणाडोळा करण्याचीच प्रवृत्ति सर्वसाधारण मनुष्याची दिसून येते. पण ही प्रवृत्ति केव्हांहि अनिष्टच. आपल्या स्वभावांतील खोडी प्रयत्नपूर्वक काढून टाकण्याच्या मार्गास त्यानें लागलें पाहिजे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, अहंभावाच्या अनिवार बोकाळलेल्या प्रवृत्तीमुळें तो दोषरूपी-स्वभाव-वृक्षास उदक घालीत बसून त्या वृक्षाचा विस्तार करण्यांत रत असलेला दृष्टोत्पत्तीस येत आहे. अशा तऱ्हेच्या मनःप्रवृत्तीमुळेंच तो आपल्या अंगच्या गुणांचीच आपण होऊनच तारीफ करतो, आपले दोष उघडकीस न आणण्याची खबरदारी घेतो व कधींकधीं वडिलाच्या नांवावर आपला मोठेपणा मिरवून "मोठेपणा"ची हौस पुरवून घेत असतो. पण अशा 'मोठेपणा' मिरविणाऱ्या माणसाची गणना श्रीसमर्थांनीं 'मूर्खांतच' केलेली आहे. समर्थ म्हणतातः—

आपली आपण करी स्तुती। स्वदेशीं भोगी विपत्ति
सांगे वडिलांची कीर्ति। तो येक मूर्ख ॥

(दा० २-१-१-१२)

---

1 'Let us not therefore follow like sheep, but rather govern ourselves by reason than by other men's fashions'—seneca.

बायबलमध्यें सुद्धां असेंच सांगितलें आहे कीं[1]:—

'तुमची स्तुति स्वतः तुम्ही करूं नका; दुसरा माणूस ती करूं दे. परक्यानें स्तुति करावयाची. तुमची तुम्ही स्वमुखानें करावयाची नाहीं.'

(४) याबाबत एक सावधगिरीची सूचना करून ठेवावीशी वाटते कीं, दुसऱ्यांनीं आपल्या अंगच्या गुणांची ओतप्रोत स्तुति–खुशामत केली असतां, तिचा आपल्या स्वभावावर अनिष्ट परिणाम होऊं देतां कामा नये. बर्कनें म्हटलेलें आहेच कीं[2]:—

"खुशामतीनें खुशामत करणाराच्या व ती ज्याची केली जाते, त्याच्या, अशा दोघांच्याहि नीतीमत्तेचा ऱ्हास होत असतो !"

आपल्या गुणांची लोकांनीं स्तुती केली असतां त्या त्या गुणांची जोड ईश्वरानें आपणांस दिलेली आहे म्हणून मनानेंच ईश्वराचे आभार मानावे. आपल्या अंगीं गुण नसतांना व ढळढळीत दोष दिसत असतांना त्यांकडे काणा डोळा करून कांहीं लोक स्वार्थबुद्धीनें आपल्या दोषांवर गुणांचें पांघरूण घालीत बसतात. अशा प्रसंगीं जर आपल्या स्वभावाची मीमांसा आपण केलेली नसेल, तर त्यांच्या फासांतच आपण सांपडतो; ही गोष्ट ध्यानांत असल्यावर केव्हां आपल्यावर गुणांचा मिथ्या आरोप करण्यांत येतो, हें सहजच कळत असतें. बारीकसारीक दोष म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणें व्यवहारांत शहाणपणाचें ठरत नसतें ! जगांत आपण कित्येक माणसें पाहतोंच कीं नाहीं, ' कीं, ज्यांना दुसऱ्यांचें म्हणणें नेहमीं खरें वाटतें. कित्येकांना आपण 'सर्वज्ञ' म्हणून घमेंड असते. यामुळें व्यवहारांत ते पुष्कळ वेळां फशीं पडत असलेले दिसून येतात ग्रीसच्या इतिहासांत ज्या कित्येक संस्थांचा उल्लेख आहे, 'त्यांत डेल्फिक ऑरेकल्‌चा उल्लेख प्रामुख्यानें होत असतो. डेल्फिक ऑरेकल्‌ला एकानें चेष्टेनें विचारलें कीं, ग्रीस देशामध्यें सर्वांत शहाणा कोण आहे ? अपोलो देवानें सांगितलें कीं ' सॉक्रेटीस'. सॉक्रेटीसला अचंबा वाटला कीं, आपलेंच नांव देवानें घेतलें कसें ? मग त्यानें आपल्या गुण-

---

1 ' Let another man praise thee, and not thine own mouth; a stranger, and not thine own lips.' (Proverbs 27-2.)

2 ' Flattery corrupts both the receiver and the giver.'

दोषांची छाननी सुरू केली. गुणदोषांचें चित्र काढतां काढतां, त्या चित्रांत दोषरूपी डागच फार, असेंहि त्यास ठाम कळून आलें. मग, इतरांच्या स्वभावांशीं आपल्या स्वभावाची तुलना करून त्यानें पाहिलें असतां त्यास कळून चुकलें कीं, बाकीचे लोक आपणांस 'सर्वज्ञ' समजतात, तशी मात्र स्वतःबद्दलची आपली भावना नाहीं. कदाचित् या आपल्या गुणावरून देवानें आपणांस 'शहाणा' म्हणून संबोधिलें असेल.[१] या गोष्टीवरून कळून येईल कीं, स्वतःच्या गुणदोषांची छाननी स्वतःनें केली असतां मनुष्य व्यवहारांत फसत नाहीं!

(५) दुःखमय संसाराची मीमांसा करतां करतां आणखी एक गोष्ट दिसून येते कीं, मनुष्यास दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय असतां कामा नये. ही संवय एकदां अंगीं मुरल्यावर स्वतःचा कार्यभाग ठार झाला म्हणून समजावें. जगांत जें कांहीं कर्तव्य म्हणून करावयाचें असेल तें स्वतःचें स्वतःनेंच केलें पाहिजे. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्'–'मेलास तर स्वर्ग मिळेल, जगलास तर पृथ्वीवर राज्य भोगशील, हें भगवंताचें वचन आपल्या मनःफलकावर खोदून ठेवून तदनुसार आपल्या व्यवहाराची दिशा आंखून टाकणें ही गोष्ट समाजदृष्ट्या केव्हांहि श्रेयस्कर होय. समर्थांचें या बाबत वचन असें आहेः—"झिजल्यावांचुनी कीर्ति कैची। मान्यता नव्हे कीं फुकाची। जिकडे तिकडे होते ची ची अवलक्षणें॥ (दा. १९-३-२४) दुसऱ्या ठिकाणीं समर्थांचें वचन असें आहे कीः—

जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला। जो आपणचि कष्टत गेला। तोचि भला॥ (दा. १९-९-१६)

१ पारनॅसस पर्वतामध्यें एक डेल्फी नांवाची गुहा असून त्या गुहेमध्यें एक चीरकांडी होती. त्या चीरकांडीमधून घाण धूर येई. तो धूर एक पुजारीण हुंगत असे. तो धूर हुंगल्याबरोबर तिच्या तोंडून गाणीवजा शब्द बाहेर पडून भविष्यकालच्या ज्ञानाबद्दल लोकांस अंधुक कल्पना कांहींशी येई. आपापलें भविष्य जाणण्याबद्दल राजेरजवाड्यांपासून तो एखाद्या खेडवळापर्यंत मंडळी तेथें येत असत. व सर्वांची कल्पना ही कीं, अशा तऱ्हेनें बाहेर पडलेले शब्द म्हणजेच अपोलो देवाचे शब्द. व ह्या देवाचा सल्ला घेऊन राजकारणेंहि चालविलीं जात. इतकें या 'डेल्फिक ऑरेकल' नांवाच्या संस्थेचें ग्रीसमध्यें प्राचीन काळीं महत्त्व होतें.

हीं सर्व वचनें ध्यानांत वागवून संसारशकट हांकला तर समाजदृष्ट्या मनुष्याची सुस्थितीच रहाणार ही गोष्ट स्पष्ट आहे.

(६) व्यवहारांत कित्येक लोक असे भेटतात कीं, ते कांहीं करोत, त्यांचा कान सारखा दुसऱ्यांच्या शब्दांकडे आपला लागलेला ! त्यांची भावनाच अशी झालेली असते कीं, दुसरे आपल्याच व्यवहाराविषयीं बोलतात; ते आपलीच स्तुति–निंदा करीत बसलेले असतात; जणूं, त्यांचा व्यापार केवळ तुमचे गुणदोष काढीत बसण्याचा ! अशा लोकांची याप्रमाणें साशंक वृत्ति होऊन बसते. व्यवहारांत अशी साशंक वृत्ति होऊन बसल्यावर ती त्यांच्या प्रकृतीवर म्हणा, अगर लोकव्यवहारावर ह्मणा, अनिष्ट परिणाम केल्याशिवाय कशी राहील ? ह्मणून लोकव्यवहारांत तरी साशंकवृत्तीची धार मनुष्यानें बोथट करून ठेवलेली चांगली.[1]

(७) मनुष्याचें जीवित दुःखमय होण्यास आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. प्रकृतीची अनास्था हीच ती गोष्ट. बेपर्वाईनें म्हणा,

या बाबतींत हेल्प्सूचे विचार चांगले मननीय आहेत.

1 ‘A great deal of discomfort arises from over-sensitiveness about what people may say of you or your actions. This requires to be blunted. Consider whether any thing that you can do will have much connection with what they will say. And besides, it may be doubted whether they will say any thing at all about you. Many unhappy persons seem to imagine that they are always in an amphitheatre, with the assembled world as spectators; whereas, all the while, they are playing to empty benches. They fancy, too, that they form the particular theme of every passer by......Well, but suppose that it is no fancy; and that you really are the object of unmerited obloquy. What then! It has been well said, that in that case the abuse does not touch you, and if you are guiltless, it ought not hurt your feelings any more than if it were said of another person, with whom you are not even acquainted.’—*Helps.*

अगर बेफिकिरपणाच्या वागणुकीमुळें ह्मणा प्रकृतीची जोपासना उत्तम तऱ्हेनें जी करावयाची ती न केल्यानें तो आपल्या जीविताचा नाश करून टाकतो तो टाकतोंच ! पण, ज्या समाजाचा तो घटकावयव आहे त्या समाजाचाहि कमी जास्त प्रमाणांत नाश करण्यास तो कारणीभूत होत असतो ![१]

आजची आपल्या समाजाची स्थिति आपण ध्यानांत घेतल्यास आपणांस दिसून येईल कीं, कित्येक माणसें गाढी विद्वान्, कर्तृत्ववान, उत्साहपूर्ण असूनहि केवळ प्रकृतिविषयीं बेफिकीरपणा दाखवीत राहिल्यानें जगास अकालींच 'राम राम' ठोकीत असतात. क्षितिजावर तारा चमकावयास लागावा व लगेंच तो मावळून जगतावर काळेंकुट्ट वस्त्र काळानें घालावें, अशी स्थिति ज्या देशाची होत जाईल, त्या देशाचें डोकें वर निघावें कसें ? हा विचार करण्यासारखा प्रश्न नाहीं, असें विधान समंजस मनुष्य तरी करणार नाहीं ! देशाची काय ती मदार तरुणावर, व जर तरुणांनींच सामाजिक कर्तव्यें न बजावतां अकालींच परलोकाची वाट धरण्याचें मनांत आणिलें तर देशाची सुस्थिति रहाणार नाहीं.[२]

---

१ एडिन्बरो युनिव्हर्सिटीमध्यें Rector 'रेक्टर' या नात्यानें कार्लाईलचें विद्यार्थ्यांसमोर झालेलें भाषण सुंदर आहे. त्यांत शरीरप्रकृतिसंबंधीं त्याचे विचार मननीय आहेत. ते असेः—

1 "I have no doubt you have among you young souls ardently bent to consider life cheap, for the purpose of getting forward in what they are aiming at of high; but you are to consider throughout, much more than is done at present, and what it would have been a very great thing for me if I had been able to consider, *that health is a thing to be attended to acontinually; that you are to regard that as the very highest of all temporal things for you.* There is no kind of achievement you could make in the world that is equal to perfect health. What to it are nuggets and millions? The French financier said "why is there no sleep to be sold!" Sleep was not in the market at any quotation."

2 Sir Surendranath Banerjea observes :—

मोर्लेचें एक वाक्य आहे:[१]—

"'आशेच्याच किरणांनीं चमकणाऱ्या कालाची काय ती मदार तरुणांवर असते. कारण, फलसाफल्याचें गाठोडें हस्तगत करून घेण्याचें काम काय तें त्यांचेंच." तसेंच, 'खरा मुसलमान कोण' यासंबंधीं चर्चा करतांना महंमद पैगंबरनें असेंच सांगितलेलें आहे कीं, जो मनुष्य आपल्या शरीरप्रकृतीची काळजीनें जोपासना करीत राहून सर्व शरीरावर आपला ताबा गाजवितो तोच खरा मुसलमानी धर्माचा अनुयायी ह्मणावयाचा.असो. तेव्हां या बाबतींत आपल्या समाजांतील तरुणांनीं तरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, सृष्टिदेवतेनें शरीरविषयक जे जे नियम घालून ठेविलेले आहेत, ते ते पाळण्याची खबरदारी मनुष्यानें घेतली पाहिजे. शरीरप्रकृतीसंबंधीं अवश्य गोष्टी पाळावयाच्या त्याः—(१) स्वच्छता, (२) खाद्यपेयाविषयीं नियमितपणा, (३) नित्याचा व्यायाम, (४) व टापटिपीची वागणूक.

व्हिक्टर ह्यूगो ह्मणतोः—[२]

"I have endeavoured in life to carry out the principle that the preservation of health is our first and foremost duty; everything else depends upon it. The machine must be kept fit and in a high degree of efficiency before it can do its work properly. Our best men, with a few exceptions, have nearly all died early, Ram Mohun Roy, Keshub Chunder Sen, Kristo Das Pal, Ram Gopal Ghose, and others died in the prime of life. They exemplified the old Latin proverb: "Those whom the Gods love die young." What a gain it would have been; if they had been spared longer to guide and lead their country men with their ripe judgment and experience." Page 392—. 'A nation in Making.'

1 An age touched by the spirit of hope inevitably turns to the young, for with the young lies fulfilment.

2 'To rise at six, to dine at ten,
To sup at six, to sleep at ten,
Makes a man live to ten times ten.'

"सहा वाजतां सकाळीं निजून उठत चला; दहा वाजतां दिवसाचें मुख्य जेवण घेत चला. रात्रीचें जेवण पुनः सहा वाजतां घेऊन दहा वाजतां रात्रीं निजत जा. असा क्रम ठेवल्यानें तुह्मीं शंभर वर्षें जगाल." या अवतरणांत आपल्या रहाटीस जुळण्यासारख्या कांहीं गोष्टी नाहींत हें खरें. तथापि आपल्या देशाचारास व विविक्षित प्रांतांतील हवामानास जुळतील असे इष्टबदल करून प्रत्येकानें प्रकृतीची जोपासना करणें जरूर आहे. ग्लॅडस्टन्‌ची प्रकृति चांगली असण्याचें कारण असें सांगितलेंलें आहे कीं, तो प्रत्येक घांस पंचवीस वेळां चावून चावून खात असे. सारांश, आपल्या समाजांतील तरुणांनीं प्रकृतीच्या बाबतींत सर्व नियम कडक रीतीनें पाळून प्रकृतिस्वास्थ्य कमावून सामाजिक कर्तव्यें जर बजावलीं तरच त्यांनीं आपल्यावरील जबाबदारी उत्कृष्टपणें पार पाडली असें ह्मणतां येईल.

येथवर मनुष्याचा व्यवहार–संसार दुःखमय होण्याचीं कारणें कोणतीं, याविषयींचा स्थूल मानानें विचार झाला.

आतां जगांत मनुष्याच्या व्यवहार करण्याच्या तऱ्हेचें निरीक्षण केल्यास दिसून येईल कीं, त्याची परमार्थाची इमारत ऐहिक व्यवहाराच्या भरभक्कम पायावर उभारलेली दिसून येत नाहीं. परमार्थ तो परमार्थ; व्यवहार तो व्यवहार, अशीच दोन्हीमध्यें फारकत असलेली दृष्टोत्पत्तीस येते. ही स्थिति चांगली नव्हे. व्यवहारद्वारा परमार्थ साधण्याची कला मनुष्यानें कमाविली पाहिजे. हीच गोष्ट आणखी स्पष्टपणें सांगावयाची झाल्यास मानवी व्यवहारास 'परमेश्वराचें अधिष्ठान पाहिजे.'

प्रस्तुत प्रश्नाबाबत आणखी एका मुद्याचा विचार करून मग परमार्थाची इमारत ऐहिक व्यवहाराच्या भरभक्कम पायावर कशी उभारली जात असते याविषयीं विचार करूं.

श्रीसमर्थांनीं दासबोधांत ह्मटलें आहे कीं:—

संसार सुखें करावा। परी कांहीं परमार्थ वाढवावा।
परमार्थ अवघाच बुडवावा। हें विहित नव्हे॥

समर्थांच्या या वचनाचा रोख असा दिसतो कीं, संसार व परमार्थ वस्तुतः भिन्न ह्मणून संसार करताना माणसाची दृष्टि परमेश्वराकडे–परमार्थाकडे हवी-किंबहुना परमार्थ हा स्वतंत्रपणें केला पाहिजे. पण हल्लींच्या गीतारहस्याच्या

युगांत ही शिकवण मानवणार नाहीं! व्यवहारांतील कर्मद्वारा परमार्थ वाढविला पाहिजे. परमार्थ व व्यवहार यांची वस्तुतः फारकत नाहीं हें आपल्या आचरणानें सिद्ध करून दाखविण्याचा हा काळ आहे. ही गोष्ट ध्यानांत वागवून तरुणांनीं व्यवहाराचा गाडा चालविणें इष्ट होईल.

(१) आतां व्यवहारशास्त्रांत मनुष्यानें पक्का आशावादी बनलें पाहिजे. मनुष्याचें जीवित विचार करितां आशेच्या भरभक्कम पायावर उभारलेलें असतें. आशेचे किरण जोपावेतों मनुष्याच्या पुढें चमकत आहेत, तोपर्यंतच त्याच्या जगण्यांत तथ्यांश असतो. या अफाट जगांत त्याला हे किरण जर न दिसतील तर तें अर्थात्च त्यास अंधःकारमय–ह्मणून भयाण वाटणार! जेथें तेथें सृष्टिदेवतेनें आशेचे अंकूर जगांत विखरून ठेवलेले आहेत, अशीच त्याची भावना असली पाहिजे. मगच कालांतरानें ह्या अंकुराचे जोमानें वृक्ष फोंफावून त्यांस मधुर वासाचीं सुमनें येणार व मनुष्यप्राणी तीं खुडत रहाणार! कार्लाईलनें सार्टर रिझार्टस्मध्यें म्हटलेलें आहेः—[१]

'खरें बोलावयाचें झालें तर, मानवी जीविताचा पाया आशा ही होय. आशेखेरीज दुसरी मौल्यवान् ठेव मनुष्यप्राण्याजवळ दुसरी कोणती नसते.'

(२) आतां हीं आशारूपी वृक्षांचीं सुमनें खुडण्यास ईश्वरानें मनुष्यप्राण्यास विविक्षित परिस्थितीची, बुद्धीची जोड देऊन ठेविलेली असते. अर्थातच हीं सुमनें ज्याच्या त्याच्या परिस्थित्यनुसार व बुद्धिनुसार निरनिराळीं असणार हें उघड आहे. तेव्हां आपली परिस्थिति काय, व आपल्या अंगीं ईश्वरानें कोणत्या शाखेंतली बुद्धि देऊन ठेविलेली आहे, या गोष्टीचा छडा त्यानें तरुणपणांतच लावून टाकला तरच त्याच्या हातून समाजविषयक कामगिरीची सुवासिक फुलें खुडलीं जाणार, हें उघड आहे. आतां, कार्यक्षेत्र ईश्वरानें आपणांस हवें तेवढें देऊन ठेविलेलें आहे, व ईश्वराची अनुज्ञाच अशी आहे कीं, 'मानवी प्राण्या, आपलें कर्तव्य वजाव.'[२]

---

1 'Man is properly speaking based upon Hope, he has no other possession but hope; this world of his is emphatically the place of Hope.'

२ हेच विचार कार्लाईलनें जास्ती खुलवून 'सार्टर रिसार्टसमध्यें' घातलेले आहेतः–'Not what I have, but what I do is my kingdom.

(३) याप्रमाणें आपल्या अंगीं कोणत्या व्यवहाराची–धंद्याची पात्रता आहे व आपली परिस्थिति काय आहे, या प्राथमिक गोष्टींची मीमांसा करून तत्संबंधीं ठाम ज्ञान झालें म्हणजे दुसरी महत्त्वाची गोष्ट 'ईश्वरावरील अढळ निष्ठा हीच होय. सर्व सामान्य व्यवहारांत ईश्वरावरील अढळ श्रद्धेचा पाठिंबा असला ह्मणजे 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ' (गीता २-३९)–ह्मणजे काय याविषयींचें ज्ञान मिळतें, व हें ज्ञान प्राप्त झालें असतां अर्थातच मानसिक स्वास्थ्यांत बिघाड होत नाहीं. गीतेंत ह्मटलें आहे कीं:—

श्रद्धावाल्लँभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥

(गीता ४-३९)

अर्थः—'जो श्रद्धावान् पुरुष इंद्रियसंयमन करून या ज्ञानाच्या पाठीमागें लागला, त्यालाहि मिळतें आणि ज्ञान प्राप्त झालें ह्मणजे लागलीच त्याला परमशांति प्राप्त होते.

म्हणूनच व्यवहारांत ईश्वराचें अधिष्ठान असलें ह्मणजे माणसाच्या हांतून मोठमोठ्या कामगिऱ्या धडाडीनें उठत असतात. व पुष्कळ प्रसंगीं ऐहिक सुखांत भर घालून पारमार्थिक सुखाचा पाया घालून त्यावर परार्थाची इमारत

To each is given a certain inward Talent, a certain outward Environment of Fortune; to each, by wisest combination of these two, a certain maximum of capacity. But the hardest problem were ever this first: To find by study of yourself, and of the ground you stand on, what your combined inward and outward capability specially is. For, alas, our young soul is all budding with capabilities, and we see not yet which is the main and true one... Thus in a whole imbroglio of capabilities, we go stupidly groping about, to grope which is ours, and often clutch the wrong one: in this mad work must several years of our small turn be spent, till the pur blind youth, by practice, acquire notions of distance, and become a seeing man.'

उठविण्यास परमेश्वरावरील दृढ श्रद्धाच कारणीभूत होत असल्याचें दिसून येईल. सारांश, मनुष्यांच्या यचावत् व्यापारांत ईश्वरी श्रद्धेचा धागा गोंविला गेला पाहिजे. म्हणजेच जगांतील हाल अपेष्टेचा कटु अनुभव कितीहि तीव्रतेनें आला, तरी त्याचें त्यास कांहींच वाटत नाहीं. या बाबत कार्लाईल म्हणतो:—[1]

'मनुष्याची सुस्थिति रहाण्यास श्रद्धा ह्या एकाच गोष्टीची अवश्यकता असते. नाहींपेक्षां स्वमताचे प्रसारार्थ म्हणा किंवा धर्माकरितां म्हणा, दुर्बल माणसें सुद्धां श्रद्धेच्या जोराशिवाय लोकापवाद काय किंवा मरण काय आनंदानें पत्करण्यास कशी तयार होतील ?'

(४) आपल्या सर्व व्यवहाराची उभारणी 'सत्यावरच' प्रस्थापित केलेली असावयास पाहिजे. प्राण गेला तरी बेहत्तर ! पण, सत्याची कांस मी सोडणार नाहीं, असाच व्यवहारांत मनुष्याचा बाणा हवा. 'सत्यच' शाश्वतवस्तु; बाकी सर्व असत्य–मिथ्या–माया म्हणून त्याज्य, हा सिद्धान्त मनःफलकावर कोरून ठेवणें जरूर आहे.

(५) 'ईश्वरावर निष्ठा' व सत्य यांच्या जोरावरच मनुष्यानें मनुष्यपण गाजविण्याकरितां कां होईना, आपल्यापुढें कांहीं सात्विक ध्येय ठेवलें पाहिजे. अर्थात् हें ध्येय परार्थ साधून देण्याकरितां म्हणा, किंवा लोकसंग्रहार्थ म्हणा, असलें पाहिजे व तें साध्य करून घेण्याकरितां हालअपेष्टांचे तडाखे न जुमानतां त्यानें आटोकाट प्रयत्न करणें जरूर आहे. नाहींपेक्षां ध्येय आंखावयाचें व संकटें आलीं असतां कच खाऊन तें सोडावयाचें, अशी 'आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः' वृत्ति पत्करणें ही भागुबाईची कामगिरी होय. याबाबत कार्लाईलचें वाक्य[2] पहा:—

ध्येय म्हटलेंस, तर तें साध्य करून घेण्याचें तुझ्या हातांत आहे; बरें, अडथळे आणणें हीहि गोष्ट तुझ्या स्वाधीनची आहे. तुझी परिस्थिति ही जणूं सामुग्री

---

1 'For man's well-being, faith is properly the one thing needful; How with it, martyrs, otherwise weak, can cheerfully endure the shame and the cross.'

2 'The Ideal is in thyself, the impediment too is in thyself; thy condition is but the stuff thou art to shape that same ideal out of.

असून या सामुग्रीचेंच ध्येयरूपी उत्तम खाद्य बनविण्याचें काम्हि तुझेंच ! दुसरें ठिकाणीं तो असें म्हणतो:—[1]

"अमेरिकाखंड येथेंच आहे असें तूं म्हटलेंस तर तें येथेंच आहे; नाहीं म्हणावयास लागलास तर तें कोठेंच नाहीं !"

सारांश, आतांपर्यंतच्या विवेचनावरून लक्षांत आलें असेलच कीं, आपली उन्नति करून घेणारे आपणच; अवनतीलाहि कारण आपणच; दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास 'आपले मित्र आपण व आपले शत्रू आपणच'–ह्या सिद्धान्ताची खूणगांठ मनाशीं बांधून व्यवहार करा, व संसार 'असार' नाहीं, ही गोष्ट सिद्ध करून द्या; येवढीच मराहाष्ट्रवासीयांस विज्ञप्ति आहे.

प्रकरण दहावें.

'व्यवहारतः सद्बुद्धीची जोड अवश्य असावयास पाहिजे.'

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुणएवच ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्योमे भक्तः स मे प्रियः ॥

(गीता १२-१३,-१४.)

अर्थः—'कोणाचा द्वेष न करणारा, सर्व भूतांशीं मित्रभावानें वागणारा, तसाच कृपाळू, ज्याची ममत्वबुद्धि व अहंकार सुटलीं, ज्याला सुख व दुःख सम झालीं, व जो क्षमावान्, सदा संतुष्ट, संयमी, दृढनिश्चयीं, ज्यानें आपलें मन व बुद्धि मला वाहिलीं, असा जो माझा योगी भक्त तो मला प्रिय होय.' (१४)

जगांत चाललेल्या व्यवहाराची मीमांसा केली असतां एक गोष्ट दिसून येणार आहे कीं, मनुष्याची बुद्धि खोटी होत चाललेली आहे. अर्थातूच असत्बुद्धीनें प्रेरित झालेला व्यवहार खोटा असल्यास नवल काय ? वस्तुतः पहातां मनुष्यानें सद्बुद्धीची कांस धरून सद्व्यवहार करीत रहाण्यांतच त्याचा

---

1 Your America is here or no where.'

थोरपणा म्हणा,–मनुष्यपणा दिसून येणार आहे. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, त्याच्यावर स्वार्थबुद्धीचा पगडा अतोनात बसला म्हणजे त्याची बुद्धि नष्ट होऊन जात असते. व याचा अनिष्ट परिणाम मात्र असा होतो कीं, लोकांचें बरें असावें, त्यांचें कल्याण व्हावें, आपल्या हांतून होण्याजोगा जेवढा असेल तेवढा तरी दुसऱ्यावर उपकार व्हावा, वगैरे विचार, त्याच्या मनास शिवत देखील नाहींत ! मनुष्याची अशी बुद्धि झाल्यावर त्याची परमावधीची अवनतीच झाली म्हणावयाची ! 'मनुष्यपणा'स तो पारखा होऊन बसल्यामुळें त्याचा व्यवहार म्हणजे नीतीमत्या कवडीमोलाचा व्यापार होऊन रहातो ! तेव्हां, मनुष्यानें सद्बुद्धीची कांस कां धरूं नये ? बेपर्वाईनें त्यानें आपला व्यवहार कवडीमोलाचा कां करून सोडावा, व्यवहारास सद्-बुद्धीची जोड कशी अवश्य आहे...वगैरे गोष्टींविषयींची चर्चा केली असतां इष्टापत्तीच होणार आहे, या हेतूनें प्रस्तुत विषय हातीं घेतला आहे.

कोणत्याहि काळीं वाटेल त्या समाजांत सद्बुद्धीचीं माणसें देशास ललाम-भूतच होत. मानवी नीतीमत्तेचें मंदिर सद्बुद्धीच्या उत्कृष्ट सुवासानें दरवळून जाऊन त्या मंदिरांतील पवित्र वातावरणांत जो मनुष्य येईल त्याच्या मनांत त्या मंदिरांतील अधिष्ठात्री अशा मानवरूपी पवित्र मूर्तीविषयीं पूज्य भावना उत्पन्न झाल्याखेरीज कशी राहील ? अर्थात् अशा पवित्र माणसाच्या नीतीमत्तेचा डोलारा पोकळ नसून तो खंबीरच असतो हें उघड आहे.

आतां, सद्बुद्धीच्या माणसांची निपज विरळ विरळ होत चालल्याचें कारण काय ! या विचारणीय प्रश्नाची चिकित्सा केली असतां नुकतेंच सांगितल्या-प्रमाणें स्वार्थरूपी सैतानाची समाजांतील लोकांवर दिवसेंदिवस मगरमिठी जोरानें बसत चाललेली आहे, हें दिसून येईल. अशा स्वार्थपूर्ण वृत्तीच्या लोकांच्या व्यवहाराची मीमांसा करून मनुष्य प्राण्याचे भर्तृहरीनें चार गट केलेले आहेतः—

एके सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान् परित्यज्य ये ।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाऽविरोधेन ये ।
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये ।
ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥

(१) आपला फायदा सोडून देऊन जे लोकांचें कल्याण करितात, तेच खरे सत्पुरुष म्हणावयाचे;

(२) स्वार्थ न सोडतां लोकांसाठीं झटणारे पुरुष सामान्य होत;

(३) आपल्या फायद्यासाठीं लोकांचें नुकसान करणारे पुरुष, मनुष्यप्राणी नसून ते राक्षस समजले पाहिजेत.

(४) परंतु, यापलीकडच्या म्हणजे लोकहिताचा निरर्थक नाश करणाऱ्या मनुष्यांस काय नांव द्यावें तें आम्हांस कळत नाहीं. भर्तृहरीनें सद्बुद्धीचीच कसोटी मनुष्यप्राण्यास लावून त्याच्या व्यवहाराची मीमांसा करून त्याचे वरीलप्रमाणें वर्ग पाडल्याचें दिसून येणार आहे. निवळ सद्बुद्धींनें प्रेरीत होऊन कायावाचामनेंकरून झटणाऱ्यांची कोटी केव्हांहि व्यावहारिक योग्याची उच्चतम कोटी होय. स्वार्थ तर सोडावयाचा नाहीं व परार्थ साधून देणें शक्य असल्यास तो साधून द्यावयाचा, अशा दोन्ही डिगरीवर हात ठेवून व्यवहार करणाऱ्या माणसांमध्यें विशेष कांहीं नाहीं, म्हणूनच ते सामान्य वर्गांतील होत. ज्यांच्या अंगीं सद्बुद्धीचा लेश वसत नसून निवळ स्वार्थावर काकदृष्टी ठेवून लोकांचे गळे कापीत रहाणारे ते राक्षस. परंतु, स्वार्थाची गोष्ट तर बाजूलाच राहूंद्या, पण दुसऱ्याचें बरें होत आहे, त्याचा बोलबाला चहूंकडे चांगल्या तऱ्हेनें होऊं लागलेला आहे, एवढें पाहिलें असतां ज्यांच्या पोटांत दुखूं लागतें व जे त्याचा पाय मागें खेचूं लागतात, अशा माणसांची कोटी कोणती ठरवावयाची ही गोष्ट ब्रह्मदेवानें त्यांनां निर्माण केलें आहे म्हणून, त्याच्याकडे सोपविणें सोयीचें होणार आहे.

हल्लींच्या व्यापारी-युगांत तर या स्वार्थरूपी सैतानाचा अंमल इतका जोरावलेला दिसून येत आहे कीं, ज्याला त्याला स्वतःचा फायदा-स्वतःची बाजू याखेरीज कांहीं दिसेनासें झालेलें आहे. स्वार्थपूर्ण विषयांमध्यें तो मग्न होऊन जात असून स्वतःच्याच नाशास आपला आपणच कसा कारणीभूत होऊन तो बसत आहे हें पुढील गीतावचनांवरून उघड होणार आहे:—

१ ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते।
संगात्संजायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते॥
२ क्रोधाद्भवति संमोहः समोहात्स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद्‌बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति॥
(गीता २-६२, ६३.)

गीता, २–६२ अर्थः—विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाचा सदर विषयांचे ठिकाणीं संग वाढत जातो. या संगापासून पुढें कामवासना उत्पन्न होते; कामापासून क्रोध उत्पन्न होतो.

गीता, २-६३ अर्थः—क्रोधापासून संमोह-अविवेक उत्पन्न होतो; संमोहापासून स्मृतिभ्रम, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश, आणि बुद्धिनाशा-पासून सर्वनाश होतो!

म्हणूनच या स्वार्थरूपी मायेची मोहनी अशी जबर आहे कीं, मनुष्य कितीहि शहाणा असो, विद्वान असो; त्याच्यापुढें ही माया आली म्हणजे त्याची गाळण उडालीच म्हणून समजावें. महाभारतांत म्हटलें आहे कीं:—

स्वार्थे सर्वे विमुह्यन्ति येऽपि धर्मविदोजनाः।

महा. भा. वि. ५१–४.

'स्वार्थाचा प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहिलेला असला म्हणजे धर्म जाणणाऱ्या माणसांनां सुद्धा मोह पडत असतो.' या वचनावरून स्पष्टपणें कळून येणार आहे कीं, मनुष्यानें सद्‌बुद्धि सदा जागृत ठेऊन स्वार्थ-विषयक गोष्टी मागें सारल्या तरच त्याची नीतीमत्ता शाबूद रहाण्याची आशा. नीतीमत्ता खंबीर राखावयाची असेल तर सद्‌बुद्धीनें प्रेरित होऊन सद्वासनांचा परिपोष करून आपलीं कर्तव्यें बजावीत राहून स्वार्थाचा नाश करून टाकावा लागत असतो. दुसऱ्या शब्दांत हीच गोष्ट स्पष्टपणें सांगावयाची झाल्यास असें ह्मणतां येईल कीं, स्वार्थबुद्धीची हाकालपट्टी करण्याकरितां परार्थबुद्धीस कवटाळून तिची जोपासना करीत राहिलें पाहिजे.

या बाबतींत असा एक प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे कीं, "काय हो, व्यवहारांत स्वार्थ तर पाहिलाच पाहिजे; त्याशिवाय माणसाचें चालावयाचें कसें? तुह्मी तर परार्थबुद्धीचीच महती गात बसलां आहांत; दुसऱ्याच्या कल्याणाकरितां आपण तरी सद्‌बुद्धि कां ह्मणून धरावी?" या प्रश्नाचे स्वाभविकपणें दोन भाग पडतात; पहिला भाग असा–स्वार्थबुद्धि धरल्याशिवाय माणसाचें जगांत कांहीं चालणार नाहीं हा; व दुसरा असा कीं दुसऱ्याविषयीं सद्‌बुद्धि धरण्याचें प्रयोजन काय? यापैकीं पहिल्या भागाचें निरसन असें करतां येतें कीं, मनुष्यप्राणी आणि इतर जीवसृष्टि यांमध्यें ईश्वरानें निसर्गतःच फरक असा ठेवलेला आहे कीं, सद्‌बुद्धीच्या जोरावर परार्थ साधून

देण्याची शक्ति एकट्या मनुष्यप्राण्यांतच आहे. यांतच त्याचें काय तें वैशिष्ट्य. आतां मनुष्यप्राण्यास काय, किंवा पशुपक्षांस काय, स्वार्थ बुद्धि लागू असली तरी केवळ स्वार्थपूर्ण वृत्तीनें प्रेरीत होऊन मनुष्यानें आपला व्यवहार करणें ह्मणजे स्वतःस नीच कोटींतील प्राण्याच्या पंक्तीला नेऊन बसविण्यासारखें आहे! 'आहारनिद्राभयमैथुनंच' या चतुष्टयीचा मंत्र घोकण्यास मनुष्यत्वच काय करावयाचें? या मंत्राचा नित्य पाठ पशुपक्षांनीं इहलोकीं नित्य गिरविण्याचा विडा ईश्वराच्या दरबारांत उचलिला आहेच. पण मनुष्यप्राण्याच्या बाबतींत ईश्वरी योजना मात्र अशी कीं, सारासार बुद्धीच्या सहाय्यानें मनुष्यानें स्वार्थबुद्धीस फांटा देऊन परार्थ साध्य करून देण्यांतच त्यानें आपलें 'मनुष्यत्व' गाजवून दाखवावें; व ही शूरपणाची कृति त्यानें करून दाखविल्यास त्या योजनेचें साफल्य झालें, असें ह्मणतां येणार आहे.

आतां दुसऱ्या भागाच्या आक्षेपाचें निरसन असें होतें कीं, सद्बुद्धीच्या जोरावर परार्थाकरितां ह्मणून जो मनुष्य झटतो तो एक प्रकारचा स्वार्थच साधण्याकरितां म्हणून झटत असतो असें दिसून येणार आहे. आतां हा स्वार्थ मात्र निराळा; त्यास नांव देणें झाल्यास त्यास (लोकमान्य टिळकांनीं ह्मटल्याप्रमाणें) उदात्त स्वार्थ[1] ह्मणतां येइल. परार्थ साधून देण्यांत आपणांस सात्विक आनंद वाटत असतोच कीं नाहीं? हा तरी 'आनंद' प्राप्त करून घेणें म्हणजे एक प्रकारचा स्वार्थच साधून घेण्यासारखें नाहीं काय? पण हा स्वार्थ व्यावहारिक स्वरूपाचा नसल्यामुळें त्यास जगांत 'स्वार्थ' म्हणून म्हणत नाहींत. पण या सात्त्विक स्वरूपाचा 'स्वार्थ'-मोक्ष साध्य करून घेण्याकरितां नामदेव व तुकारामादि संतांना झटावें लागलेंच ना? म्हणूनच व्यवहारांत सद् बुद्धीस जागृत राहून सद्वासनांचा परिपोष करून समाज-विषयक कर्तव्यें बजावून मनुष्य अध्यात्मांतील आनंदाचा मधुर आस्वाद घेत असतो-हीच गोष्ट, बुद्ध, श्रीशंकराचार्य, ख्रिस्त, ज्ञानेश्वर तुकारामादि महात्म्यांच्या चरित्रांवरून स्पष्ट होणार आहे. असो.

या ठिकाणीं असा एक प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे कीं, या स्वार्थपरायण जगांत सद्बुद्धीच्या मनुष्याचा निभाव लागावा कसा? व त्याची सद् बुद्धी चिरकाल टिकावी कशी? प्रश्न बरोबर. पण यावर उत्तर असें आहे कीं,

1 Enlightened self interest.

मनुष्यानें जगांत सत्यपूर्ण पण गोडिगुलाबीच्या वागणुकीनें स्वतःस शत्रू उत्पन्न न होतील अशी खबरदारी घेतलेली चांगली. मागील ४,५,६, या प्रकरणांत व्यवहारांत शत्रू कसे उत्पन्न होतात, व ते न होतील, याविषयीं आपली वागणूक कशी असली पाहिजे, याबद्दलची सांगोपांग चर्चा केलेली आहे. याठिकाणीं एवढेंच सांगण्याचा हेतु कीं व्यवहारशकट व्यवस्थित तऱ्हेनें हांकण्यास आणखी एका गोष्टीची–सद्बुद्धीची जोड कमावून ठेविली पाहिजे, म्हणजे शत्रू उत्पन्न झाले तरी ते कमीच असणार व जे कांहीं उत्पन्न होतील ते कालांतरानें तुमचे मित्रच होतील. आतां शत्रू असले तर ते आपले मित्र कसे करून घ्यावेत–म्हणजे त्यांच्याशीं आपली वागणूक कशी असावी याविषयीं शांतिपर्वांत युधिष्ठिरास उपदेश करतांना भीष्मांनीं एक सुंदर वचन सांगितलेलें आहे, तें असें:—

कर्म चैतदसाधूनां असाधु साधुना जयेत।
धर्मेण निधनं श्रेयो न जयः पापकर्मणा॥

अर्थः—दुष्टांच्या दुष्ट कृत्यांचें निवारण साधुपणानें (परोपकारार्थ कर्में करून करावें; कारण पापकर्में करून जय मिळविण्यापेक्षां धर्माचरण करून मरण आलें तरी तें श्रेयस्कर होय.) उघडच आहे कीं, मनुष्यप्राणी कितीहि जरी दुष्ट असला तरी दुसऱ्याच्या उपकारपूर्ण वागणुकीनें त्याच्यामध्यें सुधारणा व्हावयाचीच नाहीं, इतका दुष्ट तो खास नसतो. म्हणूनच, आपल्या परोपकारपूर्ण वर्तनानें तो आपला मित्र झाल्यास नवल काय ?

आतां; सद्बुद्धीची जोपासना करण्यास आपण कोणत्या गोष्टींकडे लक्ष देणें जरूर आहे, हें आतां पाहूं.

(१) सर्वसाधारणतः उच्चमनोवृत्ति[1] व नीच मनोवृत्ति[2] अशा दोन वृत्त्यांचा पगडा–कमी अधिक प्रमाणांत मनुष्यावर पडलेला दिसून येत असतो. पूर्वसंचित चांगलें म्हणून म्हणा–किंवा दृढनिश्चयी स्वभावामुळें म्हणून म्हणा, साधुवृत्तीच्या मनुष्याच्या बाबतींत उच्चवृत्ती प्रबल होत असून त्या नीच मनोविकारांस कह्यांत ठेवून मनुष्याकडून परोपकाराचीं कर्में करवीत असतात. म्हणून नीच मनोवृत्तींनां कह्यांत ठेवून उदार वृत्तींची जोपासना करीत राहिल्यानें सत्कृत्यरूपी वृक्षाची तो लावण करितो, व कालांतरानें त्यास पालवी

1 Higher self 2 Lower self

फुटून जीं मधुर फळें येत असतात, तीं चाखून त्यास आपलें जीवित अमृतमय करून टाकतां आल्यास आश्चर्य नाहीं.

(२) तुकारामानें शिवाजी महाराजांस जो उपदेश केला, त्यांत तो म्हणतोः—

(अ) कल्याणकारक अर्थ याचा एक ।
सर्वांभूतीं देख एक आत्मा । तु. गा.४४२८.९.

हें वचन घ्या; अगर शुकानुप्रश्नांत व्यास म्हणतात तें वाक्य घ्या;

(आ) यावानात्मनि वेदात्मा तावानात्मा परात्मनि ।
य एवं सततं वेद सोऽमृतत्त्वाय कल्पते ॥

म. शां.२३८.२२.

अर्थः—आपल्या शरीरांतहि जितका आत्मा तितकाच दुसऱ्याच्या शरीरांतहि आहे, हें जो सदैव जाणतो, तोच अमृतत्व म्हणजे मोक्ष प्राप्त करून घेण्यास समर्थ होतो ! किंवा,

'सर्व भूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि'

सर्व भूतांमध्यें आपण व आपणांमध्यें सर्व भूतें–हें गीतावचन घ्या; या तिन्ही वचनांचा सूर एकच आहे कीं, व्यवहारांत मनुष्यानें आपल्यामध्यें काय किंवा दुसऱ्यांमध्यें काय देवाचा अंश पहात राहिलें पाहिजे. व ही दिव्य दृष्टि त्यास सद्बुद्धीपूर्ण व्यवहाराच्या जोरावर लाभत असते.

सद्बुद्धीची जोड असली कीं, मनाचा थोरपणा वाढतो व दुसऱ्याच्या दोषावर सहानुभूतीची शाल घालतां येते.

आंग्ल लेखक सौथ (south) म्हणतो.[1]

"कोणत्याहि प्रसंगीं दुसऱ्याची हेटाळणी करूं नका. दुसरे 'मूर्ख' आहेत, असें तुम्हास आढळून आल्यास तुमची कल्पना अशी असूं द्या कीं, ईश्वरानें त्यांना बुद्धीची जोड दिलेली नाहीं. ते दुर्गुणी असतील तर, तुह्मी त्यांची कींवच

I "Geer not others upon any occasion. If they be foolish, God hath denied them understanding; if they be vicious, you ought to pity, not to revile them; if deformed, God framed their bodies, and will you scorn His workmanship? Are you wiser than your Greator?"

करावी. त्यांस निंदूं नये. ते कुरूप असतील तर त्यांना ईश्वरानें तसें निर्माण केलें, यांत त्यांचा काय दोष? तुह्मीं कां ईश्वरी कृतींत दोष काढूं पहाणार? ज्यानें तुह्मांस निर्माण केलें आहे, त्याच्यापेक्षां तुह्मी शहाणे आहां काय?"

अशा तऱ्हेची उदार वृत्ति मनुष्यानें व्यवहारांत वागविलेली चांगली. मगच त्याची दुसऱ्याबरोबर वर्तणूक सहानुभूतीची ठरणार.

(३) आतां, सद्बुद्धीस पारखा झालेल्या माणसाचा स्वभाव चमत्कारिक बनून जातो. ज्या माणसाचा आपला अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, त्याचे सुद्धां गूण ध्यानांत घ्यावयाचे नाहींत–त्याच्या गुणांची चहा करावयाची नाहीं, तशी वेळ आली असतां सुद्धां डोळेझांक करून त्याच्या दोषांचें आविष्करण करून त्याची 'हुर्यो' मात्र करून टाकावयाची. मनुष्याच्या अशा तऱ्हेच्या मनोवृत्तींत उदारपणा खास नाहीं. लोकांचें बरें असावें –बरें व्हावें,–त्याचा बोलबाला होत जावा, व संधी आली असतां त्याच्या गुणांची तारीफ करण्याची आपल्या मनाची तयारी असावी, अशा तऱ्हेच्या भावनेच्या बुडाशीं सद्बुद्धीचें अधिष्ठान असावें लागतें. म्हणून आपल्या अंगीं सदबुद्धीचा वास नसेल तर, दुसऱ्याच्या अंगचे दोष काढण्याची वाईट खोड आपणांस लागत जाऊन नैतिक दृष्ट्या आपल्या अधःपातास सुरुवात होत असते.

या बाबत बायबलमध्यें पुढील वचन आहे:—[1]

"तुमच्या हातांत जेव्हां असेल तेव्हां दुसऱ्याचें कल्याण जें कांहीं करून टाकावयाचें असेल, तें (तडक) करून टाका." आतां दुसऱ्याचें 'बरें' करण्याचें सहसा प्रत्येकाच्या वाट्यांस येतेंच, असा कांहीं भाग नाहीं. मग त्याची परिस्थिति अनुकूल नसते म्हणा किंवा त्याची बुद्धी त्यास तसें करण्याचें सांगत नाहीं म्हणून म्हणा वाटेल तर. परंतु प्रत्येकाच्या हातीं दुसऱ्याचें कल्याण व्हावें त्याच्या गुणांची तारीफ करून प्रसंगीं त्यास कळकळीची सहानुभूति दाखवावी. एवढी तरी गोष्ट खास असते. या गोष्टीस पैसा पडत नसून फक्त उदार मनाची (सद्बुद्धीची) ठेव असल्यास हा कार्यभाग होतो. पण, जगांतील सदुपयोग रोख ठोक अनुभव मात्र असें सांगतों, कीं सर्व साधारणत: तेवढ्या ठेवीचा करण्याची त्याच्याच कमनशिबानें त्यास बुद्धि होत नाहीं हा केवळ दैव-

1 ("Withhold not good from them to whom it is due, when it is in the power of thine hand to do it.")

दुर्विपाक होय. हल्लींच्यासारख्या जीवनकलहाच्या खडतर युगांत दुसऱ्यांचें कल्याण करणारे महात्मे केव्हांहि विरळच सांपडणार; पण शुद्ध प्रेमाला भुकेलेल्या माणसांनां सद्बुद्धीरूप शुद्ध प्रेमाची फेड सर्व साधारणतः जनाकडून कां मिळूं नये, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सद्बुद्धि असल्याखेरीज लोकांच्या दुःखांकडे दृष्टि जाणार नाहीं. दृष्टि गेल्यास हृदयास पाझर फुटणार नाहीं. अर्थात्च सद्बुद्धीच्या प्रेरणेशिवाय सक्रीय सहानुभूतीची कल्पना त्यांच्या मनास शिवणार नाहीं ! सारांश, फुकाची साहनुभूति मग ती कधीं कधीं शाब्दिक कां असेना, कळकळीची असली म्हणजे झालें. पण तेवढी सुद्धां दाखविण्याचें सर्वांचें स्वाधीन असतां व्यवहारांत अनुभव मात्र निराळा येतो, हें खेदानें म्हणावें लागतें !

(४) सद्बुद्धीचा वास आपल्या ठिकाणीं सदैव रहाण्याकरितां मनुष्यानें कलहाचे प्रसंग आपल्या व्यावहारिक चातुर्यानें शक्य तितके टाळले पाहिजेत. कारण अशा प्रसंगींच सत्-असत् बुद्धींचा झगडा होत असतो. कलहाचे प्रसंग प्रयत्नपूर्वक कसे टाळावेत याविषयींची सांगोपांग चर्चा मागें चौथ्या प्रकरणांत केलेलीच आहे. प्रस्तुत ठिकाणीं येवढेंच सांगण्याचा हेतु कीं, कलहासारखे प्रकार कधीं कधीं सद्बुद्धीच्या अभावींच उमटत असतात; व आपल्या अंगीं सद्बुद्धीचा वास असूनहि जेव्हां ते घडून येत असतात तेव्हां, ते आपल्या अंगच्या सद्बुद्धीचा नाश करण्यास कधींकधीं कारणीभूत होत असतात-या गोष्टीकडे माणसाचें लक्ष जाणें अगत्याचें आहे.

(५) सद्बुद्धीवर झडप घालणारा दुसरा भयंकर शत्रु म्हटला म्हणजे गैर-समज होय. व्यवहारांत असे कांहीं नाजूक प्रसंग येत असतात कीं, शहाण्या सुरत्या मनुष्यास सुद्धां कधीं कधीं मोह पडत असतो, त्याची बुद्धि फिरत असते, व अखेरीस तो दुसऱ्याचा म्हणा, स्वतःचाहि म्हणा नाश करून टाकीत असतो. अशा नाजूक प्रसंगाची मीमांसा केली असतां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, पुष्कळ वेळां गैरसमजाचें भयंकर जाळें दुष्ट माणसें विणीत असून त्यांत ते भल्याबुऱ्या माणसांस अडकवून टाकीत असतात; म्हणून माणसानें गैरसम-जाच्या जाळ्यांत स्वतःस अडकवून न घेण्याची खबरदारी शक्य तितकी घेणें अगत्याचें आहे. प्रत्येक गोष्टीची चांगली बाजूच घेऊन पुष्कळ वेळां गैरसमजाचे प्रसंग टाळतां येण्याजोगें असतात.

(६) कित्येक माणसांना व्यवहारांत बरकत येत नसते! या गोष्टीचा विचार केला असतां दिसून येतें कीं, त्यांची बुद्धी खोटी असते; ज्या त्या माणसावर त्यांचा अविश्वास असतो व प्रत्येकाशीं त्यांची 'आंतील डावा'ची वागणूक असते. अशी त्यांच्या व्यवहाराची स्थिति असल्यावर त्यांच्या व्यवहारास बरकत ती काय येणार! सारांश, अशा माणसांनां 'सद्बुद्धि' ही काय चीज आहे, याची कल्पना असत नाहीं व ती आल्यास स्वार्थलंपटतेमुळें ते त्या गुणाची फिकीरहि करीत नाहींत!

(७) एका तत्त्वज्ञान्यानें आपल्या शिष्यवृंदांस प्रश्न केला कीं, 'ह्या जगांत इष्ट अशी कोणती गोष्ट आहे?' पुष्कळ विद्यार्थ्यांनीं आपल्या परीनें उत्तरें दिलीं; पण, शेवटीं एकानें सांगितलें कीं, 'उदार मनोवृत्ति'[1]; तत्त्वज्ञानी त्या शिष्यास म्हणाला, "शाबास; बाकीच्या शिष्यांनीं जें कांहीं सांगण्याची खटपट केली, तें तूं दोनच शब्दांत बरोबर सांगितलेंस. ज्याचें अंतःकरण थोर, तो सदा समाधान वृत्तीचा असतो, त्यास विश्वासू मित्र मिळत असतात, व त्याच्या हांतून सत्कृत्यें उठत असतात. व्यवहारांत दुसऱ्यांवर उपकार करण्याची संधि वाया घालूं न देणें हेंच सद्बुद्धिच्या माणसाचें ध्येय असतें. कारण अशाच माणसांनां जनसेवा ह्मणजे परमेश्वराची सेवा किंबहुना, परमेश्वराची सेवा ह्मणजेच जनसेवा—हें उदात्त तत्त्व पटलेलें असतें व अशाच महात्म्यांचें आयुष्य लोकांच्या कारणीं वेंचिलें जातें. 'लीहंट' या आंग्ल कवीचें एक काव्य आहे. त्यांत 'अबूबेन ऍढेम्' या महात्म्याचा व देवदूताचा एक हृदयंगम संवाद झालेला आहे. व प्रस्तूत मुद्यावर त्या कथानकाचा प्रकाश पडणार असल्यानें या ठिकाणीं त्या काव्याचा जरूरीपुरतां उतारा देत आहे. 'अबुबेन ऍडेम्' च्या खोलींत देवदूत आला, त्या वेळचा संवाद[2]:—

1 'A good heart.'

2 "What writest thou?" the vision raised
its head
And with a look made of all sweet accord,
Answered, "the names of those who love the
Lord."
"And is mine one?" said Abu, "Nay,
not so,"

अबूनें त्या देवदूतास विचारिलें कीं, "तूं त्या पुस्तकांत काय लिहून घेत आहेस ?"

देवदूतः—"ज्यांची ईश्वरावर भक्ति आहे, अशा लोकांचीं नांवें."

अबूः—"तर मग, त्या यादींत माझें नांव असेलच ?"

देवदूतः—"छेः नाहीं."

अबूनें विनवून सांगितलें कीं, "माझें नांव तूं आपल्या यादींत टिपून घे; कारण, सर्व मानवजातीवर प्रेम करणारा असा मी एक मनुष्य आहे." त्यानें "बरें;" ह्मणून उत्तर दिलें, व तो निघून गेला. व दुसरें दिवशीं त्यानें जेव्हां याद आणून दाखविली तेव्हां, ईश्वरानें ज्या भक्तांवर कृपा केली त्या भक्तांच्या यादींत अबूचें नांव पहिलें होतें !

या उताऱ्यावरून जनसेवा हीच परमेश्वराची सेवा कशी ? या गोष्टीचा उलगडा होणार आहे, व अशा प्रकारच्या जनसेवेकरितां लागणारी सामुग्री म्हणजे सद्बुद्धि–थोर अंतःकरण व उदारपणाची सत्यमय वागणूक. तुकोबांनीं सुद्धां परमेश्वराजवळ जें मागणें मागितलें आहे, तें असें:-

(१)निर्वैर व्हावें सर्व भूतांसवें ।

(२)भूतांचा मत्सर आणि संतनिंदा हे नको गोविंदा घडो देऊं॥

(८) आपल्याकडील वेदान्त विषयक ग्रंथांत चित्तशुद्धि म्हणून जी सांगितलेली आहे तिचा अर्थ लोकमान्य टिळकांनीं "स्वार्थबुद्धि सुटून ब्रम्हात्मैक्य ओळखणें" असा गीतारहस्यामध्यें ३८८ पानावर केलेला आहे. पण, आमच्या मतें चित्त शुद्धीचा अर्थ–' स्वार्थबुद्धि सुटून अंतरात्म्याच्या

Replied the Angel. Abu spoke more low,
But cheerly still and said "I pray thee, then,
Write me as one that loves his fellowmen."
The Angel wrote, and vanished. The next night
It came again with a great wakening light,
And showed the names whom love of God had blessed,
And Lo! Ben Adhem's name led all the rest.

Leigh Hunt.

संदेशास जागृत राहणें," एवढाच व्यावहारिक अर्थ घ्यावा. 'ब्रम्हात्मैक्य पूर्णपणें ओळखणें' ही वस्तुतः पुढील पायरी होय. चित्तशुद्धीचा हा अर्थ घेतां आपणास कळून येणार आहे कीं, चित्तशुद्धीचा झरा सद्बुद्धीच्या-सद्वासनेंच्या उगमापासून वाहूं लागतो. व सद्बुद्धीचा जसजसा जोर होईल त्या मानानें चित्तशुद्धीरूपी गंगा अफाट पात्रावरून जोरानें वाहूं लागते. नंतरच नामस्मरणानें एकनाथानें खालील श्लोकांत सांगितलेला अनुभव त्याच्या प्रत्ययास येत असतो.

> सप्रेम सद्भावें संपूर्ण । नित्य करितां नामस्मरण ॥
> वृत्ति पालटती आपण । तेंहि वचन ऐक राया ॥
> नामा सरिसाच हरी । रिघे हृदय माझारीं ॥
> तेणें धाके अभ्यंतरी । हो लागे पूर्ण हृदयशुद्धी.
>
> (एकनाथी भागवत.)

व, सर्व दुष्टवृत्ति पालटल्या म्हणजेच मनुष्य अंतरस्थ देवाच्या संदेशास जागृत रहात असतो.

कबीरानीं देवाच्या तोंडीं पुढील शब्द घातलेले आहेत.

> " समुझायै समुझै नहीं परहत आप बिकाय ।
> मैं खेचत हौ आपको चलासो जमपुर जाय ॥

अंतःकरणांत मी राहून मानवास समजावितों, परंतु तो समजत नाहीं, आणि आपणांहून भिन्न असा जो देह आणि तत्संबंधीं कामक्रोधादि भाव यांच्या हातून आपणांस विकून घेतों. मी त्याला आपणापाशीं ओढतों, परंतु माझा हात हिसडून तो यमपुराप्रत जातो आणि आपला नाश करून घेतो.

भागवतांत ह्मटलें आहे कीं:—

> अकिञ्चनस्य दान्तस्य शान्तस्य समचेतसः ।
> मया सन्तुष्टमनसः सर्वा सुखमया दिशः

अर्थः—" मीच परमात्मा अंतरीं वसत असल्यामुळें ज्याचें हृदय संतुष्ट झालें आहे आणि ज्याच्या ठिकाणीं शम, दम वागतात, ज्याच्या चित्तामध्यें समता असते, तो दरिद्री असला तरी सर्व दिशा त्याला सुखानें भरलेल्या अशा वाटतात"-या उताऱ्यावरून असें स्पष्ट होईल कीं चित्तशुद्धि झाली असतां मनुष्याच्या अंतःकरणाच्या फलकावर दिव्य संदेश उमटत असतो व कालांतरानें त्यास दिव्यांशाची ओळख पटूं लागते.

सारांश ,सद्बुद्धीच्या जोरावर व्यवहाराचें जूं हांकिलें असतां मनुष्यास चित्तशुद्धीचा लाभ-दुष्टवासनांचा क्षय होऊन ईश्वराच्या नामसंकीर्तनानें ब्रह्मप्राप्ति करून घेतां येतें; नंतरच खालीं दिलेल्या मुण्डकोपनिषदांतील वचनाचा अनुभव त्यास आपोआप होत असतो.

"संप्राप्यैनमृषयो ज्ञानतृप्ताः कृतात्मानो वीतरागाः प्रशान्ताः।
ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीरा युक्तात्मानः सर्वमेवाविशन्ति ॥

अर्थः—" देवाची प्राप्ती झाल्यानंतर ऋषी ज्ञानानें तृप्त होतात, त्यांचे आत्मे सुसंस्कृत होतात, त्यांचे राग दोष नष्ट होतात, अत्यंत शांतिसंपन्न होतात आणि बुद्धिशाली आणि पवित्र आत्मे असे जे असतात, त्यांस सर्व व्यापी देव सर्वत्र प्राप्त होऊन ते सर्वांच्या ठायीं प्रविष्ट होतात."

प्रकरण अकरावें.

शीलसंवर्धनाची महती.[1]

"विकारहेतौ सति विक्रियंते येषां न चेतांसि त एव धीराः ।"

(कुमार १. ५९.)

महाभारताच्या शांतिपर्वांत (शां. १२४) भीष्मांनीं युधिष्ठिरास एक प्राचीन कथा सांगितलेली आहे, कीं, ' राज्यभ्रष्ट झालेल्या इंद्रानें देवाचा गुरु जो बृहस्पति त्याजकडे जाऊन " श्रेय कशांत आहे, तें मला सांगा," असा त्यास प्रश्न केला. तेव्हां बृहस्पतीनें राज्यभ्रष्ट झालेल्या इंद्रास ब्रह्मविद्या म्हणजे आत्मज्ञान सांगून " तेवढेंच श्रेय " असें उत्तर दिले. परंतु, इंद्राचें त्यानें समाधान न होतां " आणखी जास्त कांहीं आहे काय ?" असा पुनः

---

1 ("The crown and glory of life is character. It is the noblest possession of a man, constituting a rank in itself, and an estate in the general good will; dignifying every station, and exalting every position in society. It exercises a greater power than wealth, and secures all the honour without the jealousies of fame. It carries with it an influence which always tells; for it is the result of proved honour, rectitude, and consistency—qualities which, perhaps more than any other, command the general confidence and respect of mankind."—Smiles.)

प्रश्न केल्यावर बृहस्पतीनें त्याला शुक्राचार्यांकडे पाठविलें. तेथेंहि तसाच प्रकार झाल्यावर शुक्रानें "प्रल्हादास तो विशेष माहीत आहे," असें सांगितलें. तेव्हां अखेरीस ब्राह्मणवेशानें प्रल्हादाकडे जाऊन इंद्र त्याचा शिष्य झाला, व कांहीं काळ त्याची सेवा केल्यावर शील–सत्यपूर्ण धर्मानें वागण्याचा स्वभाव हीच त्रैलोक्याचें राज्य मिळविण्याची गुरुकिल्ली असून तेंच श्रेय होय, असें प्रल्हादानें त्यास सांगितलें. नंतर, तुझ्या सेवेनें मी संतुष्ट झालों, तूं मागशील तो वर मी तुला देतों, असें जेव्हां प्रल्हाद त्यास म्हणाला तेव्हां "तुझें शील मला दे" असा ब्राह्मणवेशधारी इंद्रानें वर मागितला. त्यास प्रल्हादानें 'होय' ह्मटल्यावर 'शील' व त्याचे मागोमाग धर्म, सत्य, वृत्त व अखेरीस श्री किंवा ऐश्वर्य या देवता प्रल्हादाच्या शरीरांतून निघून इंद्राच्या शरीरांत प्रवेश करत्या झाल्या, व त्यामुळें पुढें इंद्राला आपलें राज्य प्राप्त झालें." पौराणिक कथा ह्मणून या गोष्टीची हेटाळणी करणारे हरीचे लाल आजमितीस सुद्धां कांहीं निघतील, पण, त्यांनांसुद्धां या सुंदर गोष्टींत मनुष्यस्वभावाचें निरीक्षण करून व सामाजिक व्यवहाराची चिकित्सा करून उदात्त तत्त्व ग्रथित केलेलें आहे, व तें त्रिकालाबाधित सत्य आहे, ही गोष्ट कबूल करावी लागणार आहे. या सुंदर गोष्टींत सांगितल्याप्रमाणें शील एकदा माणसानें गमाविलें ह्मणजे तो धर्माचरण सोडतो, सत्य बोलणें टाकून देतो, आपल्या वृत्तास पारखा होतो व अखेरीस तो ऐश्वर्यास मुकत असतो. अशीच त्याची नैतिक अवनति या संसाररूपी राहाटगाडग्याच्या फेऱ्यांत होत असलेली दिसून येते खरी. मनुष्याचें शीलच गेलें मग त्याजजवळ काय राहिलें ? सर्व 'माणुसकीच' गेली ह्मणावयाची ! अशी स्थिति झाल्यावर त्याचा व्यवहार कवडीमोलाचा होऊन बसल्यास आश्चर्य नाहीं. ह्मणून त्यानें प्रयत्नपूर्वक शीलसंवर्धन करणें हें आपलें आद्य कर्तव्य समजलें पाहिजे.

आतां, जगांत मनुष्यानें येऊन संपत्ति किती कमावली आहे, त्याचा सामाजिक दर्जा कितीसा वाढला आहे, अशा गोष्टींवरून ह्मणजे दिखाऊ साधनांवरून त्याची किंमत अजमावयाची नसून त्यानें इच्छाशक्तीवर ताबा कितपतसा मिळविला आहे, तो सत्याची कांस कितीशी धरतो आहे, त्याच्या अंगीं दुसऱ्या विषयींची सद्बुद्धि कशी वसत आहे, सारांश, त्यानें आपल्या स्वभावास कसें वळण दिलेलें आहे, अशा गोष्टींवरूनच त्याची काय ती किंमत सूज्ञ ठरवीत असतो. परंतु सर्वसाधारणतः आपल्या व्यवहाराची रीत मात्र

अगदीं निराळी दिसून येते. मनुष्याच्या शीलाकडे आपली दृष्टि सहसा जात नसून त्याच्या बाह्य देखाव्यावरच आपली नजर प्रथम जात असते, व कधीं कधीं हा देखावाच आपल्यास नुसता गुंगवून सोडीत असतो, असाच आपला अनुभव नाहीं काय ?

या गोष्टीची मीमांसा करतां आपणांस दिसून येतें कीं, अंतरंगापेक्षां बाह्यांगाचीच मातब्बरी आपण फार लेखीत असतों. प्राणापेक्षां कुडीचीच किंमत आपण अतिशय करीत असतो. ह्मणूनच कुडीचें अंतरंग सजविण्याच्या खटाटोपांत पडण्यापेक्षां तिचें बहिरंगच आपण अनेक तऱ्हेच्या अलंकारांनीं म्हणा, मौल्यवान वस्त्रांनीं म्हणा, नटवीत असतो. व मौजेची गोष्ट ही कीं, नटाऊ देखाव्यावर आपण खूष रहात असून अंतर्यामीच्या आत्मारामास पार विसरून जात असतो !

याचा अनिष्ट परिणाम मात्र असा होत असतो कीं, जगांतील टक्क्याटोणप्यास तोंड देण्यास मनुष्याच्या अंगीं नैतिक बलाची जोड रहात नसून व्यवहार-संसार दुःखाचा सागर मात्र होऊन बसतो; व त्याच्या पैलतीरास सुखरूप पोचण्याचें त्याच्या नशीबीं रहात नाहीं, असाच त्याचा खडतर अनुभव असल्याचें दिसून येईल. मनुष्यास जर नैतिक बळाचा पाठिंबा असेल-शील त्यानें जर कमावून ठेविलेलें असेल,तर वाटेल त्या आणीबाणीच्या प्रसंगास धडाडीनें तोंड देण्यास त्याची तयारी रहाते; व मौज अशी कीं, त्याच्या अशा तऱ्हेच्या सत्यपूर्ण म्हणून खंबीर वागणुकीपुढें पुष्कळ वेळां संकटांची परंपरा विलयास जात असल्याचा जगाला अनुभव आहे. प्रल्हादाच्या सत्वशील वागणुकीपुढें विषानें आपला विषारीपणा सोडला, अग्नीनें आपली दाहशक्ति टाकून दिली; पर्वतानें आपल्या रौद्रस्वरूपाचा त्याग करून त्याच्या जीवास अपाय करण्याचें टाळिलें-म्हणूनच मृत्यूस त्याच्यापुढें हात टेकावे लागले ! शीलवान् मनुष्यास मृत्यूची पर्वा वाटत नसून शील ही एक स्माईल्सनें म्हटल्याप्रमाणें मौल्यवान् ठेव आहे अशी त्याची पवित्र भावना होत असून तिचें प्रयत्नपूर्वक रक्षण करणें-हेंच आपलें कर्तव्य-किंबहुना, हेंच आपलें अंतिम ध्येय अशी त्याची ठाम समजूत होऊन रहाते.

आतां, या ठिकाणीं 'शील हें काय आहे, त्याची लक्षणें तरी काय,' असा प्रश्न उद्भवण्यासारखा आहे.हा प्रश्न निरनिराळ्या तत्त्वज्ञान्यांनीं कसा सोडविलेला आहे तें आतां पाहूं.

महाभारतांतील शांतिपर्वांत शीलाचें लक्षण देतांना धृतराष्ट्रानें ह्मटलें आहेः—

(१) यदन्येषां हितं न स्यात् आत्मनः कर्मपौरुषम् ।
अपत्रपेत वा येन न तत्कुर्यात् कथंचन् ॥
महाभा शां. १२४-६६.

भावार्थः—'जें आपलें कर्म लोकांच्या हिताचें होत नाहीं, किंवा ज्याबद्दल आपली आपल्यास लाज वाटते, तें कधींहि करूं नये'—**या वचनांत आपली आपल्यास लाज वाटते, तें कधींहि करूं नये**-हें वाक्य महत्त्वाचें आहे. अर्थात्च लाजिरवाणी वर्तणूक शील सोडून असणार, येवढेंच नव्हे तर, तशा वर्तनाबद्दल आपली आपल्यासच लाज वाटून घेणें हीच गोष्ट शीलवान मनुष्य व्यवहारांत आपल्यापुढें ठेवीत असतो.

(२) महाभारतांतील उद्योगपर्वांत शीलाची प्रशंसा करतांना विदुर धृतराष्ट्रास म्हणतोः—

'ज्याचें शील उत्तम त्यानें सर्वच जिंकलें समजावें. मनुष्याला मुख्य शील होय. तें ज्याजवळ नाहीं त्याला बंधु द्रव्य व जीवित यांचा तरी काय उपयोग ?''—या वचनांत शील संपादन करून घेणें म्हणजेच 'सर्वस्व' हातीं येणें होय. शीलाशीं तोलून पाहिलें असतां ऐहिक ऐश्वर्य केव्हांहि कमीच ठरणार !

(३) उत्कृष्ट शीलाचा मनुष्य दृढ परिश्रमानें शेवटीं शेवटीं 'कर्मयोगी' बनत असतो; मग त्याची स्थिति कशी होत असते, या विषयाचें गीतेंत पुढीलप्रमाणें वर्णन आहेः—

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुख क्षमी ॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तःस मे प्रियः ॥
गीता १२-१३,१४.

अर्थः—कोणाचा द्वेष न करणारा, सर्व भूतांशीं मित्रभावानें वागणारा, तसाच कृपाळू, ज्याची ममत्वबुद्धि व अहंकार सुटलीं, ज्याला सुख व दुःख सम झालीं, व जो क्षमावान् (१४) सदा संतुष्ट, संयमी, दृढनिश्चयी, ज्यानें आपलें मन व बुद्धि मला वाहिली, असा जो माझा योगी तो मला प्रिय होय.

(४) या कर्मयोगाचें विवरण ज्ञानदेवांनीं फार बहारीनें केलेलें आहेः—

'उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे ।
हें कांहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ।
कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं हें ।
न म्हणेचि कृपाळू । प्राण पैं गा ।
गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होऊनि मारूं ।
ऐसें नेणेचि गा करूं । तोय जैसें ।
तैसी आघवियांची भूतमात्रीं । एकपणें ज्या मैत्री ।
कृपेसी धात्री । आपण जो ।
आणि मी हे भाष नेणे । माझें कांहींचि न म्हणे ।
सुखदुःख जाणणें । नाहीं जया ।
तेवींचि क्षमेलागी । पृथ्वीसि पवाड आंगीं ।
संतोषा उत्संगी । दिधलें घर॥
(१४) वार्षियेवीण सागर । जैसा जलें निर्भर ।
तैसा निरुपचार । संतोषी जो ।
वाहूनि आपली आण । धरी जो अंतःकरण ।
निश्चया साचपण । जयाचेनी ।
जीव परमात्मा दोन्ही । बैसले एकासनीं ।
जयाचिया हृदयभुवनीं । विराजती ।
ऐसा योग समृद्धि । होऊनि जो निरवधि ।
अर्पी मनोबुद्धि । माझ्या ठायीं ।
आंत बाहेरि योग । निर्वाळलेयाही चांग ।
तरी माझा अनुराग । सप्रेम जया ।
अर्जुना तो भक्त । तोचि योगी तोचि मुक्त
तो वल्लभा मी कांता । ऐसा पढिये ।

(५) बायबलमध्यें म्हटलें आहे:—[1]माणुसकीस जागून व्यवहार करा; तुमची नीतीमत्ता खंबीर असूं द्या.

(६) कुराणामध्येंसुद्धां महंमद पैगंबरनें सांगितलेलें आहे कीं ज्यानें आपल्या वृत्त्या ताब्यांत ठेऊन स्वभावास सुवळण दिलेलें आहे तोच खरा मुसलमान म्हणावयाचा.

---

1 'Quit ye like men, be strong.'

(७) जर्मन तत्त्ववेत्ता नोव्हलिस् म्हणतोः—[1] 'सुवळण दिली गेलेली जी इच्छा-शक्ति तेंच शील म्हणावयाचें, हें लक्षण अर्थात् एकांगीं आहे. इच्छाशक्तीवर पूर्ण ताबा हा हवाच; पण त्याबरोबरच हांतून सत्यपूर्ण आचरण घडून येणें जरूरीचें आहे; यासंबंधींचा उल्लेख नोव्हालीस्नें आपल्या लक्षणांत केलेला नाहीं. असो.

(८) 'आयडिया ऑफ युनिव्हर्सिटी' या सुंदर पुस्तकांत कार्डिनल न्यूमननें शीलवान् मनुष्याचें-सभ्य गृहस्थाचें सुंदर वर्णन केलेलें आहे.उतारा लांब असला तरी सभ्य गृहस्थाचे अंगीं अवश्यपणें कोणते गुण असावे लागतात याचा पूर्ण उहापोह केल्यानें जरूरीपुरता तो देणें इष्टच आहे:—[2]

---

1 "A character is a completely fashioned will" (bollkommon gebildeter wille.)

2 "It is almost a definition of a gentleman to say that he is one who never inflicts pain.........The true gentleman carefully avoids whatever may cause a jar or a jolt in the minds of those with whom he is cast;—all clashing of opinion, or collision of feeling, all restraint, or suspicion, or gloom, or resentment; his great concern being to make every one at their case and at time. He has his eyes on all his company; he is tender towards the bashful, gentle towards the distant, and merciful towards the absurd: he can recollect to whom he is speaking; he guards against unreasonable allusions or topics which may irritate; he is seldom prominent in conversation and never wearisome. He makes light of favours while he does them, and seems to be receiving when he is conferring. He never speaks of himself except when compelled, never defends himself by a mere retort, he has no ears for slander or gossip, is scrupulous in imputing motives to those who interfere with him, and interpretes everything for the best. He is never mean or little in his disputes, never takes unfair advantage, never mistakes personalities or sharp sayings for arguments, or insinua-

'सभ्य मनुष्याचें लक्षणच हें कीं, तो दुसऱ्यास दुखवीत नसतो... दुसऱ्याच्या मनास लागेल असें तो बोलत नाहीं. खटक्याचे प्रसंग

---

tes evil which he dare not say out. From a long sighted prudence, he observes the maxim of the ancient sage, that we should ever conduct ourselves towards our enemy as if he were one day to be our friend. He has too much good sense to be affronted at in sults; he is too well employed to remember injuries, and too indolent to bear malice. He is patient, forbearing and resigned, on philosophical principles ; he submits to pain, because it is inevitable, to bereavement, because is it irreparable, and to death because it is his destiny. If he engages in controversy of any kind, his disciplined intellect preserves him from the blundering discourtesy of better perhaps, but less educated minds ; who like blunt weapons, tear and hack instead ofc utting clean, who mistake the point in argument, waste their strength on trifles, misconcieve their adversary, and leave the question more involved than they find it. He may be right or wrong in his opinion, but he is too clear-headed, to be unjust ; he is as simple as he is forcible, and as brief as he is decisive. No where shall we find greater candour, consideration, indulgence; he throws himself into the minds of his opponents, he accounts for their mistakes. He knows the weakness of human reason as well as its strength, its province and its limits. If he be an unbeliver, he will be too profound and large minded to ridicule religion or to act against it ; he is too wise to be a dogmatist or fanatic in his infidelity. He respects piety and devotion ; he even supports institutions as venerable, beautiful, or useful, to which he does not assent ; he honours the ministers of religion, and it contents him to decline its mysteries without assailing or denouncing them. He

तो टाळीत असतो. आपल्या संगतींत दुसऱ्यांस आनंद झाला पाहिजे, या दिशेनें त्याचा सर्व प्रयत्न चाललेला असतो. सर्वांच्याकडे तो पूर्ण सहानुभूतीनें पहात असतो. लाजाळू माणसाकडे कोवळया दृष्टीनें पहाणें तर तुसड माणसाशीं हळुवार वागणूक करणें व मूर्खांबरोबर तर जाणून बुजून दयार्द्र दृष्टीनें व्यवहार करणें अशीच त्याची रहाणी असते. आपण कोणाशीं बोलत आहों, हें तो जाणून असतो. अदवा तदवा कांहीं तरी भकत सुटणें त्यास माहीत नसतें. संभाषणांत आपण होऊन पुढाकार घ्यावयाचा नाहीं, व बोलणें सुरू केलें असतां तें कंटाळवाणें करून सोडावयाचें नाहीं; किंवा आपल्या स्वतःच्या गुणाबद्दल कधीं 'ब्र' ह्मणून काढावयाचें नाहीं. जरूरच पडल्यास तेवढ्यापुरतें बोलावयाचें, 'शेषं कोपेन पूरयेत्' अशा तऱ्हेनें स्वतःचा बचाव करावयाचा नाहीं. गप्पागोष्टी किंवा निंदा हें ऐकून घेण्याची त्याची मनःप्रवृत्ति असत नाहीं. व प्रत्येक गोष्टीचा चांगला अर्थच तेवढा घ्यावयाचा, अशीच त्याच्या मनाची तयारी असते. एखाद्या क्षुल्लक कारणावरून भांडण उपस्थित करावयाचें नाहीं, किंवा येवढ्या तेवढ्या क्षुल्लक कारणावरून लोकांचा तोटा करण्याच्या मार्गास लागावयाचें नाहीं. कोटीक्रमाची फेड रागानें शिव्या देऊन करावयाची नाहीं; किंवा दुसऱ्यांनीं अपमान केला असतां चिडून जावयाचें नाहीं; अपकार कोणी केला असतां तो मनांत वागवावयाचा नाहीं; किंवा आपला स्वभाव खुनशी म्हणून करावयाचा नाहीं. शांत स्वभाव, सोशीकता, ईश्वरावर अढळ निष्ठा हे गुण त्याच्या अंगीं वास करतात. दुःखाचा प्रसंग अपरिहार्य म्हणून सोसून तो सारतो, वियोगाचा प्रसंग कांहीं तोड नाहीं, म्हणून तो सहन करतो; व

'अंतवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः'

या न्यायानें मृत्यूस तोंड देण्याची त्याची तयारी असते. कोणच्याहि वादांत त्यानें भाग घेतलाच तर व्यवस्थित तऱ्हेनें कोटीक्रम करून दुसऱ्याची बाजू त्याच्याच गळ्यांत तो टाकून सोडतो. केव्हांहि असभ्य वर्तन त्याच्या हातून

---

is a friend of religious toleration, and that, not only because his philosophy has taught him to look on all forms of faith with an impartial eye, but also from the gentleness and effeminacy of feeling, which is the attendant on civilization."

होत नसतें. क्रोधास वश न झाल्यामुळें तो मुद्दा सोडत नसतो व त्याची बाजू लंगडी पडत नसते. त्याचें मत, मग तें बरोबर असो, किंवा चुकीचें असो, काय जें असतें तें मात्र प्रामाणिक असतें. त्याच्या बाबतींत साधेपणा पण जोरकस स्वभाव, त्रोटकपणा पण ठाम मत हे गूण ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येत असतात. मनाची ऋजुता व उदारता या (सच्छीलास) अवश्य लागणाऱ्या गुणांची जोड त्याच्यापाशीं असल्यानें तो शत्रूंचे सुद्धां मनो व्यापार (सहानुभूती-पूर्ण दृष्टीनें) पाहून त्यांचें स्पष्टीकरण त्यांनांच अनुकूल होईल अशा तऱ्हेनें करीत असतो. मानवी स्वभावाचे नैसर्गिक दोष त्यास माहीत असतात. तो नास्तिक असला तरी दुसऱ्याच्या धर्माची हेटाळणी करीत नाहीं; व दुसऱ्याच्या धर्माविरुद्ध त्याचे हांतून आचरण होत नाहीं. संस्था मग त्या शत्रूंच्या कां असेनात त्या उपयुक्त असल्या म्हणजे झालें; त्यांना मदत करण्याची त्याची तयारी असते. धार्मिक स्वातंत्र्य त्यास मान्य असतें,.........

या उताऱ्यावरून ' व्यावहारिक योगी ' म्हणजे काय, व त्याचे अंगीं कोणते गूण असावे लागतात, हें कळून येणार आहे.

(९) कार्डिनल न्यूमननें 'व्यावहारिक योग्याचें' जें वर्णन केलेलें आहे, तसेंच तंतोतंत वर्णन मनुष्यस्वभावाचें व मानवी व्यवहाराचें निरीक्षण करून आपल्याकडील तत्त्वज्ञान्यांनीं सुद्धां केलेलें आहे. उत्कृष्ट शीलाच्या मनुष्याचें वर्णन करितानां महाभारतांतील उद्योगपर्वांत विदुर धृतराष्ट्रास म्हणतो:—

' घर सोडून जो वणवण करीत नाहीं, परस्त्रीचे वाटेस जात नाहीं, दंभ चौर्य, पैशुन्य व मद्यपान यांपासून जो अलग रहातो, तो सदा सुखी असतो. जो धर्म, अर्थ, किंवा काम यांचें सेवन क्षुब्ध चित्तानें करीत नाहीं; प्रश्न केला असतां जो खरें तेंच सांगतो; एवढ्यातेवढ्याकरितां जो भांडत बसत नाहीं; आपला कोणी मान ठेविला नाहीं, म्हणून जो रुसत नाहीं, तोच शहाणा. जो दुसऱ्याचा मत्सर करीत नाहीं दयाच करितो; आपण दुर्बल असतां दुसऱ्याशीं विरोध करीत नाहीं; केव्हांहि अमर्याद बोलत नाहीं; व कोणी उलट बोलल्यास क्षमाच करितो, त्याची सर्वत्र प्रशंसा होते. दुसऱ्याचे डोळ्यांवर येईल असा वेश धारण करीत नाहीं, आपल्या पराक्रमाचा टेंभा मिरवून दुसऱ्याला तुच्छ करीत नाहीं; चिवचिवून गेला असतांहि जो दुसऱ्यास कडु शब्द बोलत

नाहीं, अशाच्या सर्वजण सदा भजनीं लागतात. मिटलेलें भांडण उकरून काढीत नाहीं; उत्कर्ष झाला ह्मणून चौघांत वर छाती काढून चालत नाहीं; अपकर्ष झाला ह्मणून तोंडहि लपवीत नाहीं, आपण निकृष्ट स्थितीला आलों आहों या सबबीवर जो भलती गोष्ट करीत नाहीं, त्याला सज्जन उत्कृष्ट शीलाचा ह्मणतात."

इतके उतारे विस्तारपूर्वक देण्याचा हेतु एवढाच कीं, शील ह्मणजे काय, शीलवान मनुष्याच्या अंगीं काय काय गूण असतात, किंबहुना असले पाहिजेत, याविषयींची चर्चा निरनिराळ्या पौर्वात्य ह्मणा, पाश्चिमात्य ह्मणा, तत्त्वज्ञान्यांनीं कशी केलेली आहे, व व्यवहारक्रमांत शील या गुणाची किती अवश्यकता आहे अशा गोष्टींची ठळक कल्पना यावी ह्मणून.

शीलाची वरील कसोटी मनुष्याच्या व्यवहारास लावून पाहिली तर तो त्या कसास कितीसा उतरेल, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. स्पष्टपणें सांगावयाचें झाल्यास ' मधुतिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलं '–(बोलण्यांत मिठ्ठेपणा, तर हृदयांत विषारीपणा, किंवा, बोलणी मानभावाची व करणी कसाबाची') याच न्यायानें त्याचा बहुतेक व्यवहार चाललेला दिसून येतो. अशीच त्याच्या व्यवहाराची स्थिति होऊन बसल्यावर त्याच्या अंगीं शील कोठें राहिलें ? समाजांत ' बोलीन तेंच करीन, किंवा करीन तेंच बोलून दाखवीन ' अशा करारी बाण्याचीं माणसें विरलच; किंबहुना प्रत्यक्ष कृति करून दाखविण्यापेक्षां तोंडाचीच मचमच करणारे 'उत्तरा'प्रमाणें हंबीरराव वाटेल तेवढे सांपडतील. पण, शब्द व कृति, अंतरंग बहिरंग–या द्वंद्वामध्यें मेळ घालून व्यवहार करण्यांतच मनुष्याच्या अंगचा शहाणपणा काय, किंवा माणुसकी काय दिसून येत असते. म्हणूनच श्रीसमर्थांच्या खालील शिकवणीची समजास आज फार जरूर आहे असें विचारांतीं दिसून येईल. श्रीसमर्थ म्हणतातः—

जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ।
मग महंतलीला स्वभावें । अंगीं बाणे' ॥ दा. १२–२–२३.

१ हल्लींच्या काळीं तर मराठी शब्दकोशामध्यें ज्या कित्येक शब्दांचा सरळ अर्थ बाजूस ठेऊन केवळ, त्यांचा उलट–लाक्षणिक अर्थच घेऊन आपण व्यवहारांतच चालतों त्या शब्दांपैकीं 'शहाणा' ' हुशार ' हे शब्द आहेत, असें दिसून येणार आहे. 'अ'ला ज्या मानानें खोटेगिरी–फसवेगिरी

करून ती पुनः छपवितां येते, त्या मानानें 'अ' हा 'हुशार–शहाणा' म्हणून ठरत असतो. प्राचीन ग्रीस देशाच्या इतिहासांत अशी एक गोष्ट आहे कीं[1] स्पार्टन लोकामध्यें चोरी करणें हा आतांप्रमाणें गुन्हां समजला जात नसे. चोरी करण्यांत पातक नाहीं, पण तें गबाळपणाच्या वागणुकीमुळें उघडकीस आलें तर त्या पातकाच्या क्षालनार्थ त्यास देहान्त 'शासन' भोगावें लागत असे.

एकदा, एका स्पार्टन मुलानें जेवणाकरितां म्हणून एक खोकडाचें पिलुं चोरिलें. व चोरी उघडकीस येईल म्हणून त्यानें तें कांखेंत आवळून धरिलें ! खोंकडाचें पिलुंच तें; त्यानें त्या मुलाच्या छाती जवळचा भाग कुरतडून टाकण्यास सुरुवात केली ! तरी हा मुलगा आपला गप्पच. त्यानें हूं कां चूं केलें नाहीं. अखेरीस त्या मुलास शोणित स्नान झालें तरी ही स्वारी स्वस्थच!! पुढें त्या मुलाची 'फार हुशार' म्हणून स्पार्टन लोकांनीं वाहवा केली. अशीच तारीफ आज आपण समाजांत कितीतरी लोकांची कळतनकळत करीत आहों, याची कल्पनासुद्धां आपल्यास येत नाहीं ! वस्तुतः अशा तऱ्हेच्या शहाण-पणाची म्हणा–हुशारीची वागणूक शीलास सोडून असणार असेंच सुज्ञ मनुष्य म्हणणार. यावरून निष्कर्ष एवढाच निघतो कीं सत्यासत्यतेचा विधिनिषेध आपणांस वाटावा तसा वाटेनासा झालेला आहें, हें खेदानें म्हणावें लागतें ! असो.

कुमारसंभवांत एक वचन आहेः—

विकारहेतौ सति विक्रियंते । येषां न चेतांसि त एव धीराः॥

(कुमार १·५९)–ज्या कारणांनीं विकार उत्पन्न होतो, तीं कारणें ते विषय पुढें असतांहि ज्याचें अंतःकरण मोहांत पडत नाहीं, तोच पुरुष; तोच धैर्यशाली म्हणावयाचा.

(२) नुसत्या शिक्षणावरही शीलाची असावी तशी किंवा कल्पना असते तितकी भिस्त नाहीं. मनुष्यानें शिक्षणाच्या जोरावर ज्ञानाचा साठा केवढाहि सांठविलेला असो, त्यामुळें त्याच्या मनाची उदारता वाढते थोडीच; किंवा

---

1. The sparten boys were punished when caught, not for the stealings but the clumsiness in being found out.

शीलहि बनतें थोडेंच. याबाबत गोटेचें एक सुंदर वचन आहे. तो ह्मणतो[1]:—

'जगांतील व्यवहारांत मनुष्य काय मिळवून दाखवितो यावरून परिणाम–इष्ट किंवा अनिष्ट–अजमावयाचा नसून त्यानें स्वतःमध्यें किती कमाई करून ठेवलेली आहे–त्याचें शील कसें बनलें आहे–या गोष्टीवरूनच त्याची योग्यता ठरवावयाची असते.'

यावरून दिसून येणार आहे कीं, नुसतें शिक्षण कमावून ठेवण्याकरितां मनुष्यप्राणी जन्मास आलेला नसून मनुष्यप्राणी हा ' देवांश' आहे. डार्विननें म्हटल्याप्रमाणें–ह्या 'देवांशा'[2] ची वाढ करण्यास जरूर तें शिक्षण त्यानें घेणें अवश्य आहे.

(३) शीलवान मनुष्याचें मत (मग तें प्रामाणिक असलेंच पाहिजे) ठाम असावें लागतें. हें ठाम मत कसें बनवावें, याविषयींची ' मिल्ल' ची रीत चांगली आहे. तो म्हणतो[3]:—

"सर्व मुद्दे लक्षपूर्वक ऐका. घोळघोळून त्यांचा विचार करा. एककल्ली मनानें किंवा पक्षपातानें गैरसमज करून घेऊन त्यांचें परीक्षण करूं नका; व अशा निःपक्षपातानें जो विचार ठरेल तो ठाम करा व त्याप्रमाणें कृति करण्याचें व जगांतील व्यवहार करण्याचें ठरवा."

(४) व्यवहारांत बारीक सारीक गोष्टींमध्येंसुद्धां मनुष्याचें शील पुष्कळ वेळां कसाला लागतें; व कळत नकळत चाणाक्ष माणसास आपल्या स्वभावाची चांगली परिक्षा होत असते. लोकांनीं आपल्या स्वभावाची एकदां परीक्षा केल्यावर आपण मग कितीहि बतावणी केली तरी "मडकें कच्चें तें कच्चें" अशी एकदां कल्पना झालेली असते ती तशीच ठाम रहाते. म्हणून क्षुल्लक

1. ' Man exists for culture; not for what he can accomplish, but for what can be accomplished in him. Gothe—

2. God in the jerm

1. ' Hear all points with care; turn them over in your mind; examine them without bias or prejudice; and then decide what is the right conclusion for you to reach and the conviction for you to form for your action and conduct in life.

गोष्टींत सुद्धां दुसऱ्याशीं आपली वागणूक उदारपणाचीच असावी लागते. पुष्कळ वेळां असें घडून येतें कीं, दुसऱ्यांशीं आपण किरकोळ बाबतींत कसे वागत असतो इकडे त्यांचें लक्ष असतें, पण आपलें लक्ष असावें तसें असत नाहीं. आतां दुसऱ्यांशीं आपली वागणूक उदारपणाची म्हणून सहानुभूतीची असल्यावर आपणास एक प्रकारचा सात्विक आनंद जो होत असतो तो केवळ "और" होय.

(५) मनुष्याची दृष्टि किती जरी झाली तरी ती संकुचितच असते. म्हणून पुष्कळ वेळां कोणच्याहि वस्तूची एकच बाजू आपण पहात असतों. दुसरी गोष्ट, आपण आपल्या ज्ञानाची किती जरी बढाई मारली तरी तें अपुरेंच ठरत असतें. अशी वस्तुस्थिति असतां एखादी बाजू आपल्यास अमूक तऱ्हेनें दिसते, म्हणून दुसऱ्यास ती तशीच दिसावी किंबहुना दिसली पाहिजे असा आग्रह काय म्हणून धरावा? त्याच्या दृष्टीनें–त्याच्या ज्ञानानुरूप त्यास दुसरी बाजू दिसत असेल तर त्याची बाजू तशी असल्याबद्दलची त्याची साधक बाधक प्रमाणें काय आहेत–वगैरे गोष्टींचा खल उदार बुद्धीनें, मोकळेपणानें त्याच्याशीं केला असतां पुष्कळ वेळां आपल्या निदर्शनास आपलाच कोतेपणा–मग तो ज्ञानाचा म्हणा अगर मनाचा म्हणा, येत असतो! व "आपली बाजू समशेल कच्ची रे कच्ची" अशी आपल्या मनाची खात्री होत असते. म्हणूनच व्यवहारांत सत्शीलाचा मनुष्य दुसऱ्याची अमूकच बाजू असली पाहिजे, असा आग्रह धरीत नाहीं; उलट त्याच्याशीं त्याचें सहानुभूतीचें वर्तन असतें.[1]

---

१ या विषयीं स्माइल्सचे उद्गार खालीलप्रमाणें आहेतः—

As day light can be seen through very small holes, so little things will illustrate a person's character. Indeed character consists in little acts, well and honorably performed; daily life being the quarry from which we build it up, and rough-hew the habits which form it. One of the most marked tests of character is the manner in which we conduct ouerselves towards others. A graceful behaviour towards superiors, inferiors and equals is a constant source of pleasure. It pleases others because it indicates respect for their personality; but it gives tenfold mor pleasure to ourselves.

(६) हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास मनुष्याची दोषैक दृष्टि असतां कामा नये. प्रत्येक वस्तूची चांगली तेवढीच बाजू पहाण्याच्या संवयीची किंमत वर्षास १००० पौंड उत्पन्नापेक्षां अधिक होय, असें डॉ. जॉनसननें व्यावहारिक गणित करून हें कोष्टक बसविलें आहे; पण आमच्या मतें, डॉ. जॉनसनची ही दृष्टि व्यापारी दृष्टि झाली; असें म्हटल्यावाचून रहावत नाहीं. आतां या संवयीचा परिणाम मानवी स्वभावावर इष्ट असाच होत असून त्याचें शील बनण्यास हीच संवय बरीच कारणीभूत होत असते, हें कबूल करावें लागणार आहे. तेव्हां अशा संवयीची किंमत हजारांनीं ठरवून टाकणें म्हणजे 'शीलाच्याच किंमतीची कल्पना बरोबर न आल्याचें लोकनिदर्शनास आणून देण्यासारखें होय. शीलाच्या प्रश्नाचा विचार कर्तव्य असतां नफ्या तोट्याचा प्रश्न काढून शीलाची किंमत ठरवूं पहाणें म्हणजे 'शील' या गुणाची 'इतिश्रींच, पार्यायानें करून टाकण्यासारखें होय.

आतां,'शील'या गुणासंबंधानें मनुष्यानें पुढील गोष्टी नित्याच्या व्यवहारांत ध्यानांत घेणें अगत्याचें होणार आहे.

(१) नीतीमत्ता व शील यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे; तो इतका कीं, दोन्हीपैकीं एकामध्यें किंबहुना, पहिलीमध्यें (नीतीमत्तेमध्यें)जितकी कमतरता असेल तितक्या प्रमाणांत त्या माणसाच्या 'शीलाशीं' वस्तुतः तितका संबंध नसतो. मनुष्यस्वभावाचें चिकित्सापूर्ण परीक्षण करून व मानवी व्यवहार त्या स्वभावाशीं पडताळून नेपोलिअननें 'दहाला एक' असें प्रमाण काढून शारिरीक बळापेक्षां नैतिक बळाचीच पाठ थोपटलेली आहे. जगांत नानाप्रकारचे मोह आवरण्यास मनुष्याच्या अंगची खंबीर नीतिमत्ताच त्यास उपयोगी पडत असते. व असाच मनुष्य खरा धैर्यशाली, शीलवान् म्हणावयाचा.

(७) 'धीरोदात्त विभूतीचें शील कसें असतें (Charecter of the happy wartior) या विषयावर वर्डस्वर्थ कवीचें एक सुंदर काव्य आहे. या काव्यांत तो [1]म्हणतोः—

---

1 More skilful in self knowledge, even more pure,
As tempted more; more able to endure,
As more exposed to suffering and distress;
Then also, more alive to tenderness.

'धीरोदात्त व्यक्ति स्वतःच्या गुणदोषांचें सारखें चिकित्सेनें परीक्षण करीत राहून 'मोहाचा प्रतिकार' करण्यास त्याची सारखी तयारी असते. किंबहुना जितका मोह अधिक, तितका हा बहाद्दर तावून सुलाखून निघत असतो. व्यवहारांत संकटाचे प्रसंग जसजसे जोरानें चाल करून येतील तसतसे त्यांचे वार सहन करण्याची शक्ति याच्यामध्यें जास्त जास्त प्रमाणांत येत असते. इतकें असूनहि प्रेमाच्या अनुकूल संवेदनेशीं तो जागृत रहात असतो हीही गोष्ट स्पष्ट आहे. सारासारविवेचक बुद्धि हीच त्याचा जिवलग मित्र बनून तिच्याच जोरावर जगांतील व्यवहार तो करीत असतो. सामान्य माणसाच्या बाबतींत मोह न आवरल्यामुळें त्याचा चांगला गुण घ्या किंवा एखादें चांगलें कृत्य घ्या, विचार करून पहातां त्या गुणाचा काय किंवा कृत्याचा काय, पाया भक्कम नसतो. पण आपल्या धीरोदात्त विभूतींच्या बाबतींत मात्र एखाद्या चांगल्या कृतीचा म्हणा किंवा जयाचा पाया चांगलाच (भक्कम) असतो.'

दुसऱ्या शब्दांत हें म्हणावयाचें झाल्यास हें वर्णन शीलवान् माणसाचें नाहीं असें कोण म्हणेल! म्हणूनच त्याच्या अंगीं वर निर्दिष्ट केलेले गुण असल्यामुळें समाजांतील लोकांवर त्याचें वजन पडत असतें; व असा मनुष्य समाजास आदर्शवत् होऊन बसल्यास नवल नाहीं; आणि अशाच माणसाचे 'विचार, उच्चार व आचार' म्हणजे समाजांतील लोकांचे विचार, उच्चार व आचार होऊन बसतात. अमेरिकन तत्त्ववेत्ता इमर्सन म्हणतो[1]:—

—'Tis he whose law is reason ; who depends
Upon that law as on the best of friends ;
Whence, in a state where men are tempted still
To evil for a guard against worse ill,
And what in quality or act is best
Doth seldom on a right foundation rest,
He labours good on good to fix and owes
To virtue every triumph that he knows :

1. 'Men of character, are the conscience of the society to which they belong.'

(८) कोणत्याहि समाजांत वागणुकीचे म्हणून कांहीं नियम (Etiquette) ठरलेले असतात, शिवाय स्वैरवर्तनास आळा घालण्याकरितां म्हणून कायद्याचेहि निर्बन्ध व्यवस्थितपणें घातलेले असतात. या दोन्ही प्रकारच्या निर्बंधांमुळें कां होईना, मनुष्याच्या व्यवहारास काय किंवा स्वभावास काय एक प्रकारचें सुवळण लागत असतें; ही गोष्ट नाकबूल करून चालावयाचें नाहीं. तरीपण, प्रत्यक्ष अनुभव आपणांस एक गोष्ट सांगतो कीं, मानवी मनाचे व्यापार व त्याचे समाजिक व्यवहार या दोन्हीमध्यें एकसूत्रीपणाचा-सत्याचा धागा पुष्कळ वेळां गोंविलेला असत नाहीं. म्हणूनच सभ्यपणा (Gentlemanliness) हा गूण मनुष्याच्या बाह्यवर्तनांत मूर्तिमंत उतरत असलेला पुष्कळ प्रसंगीं दिसून येत नाहीं. याला उपाय एकच कीं, इच्छाशक्तीवर ताबा, सद्बुद्धि व सत्यपूर्ण वागणूक-मग प्रसंग कसा कां असेना-इतक्या गोष्टींची जोड असली ह्मणजेच मनुष्यास नीतीदृष्ट्या सुव्यवहार करण्यास काहींच वाटत नाहीं. व असा व्यवहार त्याच्या अंगवळणी पडत चालला म्हणजे 'दंभ दर्पादि आसुरी संपत्तीस' तो पारखा होत जातो.

(९) महाभारतांतील वनपर्वांत (अ. २९७) 'शिष्ट आणि शिष्टाचार' या विषयीं सांगताना मार्कंडेयास व्याध म्हणतो, 'अहिंसा, सत्य भाषण, घातुकपणाचा अभाव, सरलता, द्रोहशून्यत्व, अभिमानशून्यता, लोकलज्जा, सहिष्णुता, इंद्रियनिग्रह आणि शांति ह्या गुणांनीं संपन्न असणारे ज्ञानी, धैर्यसंपन्न, प्राण्यांवर दया करणारे व काम आणि द्वेष ह्यांनीं युक्त नसणारे जे सज्जन ते लोकांस प्रमाणभूत होत......कोणासहि नांवें न ठेवणें, क्षमा, शांति, संतोष, प्रिय भाषण, काम क्रोधांचा अभाव, शिष्टाचारांचें अवलंबन आणि शास्त्रास अनुसरून कर्म करणें हा सज्जनांचा उत्कृष्ट मार्ग होय'......हा सर्व अध्याय फार बहारीचा असल्यामुळें तो प्रत्येकानें एगदा तरी वाचून ठेवावा, अशी त्यास शिफारस आहे. हा अध्याय वाचला असतां आपल्याकडील तत्त्वज्ञान्यांनीं लोकव्यवहाराचें चिकित्सापूर्वक निरीक्षण करून सज्जनांचा मार्ग कोणता, याविषयींचा उत्तम उहापोह केल्याचें दिसून येणार आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं, आपलें आजमितीस आपल्या धर्मविषयक म्हणा, प्राचीन तत्वज्ञानांच्या अशा ग्रंथांकडे जावें तसें लक्ष जात नाहीं.' ही स्थिति शोचनीय होय, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. असो.

'अथेन्समधील लोकांपुढें भाषण करतांना प्रसिद्ध वक्ता पेरिक्लीज एकदा म्हणाला.[1]

'धान्य, दारू व तेल ह्या जिनसा उत्पन्न करण्याविषयींची प्रसिद्धी दुसऱ्या शहरांची असो, पण (कर्तबगारीची-शीलाची) माणसें निर्माण करण्याविषयीं अथेन्सची मात्र प्रसिद्धि आहे; त्याचप्रमाणें ज्या हिंदुस्थानांत श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, धर्म, हरिश्चंद्र...यासारख्या पौराणिक व्यक्ती, श्री शिवाजीमहाराज चिमाजी आप्पा, रामशास्त्री प्रभूणे किंवा साध्वी अहिल्याबाई यासारखीं ऐतिहासिक नर व स्त्रीरत्नें उत्पन्न झाली, ज्यांनीं आपल्या सद्वर्तनानें आपल्या देशासच नव्हे तर अखिल जगास शीलाचा मार्ग प्रामुख्यानें दाखवून दिला, त्या देशाचा भविष्यकाळ उज्वल असणारच; यांत शंका नाहीं. आतां, जगांतील बलाढ्य राष्ट्रें आज आधिभौतिक शास्त्राच्या मागें लागलेलीं असलीं तरी आपली भरतभूमी शीलवान माणसाची निपज अधिक अधिक प्रमाणांत करीत राहून आपली उज्वल परंपरा कायम राखीत जाणार, ही गोष्ट आजमितीस तर स्पष्ट दिसत आहे.

प्रकरण बारावें.

" कर्तव्यबुद्धीची मीमांसा."

" कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥"

गी. २-४७.

अर्थः—' कर्म करण्यापुरता तुझा अधिकार आहे: फल मिळणें वा न मिळणें ही गोष्ट तुझ्या ताब्यांतली नाहीं; अमूक फल मिळावें, असा हेतु मनांत धरून काम करणारा होऊं नको; आणि कर्मं न करण्याचाहि तूं आग्रह धरूं नको.'

मनुष्य कोणत्याहि परिस्थितींत असो, त्याच्या पाठीमागें ' कर्तव्यां'चा लकडा आपला लागून चुकला आहेच. हा लकडा त्यास टळत नाहीं, टाळण्याचा त्यानें यत्न केलाच तर, संसारांत त्यास कटु अनुभव येऊन त्याच्या

---

1. 'While other states were famous for growing corn wine and oil, Athens was famous for growing men.

मनाची समता ढळल्याशिवाय रहात नाहीं, हीच गोष्ट जगांतील अनुभव आपणांस सांगत नाहीं काय ? संसाराचें जूं एकदां मानेवर घेतलें म्हणजे मनुष्यानें कर्तव्यास पारखें राहून चालावयाचें नाहीं. आतां कर्तव्य म्हणजे काय, व तें केलेंच पाहिजे या दोन गोष्टींची जाणीव समाजांतील पुष्कळ माणसांस त्यांच्या चाललेल्या व्यवहारांवरून असत नाहीं, असें खेदानें ह्मणावें लागतें ! कर्तव्य !–छेः 'कर्तव्य' तें कसलें असतें ? ती काय वस्तु आहे ? अशी पृच्छा करणारे अजूनहि कांहीं चार्वाकबहादुर समाजांत निघतीलच निघतील ! ' ऋण काढून तुपाची वाटी झोंकत रहावी ! मेल्यावर कोण काय खाणार !' अशीच या लोकांची भावना असते; व त्यांचा सर्व विचार 'मी व माझें' याविषयीं चाललेला असतो. किंबहुना त्यांच्या सर्व विचारांचें केंद्र 'मी'–असें म्हणणें जास्त शोभेल !–असतें ! गीतेंत म्हटलें आहे कीः—

' ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी '

गीता १६–१४.

' मीच ईश्वर, मीच भोग घेणारा, मीच सिद्ध, मीच बलवान् व मीच सुखी.' असें जें वर्णन तें वरील चार्वाक बहाद्दरांचें होय. व अशा चार्वाकांचे वंशज आज समाजांत नाहींत, असें छातीला हात लावून सांगण्याची प्राज्ञा कोणाची आहे ! आपण कोणत्या परिस्थितींत आहोंत, आपण आपल्या कुटुंबाकरितां म्हणून, समाजाकरितां म्हणून, स्वदेशाकरितां म्हणून किंवा स्वतःकरितां म्हणून कर्तव्य या दृष्टीनें काय केलें पाहिजे याविषयींची अंधुक कल्पना त्यांस नसल्यामुळें, किंवा तशी कल्पना असून सुद्धां तिकडे जाणून बुजून काणा डोळा केल्यानें त्यांच्या हातून पार पडावें तसें कर्तव्य पार पाडिलें जात नाहीं. ही वस्तुस्थिति शोचनीय खरीच, असेंच कोणीहि म्हणणार ! जन्मास यावयाचें म्हणजे कसें बसें जगावयाचें व वेळ आली ह्मणजे जावयाचें ! अशाच तऱ्हेच्या वस्तुपाठाचा धडा समाजांत आजमितीस किती तरी लोक गिरवीत असल्याचें दिसून येईल. अशा लोकांच्या जगण्यापासून दुसऱ्यांस उपयोग होत नाहीं तो नाहींच; पण स्वतः त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें कांहीं होतो म्हणावें तर, तोहि नाहीं. !, मानव सृष्टींत व इतर जीवसृष्टींत ईश्वरानें जें अंतर ठेविलेलें आहे, तें हें कीं, जीवजंतूनां काय किंवा पशुपक्ष्यांना काय किंवा जनावरांना काय, स्वतःच्या गरजा भागविण्यापलिकडे त्यांस कांहीं

पहावें लागत नाहीं; किंवा त्यांची दृष्टि जात नाहीं. पण, मनुष्यप्राण्यास स्वतःकडेच नव्हे तर दुसऱ्याकडे-समाजाकडे पाहून आपण काय काय कर्तव्यें बजावलीं पाहिजेत, याविषयींची जाणीव त्यास होऊन तीं तीं करून टाकण्यांतच त्याचें काय तें वैशिष्टय होय. त्याच्या हातून हीं कर्तव्यें जर बजाविलीं जाणार नाहींत, तर भर्तृहरीनें 'पुच्छविशाणहीनः' या बहाल केलेल्या पदवीचा त्यानें आदरानें स्वीकारहि पण केला पाहिजे. निसर्गनियमानुसार त्याच्या मागें ही कर्तव्यपरंपरा अशी लागलेली आहे कीं ती पार पाडण्यास त्याचें आयुष्य पुरेसें होणार नाहीं! तरीपण, हीं कर्तव्यें तरी काय? तीं बजावण्याचे मार्ग कोणते? आपली परिस्थिति काय, अशा प्रश्नांचा सारासार बुद्धीनें विचार करून पितृऋण, समाजऋण, देवऋण व स्वतःचें ऋण अशीं आपल्या शास्त्रकारांनीं सांगितलेलीं चार प्रकारच्या ऋणांची फेड मनुष्यानें केली पाहिजे, अशीच त्यास ईश्वरी अनुज्ञा आहे.

आतां, ह्याच ठिकाणीं मनुष्याचें कर्तव्यक्षेत्र किती विस्तृत आहे याचा विचार करणें सोईचें होणार आहे. गॉटेच्या 'वुइल्हेल्म मीस्टर' नांवाच्या चटकदार कादंबरींत धर्माचें क्षेत्र किती विस्तृत आहे, याचा विचार केलेला आहे, तोच तंतोतंत कर्तव्यक्षेत्रास लागूं पडणार असल्यामुळें किंबहुना, कर्तव्याच्या भल्या भक्कम बांधाऱ्यावरच धर्माची उभारणी होत असल्यामुळें त्या कादंबरींतून जरुरीपुरता याठिकाणीं उतारा घेतला आहे:[1]

---

1. 'We must fancy Wilhelm in the Pedagogic province, proceeding towards the chief or the three with intent to place his son under their charge in that wonderful region 'where he was to see so many singularities,......The youngest laid their arms acrosswise over their breasts, and looked cheerfully up to the sky; those of the middle size held their hands on their backs, and looked smiling on the ground; the eldest stood with a frank and spirited air their arms stretched down, they turned their heads to the right, and formed themselves into a line; where as the others kept separate, each where he chanced to be.

The riders having stopped and dismounted here, as several children in their various modes, were standing

'वुइल्हेल्म नांवाचा एक सद्‌गृहस्थ आपला मुलगा गुरूच्या घरीं शिक्षणाकरित ठेवण्यास म्हणून गेला असतां, त्यास गुरु कुलाच्या अद्भुत प्रदेशांतील खालील चमत्कार दृष्टीस पडले.

---

forth to be inspected by the overseer, Wilhelm asked the meaning of these questions......Three kinds of gestures you have seen ; and we inculcate a threefold reverence, which when commingled and formed into one whole attains its full force and effect. The first is reverence for what is above us. (All Heathen religions as we call them are of this sort, whatsoever names they may bear). That posture. the arms crossed over the breast the look turned joyfully towards heaven ; that is what we have enjoined on young children; requiring from them thereby a testimony that there is a God above, who images and reveals himself in parents, teachers, superiors.

Then comes the second :—Reverence for what is under us. (The second religion, which finds itself on reverence for what is around us, we denominate the Philosophical; for the Philosopher stations himself in the middle, and must draw down to him all that is higher and up to him all that is lower, and only in this medium condition does he merit the title of wise. Here, as he surveys with clear sight his relation to his equals and therefore to the whole human race, his relation likewise to all other earthly circumstances and arrangements necessary or accidental he alone in a cosmic sense lives in truth.)

Those hands folded over the back and as it were tied together, that down turned smiling look announce that we are to regard the earth with attention and cheerfulness, from the bounty of the earth we are nourished; the earth affords unalterable joys but disproportionate sorrow she also brings us. Then we bid him gather courage. Now at last, he stands forth frank and bold ; not selfishly

(१) गुरुकुलामध्यें सर्वांत लहान मुलें जीं होतीं, तीं हात जोडून आकाशाकडे वर पहात उभी राहिलीं होतीं.

(२) मध्यम वयाचीं मुलें पाठीमागें हात करून स्मितहास्य करीत भूमातेकडे अधोवदन करून उभीं होतीं.

(३) व सर्वांत थोर मुलें पाणीदार व आनंदयुक्त चेहऱ्यांनीं हात सरळ ठेवून आपापलीं डोकीं उजवीकडे वळवून एका रांगेनें उभी राहिलेलीं होतीं. बाकीचीं मुलें जेथें असावयाचीं तेथेंच होतीं.

जेव्हां मुलांचा गुरु त्यांची तपासणी करण्याकरितां आला, तेव्हां, वुइल्हेल्मनें त्या मुलांच्या निरनिराळया उभ्या राहण्याच्या तऱ्हांचा अर्थ काय म्हणून त्यास प्रश्न केला.

गुरूजी उत्तरले:—मुलांच्या उभ्या रहाण्याच्या तीन तऱ्हा तुम्ही पाहिल्या. या तीन तऱ्हा मुलांच्या अंगीं एकवटल्या म्हणजे अर्थातच त्यांचा इष्ट परिणाम मुलांच्या (शीला)वर जबर होत असतो. आपल्यावर जी कांहीं सृष्टि आहे तीबद्दल वाटत असलेला आदर व्यक्त करून दाखविण्याची तऱ्हा पहिली. (मग अशा धर्मास तुम्ही मूर्तिपूजक-रानटी लोकांचा धर्म-म्हणा वाटेल तर.) हा आदर व्यक्त करण्याकरितां छाति वर काढून हात जोडून आकाशाकडे तोंड करून सर्व लहान मुलांनीं उभे रहावें, असा निर्बन्ध (गुरुकुळांत) घातलेला आहे. उद्देश एवढाच कीं, ईश्वर आहे व त्याचीच प्रतिमा आपणांस माता, पिता, गुरु व वडील धारी मंडळीं यांच्या ठिकाणीं प्रतिबिंबीत झालेली दिसून येत असते, अशा तऱ्हेची उदात्त भावना लहान मुलांची असावी.

उभी रहाण्याची दुसरी तऱ्हाः—आपल्या भोंवतालच्या सृष्टीविषयीं वाटत असलेला आदर व्यक्त करण्याकडे या तऱ्हेवा उपयोग होत असतो. अशा तऱ्हेच्या आदरयुक्त भावनेच्या माणसास तत्त्वज्ञान्याची पदवी योग्य आहे; कारण तत्त्वज्ञान्याच्या दृष्टीस वरील सृष्टि दृग्गोचर होत असून खालील

---

isolated, only in combination with his equals does he front the world. Third religion grounded on Reverence for what is under us : this we name the christian......In their union, they produce what may properly be called the true religion, Reverence for oneself......,

सृष्टीहि त्याच्या दृष्टिपथांत येईल अशी वर चढत असते. अशाच तत्त्वज्ञान्यास मानवजातीचे वागण्याचे नियम काय आहेत, हें माहीत असतें; व प्रचंड विश्व ज्या नियमांनीं चाललें आहे, त्याच नियमांच्या द्वारानें सृष्टपदार्थांच्या रचनेचे धागे त्यास उकलत असून तोच तत्त्वज्ञानी सत्यमय सृष्टींत वास करीत रहातो.

तिसरी तऱ्हा म्हणजे पाठीवर जोडलेले हात असून खाली पाहाणारी हास्यमुद्रा. ही तऱ्हा येवढेंच सुचवितें कीं, भूमातेकडे आपण लक्षपूर्वक पण आनंदयुक्त चेहऱ्यानें पाहिलें पाहिजे. कारण, तिच्यापासूनच आपणांस धान्य मिळत असतें, व त्यायोगें आपलें पोषण होतें; तिच्यापासून अनिर्वचनीय अशा आनंददायक वस्तूंचा लाभ होत असतो; तर केव्हां केव्हां भूमातेपासूनच आपणांवर अमर्याद अशी दुःखपरंपरा कोसळत असते ही कांहीं खोटी गोष्ट नव्हे. अशी दुःखपरंपरा आली असतां आम्ही त्यास धीर धरावयास सांगतों. याचा परिणाम असा होतो कीं, त्याच्या आनंदयुक्त वृत्तीच्या ठिकाणीं धिटाईच्या वृत्तीचें ठाणें येऊन बसतें. स्वार्थावर त्याची दृष्टि खिळून रहात नसल्यानें बरोबरीच्या नात्यानें त्यास जगांतील व्यवहारांत तोंड देतां येतें. ह्या तिसऱ्या प्रकारच्या धर्माची इमारत भूमातेविषयीं वाटत असलेल्या आदरयुक्त भावनेच्या पायावर उभारलेली असते; व ह्याच धर्माचें नांव ख्रिस्ती धर्म. हे तिन्ही धर्म एकवटले असतां मनुष्याचा खरा धर्म प्रस्थापित होत असतो; व नंतरच त्याच्या स्वतःस स्वतः विषयींचा योग्य तो आदर वाटूं लागतो,......

वरील सुंदर उताऱ्यावरून हे तिन्ही धर्म बरोबर रीतीनें पाळतां येण्यास कर्तव्यक्षेत्र किती अफाट आहे व हीं कर्तव्यें बजाविलीं तरच मनुष्याच्या खऱ्या धर्माचें कसें पालन होतें, याविषयीं यथार्थ कल्पना होणार आहे.

साहजिकपणेंच या ठिकाणीं असा एक प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे कीं, काय हो, हीं कर्तव्येंच मुळीं कां म्हणून करावींत ? या प्रश्नास उत्तर येवढेंच कीं, 'कर्तव्य कर' अशी मनुष्यास ईश्वरी आज्ञा असते म्हणून. ही अनुज्ञा पाळली असतां आपलें ऐहिक काय, किंवा पारमार्थिक काय,–श्रेयस प्रेयस् यांचा लाभ होतो म्हणून; व अशीं कर्तव्यें बजाविलीं असतांनाच मनुष्याचें मनुष्यत्व टिकतें व तो आपलें 'वैशिष्टय' या जगांत कीर्तीरूपानें गाजवून ठेवितो म्हणून.

आतां, कर्म=काम, कृत्य, उद्योगधंदा, नशीब, व कर्तव्य=अवश्य कर्म (वा. गो. आपटे यांचा कोश पाहा.)

"न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्"

—"कारण कोणी झाला तरी कर्म केल्यावांचून क्षणभर देखील केव्हांहि रहात नाहीं." या न्यायानें मनुष्यप्राणीच काय, पण जीवजंतू, पशुपक्षी यांच्या मागेंहि तें लागलेलें आहेच. आपल्या धारणपोषणार्थ अवश्य कर्में-कर्तव्यें त्यांनासुद्धां करावीं लागतात. तद्वत् मनुष्यप्राण्यास स्वतःच्या धारणाकरितां म्हणून अवश्य कर्में करावींच लागतात. पण हीं कर्में करावयाचीं तीं करून पुनः त्याला आपल्या समाजाकरितां म्हणून अवश्य कर्में करावीं लागतात; हाच मनुष्यप्राण्याच्या बाबतींत काय तो विशेष आहे. ही सामाजिक दृष्ट्या कर्म करण्याची दृष्टि इतर जीवसृष्टींत नसते. असो.

महाभारतांतील उद्योगपर्वांतर्गत संजययानपर्वांत अ. २९ कर्मप्रशंसा -कर्तव्यप्रशंसा ह्मणणें जास्त शोभेल-केलेली आहे; त्यांत असें ह्मटलें आहे कीं:—' स्वर्गांत हे देव जे झळकतात, ते कर्मांच्याच योगानें; या लोकीं रात्र व दिवस करणारा सूर्य जो सतत दक्ष राहून वेळचे वेळीं उगवतो, तें कर्मांचेंच सामर्थ्य; चंद्रहि दक्षतेनें मास, पक्ष, नक्षत्र, योग वगैरे करितो, तो तरी कर्मांचाच प्रभाव; इंधनें घातलीं असतां, एकसारखा जळून अग्नि लोकांना प्रकाश देतो, हें तरी कर्मच; त्याचप्रमाणें पृथ्वीमाता केव्हांहि न चुकतां एवढा विशाल भार नेटानें सोसते हें तरी कर्मांचेंच प्राबल्य; नद्या तत्पर राहून आपल्या पात्रांतून सत्वर उदक वाहून नेतात, आणि जलानें भूतमात्रांची तृप्ति करतात, हाहि कर्मांचाच प्रकार............तसेंच, इंद्र बृहस्पति, एकादश रुद्र, द्वादश आदित्य, अष्टवसु, विश्वेदेव, यमराजा, वैश्रवण, गंधर्व, यक्ष, अप्सरा हीं सर्व कर्मानेंच प्रकाशमान होत असतात. सारांश, परांकरितां अवश्य कर्मांचा-कर्तव्यांचा लकडा जर सृष्टीच्या मूलभूत तत्त्वांमागेंसुद्धां लागलेला आहे व सृष्टीचीं मूलतत्त्वें तीं खुषीनें आजवर करीत आलेलीं आहेत, तर मनुष्यप्राण्यानें या अवश्य कर्मांबद्दल उगीच कुरकूर करीत कां रहावें कोणास ठाऊक? ईश्वरी योजना अशी दिसून येते कीं, सृष्टीचे व्यापार ह्मणा-तिचीं कर्तव्यकर्में ह्मणा, (जीं आजवर खंड न पडतां सुरळीत चाललेलीं आहेत) मनुष्यानें आपल्यापुढें आदर्शवत् ठेवावींत; व तितक्याच तत्परतेनें

त्यानें आपलीं समाजविषयक कर्तव्यें बजावीत रहावें. सृष्टीच्या व्यापारांमध्यें नियमितपणा व टापटीप हे गूण प्रामुख्यानें झळकत असल्यामुळें सर्व सृष्टीमध्यें शांतता वसत असते. हेच गूण मनुष्यप्राण्यानें उचलून त्यानें समाजविषयक कर्तव्यें योग्य तऱ्हेनें बजावलीं तर, त्याच्याहि समाजांत संतोष-आनंद यांचें अधिष्ठान कां होणार नाहीं बरें ? परंतु, आपल्या समाजस्थितीचें पर्यालोचन करून आपण आपलीं कौटुंबिक, समाजिक कर्तव्यें कितीशीं बजावीत राहिलों आहोंत ? त्यामुळें आपल्या सामाजाची स्थिति कितपत समाधानकारक आहे, याविषयींचा निर्णय दुसऱ्यानें स्पष्ट सांगण्यापेक्षां स्वतःच्या स्वतःनेंच विचार करून काय तो केलेला चांगला.

या ठिकाणीं असा एक प्रश्न उद्भवण्यासारखा आहे कीं, 'अहो, तुमचीं हीं कर्तव्यें आहेत तरी काय, तीं सांगा. तेवढीं केलीं झणजे झालें ? पण, याचें उत्तर असें कीं, अमूक अमूक कर्तव्यें तुह्मीं करावयाचीं असतात, हें आह्मी तरी सांगावें कसें ? कारण, आपण नुकतेंच पाहिलेलें आहे कीं, कर्तव्यक्षेत्र इतकें अफाट आहे कीं, माणसानें आपल्या रुचिवैचित्र्यानुसार, परिस्थित्यनुसार अगर शिक्षणानुसार त्या क्षेत्रांतील कर्तव्यें हुडकून काढून तीं तीं बजावीत राहिलें पाहिजे. मनुष्याला स्वतःकरितां झणून व ज्या समाजाचा तो एक घटकावयव आहे त्या समाजाकरितां झणून, कोणता ना कोणता तरी एक धंदा करावा लागतोच; हें सुद्धां एक अवश्य कर्म असून निरपेक्षबुद्धीनें 'कर्तव्य झणून कर्तव्य करावयाचें' या सद्भावनेनें त्यानें तें केलें असतां त्याचें स्वतःचें धारण पोषण होत असतें एवढेच नव्हे तर ज्या समाजाकरितां झणून तो धंदा करितो त्या समाजाची सेवाच त्यानें केली असें म्हणतां यावयाचें नाहीं काय ? व हा मार्ग साधारण मनुष्यास सुद्धां अनुसरतां यावयाचा नाहीं, असें समंजस मनुष्य कदापि म्हणणार नाहीं. सेंटपॉल झणतो:—[1] ' प्रत्येकानें आपलें कर्म, मग जें त्याच्या वांट्यांस आलेलें आहे, तेंच एकनिष्ठेनें करावें. (हाच त्याचा धर्म.)' महंमदपैगंबराकडे एकदा एक स्त्री गेली, व मोक्ष मिळविण्यास आपण काय करावें, असा तिनें त्यास प्रश्न केला. तेव्हां, पैगंबरनें त्या बाईला उपदेश केला कीं, 'तूं आपली धान्य दळीत जा.' पुनः

1 Let every man abide in the same calling where he is called.

त्यानें तिला सांगितलें कीं, ' तुझ्या आयुष्यामध्यें तूं आपल्या समाजांतील लोकांची-आपल्या देशाची अशा रीतीनें सेवा केलीच पाहिजे. त्यायोगें तुला मोक्ष मिळेल.' साक्रेटीसनें सुद्धां आपल्या शिष्यास असेंच शिकविलें कीं,[1] ' ज्या देशांतील लोक आपापलीं प्राप्त कर्में काळजीपूर्वक व निःपक्षपातानें करितात, तोच देश नीतिदृष्ट्या व शारिरीकसामर्थ्यदृष्ट्या बलवान् होय.' या सर्व वचनांवरून स्वतःचा धंदा, मग तो कोणत्याहि प्रकारचा कां असेना, समाजदृष्ट्या तो 'आपलें एक कर्तव्य' कसा होऊन बसतो, व तो धंदा एकनिष्ठेनें केला असतां समाजविषयक कामगिरी अंशतः कां होईना, आपल्या हातून कशी होत जाते, याविषयींची ठळक कल्पना येणार आहे.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून मनुष्याच्या मागें कर्तव्य कसें लागून चुकलें आहे, कर्तव्यक्षेत्र किती विस्तृत आहे, व हीं कर्तव्यें ज्यानें त्यानें आपापल्या परिस्थित्यनुसार, बुध्यनुसार व शिक्षणानुसार कशी ठरवावयाचीं व स्वतःचीं कर्तव्यें निरपेक्ष बुद्धीनें केलीं असतां तींच समाजविषयक कर्तव्यें होऊन आपल्या हातून समाजविषयक कामगिरी कशी होते, अशा गोष्टींविषयीं जरूर तो विचार केला. आतां जगांतील व्यवहाराचें पर्यालोचन करून प्रस्तुत विषयाबावत काय काय गोष्टी दिसून येतात तें पाहूं.

विषयप्रतिपादनाच्या सोयीकरितां आपण पहिल्याप्रथम आपल्याकडील कौटुंबिक कर्तव्यांची स्थिति सामाजिक दृष्ट्या कशी होऊन बसलेली आहे हें पाहिलें पाहिजे. हल्लींच्या या आधिभौतिक युगांत मनुष्य प्राणी हीं कौटुंबिक कर्तव्यें योग्य रीतीनें पार पाडीनासा झालेला आहे. आधिभौतिक शास्त्रांचें परिश्रमपूर्वक अध्ययन केल्यानें सुखसोयी त्यास मिळाल्या ह्मणून कीं काय कोण जाणे, मातापित्यांस मुलगा विचारीनासा झाला आहे, तर बहीण भावास पुसेनाशी झालेली दिसून येत आहे ! मग इतर आप्तगोतांचे संबंध किती ताणून गेलेले असतील याची नुसती कल्पनाच करणें सोईचें होणार आहे. ही त्याची तुसडेपणाची वृत्ति स्वार्थाच्या भक्कम पायावर उभारलेली असल्यानें ती त्यास आज एकलकोंडेपणानें रहाण्यास भाग पाडीत आहे ! त्यामुळें आज कुटुंबांत काय, किंवा समाजांत

1 That country is strong and sound in which each person minds his own business.

काय, प्रत्येक व्यक्ति निराळी, तिचे आचारविचार निराळे, मनाचे धर्म वेगळाले, अशी शोचनीय स्थिति असल्यावर तें कुटुंब ह्मणा किंवा समाज ह्मणा, विस्कलीत झाला असल्यास नवल काय ? समाज सुस्थितींत रहाण्यास प्रथम प्रत्येक कुटुंब सुस्थितींत रहाणें जरूर आहे. ही सुस्थिति राखतां येण्यास परस्परांनीं एकमेकांमधील संबंध राखण्याकरितां उदार मनानें परस्पर-विषयक कर्तव्यें बजावीत राहिलें पाहिजे. परस्परांमधील जिव्हाळ्याचे संबंध जिव्हाळ्यानेंच संभाळले पाहिजेत. दुःखाची गोष्ट ही कीं जिव्हाळ्याचा ओलावा दुर्मीळ होऊन बसल्यानें पुष्कळ कुटुंबांची घडी विस्कळीत होऊन गेलेली आहे, व याचा अनिष्ट परिणाम अर्थात् समाजावर घडून आला असल्यास आश्चर्य काय ?

आतां, समाजविषयक कर्तव्य मनुष्याकडून कितीसें बजाविलें जात आहे हें पहातां, पुनः तीच दुःखाची कहाणी सांगावी लागत आहे. आपण समाजाचे एक अवयव आहोंत, व आपलें कर्म समाजहिताचें किंवा अहिताचें परोक्ष, अपरोक्ष, कधीं कधीं कालांतरानें कां होईना, कसें कारणीभूत होत असतें-ही भावना मनुष्यास आज कितपत आहे, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ईश्वरेच्छनुसार जी परिस्थिति तुह्मांस दिलेली आहे, ज्या शक्त्यांची जोड ईश्वरानें तुह्मांस 'खैरात' करून टाकलेली आहे, त्या त्या परिस्थित्य-नुसार व शक्त्यनुसार समाजांत 'प्राप्त कर्तव्यें' जीं असतील तीं खरेपणानें बजावीत राहिलें पाहिजे. अशा तऱ्हेची जाणीव त्यास सहसा नसते, ही दुःखाची गोष्ट होय. समाज तरी काय, विस्तृत प्रमाणावर तो एक कुटुंबच होय. गीतेंतील '**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्म-बंधनः**' गीता. ३·९ या श्लोकावर श्रीज्ञानदेवाची टीका अशी आहे:—

'स्वधर्म जो बापा । तोचि नित्य यज्ञ जाण पां ।
ह्मणोनि वर्ततां तेथ पापा । संचार नाहीं ॥
हा निजधर्म जैं सांडे । आणि कुकर्मीं रति घडे ।
तैंचि बंध पडे । सांसारिक ॥
ह्मणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञ याजन ।
जो करी तया बंधन । कांहींच न घडे ॥
हा लोक कर्में बंधला । जो परतंत्रा भुलला ।
तो नित्य यज्ञातें चुकला । म्हणोनियां ॥

या ओव्यांतील स्वधर्म या शब्दाचा 'समाजतः स्वकर्तव्य' हाच अर्थ घेणें प्रशस्त होणार आहे. प्रत्येक कुटुंबानें आपला स्वधर्म–स्वकर्तव्य आचरिलें असतां सर्व समाजाची सुसंघटित घटना होणार आहे. आपल्याकडील वर्णाश्रमव्यवस्थेचीं बंधनें कालमानाप्रमाणें आज सैलावलेलीं असलीं तरी तीं तीं कर्में आजसुद्धां बजाविलीं जात आहेतच. त्याशिवाय समाज चालावयाचा नाहीं. पण मुख्य प्रश्न असा कीं, हीं समाजविषयक कर्तव्यें आज समाजाकरितां ह्मणून, किंवा निवळ स्वार्थप्रेरित बुद्धीनें स्वतःकरितां ह्मणून बजाविलीं जात आहेत? यापैकीं दुसराच मार्ग बहुतेकांनीं आजमितीस तरी स्वीकारलेला असल्याचें दिसून येईल. आपण व्यापारी असलों काय, वकील झालों काय, सुतार–लोहार बनलों काय, फाजील स्वार्थबुद्धीस आळा घालून आपापला धंदा निःसीमपणानें करावयाचा, अशी भावना असल्यावर व तदनुसार हांतून कृति घडून आल्यावर मग काय हवें? परंतु भावना उदित होणें व हांतून कृति उतरणें यांमध्यें अंतर फार आहे; याबाबत आंग्ल कवि "यंग" याचें 'रात्रीच्या वेळचे विचार' या नांवाचें सुंदर काव्य आहे; त्यांत तो [1]ह्मणतोः—

'मनुष्याला आपल्या मूर्खपणाचा संशय त्याच्या वयाच्या तिसाव्या वर्षाच्या सुमारास येत असतो. चाळिशीच्या अदमासास त्यास तो पटतो. मग त्याला आपला रस्ता सुधारण्याची बुद्धि होते, पण हांतून तदनुसार कृति उतरण्यांत फाजील दिरंगाई होत गेल्यामुळें स्वतःचीच निर्भत्सना पन्नाशीच्या गांठीला तो करीत असतो, व त्यावेळीं पोक्तपणाचा विचार करून पोक्त बेत काय जो ठरवावयाचा तो ठरवितो. त्यांत दुरुस्तीला सुरुवात होते न होते तोंच तो 'राम' ह्मणत असतो!'

---

1 'At thirty man suspects himself a fool;
Knows it at forty and reforms his plan:
At fifty chides his infamous delay,
Pushes his prudent purpose to resolve;
In all the magnanimity of thought
Resolves; and re-resolves: then
dies the same.
Young, Night Thoughts; Night 1-417-22.

अशीच समाजांतील पुष्कळ लोकांची रहाटी होऊन बसलेली आहे. त्यामुळें समष्टीरूपानें समाजसेवा जशी व्हावयास पाहिजे तशी होत नाहीं ही फार केविलवाणी स्थिति आहे. आज समाजसुधारणाविषयक व देशाच्या उन्नतिबाबत किती तरी काम आहे; पण, तें अंगावर घेऊन करून दाखविण्याची बुद्धि होत नाहीं व बुद्धि झाल्यास अंगांत हिंमत तग धरून रहात नाहीं, त्यामुळें कामाचा बोजा उठावा तसा उठत नाहीं; व पुष्कळांची 'यंग' कवीनें वर्णन केल्याप्रमाणें स्थिति होऊन जात असते. याबाबत एवढेंच सुचवावयाचें कीं, मोठमोठ्या समाजविषयक म्हणा किंवा देशविषयक म्हणा, कामगिऱ्या अंगावर घेऊन त्या पार पाडण्याचें तुमच्या अंगीं बौद्धिक नैतिक सामर्थ्य नसेल तर नसो, तुमची परिस्थिति त्या दिशेनें अनुकूल नसेल तर नसो, पण, निवळ पोटाकरितां म्हणून जो उद्योग सामान्यतः मनुष्य करीत असतो, तोच महंमद पैगंबरानें वर सांगितल्याप्रमाणें सामाजिक कर्तव्य म्हणून केला व चोख रीतीनें तो पार पाडून दाखविला, तरी सुद्धां समाजविषयकच काय, पण देशाची सुद्धां चांगली कामगिरी करून दाखविल्याचें श्रेय प्रत्येकास कां लाभणार नाहीं, हें कळत नाहीं.

आतां, कर्तव्य योग्य तऱ्हेनें बजावण्यास आपल्या अंगीं कोणते गूण लागतात, हें पाहूं.

(१) मुख्य गोष्ट अशी कीं, परमेश्वरानें आपणांस ज्या परिस्थितींत निर्माण केलें आहे, ती परिस्थिति अनुकूल असो वा प्रतिकूल असो, कुरकुर न करितां समाधानवृत्तीनें आपलें कर्तव्य कोणतें, हें शोधून काढून तें करीत रहाण्याची बुद्धि त्यानें वागविली पाहिजे. मनुष्याच्या आयुष्यक्रमांत फेरबदल चालले आहेत, व तसेच ते होत जाणार; म्हणून तोटा आला असतां कष्टी व्हावयाचें नाहीं, व नफा झाला असतां हर्ष होऊं द्यावयाचा नाहीं, किंबहुना दुःख व आनंद अशा द्वंद्वावरहि आपला ताबा चालवून मनाची समता मनुष्यानें ढळवितां कामा नये. हीच शिकवणूक गीतेंतील पुढील श्लोक आपणास देत आहे:—

" सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ " गीता २-३८

अर्थः—'सुखदुःख, नफानुकसान आणि जयापजय सारखे मानून नंतर लढण्यास (कर्तव्य बजावण्यास) सुरुवात कर; म्हणजे तुला पाप लागणार नाहीं !'

गीतेंतील ह्या शिकवणुकीची मीमांसा करितां असें दिसून येतें कीं, कर्म करीत असतां जयापजयावर-सुखदुःखावर मनुष्याची दृष्टि खिळून रहातां कामा नये; व तशी ती राहिल्यास त्याच्या कर्तव्याचरणामध्यें कमतरता येण्याचा संभव असतो. सुखदुःखावर पाणी सोडून जयापजयाची पर्वा न करून धडाडीनें कर्तव्याचरण घडलें असतां तें शंभर नंबरी उतरतें, हीच व्यवहारदृष्ट्या कायती गुरुकिल्ली गीतेंतील उपदेशामध्यें असल्याचें दिसून येतें. म्हणूनच उपदेशाचा हा रोख मनांत बागवून कायेनें, वाचेनें, मनानें कर्म करीत राहिलें असतां आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा होत असून निसर्गाच्या नियमानुसार जयहि प्राप्त होत असतो. म्हणून 'कर्म करणें आपलें काम, फल देणें ईश्वराचें काम' हीच दृष्टि मनुष्यप्राण्यानें व्यवहारांत धरून कर्तव्य बजावलें असतां तें योग्य तऱ्हेनें त्याच्या हातून पार पडेल, असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. महाभारतांतील शांतिपर्वांत व्यासांनीं युधिष्ठिरास असेंच सांगितलें आहेः—

'सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम्।
'प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः॥

अर्थः—'सुख असो वा दुःख असो, प्रिय असो वा अप्रिय असो, जें ज्या वेळीं जसें प्राप्त होईल, तें त्यावेळीं मनाचा हिरमोड होऊं न देतां (म्हणजे खट्टू होऊन आपलें कर्तव्य न सोडतां) सेवीत जा.

(२) कर्तव्य करीत रहावयाचें व तें सुद्धां आतां सांगितलेल्या दृष्टीनें. एवढें ठरवून टाकल्यावर आपल्या हातून कोणतें कर्म व्यवहारांत होण्याजोगें आहे, हें आपल्या अंगच्या गुणांची चिकित्सापूर्वक परीक्षा करून, परिस्थिति अजमावून काय तें ठरविणें अगत्याचें आहे. कार्लाईल म्हणतोः—'तुह्माला[1] काय करतां येईल हें ओळखून घ्या.'

(३) आतां, पुष्कळ वेळां व्यवहारांत कर्तव्य करतांना मोहाची लाट येत असते, व त्या त्या लाटेबरोबर आपण वाहून जाऊं कीं काय, इतकी

1. "Know what thou canst work at."

साधार भीतीहि वाटत असते. अशा वेळीं 'विवेका'ची मदत घेतली असतां वेळ निभावून पैलतीरास सुखरूपपणें पोंचतां येतें. उदाहरणार्थः-भारतीय युद्धाचे वेळीं अर्जुनास क्षात्र कर्तव्य युद्ध करावयास सांगत होतें तर दुसरीकडे त्यास सोयऱ्याधायऱ्या मंडळींविषयीं वाटत असलेलें प्रेम मागें खेंचीत होतें; अशा बिकट कांचणींत तो पडला असतां, त्यास श्रीकृष्णरूपी विवेक सल्ला देणारा असल्यामुळें त्यानें लुंग्यासुंग्या मोहावर मात करून स्वकर्तव्य बजावून युद्धांत जय संपादन केला. पण याच्या उलट, हॅम्लेटचें उदाहरण घ्या. एकीकडे त्याच्या बापाचें भूत त्यास चुलत्याचा सूड घेण्यास सांगत होतें तर दुसरीकडे तक्ताधीन चुलता मोठा कावेबाज, त्यास सुडाची कानगी लागल्यास तो सर्वस्वी घात करील हीहि धास्ती त्याच्या पुढें 'दत्त' म्हणून उभी होतीच. सारांश, एकीकडे आड तर दुसरीकडे विहीर, अशीच त्याची कष्टमय स्थिति होऊन गेलेली होती. पण त्यास विवेकाचें पाठबळ नसल्यामुळें इहलोकची यात्रा संपवावी लागली. वरील दोन्ही उदाहरणांवरून 'कर्माकर्माचा-कर्तव्याकर्तव्या'चा मोह पडला असतां विवेकबुद्धीचा सल्ला घेऊन निर्णय काय जो ठरेल, तो अमलांत आणणें हेंच व्यवहारदृष्ट्या श्रेयस्कर ठरणार आहे. कर्तव्याकर्तव्याचा मोह पडला असतां कार्लाईलचा उपदेश असा आहे:[1]—

"मोह पडला असतां तो कर्तव्य आचरूनच सारला पाहिजे. ताबडतोब कर्तव्य काय जें करावयाचें असेल तें ठरवा; व तदनुसार अंमलांत आणा. म्हणजे दुसरें काय करावयाचें तें तुमचें तुम्हांस आपोआपच कळून चुकेल.'

(३)'जार्ज वॉशिंग्टन'या प्रसिद्ध आंग्ल लेखकाचें एक सुंदर वाक्य आहे:[2]- जी गोष्ट तुमच्या हातून होण्यासारखी असेल तीच करण्याचें पतकरा पण, ती एकदां पतकरल्यावर आपला निश्चय ढळूं देऊं नका.' हा नियम पुढें ठेवून

1. "Doubt of any sort can not be removed except by Action......Do the Duty which is nearest thee......Thy second duty will already have become clearer."

2. "Undertake not what you cannot perfom, but be careful to keep your promise."

राहिलें पाहिजे. आतां कर्तव्य बजावतांना सुख प्राप्त होण्यापेक्षां दुःखाशींच झोंबी खेळावी लागते व नैतिक बळाच्या जोरावर त्यास अशी झुंज खेळतां येते. 'मी कर्तव्याचरण करीत आहे, हीच भावना त्यास दुःखाचा भार सहन करावयास लावते.' उदाहरणार्थः-भीष्मानें शंतनूकरितां गृहस्थाश्रमावर लाथ मारली. श्रीरामचंद्रांनीं दशरथाचे कैकयीस दिलेलें वचन खरें करण्याकरितां वनवास स्वीकारला; तर सत्यनिष्ठ पांडवांनीं आपापलें कर्तव्याचरण योग्य तऱ्हेनें-धर्मानुसार करतांना नाना प्रकारच्या हालअपेष्टांचे तडाखे सहन केले-या सर्व विभूतींचीं चरित्रें म्हणजे कर्तव्याचरणाचे मोठमोठे इतिहासच होत. व या दृष्टीनें अशा इतिहासांचें वाचन झालें असतां, कर्तव्याचरण करण्याची धमक आपल्या अंगीं येईल, असा भरंवसा वाटतो. आतां कर्तव्याचरण करतांना मनुष्याची मनोवृत्ति किती खंबीर असावी लागते, ही गोष्ट पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होणार आहे. 'बोमंट आणि फ्लेचर' या नाटककारद्वयांच्या हातून एक नाटक 'समुद्रावरील सफर' (Sea voyage) ह्मणून उतरलें आहे. त्या नाटकांत पुढील चित्तवेधक संवाद आहे.[1]:—

'जुलिएटा त्या कप्तानाला व त्याच्या मंडळींना उद्देशून म्हणतेः—

जूलेटा:—तुम्हाला फाशीं देणें आमच्या स्वाधीन आहे.

मास्तर:—ताबडतोब द्या. आमच्या स्वाधीन फांशी जावयाचें असून तुमचा तिरस्कार करण्याचेंहि आहे.'

(४) शेवटला मुख्य गुण माणसानें कमावून ठेवण्याचा म्हटला म्हणजे आपल्या राजस व तामस वृत्तींवर ताबा. स्वतःवर असा ताबा असल्याशिवाय कर्तव्याचरण योग्य तऱ्हेनें होत नसतें. कारण, नीच वृत्तींचा म्हणजे कामक्रोधादि षड्रिपूंचा पगडा त्याच्यावर केव्हां अंमल गाजवील, याचा कांहीं नेम असत नाहीं. तरी त्यांच्या आधीन मनुष्यप्राण्यानें होतां कामा नये. याबाबत टेनिसन नांवाच्या आंग्ल कवीचें प्रसिद्ध वचन आहे. तो [2]ह्मणतोः—

---

1. zuletta calls the stout captain and his company,
zul :—Why, slaves, 'tis in our power to hang ye.
Master :—Very likely.
Tis in our powers, then to be hanged and scorn ye.

2. ' Self-reliance, self knowledge, self control,
These three alone lead life to soverign power.'

'आत्मनिष्ठा, आत्मज्ञान व स्वतःवर ताबा या तीन गुणांच्या जोरावर मनुष्यास अप्रतीम शक्तीची जोड लाभत असते, व ही शक्ति त्यास प्राप्त झाली ह्मणजेच कर्तव्याचरणास खरें स्वातंत्र्य मिळत असतें.'

येथवर कर्तव्याचरण होण्यास मनुष्यानें कोणत्या गोष्टी स्वाधीन करून टाकिल्या पाहिजेत, याविषयीं स्थूलमानानेंच विचार झाला. आतां कर्तव्य कसें बजवावयाचें याविषयीं पुढील गोष्टी मनुष्यानें ध्यानांत ठेवणें सोयीचें होणार आहे.

(१) कर्तव्याचरण योग्य तऱ्हेनें करणाऱ्या माणसाची भूमिका कशी असावी, याजविषयीं श्री ज्ञानदेव ह्मणतातः—

जो अंतरीं दृढ । परमात्मरूपी गूढ ॥
बाह्यतरी रूढ । लौकिक जैसा ॥
तो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी ॥
प्राप्तकर्म नाव्हेरी । उचित जें जें ॥

ज्ञानेश्वरी. (३-७-६८-६९.)

(२) मनुष्यजन्मास येऊन मनुष्यानें आपल्या 'उचिता'स का सोडावें, हा विचार करण्यासारखा प्रश्न असून त्यानें तो कुशलतेनेंच सोडविला पाहिजे; ह्मणजे त्यास कर्मांची खंती वाटणार नाहीं. याबाबत श्री ज्ञानदेवाच्या पुढील ओंव्या बहारीच्या आहेत. ते ह्मणतातः—

हां गा शरीर जरी जाहलें । तरी कर्तव्य वोघें आलें ॥
मग उचित कां आपलें । वोसंडावें ।
परिस पां सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची ॥
खंती करिती कर्मांची । ते गांवढे गा ॥

(३) कर्तव्य बजावतांना मनुष्यानें गीतेंतील महावाक्य सदैव ध्यानांत वागविलें पाहिजेः—

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि'

गी. २-४७.

व अशी कर्मे करण्याची-कर्तव्य बजावण्याची हातोटी मनुष्यास साधल्यावर त्यास श्री म्हणजे ऐश्वर्यहि मिळत असतें. मनु म्हणतोः—

'कर्मण्यारभमाणं हि पुरुषं श्रीर्निषेवते ।

मनु. (९-३००)

'कर्मे करणाऱ्या–(कर्तव्य बजावणाऱ्या) पुरुषासच जगांत श्री ह्मणजे ऐश्वर्य मिळतें.'

आतां कर्तव्य बजावणाऱ्या माणसाची कीर्ती 'कशी दुमदुमून रहाते, याविषयींचें 'शीलर' कवीचें सुंदर काव्य आहे. तो ह्मणतोः—[1]

'माझें नांव अजरामर व्हावें, याकरितां म्यां काय करावें ' तर तूं आपलें कर्तव्य बजावित रहा. बरें; ज्यांनीं आपापलीं कर्तव्यें योग्य तऱ्हेनें पाळिलीं, अशीं माणसें जगांत न चमकतांच केव्हांच निघून गेलीं ? छेः छेः तुला तीं माहीत नाहींत एवढेंच काय तें. बाकी देवदूत अशा लोकांच्या कीर्तीचा गजर करून त्या गजरानें सर्व आकाश दुमदूमून टाकीत असतात. अशाच महात्म्यांचें नशीब 'दिव्य' म्हणावयाचें.

'सारांश, कर्तव्य ह्मणून कर्तव्य करीत रहावयाचें.[2]

ही गोष्ट मनुष्यास दुर्घट वाटत असली, तरी अशक्य कोटींतील खास नव्हे. कर्तव्य आचरण्यांत दुःख आलें तरी अंतीं सुखच आहे, ही मनाशीं खूणगांठ बांधून ठेवून सामाजिक कर्तव्यें कुशलतेनें पार पाडा; व आपला व्यवहार सर्व जगास आदर्शभूत होऊन राहील अशा रीतीनें तो धडाडीनें करून दाखवा, एवढीच सर्व महाराष्ट्रवासीयांस प्रेमपूर्वक विज्ञप्ति आहे.

" देव- पितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवोभव ।
पितृदेवोभव । आचार्यदेवो भव ॥
अतिथिदेवो भव । यान्यवद्यानि कर्माणि ।

---

1. ' What shall I do to be for ever known;
Thy duty ever !
This did full many who yet sleep unknown,
Oh, never, never
Thinkest thou purchance that they remain unknown
Whom thou knowest not ?
By angel trumps in heaven their praise is blown
Divine their lot.'

2 (Duty for Duty's Sake)

तानि सेवितानि नो इतराणि। यान्यस्माकं सुचरितानि॥ तानि त्वयोपास्यानि[1]॥

'तैत्तिरेय उपनिषद्.'

प्रकरण तेरावें.

परोपकाराचें ध्येय अंशतः हवेंच.

'स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमानेकः सतां अग्रणी'॥

अर्थः—परार्थ हाच ज्याचा स्वार्थ होऊन बसला, तोच पुरुष काय तो साधूंमध्यें श्रेष्ठ होय.

आपल्या समाजांतील लोकांच्या रहाटीचें निरीक्षण केलें असतां आपल्या दृष्टोत्पत्तीस एक गोष्ट येणार आहे कीं, पुष्कळच लोकांनीं या जगांत निवळ जगण्यापलीकडे (सुव्यवस्थित तऱ्हेनें जगणें, हें तरी ध्येय असतें कोठें ?) कांहीं ध्येय आपल्यापुढें ठेविलेलें नाहीं जणूं जगांत येणें, कसें बसें आयुष्याचे दिवस कंठणें व वेळ आली असतां इहलोकची यात्रा संपविणें या 'त्रयीं'तच त्यांची इतिकर्तव्यता काय ती दिसून येत असते. एवढाच हेतु जर मनुष्य आपल्यापुढें ठेवून जगांत वावरत असेल, तर 'काकोहि बलीं भुंक्ते' या न्यायानें काकांमध्यें व त्याच्यामध्यें मग अंतर कोठें राहिलें, हें कळत नाहीं. ज्या समाजांत 'अशा पुच्छविषाणहीनाः' मनुष्यांचा भरणा फार, त्या समाजाची स्थिती किती कष्टमय असेल,याविषयींची निवळ कल्पनाच करणें सोईचें होणार आहे. अर्थात्च समाज विस्खळित होऊन जात असल्याचा आपला प्रत्यक्ष अनुभव आहे.

ज्या माणसांनीं आपल्यापुढें कांहीं ठरीव ध्येय आंखून ठेवलेलें नाहीं, व ज्यांनीं आयुष्य कसेंबसें कंठण्याचेंच हातांत कंकण बांधलेलें आहे, त्यांची

---

१ 'देव पितर ह्यांसंबंधीं आपलें कर्तव्य करण्याचें चुकूं नकोस. आईला देवाप्रमाणें पूज्य मान. बापाला देवाप्रमाणें पूज्य मान. गुरूला देवाप्रमाणें पूज्य मान. अतिथीला देवाप्रमाणें पूज्य मान. जीं वंद्य कर्में आहेत, जीं विहीत आहेत, तीं करीत जा. दुसरीं करूं नकोस. आमचें जें योग्य आचरण आहे, त्याप्रमाणें वागत जा. आमचीं जीं अनुचित कर्में असतील त्याप्रमाणें वागूं नकोस.'

स्थिति प्रसिद्ध तत्त्ववेत्ता 'सिनेका' यानें वर्णन केल्याप्रमाणें होत असते. तो ह्मणतो[1]:—

'कांहीं लोक आपल्यापुढें कांहीं ध्येय ठेवीत नसून ते आपलें आयुष्य ज्याप्रमाणें एखाद्या नदीमध्यें पाचोळा वहात जातो. तसें कंठीत असतात; ते आपण होऊन जात नाहींत तर त्यांनां ढकलून न्यावें लागतें !' अशीच स्थिति आज आपण बऱ्याच लोकांची असलेली पहात नाहीं काय ? मनुष्यानें आपल्या आयुष्याचें तारू अफाट म्हणून भयाण समुद्रांत सुकाणूशिवाय लोटणें, वायूच्या सपाट्यानें तें पैलतीरास लागलें वाहवा, मध्येंच त्यानें गटकाळी खाल्ली तरी वाहवा, त्याची पर्वा न करणें, हा मार्ग त्याच्या स्वतःच्या दृष्टीनें नव्हेच नव्हे, तर समाजाच्या दृष्टीनेंहि तो श्रेयस्कर नसतो, ही गोष्ट त्यानें ध्यानांत वागवावयास नको काय ? अर्थातच अशा लोकांचा व्यवहार ह्मणजे 'गोंधळाचा बाजार' होऊन बसल्यास नवल नाहीं !

ह्मणूनच, मनुष्याचा व्यवहार सुव्यवस्थित तऱ्हेनें चालण्यास त्यानें आपल्यापुढें कांहींतरी ध्येय ठेविलें पाहिजे; व हें ध्येय त्यानें शक्य तितक्या लवकर आपल्या परिस्थितीनुसार व बौद्धिक शारिरीक सामर्थ्यानुसार आटोक्यांत असेल तेंच आंखून ठेवणें चांगलें. मगच त्याच्या आयुष्यांत कांहीं 'राम' असणार व तो त्यास वाटणार. गोटेविषयीं सांगतात.[2]

'आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी गोटेनें आयुष्याचा गाडा अर्धवट रीतीनें हांकारण्याचें बंद करून पुढें कांहीं ध्येय आंखून ठेवून त्यानें आपला आयुष्यक्रम सुंदर तऱ्हेनें व पूर्णतेनें घालविण्याचें ठरवून टाकिलें.'

आतां, मनुष्यप्राणी आपल्यापुढें कांहीं तरी ध्येय ठेवून आपल्या आयुष्याची दिशा कां ठरवून टाकीत नाहीं, या गोष्टीचा मीमांसा करतां दिसून येतें कीं, तो आपल्या 'स्वार्था'स फाजील तत्पर असतो. इंद्रियांच्या सुखार्थ जी ती वस्तू

---

1. 'There are some " who live without any design at all, and only pass in the world like straws on a river : They do not go ; they are carried."

2. " Im Gazen, Guten, Schonen
Resolut Zu leben."

= Gothe resolved " to work out life no longer by halves but in all its beauty and totality—

प्राप्त करून घेण्याची मनुष्याची खटपट अहोरात्र चाललेली दिसून येते; किंबहूना इंद्रियसुखाच्या पलीकडे त्यास कांहीं दिसेनासें होत असतें, असाच आपला अनुभव आहे. विचार करितां सर्वसाधारण-क्षुल्लक मनुष्याची ही प्रवृत्ती-अशी त्याची प्रवृत्ती असल्यावर त्याचें मनुष्यपण तें काय राहिलें ?

बरें, इंद्रियसुखाच्या मागें तो लागला ह्मणून त्याची विषयवासना तरी कोठें तृप्त होत असते ?

महाभारताच्या आदिपर्वांत व्यासांनीं सांगितलेलें आहे.

न जातु कामः कामानां उपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥

संदर्भः—ययाती राजानें आपल्या मुलाचें ह्मणजे पुरूचें तारुण्य घेऊन एक हजार वर्षें एकसारखा विषयोपभोग घेतल्यावर पृथ्वींतील सर्व पदार्थ मनुष्याची सुखलालसा तृप्त करण्यास असमर्थ आहेत, असें त्याच्या अनुभवास आलें; तेव्हां तो ह्मणतोः—

अर्थः—सुखांचा उपभोग घेतल्यानें विषयवासनेची तृप्ति न होतां हवनद्रव्यानें जसा अग्नि, त्याप्रमाणें उपभोगानें विषयवासना अधिकाधिकच तीव्र होते! तसेंच बुद्धाचें एक वचन आहे कीं:—

" न कहापणवस्सेन तित्ति कामेसु विज्जति ।
अपि दिब्बेसु कामेसु रतिं सो नाधिगच्छति ॥
(धम्मपद १८६-१८७)

अर्थः—'कार्षापण नामक नाण्यांचा पाऊस जरी पडला, तरी कामाची तृप्ति होत नाहीं, आणि स्वर्गांतलीं सुखें मिळालीं तरीहि कामी पुरुषाचा काम सुटत नाहीं.' तेव्हां, विषयवासना इतकी जोरावल्यावर मनुष्याचें मन शांतिसुखास पारखें होऊन बसल्यास नवल तें काय ? ह्मणूनच मनुष्याचा या बाबतींत इतका खडतर अनुभव आहे तर त्यानें या स्वार्थपूर्ण वृत्तीस आळा घालणें फार अगत्याचें आहे. कारण, स्वार्थवृत्तीपासून जर मानसिक समाधान प्राप्त होत नाहीं, तर परार्थबुद्धि धरल्यापासून तें लाभतें कां ? या गोष्टीचा अनुभव घेऊन पहाण्याचें त्याचें काम नाहीं काय ? हा अनुभव घेऊन त्यानें पहावाच; ह्मणजे त्यास खालील वचनें पटणार आहेत.

(१) आपल्याकडील सर्व शास्त्रकारांनीं परोपकाराचें महत्त्व ध्यानांत घेऊन पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

'अष्टादशपुराणानां सारंसारं समुद्धृतम्।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्' ॥

(२) श्रीसमर्थांची शिकवण अशी आहे:—

आपल्या कार्यास तत्पर। लोक असती लहान थोर ॥
तैसाचि करी परोपकार। मनापासुनी ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवे। दुसऱ्याच्या सुखें सुखावे।
आवघेचि सुखी असावे। ऐसी वासना ॥

(दा. १९-४-२२,२३.)

मेटर्लिंक (Maeterlinck) नांवाचा बेल्जमचा कवी म्हणतोः–

'जगांत एकच गोष्ट अशी आहे कीं, जी केली असतां आपल्यास कांहीं त्रास होत नाहीं; व ती म्हणजे दुसऱ्याचें आपण जें कांहीं बरें करतों तें.' या वचनामध्यें एक सुंदर तत्त्व गुंफिलेलें आहे कीं, परोपकारापासून मनाची समता ढळत नसून अद्वितीय अशा शांतीची प्राप्ति होत असते. व हाच परमावधीचा आनंद प्राप्त होत जावा म्हणून जगांतील महान महान साधू पुरुषांस परार्थ साधून देण्याकरितां स्वतःचे देह खर्ची घालण्यास कांहीं दिक्कत वाटत नसते. व अशाच महात्म्यांच्या हांतून लोकसंग्रहाचें काम होत असतें. श्रीरामचंद्र, भगवान् कृष्ण, पाण्डव, येशु, महंमद, बुद्ध वगैरे जगमान्य विभूतींच्या चरित्रांवरून मनुष्यानें परार्थ साधून देण्याकरितां आपलें आयुष्य वेंचिलें पाहिजे हीच शिकवणूक आपणांस मिळणार आहे. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, मनुष्यप्राणी अशी शिकवणूक सर्वसाधारणतः पचनीं पाडून घेत नाहीं. अर्थातच समाजहित त्याच्या हांतून व्हावें तें होत नाहीं.

फ्रेंच तत्त्ववेत्ता ((Rousseau)) रुसोवर मोर्ले साहेबांनीं जो विद्वन्मान्य ग्रंथ लिहिलेला आहे त्यांत ते म्हणतात:—

---

1. 'There is one thing that can never turn into suffering and that is the good we have done'—

2. 'What the young need to have taught to them by way of moral education is that they are not born "mere atoms" in this world, floating as it were each by himself in the sea of life. They are "soldiers in a host, citizens of a polity," bound as debtors to their country to discharge their debts to it as its sons and

'तरुण मुलांना नैतिक शिक्षण जें द्यावयाचें. त्या शिक्षणाचा रोंख असा असावा कीं, या आयुष्यरूपी महासागरांत आपण लहान लहान परमाणू जन्मास आलों असून ते सैरावैरा स्वतंत्र असे तरंगत आहोंत, अशी त्यांची कल्पना होतां कामा नये; परंतु त्यांची कल्पना-भावना अशी झाली पाहिजे कीं, आपण सामुदायिक तऱ्हेनें एका राज्याचे घटक असून आपलें काम शिपायांप्रमाणें सर्व देशाची राज्यव्यवस्था राखण्याचें आहे. त्या देशमातेची आपण मुलें असून आपण तिचें ऋण फेडणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, अशी त्यांची भावना असावयास पाहिजे. व देशमातेच्या उन्नतीप्रीत्यर्थ वाटेल ती झीज सोसण्याची आपली तयारी असून जुन्या चालीचें बंड मोडून जागत्या सत्याची पताका उभारणें, स्वार्थावर स्वार्थत्यागास थयथय नाचावयास लावणें, स्वतःवरचे म्हणा, आपल्या जातीवरचे म्हणा, त्या प्रेमास गाडून न्यायदेवतेचीगुढी उभारणें, व आलस्ययुक्त वृत्ति, बेपर्वाई व निष्काळजी-पूर्ण काम करण्याची तऱ्हा या त्रयींवर सदसद्विवेक बुद्धीस स्मरून काम करण्याच्या संवयीचा झेंडा उभारणें हीं सर्व कामें स्वतःचीं आहेत, अशीच त्यांची कल्पना होणें जरूर आहे. व याच गुणाला 'सामाजिक विवेकबुद्धि'[1] हें नांव आहे.

आपलेकडील कर्मयोगशास्त्रांतील 'लोकसंग्रह' म्हणून जो कांहीं सांगितलेला आहे, त्याच्या बुडाशीं मोर्ले साहेबांची सामुदायिक-सामाजिक विवेकबुद्धी आहे हें कळून येईल. 'लोकसंग्रह' या पदाचे अनेक अर्थ काय आहेत हें पाहून त्यांचें शास्त्रीय दृष्ट्या विवरण करण्याचें हें स्थळ नव्हे. 'लोकसंग्रह' या पदाचा सर्वमान्य अर्थ शांकरभाष्यांत 'लोकसंग्रह'= लोकस्योन्मार्ग

---

daughters by devoting their energies to their mother-land's progress, taking up the cause of new truth as against old prejudice, the cause of selflessness as against selfishness, the cause of justice for all as against love of self or class or caste, and the cause of conscientious industry. as against indolence, indifference, and slipshod work. This is the sphere and definition of social conscience.

1 Social conscience

प्रवृत्तिनिवारणं' 'अज्ञानानें सैरावैरा होऊन वागत असणाऱ्या लोकांस सुस्थितींत एकत्र ठेवणें आणि आत्मोन्नतीच्या मार्गास लावणें' असा लो. टिळकांनीं या पदाचा केलेला अर्थ या ठिकाणीं अभिप्रेत असल्याचें दिसून येईल.

परंतु हें उदात्त ध्येय गांठण्याकरितां मनुष्यानें परोपकारबुद्धि धरली पाहिजे. अशी परोपकारबुद्धि असावयास मनाच्या उदारपणाच्या गुणाची जरूरी असते. प्रत्यक्ष शत्रूंवरसुद्धां ते मानव आहेत, या जगांत ते आपल्या बरोबरीनें वास करीत आहेत या उदात्त भावनेनें प्रसंगीं प्रेम करीत राहिलें पाहिजे.

येशूची शिकवण अशी आहे:—[1]

'आपल्या शत्रूंवर प्रेम करा; तुमची निर्भत्सना जे करीत असतील त्यांना (उदार मनानें) चांगलाच आशिर्वाद द्या; तिरस्कार जे करीत असतील, त्यांच्यावर उपकार करा; व जे तुमच्याशीं हेटाळणीपूर्वक वागणूक करीत असतील, त्याच्याविषयीं तुह्मी ईश्वराजवळ करुणा भाका.'

अशा तऱ्हेची मनाची उदारताच सामाजिक कर्तव्यें परोपकारबुद्धीनें करण्यास भाग पाडीत असते.

आतां, आज परोपकारबुद्धीनें आपल्या समाजाकरितां काय काय गोष्टी करावयाच्या आहेत ? असा प्रश्न एखाद्या अप्रबुद्ध मनुष्यानें केल्यास त्यास सांगतां येईल कीं, आजमितीस जरी निरनिराळ्या महात्म्यांचे समाजसुधारणा-विषयक ह्मणा, देशाच्या उन्नतिविषयक म्हणा, कितीजरी आटोकाट प्रयत्न चाललेले दिसून आले, तरी ते अपूरेच पडत आहेत, व अजूनसुद्धां आपल्यापुढें कितीतरी काम पडलेलें आहे; व तें आपल्या श्रमाची वाटच पहात जणू बसलेलें आहे असें दिसून येईल. स्थूलमानानें विचार केला असतां आपल्या समाजाकरितां खालील गोष्टी करण्याचे प्रयत्न सुरु करणें जरूरीचें आहे.

---

1. Love your enemies; bless those that curse you; do good to those that hate you; and pray for those that despitefully use you.'

अ	आ	इ
१ राजकारण.	१ वाङ्मयसेवा, (लेखन, भाषणद्वारा)	१ व्यापारविषयक सुधारणा.
२ शिपाईगिरी.	२ शिक्षणविषयक सुधारणा व शिक्षणप्रसार.	२ औद्योगिक धंदेशिक्षण-प्रसार व औद्योगिक धंद्यांचा प्रसार.

ई	उ	ऊ
१ शास्त्रीय शिक्षणक्रमांत सुधारणा व शिक्षणाचा प्रसार.	१ धर्मविषयक विचारांत सुधारणा.	१ आरोग्य संवर्धक सुसंघटित प्रयत्न.
	२ सामाजिक सुधारणा. (चालीरीतींत)	

ए	ऐ
१ धार्मिक संस्था ह्मणा किंवा लोकोपयोगी शिक्षणसंस्था ह्मणा, त्या उभारण्याकरितां द्रव्यद्वारा मदत.	१ आपल्या हातून कांहींहि होण्याजोगें नसलें तरी काम करणाऱ्या एखाद्या महात्म्यास त्याचे पाय मागें न खेंचतां शक्य तितकी खरी कळकळ दाखवून प्रोत्साहन देणेची कामगिरी.

असो; सामाजिक गरजांची ही यादी अर्थातच पूर्ण नाहीं. ज्या गोष्टींची गरज आज आपल्या समाजास तीव्रतेनें भासत आहे, त्यांचाच तेवढा या ठिकाणीं उल्लेख केल्याचें दिसून येईल. ज्याच्या त्याच्या परिस्थितीनुसार आणखीहि उणीवा आढळून येतील; त्यांचा, ज्याचा त्यानें विचार करून या यादींत भर टाकली असतां ती इष्टापत्तीच होणार आहे.

आतां, गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें या सामाजिक गोष्टी कोणी काय करावयाच्या, यासंबंधींचा विचार परिस्थितिनुसार व बाद्धिक शक्तीनुसार ज्याचा त्यानें करावयाचा आहे. परोपकार करण्याचे मार्ग अनेक आहेत. उदाहरणार्थः—एकानें आपल्या स्नेह्यास संकटसमयीं आर्थिक मदत केली तर हा परोपकारच ना ? त्याप्रमाणें गरीब मुलांचें शिक्षण करून देणें, गरिबांस, इष्टमित्रांस हरप्रसंगीं आर्थिक, कायिक वाचिक मदत करणें वगैरे परोपकार करण्याचे मार्ग अनंत आहेत. पण, आह्मी या मार्गांचा उल्लेख या ठिकाणीं

जाणून बुजून केलेला नाहीं. कारण व्यक्तीवर उपकार करणें निराळें; व सामुदायिक तऱ्हेनें समाजावर उपकार करणें निराळें. समाजास उपकृत करून ठेवण्याचें ध्येय प्रत्येकानें आपल्यापुढें ठेवावें, व तें ध्येय गांठण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न करावा, हीच परोपकाराची उच्च पायरी असेंच आमच्याप्रमाणें सर्वांचेंच मत होईल. व ह्याच दृष्टीनें प्रस्तुत निबंध लिहिलेला आहे हें प्रस्तुत विषयाच्या विवेचनावरून आतांपर्यंत कळून आलेंच असेल; असो.

आतां, लोकसंग्रहविषयक परोपकाराचीं कामें करतांना मनुष्यानें पुढील गोष्टी आपल्या ध्यानांत वागविणें जरूरीचें आहे.

(१) बहुतेक मनुष्यांच्या आयुष्यक्रमांत आपल्या हातून समाजाची कांहीं सेवा व्हावी, अशा तऱ्हेचे उदात्त विचार केव्हां केव्हां येत असतात. व ज्या क्षणीं असे विचार येत असतात, ते क्षण वस्तुतः दिव्यच होत. हे क्षण ज्यानें त्यानें पकडले पाहिजेत. अशा वेळींच त्यास ईश्वरी आदेश होत असतो कीं, 'तूं अमुक एक परोपकाराचें कृत्य समाजाकरितां म्हणून कर.' हा आदेश त्याच्या मनःफलकावर आदळतो न आदळतो तोंच, सैतान अडचणींची परंपरा त्याच्या मनःचक्षूंपुढें उभी करतो! मनुष्यस्वाभावास अनुसरून तो अडचणींस भिऊन जातो; व दिव्य क्षणीं उदित झालेल्या दिव्य भावनेस तो राजीखुशीनें फाटा देऊन टाकितो! अशीच सर्वसाधारण मनुष्याची स्थिति होऊन जात असते. त्याच्यामध्यें जो दिव्यांश आहे त्यानें या अडचणींना गचांडी देऊन टाकिली पाहिजे तरच वेळ निभावते, व पाऊल पुढें पडतें. जगांतील थोर थोर विभूतींच्या गोष्टी वाचा. बुद्धानें परोपकाराचें ध्येय पुढें ठेविल्यावर सैतानी हांकेस त्यानें 'ओ' च दिली नाहीं; त्याप्रमाणेंच येशूचें उदाहरण घ्या; त्यानें सैतानी वृत्तीस आळा घालून दुष्ट वासनांवर जय संपादन केला; फार लांब कशाला? आपल्याकडील तुकोबाचें उदाहरण घ्याना. दुष्ट वासनांचा नायनाट करून त्यानें शांतिसाम्राज्याचें आधिष्ठान मिळविलें. अशा तऱ्हेचे विजय संपादन करणें मनुष्याचेंच काम, व तें त्यानें केलें म्हणजेच स्वतःमधील दिव्यांशाची त्यास ओळख पटते. याबाबत अमेरिकन तत्त्ववेत्ता इमर्सन याचे विचार सुंदर असून मननीय आहेत. तो [1]म्हणतोः—

1. "The characteristic of a genuine heroism is its persistency. All men have wandering impulses, fits and

'मनुष्याचें खरें खुरें शौर्य तो आपल्या ध्येयप्राप्त्यर्थ जो पिच्छा पुरवतो त्यांतच दिसून येतें. उदार बुद्धीनें परोपकाराचीं कृत्यें करून दाखविण्याची हौस पुष्कळांना मधून मधून येत असतेच. एकदां ध्येय मुक्रर केल्याबरोबर अंगच्या दौर्बल्यामुळें जगाशीं 'मिळतें' ह्मणून 'नमतें' घेण्याच्या भानगडींत पडूं नका. शूर मनुष्य केव्हांहि शूरच; व त्याचीं कृत्यें केव्हांहि शूरपणाचींच ठरणार. साधारण प्रतीच्या मनुष्याची बुद्धीहि साधारणच असते, व त्याच्या कृतींत इतर जनाच्या कृतींपेक्षां विशेष तें काय असणार ? परंतु, शूर मनुष्यामध्यें एक अवगुण दिसून येतो कीं, आपल्या शूरपणाच्या कृतीबद्दल लोकांनीं न्यायबुद्धि दाखवावी व शक्य त्या सहानुभूतीनें त्यांनीं त्याच्या कृतींकडे पहावें, अशी स्वाभाविक त्याची इच्छा असते. पण, जग इतकी सहानुभूति दाखविण्यास तयार असत नाहीं. जगाकडून न्याय मिळण्यास नेहमींच कालावधि लागतो. आपल्या बांधवांस एकदा तुम्ही एकावचनानें सहाय्य करण्याचें बोललांत, तर तें खरें करून दाखविण्यास मागें घेऊं नका; मग शाहाण्यासुरत्यांचा अपवाद कांहीं असला तरी बेहेत्तर; आपलें कृत्य-ध्येय ध्यानापुढें ठेवून त्याचा पिच्छा पुरवून तें पार पाडण्याचें पहा. व तुमच्या हांतून एखादी लोकविलक्षण ह्मणा, लोकोत्तर ह्मणा, गोष्ट घडून आली तर जगाच्या एक प्रकारच्या अबाधित रहाटीस तुह्मी खंड घातला म्हणून, तुम्ही आपलें कौतुकच करून घेतलें पाहिजे.'

---

starts of generosity. But when you have chosen your part, abide by it, and do not weakly try to reconcile yourself with the world. The heroic, can not be the common, nor the common the heroic. Yet we have the weakness to expect sympathy of people in those actions whose excellence is that they outrun sympathy, and appeal to a tardy justice. If you would serve your brother, because it is fit for you to serve him, do not take back your words when you find that prudent people do not commend you. Adhere to your own act, and congratulate yourself if you have done something strange and extravagant and broken the monotony of a decorous age,"—

(२) आतां, विचारांतीं आपणास दिसून येईल कीं, अशाच महात्म्यांची ईश्वरावर अढळ निष्ठा असल्यामुळेंच त्यांच्या हातून परोपकाराचीं लोकोत्तर कामें होत असतात. पारशी धर्माचा प्रस्थापक झोरॉस्टर म्हणतोः—[1]

'ध्येयाच्या मागें लागलेल्या महात्म्यास देवदूत सहाय्य करण्यास तत्काळ पुढें सरसावतात.'

बायबलमध्यें एक वचन आहे:—[2]

—'ईश्वरच काय तो आमचा आधार व बल; संकटसमयीं मदत करण्यास धांवणारा तोच; म्हणून सर्व पृथ्वी जरी हादरून गेली, व पर्वताच्या रांगा समुद्रांत जरी गडप होऊन गेल्या तरी आम्हांस कांहीं डर नाहीं'—मनुष्याची ईश्वराचे ठिकाणीं इतकी अढळ निष्ठा असल्यावर मग काय हवें ? अशाच ईश्वरनिष्ठ महात्म्यांच्या हातून लोकसंग्रहाचें लोकोत्तर कार्य होण्यासारखें असतें.

आतां कित्येक अदूरदृष्टीनें या ठिकाणीं शंका काढतील कीं, अहो परोपकाराचा तुह्मी जो इतका ढोल वाजवितां, त्याचा अर्थ काय ? प्रत्येकाच्या मागें पोट हें लागलेलें आहेच कीं नाहीं ? उदरभरणार्थ तरी स्वार्थ पाहिला पाहिजेच ना ? वरपांगी, ही शंका अपरिहार्य अशीच वाटेल. पण या शंकेचें गीतेंत भगवंतांनीं निरसन केलेलें आहे, ते ह्मणतातः—

'**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्**' गीता. ९–१२.

श्री समर्थांनींसुद्धां या शंकेचें निरसन केलें आहे. ते ह्मणतातः—

उपजत गुण शरीरीं । परोपकारी नानापरी ।
आवडे सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ ॥
कोणाचें मनोगत तोडीना । भल्यांची संगती सोडीना ॥
सदेव लक्षण अनुमाना । आणून ठेवी ॥
तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा ॥
मूर्खपणें अनुमान गोवा । कांहींच नाहीं ॥

---

1. "To the persevering mortal, the blessed Immortals are swift."—

2. God is our refuge and strength, a very present help in trouble. Therefore will we not fear, though the earth be removed, and though the mountains be carried into the midst of the sea." P. S; PIVI, 1.2.

नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र ॥
प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ॥
राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर ॥
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥
नम्रपणें पुसो जाणें । नेमस्त अर्थ सांगों जाणे ॥
बोला ऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥
जो मानला वहुतांसी । कोणी बोलों न शके त्यासी ॥
धगधगीत पुण्यरासी । महापुरुष ॥
तो परोपकार करितांचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ॥
मग काय उणें तयाला । भूमंडळीं ॥

(दा. दो. १९-४-२-१०.)

वरील वचनांवरून कळून चुकलें असेलच कीं, 'परार्थ' हा ज्याचा स्वार्थ झाला, त्याच्या बाबतींत स्वार्थ त्यास आड येणार कसा ? म्हणूनच तो इहलोकींच काय, पण, परलोकींहि नांव गांजवून सुख मिळवितो.

महाभारतांत म्हटलें आहेः—

आत्मौपम्यस्तु भूतेषु यो वै भवति पूरुषः ।
न्यस्तदंडो जितक्रोधः स प्रेत्य सुखमेधते ॥

भावार्थः—आपल्याप्रमाणें जो पुरुष दुसऱ्यास मानतो, व ज्यानें क्रोध जिंकला, तो परलोकीं सुख पावतो.

पूर्ण 'कर्मयोगी' कसा असतो, याचें गीतेंतील वर्णन असें आहे.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ गीता ६-६२.

अर्थः—'अर्जुना ! सुख असो वा दुःख असो, आपल्याप्रमाणें इतरांनां अशा आत्मौपम्य दृष्टीनें जो सर्वत्र सारखें पाहूं लागला, तो योगी परम योगी होय.'

सारांश, आपल्याकडील तरुणांस बुद्धिमत्तेची ह्मणा, शारिरीक बळाची ह्मणा भली भक्कम जोड असून केवळ परोपकाराचें ध्येय, मग तें अंशतः कां होईना आपल्यापुढें न ठेविल्यानें त्यांच्या हातून आज सामाजिक कार्य व्हावें तसें

होत नाहीं; ही आपल्या देशाच्या दृष्टीनें शोचनीय स्थिति आहे. तेव्हां, आपल्या तरुणांनीं स्वतःपुढें कोणतें ना कोणतें तरी परोपकाराचें ध्येय ठेविल्यास आपल्या समाजाचाच नव्हे, तर आपल्या राष्ट्राचा अलोट फायदा होणार आहे, हें आह्मीं आज नव्यानें सांगावयास नको तरी शेवटीं, वर श्रीकृष्णानीं सांगितलेलें 'परम योग्याचें' परोपकाराचें ध्येय आपल्या तरुणांनीं स्वतःपुढें ठेऊन तें आटोकाट प्रयत्नानें साध्य करून दाखविण्याची हिंमत धरावी, व समाजाच्या ऋणांतून मोकळे होऊन शिवाय, आपल्या देशाच्या नांवलौकिकांत भर टाकीत जावी, एवढी प्रेमाची व कळकळीची विनंति सर्व महाराष्ट्रीय तरुणांस आहे.

'न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।[1]
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्माण ॥

गीता. ३. २२.

प्रकरण चौदावें.

आपलें जीवित रमणीय करण्यास काय हवें.

"तुमचें जीवित किती जरी गरीबीचें असलें, तरी त्यास तोंड देऊन तुह्मी आपला आयुष्यक्रम चालवा, वैतागून जाऊन त्यास (आपल्या जीवितास) नांवें ठेऊं नका. तुमच्या कल्पनेप्रमाणें तुमचें जिणें सुमार खास नाहीं. तुह्मी श्रीमंत असला, पण तुमचें मन वाईट असेल, तर तेंच जिणें तुम्हास गरीबीचें वाटणार. दोषैक दृष्टीच्या माणसास इंद्रभुवनांतसुद्धां दोष हे दिसावयाचेच. तुमचें जीवित जरी हलाखीचें असलें, तरी त्याच्यावर प्रेम करा. कारण गरीब माणसाच्या पर्णकुटिकेंतसुद्धां मनास आनंदानें थरारून सोडणारे परम सुखाचे कांहीं क्षण त्याच्या नशीबीं येत असतातच. श्रीमंतांच्या राजवाड्यांतून संध्यासमयाच्या आरक्त वर्णाचा किरण जो खेळ खेळतो, तोच तितक्याच तेजोबलानें गरीबांच्या खोपटांतून खेळत राहतो...सारांश, मनाची समाधान वृत्ति असली म्हणजे आनंदाचे विचार राजाच्या राज-

---

१ हे पार्था, माझें ह्मणून या त्रिभुवनांत कांहीं कर्तव्य ह्मणून उरलेलें नाहीं. किंवा अप्राप्त वस्तु मिळविण्याची राहिलेली नाहीं; तथापि मी कर्मच करीत आहे.

वाड्यांतच नव्हे तर गरीबांच्या खोपटांतूनसुद्धां ते खेळत असतात[1]. ”
—थोरो.

निसर्गाची शोभा पाहून कोणाला आल्हाद होत नाहीं ? खेडेगांवचा एखादा गरीब कुणबी असो, किंवा शहरांतील एखादा गर्भश्रीमंत अथवा जाडा विद्वान् असो, त्यानें निसर्गाच्या सौंदर्याचें आकंठ पान केलें असतां, त्याच्या जीवास दुःखाचा विसर पडत असतो, त्याच्या मनास शांतिसुखाची प्राप्ती होत असते व अशा अमोघ शांतिसुखाचे घुटके घेत असतां कधीं कधीं ईश्वराच्या अगाध चातुर्याबद्दल व लीलेबद्दल त्याचें मन थक्क होऊन जाऊन सद्गदित होत्साता असा तो स्वतःस विसरून ब्राह्मी सुखाचा नितांत मधुर अनुभव घेत असतो ! अशा तऱ्हेचा निसर्गाचा गोड अनुभव मनुष्यप्राण्यानें हरघडीं घ्यावा, व तो त्यास बिनसायासानें व बिनखर्चानें मिळावा, अशीच ईश्वरी योजना असूनहि त्या योजनेचा फायदा मनुष्यप्राण्यानें जसा घ्यावा तसा तो घेत नाहीं. ही फार शोचनीय गोष्ट आहे. येवढेंच नव्हे तर, उलट दिशेनें कृत्रिम साधनांचा उपयोग करून कृत्रिम सुखाच्या मागें लागलेला आज मितीस तरी तो दिसत आहे ! उद्याचें कोणीं सांगावें ? आपल्या चिमुकल्या मेंदूच्या जोरावर निर्माण केलेलीं साधनें म्हणजे आगगाड्या, आगबोटी आकाशयानें वगैरे अद्भुतकारक चिजांवर भिस्त ठेवून निसर्गावर मात करण्याचा त्यानें आज घाट घातलेला दिसून येत आहे खरा; पण, खरें सुख म्हणजे काय ? तें कशानें मिळतें ? व आपलें जीवित रम्य करण्याचा उपाय कोणता ?” याविषयींची त्यास कल्पना नसल्यामुळें ह्मणून ह्मणा, कल्पना असूनहि इंद्रियसुखास लांचावल्यामुळें त्याची खटपट करण्याची तयारी नाहीं

1. “However mean your life is, meet it and live it; do not shun it and call it hard names. It is not so bad as you are. It looks poorest when you are richest. The faultfinder will find faults even in paradise. Love your life, poor as it is. You may perhaps have some pleasant, thrilling, glorious hours, even in a poor house. The setting sun is reflected from the windows of the alms-house as brightly as from the rich man's abode; ......I do not see but a quiet mind may live as contentedly there, and have as cheering thoughts, as in a palace.” Thoreau

ह्मणून ह्मणा, किंवा साधूसंतांचा मधुर अनुभव रोख ठोक असा पुढें असतां जाणून बुजून तो तिकडे काणाडोळा करून राहिलेला आहे म्हणून ह्मणा, आपला व्याप वाढवून तो संतापांत भरच टाकीत बसलेला आहे, असें थोड्या विचारांतीं दिसून येणार आहे. एक एक शास्त्रीय शोध लावून त्यापासून जिवास खऱ्या समाधानाची प्राप्ति होते कां ह्मणून पहावें तों, तें समाधान दूरच रहातें, अशीच त्याची गोल्डस्मिथप्रमाणें स्थिति होऊन बसलेली आहे खरी ! निरनिराळ्या शास्त्रांमध्यें नाना तऱ्हेचे शोध लागतांना ईश्वराच्या अगाध शक्तीची थोडी जरी कल्पना आली, व त्याच्या गूढ कृतीचें कौतुक करण्याचें त्याच्या नशीबी केव्हांतरी आलें, तरी ती इष्टापत्तीच म्हणावयाची. पण असें कौतुक करण्याचें कितीजणांच्या वांट्यास आलें असेल तें असो, तें आह्मीं सांगण्यापेक्षां ज्यानें त्यानें लोकव्यवहाराचें निरीक्षण करून ठरविलेलें बरें ! आह्मांस तर स्पष्ट दिसतें कीं, बिनतारायंत्री संदेशानें तो जगाच्या दूरदूरच्या कोंपऱ्यांतील मनुष्यांशीं संभाषण करू लागला आहे, व सत्तावन मजली इमारत बांधून त्यांत ऐषआरामाच्या सुखसोई करून त्याचा उपयोग तो मोठ्या दिमाखानें घेऊं लागला आहे. पण दुःखाची गोष्ट ही कीं, बुद्धीसर्वस्व खर्च करून ऐहिक ह्मणून काल्पनिक सुखाच्या मागें लागून निसर्गाच्या अकृत्रिम सौंदर्यास पारखा होऊनच तो राहिलेला आहे ! आपला मेंदू झिजवून इतके उपाय इतकीं साधनें यांचा कुशलतेनें उपयोग करून त्यानें स्वतःच्या सुखाप्रीत्यर्थ काय कमाई करून ठेविलेली आहे, हें चिकित्सापूर्ण दृष्टीनें पहाणें झाल्यास उत्तर शून्य असेंच ह्मणतां येणार आहे.

या ठिकाणीं एक गोष्ट सांगून ठेवावीशी वाटते कीं, शास्त्रांत नाना प्रकारचे शोध लावलेले आहेत, किंवा आजमितीस ते लागत आहेत, ते मनुष्यानें आपल्या वाढत्या ज्ञानाच्या जोरावरच लाविलेले आहेत; त्याबद्दल त्याचें कौतुकच आह्मी करीत आहोंत. वर्डस्वर्थच्या दृष्टीप्रमाणें आमची दृष्टि नाहीं ही गोष्ट अगत्यानें येथें सांगून ठेवणें आमचें पवित्र कर्तव्य आहे. प्रसिद्ध कवि वर्डस्वर्थ म्हणतोः—

---

1. 'Enough of science and of art;
Close up those barren leaves;
Come forth and bring with you a heart
That watches and receives;

' शास्त्र व कला आतां पुरे झालीं; त्यांची शुष्क पानें आतां झांकून टाका, व आतां मोकळेपणानें बाहेर येऊन सृष्टीकडे पहात रहा; व तिच्या सौंदर्याचें पान सहृदयतेनें करीत जा !'

ऐहिक गरजाच्या वाढीबरोबर शास्त्र व कला यांचीहि वाढ होणें अपरिहार्य आहे. प्रश्न एवढाच कीं, या आधिभौतिक शास्त्रांच्या वाढीबरोबर त्यानें बेगुमान होऊन सृष्टीच्या सौंदर्यास मुकावें, ईश्वरविषयक ज्ञानास पराङ्मुख व्हावें व बेपर्वाईपणानें जगांत कालक्रमणा करावी हाच कितपत श्रेयस्कर मार्ग आहे ! हा मार्ग श्रेयस्कर नव्हेच नव्हे असेंच समंजस माणसाचें आमच्या प्रमाणें मत होईल, असा भरंवसा आहे.

याबाबत लोकव्यवहाराचें निरीक्षण केल्यास असें दिसून येतें कीं, आज मनुष्याची दृष्टि कोणत्याहि पदार्थाच्या सौंदर्यापेक्षां त्याच्या उपयुक्ततेवरच खिळून राहिलेली आहे. याचें कारण उघडच आहे कीं, इंद्रियांचें चोज पुरविण्याकरितां त्याची दृष्टि पदार्थांच्या उपयुक्ततेवर विशेष असावी लागते. तरच त्याचा निभाव लागत असतो ! सर्व जगाकडे पहाण्याची मनुष्याची हीच दृष्टि झाली तर अर्थातच त्याच्या दृष्टीनें जगाचें रमणीयत्व तें काय राहिलें ? वस्तूचा उपयोग जीवधारणार्थ हा होतोच; पण त्या वस्तूच्या सौंदर्याच्या आकंठ पानानें मानवी अंतःकरण सद्गदीत होतें, व तें इश्वराच्या ठिकाणीं विलीन होत असतें ! कोणत्याहि वस्तूच्या दोन बाजवा असतात; त्या दोन्हींकडे मनुष्याचें लक्ष जावें, अशीच ईश्वरी योजना असते. त्या दोन बाजवा ह्मटल्या म्हणजे पदार्थांची उपयुक्तता व रमणीयता; पैकीं पदार्थांच्या उपयुक्ततेकडे मनुष्याचें लक्ष ठाम जातेंच, (कारण त्याशिवाय त्याचा निभाव या जगांत लागतच नाहीं) आतां, मनुष्याच्या नशीबानें-कमनशीबानें ह्मणा, तो पहिल्या गुणास कवटाळून दुसऱ्यास बेपर्वाईपणानें फेटाळूं लागलेला आहे !

आतां या ठिकाणीं असा एक प्रश्न उद्भवण्यासारखा आहे कीं, सृष्टपदार्थांच्या सौंदर्याचीच आपण इतकी महती कां गात जावी ? या प्रश्नाचें उत्तर असें कीं, सृष्टींमधील रम्य वस्तूंच्या सौंदर्यावर आपण आपली दृष्टि खिळवून अंतरंग रंगवीत राहिलें पाहिजे. अंतरंग रंगलें तरच, मनाचा थोरपणा वृद्धिंगत होत जातो व मनाच्या थोरवीबरोबरच ईश्वराच्या अगाध लीलांचें

मनुष्यास थोडेंबहुत ज्ञान होण्यासारखें असतें. मनुष्यानें आपल्यामधील या बाजूची वाढ करून त्यानें आपलें जीवित रमणीय करून टाकावें, असाच ईश्वरी संकेत दिसतो. संसारांत मनुष्याच्या वाट्यांस कटु अनुभव ठेविलेला ! हाल अपेष्टांचे तडाखे त्यास तर-वरचेवर खावे लागतात ! म्हणून त्यानें आपलें जीवित रमणीय कसें करून टाकावें-किंबहुना, जीवित रमणीय करून टाकण्याची ही कला तरी काय आहे, ती त्यास माहित झाली नाहीं तर त्यास संसार हा 'असार' वाटावयास लागल्यास नवल काय ? 'सुख पहातां जवापाडें दुःख पर्वताएवढें' किंवा, 'दुःखासी कारण जन्म घ्यावा' अशा तुकोबांच्या उक्तींप्रमाणें मनुष्यानें जीवित रमणीय करून जर टाकलें नसेल तर त्यास संसाराचा कटु अनुभव असाच यावयाचा.

आतां, मनुष्यप्राण्यास ईश्वरानें अशा एका शक्तीची जोड देऊन ठेविलेली आहे कीं, तिच्यायोगें त्यास सृष्टपदार्थांचें रमणीयत्व भासत असतें. व संसारांत संकटाच्या प्रसंगीं झुंज खेळण्यास त्यास नैतिक बळ लाभत असतें. वेदकालीन लोकांची स्थिति जर आपण ध्यानांत आणली, तर आपणास असें दिसून येणार आहे कीं, आधिभौतिक सुखाच्या मदानें त्यांच्या दृष्टीवर धुंदी चढलेली नसल्यामुळें त्यांस सर्व सृष्टीचे पदार्थ ह्मणजे ईश्वराच्या लीलेचे कौतुकास्पद विषयच होऊन बसलेले होते. सूर्याचा प्रखर प्रकाश, शीतरश्मीचें आल्हाददायक चांदणें, आकाशांतील ग्रहमाला व तारकापुंज, उंच उंच पर्वतश्रेण्या, धों धों वहाणाऱ्या नद्या, मंजुळ रव करणारे ओहोळ व उंच उंच गगनभेदी वृक्षांच्या रांगा पाहून त्यांना आपण सृष्टकर्त्याशीं बोलत आहों कीं काय, असें वाटल्यास नवल नाहीं. सृष्टिकर्त्याशीं असा लय लागला असतां त्यांच्या तोंडून स्फूर्तिपूर्ण-काव्यमय उद्गार बाहेर पडले असतां आश्चर्य तें काय ? इमर्सन ह्मणतोः—¹

'तुह्मी एकान्तांत असतांना सृष्टिदेवतेला वाचा नसली तरी ती तुमच्याशीं संभाषण करीत असते ही गोष्ट तुम्हाला कधीं कळलेली आहे काय ? सृष्टि-देवतेशीं एकान्त करून समरस होऊन मनुष्याच्या मुखांतून जीं ओजस्वीं

'1. Have you found out that Nature is always talking to you, especially, when you are alone, though she has not the gift of articulate speech.

गीतें बाहेर पडतात, तीं वस्तुतः दिव्यच होत. सृष्टिदेवता व वेदकालीन लोक यांच्यामध्यें आधिभौतिक शास्त्रांच्या सुखसोयीचा डोळ्यावर धुंदी आणणारा पडदा नव्हता, ह्मणूनच ते त्या देवतेसमीप अहोरात्र असत. पण जसजसा काल लोटत चालला, तसतसा मनुष्य आधिभौतिक मायेच्या मागें लागून तो सृष्टिदेवतेपासून दूरदूरच जात चालला आहे. म्हणूनच हल्लींच्या आपल्या गीतांत वेदकालीन लोकांच्या गीतांमधील स्फूर्ति नाहीं, ह्मणून ओज नाहीं. व ह्मणूनच त्या गीतांचा समाजावर इष्ट परिणाम होत नाहीं ! आधिभौतिक सुखाच्या मागें बेसुमार लागल्यानें आपल्यामध्यें कृत्रीमतेचा दोष इतका वाढलेला आहे कीं, आपला आचार कृत्रीम, विचार कृत्रीम व उच्चारहि कृत्रीम ! असो.

आधिभौतिक शास्त्रांच्या वाढीबरोबर आपल्यामध्यें कृत्रिम आचारा-विचारांची भर कां पडत जावी, याचा सर्वसाधारण मनानें विचार करतां, आपणांस एक कारण दिसून येतें कीं, हल्लीं मनुष्य जसजसा वाढत जातो तसतसा तो विषयसुखाच्या मागें लागल्यानें त्यास वस्तुविषयक सौंदर्याचें आश्चर्य वाटेनासें होतें; व त्या त्या वस्तू नित्यशः पहात राहिल्यानें त्यांतील अद्भुत नाविन्य त्यास नाहिसें होत असतें; एवढेंच नव्हे तर, अतिपरिचयानें त्या त्या वस्तूबद्दल वाटणारा आदरसुद्धां त्यास वाटत नसतो. असाच आपल्या जाणत्या सवरत्या माणसाचा अनुभव दिसून येत आहे. अखिल जगास सोनेरी किरणांनीं प्रकाशित करणारा—म्हणून जीवन देणारा सार्थनामा सहस्ररश्मि, किंवा मानसिक दुःखांचा विसर पाडण्यास आपल्या शितळ किरणांनीं मदत करण्यास एका पायावर तयार असणारा शीतरश्मि खगोलांतील तेजोवलय व तारकापुंज हे नित्यशः दिसले म्हणून—त्यांचा अतिपरिचय झाला ह्मणून, त्यांचें नाविन्य म्हणा, त्यांची अद्भुतता ह्मणा, यांच्याविषयींची मनुष्याची दृष्टि कमी कां होत जावी कोणास ठाऊक ? गंमत ही कीं, वस्तूच्या नाविन्याचें त्यास कांहीं वाटत नसतें तें नसतेंच; पुनः तो दोषैक दृष्टीनें अंध होत जाऊन कधीं कधीं सूर्या-वरील डाग मोजून त्यावर थुंकावयासहि कमी करीत नाहीं ! अशी स्थिति असल्यावर सृष्ट पदार्थांविषयीं म्हणा, किंवा थोर थोर विभूतींविषयीं ह्मणा, त्यास आदर वाटेनासा होतो ! 'सार्टर रिसार्टस' अगर 'ठिगळ्या शिंपी' या प्रसिद्ध ग्रंथांतील नायक जो टायफल्सड्राक, त्याच्या तोंडून कार्लाईलनें

'आश्चर्य' (Wonder)–हा गूण–ही भावना–तिची किंमत काय आहे, याजबद्दल पुढील उद्गार वदविले आहेत[1]:—

" टायफल्सड्राक्सारखा मनुष्य आश्चर्ययुक्त भावनेमध्यें विलीन होऊन जात असतो, एवढेंच नव्हे तर या पृथ्वीवर वास करीत असलेल्या प्रत्येक इसमास अशा तऱ्हेच्या भावनेची जोड अवश्य पाहिजे, असें त्याचें ठाम मत आहे. याचें कारण असें कीं, आश्चर्ययुक्त भावना हीच ईश्वरीपूजेचा पाया होय. या भावनेस क्षय नाहीं. पण, हल्लींच्या काळीं तर शास्त्रीय शोधांची धडपड जी चालली आहे, तिचा सर्व रोख ही आश्चर्ययुक्त भावना ठार करण्याकडेच आहे; एवढेंच नव्हे तर पूज्यभावनेच्या ठिकाणीं मोजमापाचें 'आंकडेमोडी'च्या शास्त्राचें अधिष्ठान करण्याची सर्व शास्त्राची आटोकाट खटपट चाललेली आहे! टायफल्ससारख्या तत्त्वज्ञान्यास मनुष्याची अशा दिशेनें चाललेली खटपट बिलकूल पसंत नाहीं; एवढेच नव्हे तर, तो शास्त्रीय शोधांच्या अशा तऱ्हेच्या अनिष्ट परिणामांची हेटाळणीच करीत आहे."

सारांश, 'अतिपरिचयादवज्ञा' या न्यायानें आज आपण टायफल्सनें म्हटल्याप्रमाणें आश्चर्ययुक्त भावनेस पारखे होत चाललों आहोंत हें खरें. एखाद्या जादूगारानें लहानसा चमत्कार करून दाखविला–आपली थोडी दिशाभूल केली कीं, आपण त्याचें कौतुक करितो. पण, ज्या ईश्वराच्या अनंतसृष्टींत नानाविध चमत्कार हरघडीं चाललेले आहेत, त्यांजकडे आपलें

---

1. "For the rest, as is natural to a man of this kind, he deals much in the feeling of wonder, insists on the necessity and high worth of universal wonder which he holds to be the only reasonable temper for the denizen of so singular a planet as ours. "Wonder, says he is the basis of worship; the reign of wonder is perennial, indestructible in man; only at certain stages (as the present) it is for some short reason, a reign in partibus infidelium. That progress of science, which is to destroy wonder, and in its stead Substitute Mensuration and Numeration, finds small favour with Teufelsdroch, much as he otherwise venerates these two latter processes!"

लक्ष कधीं जातें काय? या ठिकाणीं आणखी एक गोष्ट सुचवून ठेवणें इष्ट होइलसें वाटत आहे. ती ही कीं, लहान मुलांच्या शिक्षणक्रमांत सुद्धां जगातील रम्य वस्तूंकडे त्यांचें लक्ष वेधणें, व ईश्वराच्या अजब कृति त्यांनां समजावून देऊन परमेश्वराच्या चातुर्याचें, त्याच्या अगाध शक्तींचें कौतुक करण्याची संवय त्यास लावणें ह्या महत्त्वाच्या बाबी आहेत. मुलांस आपण विजेचे सिद्धान्त शिकवितों; पण, वीज ही काय व कशी वस्तु आहे? या गोष्टीकडे आपण त्याचें लक्ष वेधित नाहीं; हा शिक्षणक्रमांत एक दोषच आहे. सूर्य तेजाचा गोळा म्हणून आपण त्याची विल्हेवाट लावितो, पण त्याच्या अजब शक्तीची व्हावी तशी आदरयुक्त कल्पना आपणांस होत नाहीं, अशी आज स्थिति आहे. सृष्ट पदार्थांनां तीं तीं नांवें दिलीं, म्हणजे आपलें काम झालें; त्यांच्या शक्तींचा आपल्या सुखसोयीकरितां उपयोग करून घेतला म्हणजे 'आपण मिळविली,' असेंच आजचा अनुभव आपणांस सांगत आहे. वस्तुतः वस्तूंच्या आश्चर्यकारक रचनांचे, त्यांच्या गूढ शक्तींचें कौतुक करण्यानें—त्यांच्या कर्त्याविषयीं आदर-भाव वाटल्यानें आपणांस एक प्रकारचें धार्मिक शिक्षण मिळत असतें, व अशा तऱ्हेचें मुलांस शिक्षण मिळाल्यास त्याच्या बौद्धिक शिक्षणास धार्मिक शिक्षणाची जोड दिल्यासारखी होणार आहे.[१]

आतां, विचार केला असतां, दिसून देईल कीं, ईश्वरानें जगांत रम्य वस्तू ठिकठिकाणीं पेरून ठेविलेल्या आहेत. पण, मनुष्याच्या व्यवहाराची गाडी निराळ्याच रुळावरून चालली असल्यानें त्याचें लक्ष निसर्गाच्या निरनिराळ्या ऋतूंतील रम्य देखाव्यांकडे जात नाहीं! किंबहुना, रम्य वस्तू पाहून त्यांजपासून आनंद प्राप्त करून घेण्याची कला मनुष्यप्राण्यास अवगत व्हावी तशी झालेली नाहीं, असेंच म्हटलें असतां चालणार आहे! बहुतेक वेळ उदरभरणार्थ खर्च करावयाचा, व राहिलेला वेळ चकाट्या पिटविण्यांत घालविण्याचा, असाच ठरीव कार्यक्रम समाजांतील पुष्कळ लोकांचा आज दिसून येत आहे. म्हणून श्रीसमर्थांच्या खालील वचनांची आठवण आपणांस आज हरघडीं होत गेल्यास आश्चर्य नाहीं. श्रीसमर्थ म्हणतातः—

१ थोडें विषयान्तर झालें तरी तें प्रस्तुत ठिकाणीं व हल्लींच्या काळीं तें क्षम्यच ठरेल असा भरंवसा आहे. असो.

'क्षुधा लागतांच जेविला। जेऊन उठतां आळस आला॥
आळस येतां निजेला। सावकास ॥
निजोन उठतांच दुश्चित। कदा नाहीं सावचित॥
तेथें कैचें आत्महित। निरूपणीं॥

(दा. ८-६-३८-३९)

आयुष्याचा असाच क्रम ठरून राहिल्यावर मनुष्याच्या उदार मनोवृत्तींचा विकास व्हावा कसा, हें कळणें अशक्य आहे. नीच मनोवृत्तींची तहान भागविण्यापलीकडे त्यानें आपलें ध्येय ठरवलेलें नसल्यानें उच्च मनोवृत्तींच्या गरजा काय, ही कल्पना सुद्धां त्याच्या मनास शिवत नाहीं, असाच अनुभव आज पुष्कळांच्या बाबतींत तरी दिसून येत आहे. हल्लींच्या सुधारणेच्या युगांत मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांवर सुद्धां आधिभौतिक ऐषआरामाचा पगडा असलेला दिसून येतो, मग इतरांची काय कथा! अशा तत्त्ववेत्त्यांची दृष्टि समूळ अंध झालेली दिसून येत नाहीं. म्हणून त्यांनां सृष्टपदार्थांच्या मोहनीनें क्षणभर कां होईना 'महातन्हेचा' (जीव शिवाचें ऐक्य) नितांत मधूर अनुभव येत असतो; व अशा अनुभवाचीं गोड गीतेंही ते गात बसतात.

येथवर आधिभौतिक शास्त्रांनीं मनुष्यावर आपला पगडा कसा बसविलेला आहे, व त्याचा मनुष्यावर अनिष्ट परिणाम कसा होत चालला आहे, ह्मणून, मनुष्याच्या जीवनक्रमांत कृत्रिमता कशी बोकाळली आहे वगैरे गोष्टींविषयीं

अमेरिकन तत्त्ववेत्ता इमर्सन याची गोष्ट घ्याना, तो सृष्टीवरील (on Nature) निबंधांत ह्मणतो.

'Art and Luxury have early learned that they must work as enhancement and sequel to this original beauty. I am over instructed for my return. Henceforth I shall be hard to please. I can not go back to toys. I am grown expensive and sophisticated. I can no longer live without elegance: but a countryman shall be my master of revels. He who knows the most, he who knows what sweets and virtues are in the ground, the waters, the planets, the heavens and how to come at these enhancements is the rich and royal man.

विचार झाला. आतां आपलें जीवित रमणीय करण्यास काय काय गोष्टींकडे आपण लक्ष पुरविलें पाहिजे, हें पाहूं.

(१) वस्तुतः पहातां जगांत कुरूप असें कांहीं नाहीं. आपलें मनच तेवढें वाईट; त्यामुळेंच आपणास निरनिराळ्या वस्तूंचें सौंदर्य भासमान होत नसून त्या त्या वस्तूंचे दोषच तेवढे दिसत असतात. विचार करून पहातां आपणांस कळून येणार आहे कीं, मिल्टनच्या ह्मणण्याप्रमाणें मनाची अशी कांहीं जबरदस्त शक्ति आहे कीं, पृथ्वीवर स्वर्ग उतरण्याचें किंवा नरक उत्पन्न करण्याचें सामर्थ्य एकट्या मनांत आहे.

किंवा, आपल्या भाषेमध्यें एक ह्मण आहेच कीं, 'मन तारी, मन मारी' किंवा '**मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः** ॥ हीं सर्व वचनें मनाची जबर शक्ति आहे हीच गोष्ट प्रस्थापित करतात. तेव्हां, हें मन मनुष्यानें आपल्या ताब्यांत आणून घेणें हीच कायती मुख्य गोष्ट आहे. मन ताब्यांत आल्यावर वाटेल तसा त्याचा सूर आपल्यास लावतां येतो. त्याचा बेसूर न होईल अशी तजवीजहि करण्याचें आपल्या स्वाधीन रहातें. जगांत जे कांहीं साधू होऊन गेले त्यांनीं प्रथम 'मनास' आपलेसें करून टाकिलें होतें. त्यामुळेंच जगांतील 'विषमता' त्यांच्या बाबतींत 'समताच' ठरून गेली. ह्मणूनच त्यांनां जगांत 'राम' वाटत जाऊन तोच 'राम' जगांत जिकडे तिकडे उमटलेला त्यांच्या प्रत्ययास आला. येशूख्रिस्ताची एक गोष्ट सांगतात कीं, तो एकदा आपल्या शिष्यांसमवेत चालला असतां, वाटेंत त्याला एक मेलेला कुत्रा आढळला. त्या कुत्र्याचा दुर्गंध इतका सुटलेला होता कीं, येशूचे सर्व शिष्य त्या ठिकाणाहून पसार झाले. येशू मात्र त्या कुत्र्याच्या जवळ जाऊन त्यानें आपल्या शिष्यवृंदास बोलावून ह्मटलें कीं, 'पहा ह्या कुत्र्याचे दांत तो जरी मृत आहे, तरी मोत्याच्या दाण्यासारखे सुंदर आहेत.' अशींच उदाहरणें आपल्याकडील साधुसंतांचीं किती तरी देतां येतील. उदाहरणार्थ, एकनाथ महाराजांनीं गाढवास 'भागीरथी' पाजविली हें घ्या; किंवा तुकोबांनीं पक्ष्यांस शेत खाण्यास सर्रास मोकळीक दिली हे घ्या; या उदाहरणांवरून त्यांनीं आपलें मन कसें थोर केलेलें होतें, व त्यामुळें त्यांच्या मनाची 'समता' कशी ढळत नसे, याची कल्पना येणार आहे.

(२) मनाचा उदारपणा वाढविण्यास शक्य त्या संध्या मनुष्यप्राण्यानें निर्माण करून त्यांचा सदुपयोग करून घेतला पाहिजे. अशा संध्या आणून

घेण्यास सृष्टपदार्थांवर त्याचें अकृत्रिम प्रेम बसावयास हवें. त्यानें निरनिराळ्या रंगाच्या सुमनांनीं आपलें मन वेधावें, त्यांच्या सुवासानें मन समाधान पावून घ्यावें; कोकिल पक्ष्याच्या मंजुळ गीतानें उल्हास वाटून त्यानें आपल्या कर्णांचें पारणें फेडून घ्यावें; उंच उंच वृक्ष व गगनभेदी पर्वत यांच्या रांगाच्या रांगा पाहून त्यानें आपल्या नयनांस धन्यता वाटून घ्यावी; झुळझुळ वाहणाऱ्या ओहळांच्या व धों धों वाहाणाऱ्या नद्यांच्या अस्फुट गीतांनीं त्यानें आपल्या मनाचा लय लावून टाकावा; सारांश, अशा सृष्टिचमत्कारांनीं जिवास विरंगुळा वाटून घेऊन ईश्वराच्या लीलांचें कौतुक करण्याची त्यानें आपणांस संवय लावून घ्यावी; हीच संवय पृथ्वीवर नंदनवनाचा मधुर आस्वाद घेण्याची पात्रता मनुष्याच्या अंगीं येण्यास कारणीभूत होत असते. व कालांतरानें अशा रमणीय पदार्थांचें रमणीयत्व त्यास अधिक अधिक प्रमाणांत अनुभवास मिळत जात असल्यानें संसाराचा कडु अनुभव त्यास जो येत असतो, त्याचें त्यास कांहींच वाटेनासें होतें.[1] व पुढें पुढें अशा रमणीय पदार्थांच्या सौंदर्याचा आपल्यावर इतका इष्ट परिणाम होत असतों कीं, विषादाचे प्रसंग कितीही व कसेहि आले तरी मनाचा उल्हास कायम ठेवण्यास हेच रमणीय सृष्टपदार्थ कारणीभूत होत असल्यामुळें आपणांस आपलें जीवित रमणीय वाटल्यास आश्चर्य काय ?[2]

याबाबत आङ्ग्ल कवि कीट्स ह्मणतोः—

1. A thing of beauty is a joy for ever :
Its loveliness ; increases it will never
Pass into nothingness ;.........
Therefore, on every morrow, are we wreathing
A flowery band to bind us to the earth,
Spite of despondence, of the inhuman dearth ;
Of noble natures, of the gloomy days,

कवि कीट्स ह्मणतोः—

2. ....Glories infinite
Haunt us till they become a cheering light
Unto our souls, and bound to us fast,
That, whether there be shine or gloom o'er cast,
They always must be with us, or we die.

आतां, सर्व सृष्टि म्हणजे ईश्वराचें एक अद्भुत वस्तुभाण्डारच होय. या भांडारांतील निरनिराळ्या वस्तूंची विलक्षण रचना, अतर्क्य योजना व मनास थक्क करून सोडणारी मोहकता मनुष्याच्या अनुभवास येते, व सृष्टिकर्त्यांशीं आपण तावत्काळ कां होईना, तादात्म्य पावत असतो. जेम्स फ्रीमन क्लार्क ह्मणतो:—'सृष्ट पदार्थांत, जीवितांत, मनुष्यमात्रांत, कलेंत, अंतःसृष्टींत, तसेंच बाह्य सृष्टींत जिकडे तिकडे ह्मणून रमणीयत्व दृग्गोचर होतें, तिकडे तिकडे आपणांस ईश्वराच्या अस्तित्वाची प्रचीति येते.' आपल्याकडे सुद्धां 'देवस्यैष महिमा तु लोके येनेदं भ्राम्यते चक्रम्' हें वचन घ्या; किंवा 'एष देवो विश्वकर्मा महात्मा सदाजनानां हृदये संनिविष्टः' (सर्व विश्वाचा कर्ता महान् आत्मा देव मनुष्याच्या अंतःकरणामध्यें सदा वास करीत असतो.' हीं दोन्ही वचनें अंतर्सृष्टींत जिकडे तिकडे चैतन्याचा वास आहे, हीच गोष्ट सुचवितात.

(४ परंतु, अशा तऱ्हेचा अध्यात्मांतील नितांत मधुर अनुभव मनुष्यास येण्याकरितां त्यानें 'विवेका'ची कास धरली पाहिजे; ह्मणजेच त्यास संसारांत सारभूत तत्त्वें काय आहेत, हें त्याच्या प्रत्ययास येत असतें. मगच त्यास वेदान्तातील 'ब्राह्मी स्थिती' चा अनुभव येत असतो. याबाबत इमर्सनचे विचार मननीय आहेत. तो म्हणतो:—[1]

'द्रव्याचा लोभ धरणाऱ्या मंडळींचा त्याग करून जो अरण्यवास पत्करतो व आपल्या विचारांचे विषय सूर्य, समुद्र, पर्वताएवढे वृक्ष करून

---

1. Whoso inhabiteth the wood,
And chooseth light, wave, rock and bird,
Before the money—loving herd,
Into such forrester shall pass,
From his companious power and grace,
Pure shall he be without, within,
From the old adhering sin;
He shall never be old,
Nor his Fate shall be foretold;
He shall watch the spending year,
Without waiting, without fear;
He shall be happy in his love,
Like to like shall Joyful prove.'

त्यांच्या अद्भुत नियमांचें व शक्तींचें चिंतन जो करतो, त्याला एक विशेष प्रकारची शोभा व विलक्षण प्रकारचें सामर्थ्य प्राप्त होऊन तो मनानें पवित्र व शरीरानें पवित्र असा होत जाऊन त्याच्या मागें लागलेल्या पातका (संचिता) पासून तो मोकळा होतो. त्याला वृद्धावस्था शिवत नाहीं; व ब्राह्मी स्थितीचा अनुभव घेणाऱ्या एखाद्या सिद्धाप्रमाणें त्याची स्थिति होऊन रहाते. तटस्थ वृत्ति धारण करून जगाची रहाटी–सुखदुःखादि द्वंद्वें यांच्या पलीकडे जाऊन सदैव नांदणारे प्रेम व आनंद यांचा आस्वाद तो घेत असतो. तसेंच जर्मन तत्त्ववेत्ता जॉन थिओडर मर्झ (John Theodor merz) यानें म्हटलें आहे कीं,[1]

' सृष्टिसौंदर्य हें जणूं एक दरवाजा असून त्या दरवाज्यानें मनुष्यप्राणी ' सत्यरूपी परब्रम्हाच्या साम्राज्यांत प्रवेश करीत असतो.'

(५) या उताऱ्यांवरून विवेकास एकान्तवासाची कशी व किती जरूरी आहे, याची कल्पना होणार आहे. आपल्याकडील साधुसंतांनीं जरी सृष्टी-देवतेचे इतके पोवाडे गाइलेले दिसून येत नाहींत, तरी प्रसंगोपात् अध्यात्मिक अभ्यासास एकांतवास कसा अवश्य लागतो व मनाच्या धारणेकरितां सृष्टीच्या देखाव्याची सुंदर स्थळें कशीं अवश्य असतात, याविषयींचीं बहारीचीं वर्णनें निरनिराळ्या कवींनीं दिलेलीं आहेत, त्यांजवरून बाह्य सृष्टीच्या सौंदर्याच्या आनंदास आपले संत कवी अगदींच अपरिचित होते, हें ह्मणणें सहासाचें होईल. उदाहरणार्थ, एकान्तवासांतील रम्य स्थळांचें वर्णन करतांना ज्ञानदेव ह्मणतातः—

जेथ अमृताचेनी पाडें । मुळाहीसकट गोडें ॥
जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ॥
पाउला पाउला उदकें । वर्षाकाळावीण अतिचोखें ॥
निर्झरें कां विशेषें । सुलभें जेथें ॥
हा आतपही अळुमाळ । जाणिजे तरी शीतळ ॥
पवन अति निश्चल । मंद झुळके ॥

1. The Beautiful is the portal through which man enters into the religion of truth ! (Merzes's European Thought in the nineteenth century Vol. IV P. 17)

बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिघे श्वापद ॥
शुकहन षट्पद । तेउतें नाहीं ॥
पाणिलगें हंसें दोनीचारी सारसें । कवणें एके वेळे बैसे ॥
कवणें कोकिलही हो कां । निरंतर नाहीं ॥
तरी आलीं गेलीं कांहीं । होतु कां मयुरेंही ।
आह्मी ना न ह्मणों । परी अवश्यक पांडवा ॥
ऐसा ठाव जोडावा । तेथें निगूढमठ होआवा ॥
कां शिवालय ॥ (ज्ञा. ६-११-७३-७९.)

तुकोबा ज्या भंडारा डोंगरावर बसत असत,त्या डोंगराच्या सभोंवतालच्या सृष्टीच्या देखाव्याचें पांगारकर यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:— 'भंडाऱ्यावर पश्चिमेचे बाजूस एक गुहा असून जवळच पाण्याचा झरा आहे, तेथें त्यांची (तुकोबाची) वस्ती झाली. डोंगराच्या शिखरावरून चारी बाजूस लहान मोठे डोंगर, रम्य हिरवींगार शेतें, इंद्रायणी नदीचा प्रवाह व अनेक लहान मोठे ओहळ यांची अनुपम शोभा दिसते, अशी त्या डोंगराला तुकोबांच्या सहवासामुळें तपोवनाची योग्यता आली.

(तु. चरित्र पान २८८.)

त्याचप्रमाणें समर्थ ह्मणतातः—

'येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें ॥
अंतरात्म्यासरिसें फिरावें । कांहीं तरी ॥
जयास येकान्त मानला । अवघ्या आधीं कळे त्याला ॥
त्यावेगळें वडिलपणाला । ठावचि नाहीं ॥

(दा. १८-१०-४९-५०.)

तेव्हां अध्यात्मिक विचारांकरितां एकान्तांतील रम्य स्थळांची कशी आवश्यकता असते, व तशीं स्थळें विवेकास कशीं पोषक ठरत असतात, हें ज्ञानदेवाच्या व समर्थांच्या उताऱ्यांवरून कळून येणार आहे.

सारांश, संसार करून परमार्थ साधणाऱ्या इसमानें नित्यशः थोडे क्षण एकान्तवासाचें सेवन करावे, व ईश्वरानें मनुष्यप्राण्यांकरितां जें सृष्टीरूपी नंदनवन करून ठेविलेलें आहे, त्यांत मनसोक्त विहार करून शांतिसुखाचें सेवन त्यानें अखंड करीत जावें. हें सर्व प्राप्त होण्यास विवेकरूपी रज्जूनें

सैरावैरा धांवणाऱ्या मनास खेंचून आणून सृष्टिविषयक सुंदर वस्तूंवर त्यास खिळवून ठेविलें असतां, त्याचें जीवित रमणीय होणार; संसार आणि परमार्थ यांची जोड घालून परमेश्वरविषयक ज्ञान प्राप्त करून घेण्याची धमक त्याच्या अंगीं येणार; व मगच खालील श्रुतीतील गोड अनुभव त्याच्या वाट्यांस आल्यास नवल काय ?

'सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षि शिवो मुखम् ॥
सर्वतः श्रुतमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥

अर्थः—विश्वामध्यें ब्रह्मस्वरूपी परमेश्वराचे हातपाय चोहींकडे आहेत. त्याचें डोकें आणि मुख हीं चोहींकडे आहेत, त्याचे कर्ण चोंहीकडे आहेत, तो सर्वांस व्यापून राहिलेला आहे.

प्रकरण पंधरावें.

'व्यावहारिक मोक्ष मिळविण्याचा उपाय.'

'देह त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी.
मना चंदनाचे परि त्वां झिजावें;
परि अंतरीं सज्जना नीववावें.' —समर्थ.

लोकांनीं आपणांस चांगलें ह्मणावें, त्यांनीं आपणांवर प्रेम करावें, जिकडे तिकडे आपला बोलबाला व्हावा, अशी कोणाची इच्छा नसते ? परंतु, मनुष्याची अशी इच्छा असूनहि त्याची समाजाकडून वेळोवेळीं कशी संभावना होत असते, याचा कटु अनुभव प्रत्येकाच्या वांट्यास थोडाबहुत येत असतोच. ज्याच्या वांट्यास असा अनुभव येत नाहीं, त्याचें नशीबच जोरावर, असेंच म्हटलें पाहिजे. तेव्हां, अशी स्थिति कां असावी, लोकांनीं आपणांस कां विचारूं नये, आपल्या अंगच्या गुणांचा मोबदला आपणांस समाजाकडून कां मिळूं नये, लोकांत आपली चहा कां होऊं नये वगैरे कारणपरंपरेची मीमांसा करणें फार अगत्याचें आहे असेंच कोणासही वाटणार आहे. या सर्व कारण-परंपरेची मीमांसा करूं पहातां एक गोष्ट कळून येईल कीं मनुष्य-स्वभावांत जे कांहीं दोष आहेत, त्यांपैकीं एक दोष ठळकपणें जो

दिसतो तो हा कीं, मनुष्याला स्वतःचे कित्येक दोष दिसत नसतात, किंवा माहीत असले तरी तिकडे त्याचें दुर्लक्ष असतें ह्मणून ह्मणा, किंवा जाणून बुजून तिकडे तो काणाडोळा करीत असतो म्हणून ह्मणा, समाजांत त्याची किंमत होत नाहीं; व ज्या समाजांत आपण वावरतों,त्या समाजाकडून आपल्या गुणांची चहा झाली नाहीं तर, जगण्याचा-जीविताचा हेतु सफळ झाला नाहीं, असेंच समजलें पाहिजे. अशा तऱ्हेचें जीवित केव्हांहि कष्टमयच ठरणार. तेव्हां, या बाबतींत एकच उपाय दिसतो कीं, लोकांचे दोष काढण्याच्या भरीस न पडतां, आपल्याकडून कुटुंबांत काय, किंवा समाजांत काय, काय काय गोष्टी चुकत असतात, व आपणच पुष्कळ वेळां दोषी कसें ठरत असतों या गोष्टीची मीमांसा करणें अगत्याचें आहे.

विषयाचें प्रतिपादन सोईनें करतां यावें, म्हणून मनुष्याची हल्लीं रहाणी कशी होऊन बसलेली आहे, याचें विहंगमदृष्ट्या पर्यालोचन करूं.

गेल्या पांच पन्नास वर्षांमध्यें आपल्या समाजावर इष्ट अनिष्ट असे जे कांहीं परिणामकारक फेरबदल झालेले आहेत, त्यांपैकींच आपल्या कौटुंबिक रहाणीमध्यें झालेला फेरफार फार महत्त्वाचा समजला पाहिजे. सुमारें चाळीस पन्नास वर्षांमागें आपल्या समाजांत सरास एकत्र कुटुंबाची पद्धत होती. पण, मनुष्याच्या स्वभावामध्यें कालानुसार फेरबदल झालेला आहे ह्मणून ह्मणा, किंवा हा फेरबदल हल्लींच्या बिकट परिस्थितीमुळें झालेला आहे म्हणून ह्मणा, (हा प्रश्न सोडविण्याची या ठिकाणीं जरूरी नाहीं,) किंवा, या दोन्ही गोष्टींचा समाजावर कमीजास्त परिणाम होत चाललेला आहे ह्मणून ह्मणा, आज आपल्यामध्यें सरास एकत्र कुटुंबाच्या पद्धतीचा वास नाहीं, असें ह्मणतां येणार आहे. तिच्या जागीं विभक्त पद्धतीचे ठाणें येऊन बसलें आहे. पुनः विभक्त पद्धत चांगली कां एकत्र कुटुंबाची पद्धत चांगली, ह्याहि प्रश्नाचा ऊहापोह या ठिकाणीं करण्याचा नसून फक्त विभक्त कुटुंबाच्या रहाणीचा मनुष्यस्वभावावर काय काय अनिष्ट परिणाम झालेला आहे, हेंच येथें पहावयाचें आहे.हिंदुसमाजांत एकत्रकुटुंब असतांना कुटुंबांतील परस्परांचे संबंध आतांपेक्षां जास्त जिव्हाळ्यानें व आदरानें पाळले जात असत, मातापिता व पुत्र, बंधु बहीण, गुरु शिष्य यांमधील संबंध आज ताणलेले आहेत, असेंच दिसून येणार आहे. मातापित्यास पुत्र विचारीनासा झालेला असून बहिण भावास

पुसेनाशी झालेली आहे;मग दूरदूरच्या नातेवाइकांची गोष्ट कशाला ? ह्मणून कुटुंबांत विस्खळितपणा दिसून आल्यास नवल नाहीं. एकमेकांविषयीं एकमेक तर फटकून राहूं लागल्यानें परस्परविषयक ऋणें आज फिटेनाशीं होत जाऊन, जिव्हाळ्याचें प्रेम, कळकळीची सहानुभूति व विनयपूर्ण आदर या अवश्य गुणास मनुष्यस्वभाव पारखा होत चाललेला आहे.जो तो आपापल्यापुरतें पाहूं लागल्यानें कुटुंबाचे अवयव पृथक पृथक दिसूं लागलेले असून कुटुंबाचें संघटित स्वरूप आज लयास जाऊं पहात आहे.

यावर असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, कालानुसार मनुष्याची परिस्थिति बदललेली आहे व परिस्थितिनुसार हा बदल झालेला आहे, त्याला मनुष्यानें काय करावें ? प्रश्न बरोबर. पण, या प्रश्नालाहि उत्तर देतां येण्यासारखें आहे कीं, कालानुसार परिस्थिति बदललेली असेल तर ती बदलो; पण त्या परिस्थितीचा अनिष्ट परिणाम त्यानें आपल्या स्वभावावर कां करून घ्यावा कोणास ठाऊक ? आज 'मी' पणानें मनुष्य आपली संस्कृति वाढली आहे असें सांगत आहे; पण त्या संस्कृतीचा उपयोग तो आपल्या दोषावर पांघरूण बेमालूम कसें घालावें, इकडेच कुशलतेनें करीत आहे. त्याला कोण काय करणार ! या सुसंस्कृतीचा सदुपयोग त्यानें केला असतां मनुष्यस्वभाव नमुनेदार बनणारा आहे; पण, वस्तुस्थिति मात्र भिन्न आहे-ही गोष्ट स्पष्टतर दिसून येत आहे.

तेव्हां ह्या बदललेल्या परिस्थितीचे अनिष्ट परिणाम त्यास भोगावयास लागूं नयेत, याला आम्ही येथें एकच उपाय सुचवितों व तो त्यानें योजून पहावा; तो हा कीं; कुटुंबामध्यें मातापित्याशीं, बहिणींशीं आप्तइष्टांशीं त्याचा संबंध जेव्हां जेव्हां येतो, तेव्हां तेव्हां त्यांच्याशीं त्याचें निर्व्याज प्रेम खेळतें राहिल, अशीच त्याची रहाणी हवी. आनंदी चेहरा, खटक्याचे प्रसंग टाळण्याची संवय, औदार्यपूर्ण वागणुक सत्यावर निष्ठा व 'मिळता स्वभाव' या गुणांनीं त्यानें आपल्याभोंवतीं पवित्र वातावरण उत्पन्न करावें, ह्मणजेच आपल्या कुटुंबामध्यें तो हवाहवासा झाल्यास नवल तें काय ?

आतां समाजांत व्यवस्थित तऱ्हेनें वागण्यास व लोकांकडून त्याच्या अंगच्या गुणांची चहा होण्यास त्यांच्या अंगीं कोणत्या गुणांचा वास अवश्यपणें असावा लागतो, तें पाहूं.

(अ) स्वभावतःच मनुष्य हा समाजप्रिय आहे. ह्मणून समाजामध्येंच रहाण्यामध्यें तो आपणास 'धन्य' मानून घेत आहे. समाजाशीं फटकून वागणें ह्मणजे त्यानें निसर्गाच्या नियमाविरुद्ध वर्तन करण्यासारखें होय. परंतु, समाजांत असे कांहीं लोक आहेत कीं, ते एकलकोंड्या स्वभावाचे असल्यामुळें घराबाहेर ह्मणून पडावयाचे नाहींत; पडल्यास समाजांत मिसळावयाचे नाहींत; अशीच त्यांची मनोवृत्ति. तेव्हां, असल्या माणसांबद्दल लोकांनां सहानुभूति कां वाटावी हा एक प्रश्न आहे. समाजांत मिसळून लोकव्यवहार केल्यानें मनुष्यास आपल्या अंगच्या दोषांची जाणीव होत असते. व प्रयत्नपूर्वक ते दोष काढून टाकण्याचें त्याच्या मनानें घेतल्यास ते दोष जाऊन त्याच्या स्वभावास सुवळणच लागत जातें; व त्यामुळेंच त्याचें शील बनत असते. समाजांत जसें जसें आपण मिसळत जाऊं तसें सामाजिक दृष्ट्या आपलें वजन—शक्ति—वाढत असतें. हा नियम आहे. किपलिंग ह्मणतोः—[1]

'लांडग्याची शक्ति काय ती तो आपल्या कळपांत असला म्हणजे असते.' ह्याच नियम पर्यायानें मनुष्यप्राण्यास लावतां येईल.

(ब) आपल्या विषयीं लोकांची खरीखुरी सहानुभूति असावी, अशी जर आपली इच्छा असेल, तर आपणही दुसऱ्याबद्दल व्यवहारांत तशीच सहानुभूति दाखविणें जरूरीचें नाहीं काय ? रबरी चेंडूचा आघात जर जमीनीवर झाला तरच, त्याला उसळी यावयाची व तो जितक्या जोरानें होईल तितक्याच जोरानें त्यास वर उसळी यावयाची; हा सृष्टीचा नियमच आहे. मनुष्याच्या कळकळीविषयीं हा नियम लावतां येईल—म्हणूनच समाजांत सहानुभूतीपूर्ण वर्तन मनुष्याचें असावें लागतें.

(इ) मनुष्याची दृढभावना अशी असावी कीं, जग हें सारवस्तूनीं भरलेलें आहे, ह्मणूनच तें एक प्रचंड काव्य आहे; व अशा गूढ काव्याचा आस्वाद त्यानें हरघडीं घ्यावा असाच ईश्वरीसंकेत आहे. काव्याचा आस्वाद घेण्यास मनुष्याची उल्हसित वृत्ती असूनहि त्याच्यामध्यें सहृदयतेच्या गुणाचा वास असावा लागतो. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, त्याचें अंतरंग रंगलेलें असेल तरच त्याची मुखचर्या रंगलेली असणार. अंतर्यामीं ' राम ' असेल तरच त्यास समाजांतील व्यवहारांत तोच

1. 'The strength of a wolf is in the pack'

'राम' दिसत रहाणार. मनुष्याची अशी स्थिति असल्यावर त्याच्या सहवासांत लोकांना आनंद वाटूं लागल्यास आश्चर्य नाहीं.

(ई) मनुष्यानें व्यवहारांत सद्बुद्धि धरणें अगत्याचें आहे. दुसऱ्याचे दोष काढण्यापासून आपला काय फायदा होत असतो, हें कळत नाहीं. जगांत अशी कोणती वस्तु आहे कीं जी सर्वथैव निर्दोषी असते? तिच्या अंगीं जसे कांहीं दोष तसे कांहीं गुण असणें अपरिहार्य आहे. मनुष्याच्या गुणांवर आपली दृष्टि जाणें ही शीलाची गोष्ट होय. हीच गोष्ट व्यवहारतः श्रेयस्कर ठरणार. धर्मराजास दुर्योधनाचे गुणच दिसत असल्यामुळें त्यास तो 'सुयोधन' ह्मणत असे; व दुर्योधनास पांडवाच्या अंगचे ढळढळीत गुण दिसत असूनहि त्याच्या दोषांचें आविष्करण तो तुच्छतादर्शक व व्यंजक अशा शेलक्या शब्दांनींच करीत असे. ह्मणूनच व्यवहारांत मनुष्याची 'दुर्योधनी दृष्टि' असूं नये.

(उ) आतां, मनुष्याचा व्यवहार पाहिला असतां बहुधा तो आपलपोटेपणाचा असलेलाच दिसून येतो. व हीच स्वार्थप्रियता त्याच्या हाडामांसाशीं इतकी खिळून राहिलेली दिसून येत आहे कीं, त्याचा विचार, उच्चार व आचार या त्रयींत स्वार्थलंपटतेचा धागा त्यानें गोंवून टाकलेला असतो. इतक्या स्वार्थप्रियतेनें डोळ्यावर धुंदि आल्यामुळें जन तुमची वाट सोडून चालल्यास नवलहि पण नाहीं. ह्मणून व्यवहारांत मनुष्यानें बायबलमधील सुवर्णमय नियम मनापुढें ठेवून तदनुसार कृति आचरणांत उतरविण्याची खटपट केली पाहिजे. तो नियम सर्वांस परिचित असाच आहे [1] कीं:—

'लोकांनीं तुमच्यांशीं ज्याप्रमाणें वागावें, अशी तुमची इच्छा असते, त्याप्रमाणें तुह्मी (प्रथम) त्यांच्याशीं वागत चला.'

'आल्फ्रेड धि ग्रेट' यास ह्या नियमाचें महत्त्व इतकें पटून गेलें होतें कीं, तो आपल्या प्रजेस नेहमीं ह्मणत असे कीं, मनुष्याला आपण व्यवहारांत जें काय करतों, तें बरोबर आहे, अगर चूक आहे, हें ताडण्यास वरील बायबलांतील वचनाचा त्यानें सदा उपयोग करीत राहिलें पाहिजे, म्हणजे

1. "Therefore all things whatsoever ye would that men should do to you, do ye even so to them." (St. Math VII 12,)

त्याला दुसऱ्या कोणत्याहि नियमांच्या पुस्तकाची जरूरी भासणार नाहीं. सारांश, मनुष्यानें 'व्यावहारिक योगी' (Gentleman) व्हावयास हवें.[1]

परंतु, लोकांची सर्वसाधारण समजूत अशी असते कीं, सामाजिक दृष्ट्या मनुष्यास त्यानें संपत्ति कमाविल्याशिवाय महत्त्व चढत नाहीं—व त्याशिवाय त्यास लोकव्यवहारांत अग्रस्थान मिळत नसतें. पण, ही त्यांची कल्पना थोड्याशा विचारांतीं भ्रामक असल्याचें कळून येईल. जगामध्यें उच्च कुळांतील डायोजिनीस, सॉक्रेटीस, एपमिनोन्डास यासारख्या माणसांना लक्ष्मीचा धोपट मार्ग मोकळा असतां त्यांनीं गरीबीच पत्करली; व लोकव्यवहार करून त्यांनीं आपल्याच समाजाच्या काय, पण जगरूपी प्रचंड समाजाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलेलें आहे.

अशाच गरीबी स्थितींतील पण व्यवहारतः मनुष्यत्वाच्या पूर्णावस्थेप्रत पोंचलेल्या धीरोदात्त व्यक्तींस कर्तव्य-क्षेत्र वाटेल तेवढें-अफाट सांपडत असल्यामुळें त्या क्षेत्रामध्यें स्वैरसंचार करून आपल्या वांट्यास आलेलीं सामाजिक कर्तव्यें ते बजावीत असतात. समाजांतील व्यवहारांत उच्च सांपत्तिक स्थितिमुळें क्रमप्राप्त आचारांचे निर्बंध त्यांस आड येत नाहींत; त्यामुळें त्यांच्या अंगच्या गुणांचें तेज समाजांत वाटेल तसें पडत असतें कर्तव्य तें काय. व समाजाकरितां तें कां म्हणून करावें व कसें करावें याविषयींची मीमांसा त्यानीं केल्यानें कर्तव्य हेंच त्यांच्या आयुष्याचें ध्येय होऊन बसत असतें. त्यांच्या आयुष्याचें ध्येय कर्तव्य' त्यांच्या जीवाचा 'विसावा' कर्तव्य अशी स्थिति असल्यावर कर्तव्यदेवतेच्या आराधनास ते कसूर करीत नसतात. म्हणूनच कर्तव्यदेवतेच्या कृपाछत्राखालीं अशीं माणसें रहात असल्यानें स्वतःच्या जीवनाकरितां म्हणूनच त्यांच्या हांतून कर्तव्यकर्म पार पडत असतें !

तत्त्ववेत्ता इमर्सन म्हणतोः—

1. 'The gentleman is a man of truth', lord of his own actions, and expressing that lordship in his behaviour, not in any manner dependent and servile either on persons or opinions, or possessions. Beyond this fact of truth and real force, the word denotes good nature and benevolence.'

आणखी एक गोष्ट; अशाच धीरोदत्त विभूतींकडून लोकसंग्रहाचें कार्य होत असतें. समाज हें एक अवाढव्य कुटुंब व त्या कुटुंबाचें हित तेंच समाजहित अशी त्यांची व्यापकदृष्टि असल्यानें आयुष्याचें ध्येय निव्वळ उदर भरणें हेंच नसून कांहीं तरी परार्थहित, मग अंशत: कां होईना, आपल्या हांतून व्हावें, अशीच त्यांची उदात्त भावना झालेली असतें. कालांतरानें त्यांच्या अंगच्या गुणांचा विकास होत जाऊन 'माणुसकी' हा गुण काय आहे, हें त्यांस पटून या गुणास अनुरूप असेंच आचरण त्यांचे हांतून उतरत असल्यास नवल नाहीं.

'माणुसकी'चीं लक्षणें एका लेखकानें पुढीलप्रमाणें नमूद केलेलीं आहेत:-

(१) 'अन्य कोटींतील निरपराधी, निरुपद्रवी व विशेषतः मनुष्याशीं मैत्रीनें वागून त्याला उपयोगी पडणारे जे प्राणी, त्यांना आपल्या वागणुकीपासून भीती वाटणार नाहीं, असेंच आपलें दयापूर्ण वर्तन असावें.

(२) 'मनुष्यमात्रांविषयीं ममता व बंधुभाव संभाळणें-ही गोष्ट अवश्य आहे.'

(३) जगत्कर्त्याचा बोध करून घेणें, त्याच्याविषयीं निःसीम पूज्यभाव आपल्या मनांमध्यें वागवून त्याच्यावर प्रेम करणें-अशा या तीन गोष्टी होत.

हीं तीन लक्षणें मनुष्याच्या अंगीं येण्यास त्यानें आपल्यामधील 'विवेक'रूपी शक्तीची मदत घेणें जरूरीचें आहे; किंबहुना या शक्तीची कांस धरल्यावांचून त्याच्या अंगीं 'मनुष्यत्वा'च्या गुणाची धारणा होणें अशक्यप्राय असतें. व पूर्णत्वानें हा गुण त्यांच्या अंगीं उतरल्यास त्यांसच 'नर करे तो नरका नारायण हो जाय' ही म्हण अक्षरशः लागूं पडते. व अशा माणसांच्या हांतून असामान्य कामगिऱ्या पार पडत असल्यामुळें त्यांसच 'परमेश्वराचे अवतार' ही व्यावहारिक पदवी लाभत असते.

अशा तऱ्हेच्या विभूतींच्या आचरणांत एक गोष्ट दिसून येते कीं, त्यांचें अंतिम ध्येय जगत्कर्त्याचें ज्ञान करून घ्यण्याचें असतें. हें ध्येय साध्य होण्यास चौदाव्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें 'विवेका'च्या जोरावर एकान्त-वासाचा आश्रय करून दिव्यक्षण निर्माण करून अनुपम सुखाचा ते आस्वाद घेत असतात. व अशा आस्वादाचे घुटके वारंवार घेत राहिल्यानें त्यांच्या मनरूपी आकाशांत भूतदयेचें वारें खेळत राहून अखिल मानव-जातीवर

त्यांचें प्रेम जडून जातें व 'समाजपूजा' हीच परमेश्वराची पूजा किंबहुना, परमेश्वराची पूजा हीच समाजपूजा हा सिद्धांत त्यास पटतो. समाजहित साधण्याकडेच अशा विभूतींचा 'विचार, उच्चार व आचार खर्ची पडत असून एका आधुनिक लेखकानें म्हटल्याप्रमाणें त्यांच्या 'सुचरित्राचा प्रभाव मानव-सृष्टीच्या इतिहासांत चिरंतन हितकारी असे परिणाम घडवून आणीत असतो' म्हणूनच अशा विभूती समाजास ललामभूत होऊन राहिल्यास व मागें चिरकाल नांव ठेविल्यानें त्यांनीं 'व्यावहारिक मोक्ष मिळविल्यास नवल तें काय ?

ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थकची करावें ॥
जनीं मरोन उरावें । कीर्तिरूपें ॥

दा. बो. ३-९-४४

॥ ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु ॥

॥ शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु ॥
